# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

# आरंभिक भारत

**(सुरुवातीपासून ते ३ ऱ्या शतकापर्यंत)**

**(Early India - from the beginning to 3rd Century B.C.)**

(शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून)

**एम. ए. भाग-१**

**इतिहास**

HIST-101 (Compulsory Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१८
एम. ए. भाग - १ करिता (आरंभिक भारत - सुरुवातीपासून ते ३ ऱ्या शतकापर्यंत)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-939381-0-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)
★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ इतिहास समन्वय समिती ■

अध्यक्ष - **प्राचार्य ए. एल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. व्ही. आर. पाटील**
  आर्टस् कॉलेज, कोवाड,
  ता. चंदगड, जि. कोल्हापूर
- **प्रा. डॉ. नंदा पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**आरंभिक भारत** (सुरुवातीपासून ते ३ ऱ्या शतकापर्यंत)
**एम. ए. भाग–१ : इतिहास** HIST 101

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. निरंजन कुलकर्णी**<br>मा. श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले | १ |
| **डॉ. पी. के. पाटील**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | २ |
| **डॉ. शर्मिला अ. साबळे**<br>राजर्षी शाहू कला आणि वाणिज्य महाविद्यालय, रुकडी | ३ |
| **डॉ. मंजुश्री शिवाजीराव घोरपडे**<br>इतिहास विभागप्रमुख, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर | ४ |

### ■ संपादक ■

**डॉ. निरंजन कुलकर्णी**
मा. श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज,
हातकणंगले

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्रामार्फत शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून बहि:स्थ विद्यार्थ्यांकरिता दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यास सुरुवात झाली. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून म्हणजेच २०१८-१९ पासून सत्रपद्धती राबविण्यात येत आहे व त्यानुसार अभ्यासक्रमाचीही पुनर्रचना करण्यात आली आहे. यावर्षी इतिहास विषयाच्या एम. ए. भाग-१ या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''आरंभिक भारत (सुरुवातीपासून ते ३ ऱ्या शतकापर्यंत)''. या विषयाच्या स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकातील विविध घटकांचे लेखन शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्यापन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांनी केले आहे. यात साधी-सोपी, ओघवती भाषा, स्पष्ट मांडणी, समर्पक उदाहरणे, संकल्पनांचे विवेचन, विषय आकलनासाठी तक्ते-आकडेवारी इ. चा वापर केला आहे. त्याचबरोबर प्रत्येक घटकाच्या शेवटी प्रश्न व त्यांची उत्तरे आणि सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द दिलेले आहेत. घटक विषयासंबंधी अधिक वाचनासाठी मराठी व इंग्रजी भाषेतील संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

''आरंभिक भारत (सुरुवातीपासून ते ३ ऱ्या शतकापर्यंत)'' या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये शिकारीकडून संस्कृतीकडे, वैदिक संस्कृतीतील संक्रमण, दुसरे नागरीकरण आणि अवैदिक धर्मांचा उदय आणि मौर्य साम्राज्य इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तक लेखनात स्पष्टता आणि अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरीही काही दोष किंवा उणिवा जाणवल्यास विद्यार्थ्यांनी व वाचकांनी आमच्या निदर्शनास आणून दिल्यास पुढील आवृत्ती अधिक सुधारित करता येईल. हे पुस्तक विद्यार्थ्यांबरोबरच इतिहास अभ्यासकांनाही उपयुक्त ठरेल याची आम्हाला खात्री वाटते. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूर शिक्षण विभागाचे संचालक, सर्व प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी वर्गाने अत्यंत परिश्रम घेतले आहेत. त्याबद्दल त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. या पुस्तकासाठी घटक लेखन करून सहकार्य केल्याबद्दल सर्व लेखकांचा मी आभारी आहे.

**■ संपादक ■**

**डॉ. निरंजन कुलकर्णी**

मा. श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
हातकणंगले

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■


अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहादूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अबंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | शिकारीकडून संस्कृतीकडे | १ |
| २. | वैदिक संस्कृतीतील संक्रमण | ३३ |
| ३. | दुसरे नागरीकरण आणि अवैदिक धर्मांचा उदय | ६८ |
| ४. | मौर्य साम्राज्य | ८८ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक –१

# शिकारीकडून संस्कृतीकडे

**अनुक्रमणिका :**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ विभाग १ : अन्न संग्राहक आणि शिकारी

अ) पुराश्मयुग

ब) मध्याश्मयुग

१.२.२ विभाग २ : आद्य शेतकरी आणि रहिवासी

अ) नवाश्मयुग

ब) दख्खनमधील ताम्रपाषाणयुग

१.२.३ विभाग ३ : हडप्पा संस्कृती–पहिले नागरीकरण

अ) नगररचना व घरे

ब) राजकीय आणि आर्थिक परिस्थिती

क) सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


## १.० उद्दिष्टे

या प्रकरणात आपल्याला लक्षात येईल की–

- प्रागैतिहास अथवा अश्मयुग म्हणजे काय? या युगातील मानवाचे एकंदर जीवन कसे होते?

- इतिहासपूर्व काळ/ताम्रपाषाणयुग म्हणजे काय?
- हडप्पा संस्कृतीची कोणती वैशिष्ट्ये होती?

## १.१ प्रस्तावना :

प्रागैतिहासिक (Prehistoric) काळ म्हणजे मानवाच्या इतिहासातील प्रारंभीचा कालखंड. या काळास 'अश्मयुग' (Stone Age) असेही म्हंटले जाते. या युगामध्ये पुराश्मयुग, मध्याश्मयुग आणि नवाश्मयुग हे उपकालखंड येतात. यातील शेवटचा नवाश्मयुगीन कालखंड हा एक क्रांतीकारी कालखंड होय.

यानंतर दगडी हत्यारांची जागा धातू (तांबे) घेतात. त्याचबरोबर भारतातील पहिलीवाहिली खेडी उदयास येतात. ही खेडी आद्य शेतकऱ्यांनी वसवलेली असतात. यास 'ताम्रपाषाणयुग' असे म्हणतात. महाराष्ट्रातील या युगाला 'दख्खन ताम्रपाषाणयुग'(Deccan Chalcolithic) म्हणून ओळखले जाते. या युगात, भारतभर जरी खेडी असली तरी भारताच्या वायव्य भागातील काही खेडी प्रचंड विकसित होतात. येथे भारतात पहिलीवाहिली नगर उदयास येतात. या नागरी संस्कृतीस 'हडप्पा संस्कृती' असे म्हटले जाते. हा भारताचा इतिहासपूर्व (Protohistoric) कालखंड होय.

## १.२ विषय विवेचन :

प्रागैतिहासिक काळातील मानव हा शिकारी आणि अन्न संग्राहक होता. विशेषत: पुराश्मयुगामध्ये आणि मध्याश्मयुगामध्ये अशी परिस्थिती होती. या दोन युगातील मानवी जीवन कसे होते ते या भागात पहावयाचे आहे.

### १.२.१ विभाग १ : अन्न संग्राहक आणि शिकारी

### (अ) पुराश्मयुग :

मुख्यत्वे हत्यारांच्या विकासावरुन, पुराश्मयुगाचे तीन उपकालखंड पडतात; पूर्वपुराश्मयुग, मध्यपुराश्मयुग आणि उत्तरपुराश्मयुग. पूर्वपुराश्मयुगीन काळात जरी बरीचशी जमिन बर्फाच्छादित असली तरी- येथे मोठ्या प्रमाणावर जंगले दिसून येतात. या काळातील मानव हत्ती, रानटी बैल, म्हैस, गेंडा अशा मोठ्या प्राण्यांची शिकार करताना दिसतो. पुढे उत्तरपुराश्मयुगामध्ये जंगलाप्रमाणेच गवताळ पट्ट्यांचेही आकर्षण वाढलेले दिसते. या काळातील मानव आता मोठ्या प्राण्यांबरोबरच नीलगायी, हरीण अशा लहान प्राण्यांची शिकार करु लागतो.

या मानवाच्या वसाहतीचे अवशेष विविध ठिकाणी सापडलेले आहेत. असे दिसते की हा मानव गुहेमध्ये तसेच उघड्यावर रहात होता. तसेच, हा ज्या ठिकाणी कच्चा माल मोठ्या प्रमाणावर मिळत असे त्यांच्या शेजारी रहाताना दिसतो.

हत्यारे : प्रागैतिहासिक मानवाने हत्यारांसाठी मुख्यत्वे दगडांचा वापर केला. त्याच्या विकासाबरोबरच

हत्यारांमध्येही विकास होत गेलेला दिसून येतो. जसे, पूर्वपुराश्मयुगात स्थानिक ठिकाणी मिळणाऱ्या गोट्यांचा (Pebbles) वापर करुन तोडहत्यारे (Chopping Tools) व दगडांच्या छिलक्यांपासून हातकुऱ्हाडी (Hand-axe) तयार केल्या जात होत्या. तर, मध्यपुराश्मयुगात छिलक्यांचा (Flakes) आणि पुढे उत्तरपुराश्मयुगात हत्यारांसाठी दगडी पात्यांचा (Blades) वापर केला जात असे. यासाठी त्याने मुख्यत्वे क्रिप्टो क्रिस्टलाईन सिलिसियस (Crpto Crystaline Silicious) दगडाचा वापर केला.

समाजजीवन, राहणीमान वगैरे : एकंदरीत या काळातील मानव हा पूर्णपणे भटका असून, मुख्यत्वे शिकार व अन्न संग्राहण, मासेमारी हेच त्याचे उपजिविकेचे साधन होते. सुरुवातीच्या काळात हा गेंडा, हत्ती असे मोठे प्राणी, पुढे पुढे बैल, रेडा व शेवटी शेवटी जंगली वराह, चिंकारा, नीलगाय, हरणांसारख्या वेगवान आणि छोट्या प्राण्यांची तो शिकार करु लागलेला दिसतो. त्याच्या आहारात कासव, मासे यांचाही समावेश दिसून येतो. तर मध, फळे, मूळं, बीया, पानं इ. चा तो खाण्यासाठी संग्रह करीत असे. याठिकाणी एक लक्षात घेतले पाहिजे की पुराश्मयुगीन मानवांमध्ये शिकारीपेक्षा, कंदमुळे आणि फळे गोळा करण्यावर भर असावा. त्याचप्रमाणे आहाराचा विचार करता असे दिसते की हा मानव आपले संसाधन पूर्णपणे संपवून टाकीत नसावा. तो सभोवतालच्या भागातील काही भाग राखून ठेवत असावा. त्याच्या निवाऱ्याचा विचार करता असे दिसते की हा मानव भटका जरी असला तरी तो-थोड्या काळासाठी का असेना काही प्रमाणात आपल्या निवाऱ्याचाही विचार करु लागलेला आहे. हुणसगी (कर्नाटक) या ठिकाणी ग्रॅनाईटच्या दगडांनी वेढलेली, एक अंडाकृती चोपलेली जमिन मिळालेली आहे. तसेच भीमबेटका (मध्य प्रदेश) या ठिकाणी गुहेमध्ये दगडांची एक भींत मिळालेली आहे. तसेच काही ठिकाणी तो फांद्या, गवत, पानं, बांबू यांचा वापर करुन झोपड्याही बांधत असावा असे दिसते. यावरुन या युगातील मानव काही काळासाठी का असेना राहण्यासाठी घरांचे प्रयोग करीत होता असे दिसते.

या काळातील मानवाच्या धार्मिक श्रध्दांविषयीही आपल्याला काही अंदाज बांधता येतो. लोहंडा नाला (बेलन खोरे-उत्तर प्रदेश) याठिकाणी एक कोरलेला हाडाचा तुकडा सापडलेला आहे. त्याला मातृदेवता असे म्हटलेले आहे. तसेच कर्नुल गुहेमध्ये, एक छिद्र असलेला प्राण्याच्या दाताचा तुकडा सापडलेला आहे. हा दात ताईत म्हणून वापरला जात असावा. तसेच पाटने याठिकाणी शहामृगाच्या अंड्यापासून बनवलेला एक मणी सापडलेला आहे. या सर्व वस्तू पुराश्मयुगीन मानवाच्या धार्मिक श्रध्दाविषयी आपल्याला माहिती देतात. त्याचप्रमाणे बागोर (मध्य प्रदेश) याठिकाणी, चोपलेल्या जमिनीवर एक त्रिकोणी दगड सापडलेला आहे. अभ्यासकांच्या मतानुसार हा एक विधीचा भाग असावा. हे लक्षात घ्यावे की, आजसुध्दा, याच परिसरातील कोल आणि बैगा या जमाती अशाच प्रकारे पूजा/अर्चना करताना दिसतात.

**(ब) मध्याश्मयुग :**

मध्याश्मयुगात प्राणी, पक्षी, झाडं यांच्या प्रकार-आकार आणि प्रजातीमध्येंही परिवर्तन आलेले दिसते. त्मामुळे, मानव जरी पूर्वीसारखाचा शिकारी-संग्राहक राहिला तरी त्याच्या हत्यारे आणि शिकारीच्या तंत्रांमध्येही परिवर्तन घडून आले. त्याने वेगवान व अधिक प्रभावी अशा संयुक्त हत्यारांचा (Composite

tools) मोठ्या प्रमाणावर वापर सुरु केला. यासाठी त्याने मोठ्या प्रमाणावर सूक्ष्मास्त्रे (microliths) बनविण्यास सुरुवात केली. यामुळे हरीण समुहातील छोट्या आणि वेगवान प्राण्यांची शिकार करणे त्याला सोपे होऊ लागले. अर्थातच अशा प्रकारच्या हत्यारांचा त्याला फार फायदा झाला. जसे, ही हत्यारे मुख्यत्वे संयुक्त स्वरुपाची असल्याने, कोणताही विशिष्ट आकार गृहीत धरुन हत्यारे करणे आता फारसे गरजेचे राहिलेले नाही. फक्त ही सूक्ष्मास्त्रं ज्या लाकडात/दगडात जोडायची आहे ते हव्या त्या आकारांची असली की झाले! तसेच, या काळातील हत्यारे ही पूर्वीपेक्षा वजनाने हलकी असल्याने, सोबत बाळगणे हे आता अधिक सोयीचे झाले. शिवाय ही हत्यारे तुटली अथवा हरवली तरी जागच्या जागी तयार करणे ही सोपे होते. विशेषत: अशा सूक्ष्मास्त्रांचा वापर करुन त्याने आपले धनुर्धारी कौशल्य विकसित केले. हा मानव मासे पकडत होताच आता पक्ष्यांचीही तो मोठ्या प्रमाणावर शिकार करु लागला.

मध्याश्मयुगीन मानवाच्या वसाहतीचा विचार करता असे दिसून येते की, या काळातील वसाहती फार मोठ्या प्रमाणावर मिळालेल्या आहेत. म्हणजेच, या काळातील लोकसंख्या वाढलेली दिसते. त्याचे कारण म्हणजे या काळातील मानव हा अधिक विकसित झालेला असून तो पर्यावरणावर नियंत्रण करु लागलेला होता. म्हणूनच मध्याश्मयुगीन मानवाच्या वसाहती भारतभर पसरलेल्या दिसून येतात. पर्यावरणावरील नियंत्रणाची ही शिदोरीच पुढे म्हणजे नवाश्मयुगात त्याला शेतीचा आणि पशुपालनाचा शोध लावण्यास सहाय्यक ठरली.

- **समाजजीवन, राहणीमान वगैरे :**

या मध्याश्मयुगीन काळात लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली दिसून येते. त्यामुळे, मानवाने पारंपारिक प्रदेशाप्रमाणेच नवनव्या प्रदेशात पदार्पण केले. त्याने विविध भौगोलिक पर्यावरणाशी-संस्कृतीशी सहसंबंध निर्माण केले. हा जरी भटका असला तरी, अल्पकाळासाठी, रहाण्यासाठी गुहेचा अथवा गवताच्या झोपड्यांचा वापर करीत असावा. तसेच, तो एकाच ठिकाणी नियमितपणे वसतीही करताना दिसतो.

त्याच्या आहाराचा विचार करता असे दिसते की तो जंगली रेडा, ऊंट, गेंडा अशा मोठ्या प्राण्यांची शिकार करीत असे. शिवाय, सूक्ष्मास्त्रांच्या संयुक्त हत्यारांमुळे तो आता छोट्या तसेच वेगाने धावणाऱ्या प्राण्यांची शिकार करु शकला, जसे, हरिण समुहातील प्राणी लांडगा, कासव, ससे, मुंगुस इ. याशिवाय तो मासेमारीही करीत असे. त्याच्या आहारात शाकाहाराचाही समावेश होता. तो जंगली कंदमुळं, फळं, मध, बिया, खाण्यायोग्य गवत वगैरेचं सेवा करीत असे. याठिकाणी हे लक्षात ठेवले पाहिजे की या मानवाला आता अन्नधान्याचे महत्व कळू लागलेले होते. तसेच तो किरकोळ प्रमाणात देवाणघेवाण व पशुपालनही करताना दिसतो.

**मध्याश्मयुगीन कला/गुहाचित्रे** (Rock-art) **:**

मध्याश्मयुगीन मानवाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील एक महत्वाचा भाग म्हणजे गुहाचित्रे होय. साधारणत: १८६७-६८ मध्ये भारतीय पुरातत्व खात्याच्या ए.सी.एल. कार्लाइल यांनी कैमूर पवर्तराजीतील

सोहागीघाट (जि. मीर्झापूर) याठिकाणी मध्याश्मयुगीन गुहाचित्रांचा शोध लावला. त्यापासून आजपर्यंत एकूण १५० गुहांचा शोध लागलेला असून त्याची १९ गटांत विभागणी होते. यातील बहुतेक गुहा (३/४) या मध्य प्रदेशातील विंध्य-सातपुडा पर्वतरांगामध्येच वसलेल्या आहेत. यामध्ये, भीमबेटकाची (भोपाळपासून ४५ कि. मी. वर) गुहाचित्रं ही प्रातिनिधिक व प्रसिध्द अशी आहेत. व्हि.एस.वाकणकर यांना १९५७ मध्ये याठिकाणी गुहाचित्रं सापडली.

मठपाल या विद्वानांनी येथील चित्रांची तीन मुख्य टप्प्यात विभागणी केलेली आहे. यातील पहिल्या पाच उपटप्प्यांमध्ये मध्याश्मयुगीन चित्रं दिसून येतात. ही चित्रे गुहांच्या छतावर व भिंतीवर काढलेली आहेत. यासाठी या मानवाने एकूण १६ प्रकारचे रंग अथवा रंगछटा वापरलेल्या आहेत. अर्थात पांढरा आणि फिकट लाल या रंगछटा मोठ्या प्रमाणावर वापरलेल्या दिसून येतात. अशा रंगासाठी नैसर्गिक (स्थानिक खनिजांचा) रंगांचा वापर केलेला दिसून येतो. या रंगांमध्ये लाल (रेड ऑक्साईड), पांढरा (चुनखडी), हिरवा (हिरवा चॅल्सेडोनी दगड) यांचा विविध छटांमध्ये समावेश होतो. त्याने रंग टिकावा म्हणून हे रंग चरबी, अंड्याचा पांढरा भाग आणि डिंकामध्ये कालवून वापरलेले दिसतात. तर, प्राण्यांच्या शेपटांपासून ब्रश तयार केलेले आहेत. अभ्यासकांनी या चित्रांवरुन चित्रकलेच्या एकूण १२ शैली ओळखलेल्या आहेत. ही मुख्यत्वे रेखाचित्रे असून यामध्ये नंतर रंग भरला जाई.

चित्रविषयांमध्ये मुख्यत्वे प्राणी व शिकारीचे प्रसंग प्रधान दिसतात. भीमबेटकामध्ये एकूण २९ प्राण्यांचे प्रकार अभ्यासकांनी ओळखलेले आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणावर चितळ, बिबट्या, वाघ, हत्ती, गेंडा, काळवीट, हरिण, रानडुक्कर, खार इ. विविध प्राण्यांचा, त्यांच्या हालचालीसह समावेश करता येईल. त्याप्रमाणे पक्षी, मासे, पाली,बेडूक, खेकडा, साळींदर असेही प्राणी दिसतात. त्याने, विविध भौमितिक आकारांनी यांचे शरीर सुशोभित केलेले दिसते.

तर शिकारीच्या दृश्यात सामुहिक तसेच एकेकट्याने केलेल्या शिकारींची तसेच प्राण्यांना सापळ्याद्वारे पकडण्याची चित्रं आहेत. यामध्ये शिकारी हे काळविटांची तसेच इतर प्राण्यांची शिंगे असलेली टोपी वापरताना दिसतात. तसेच, यांनी विविध अलंकार सुध्दा परिधान केलेले दिसतात, जसे, हार, बांगड्या, कडे इ. यांच्या शस्त्रांमध्ये सूक्ष्मास्त्रं जोडलेली भाले, धनुष्यबाण, काठ्या, लगोर इ. चा समावेश करता येईल. यातील काही शिकारीच्या प्रसंगात शिकारी सोबतीला कुत्री घेऊन जाताना दिसतात.

शिकारीशिवाय विविध हालचालीमध्ये प्राणी दिसतात. जसे, गरोदर मादी, बछड्यांबरोबर खेळणारे नर-मादी, पक्ष्यांच्या मागे बागडणारी हरिणं, उड्या मारणारे ससे आणि माकडे, चरणारी गुरं इ. त्याचबरोबर मधासारखी वन्यउत्पादनं गोळा करणारी आणि मासेमारी करणारी माणसेही या चित्रांत आहेत. त्याचबरोबर, बाळाचे पालन-पोषण, दफनविधी अशी जीवनचक्रं दाखविणारीही चित्रं आहेत.

मध्याश्मयुगातील 'श्रमविभागणी' ही आपल्याला लक्षात येते. आपल्याला दिसते की पुरुष शिकारीची कामं करीत असत तर स्त्रिया कंदमुळं आणि फळं गोळा करणे आणि अन्न बनविण्याचे काम करीत असत. या चित्रांवरुन मध्याश्मयुगीन मानवाची केश आणि वेशभूषाही आपल्याला कळून येते. यामध्ये, पुरुष झाडाची

साल/जनावरांचे कातड्यांपसून बनवलेले अधोवस्त्रं वापरताना दिसतात. त्यांनी केस मोकळे सोडलेले दिसतात मात्र स्त्रीयांनी आंबाडा बांधलेला दिसतो.

मध्य प्रदेशातील भीमबेटकाप्रमाणेच भारतात इतरत्रही गुहाचित्रं आढळुन येतात. विशेषत: ओरिसामधील सुंदरगढ आणि संबलपूर जिल्ह्यांमध्ये जवळजवळ ५५ गुहा सापडलेल्या आहेत. अर्थात यातील चित्रे अमूर्त स्वरुपाची असून, प्राणी आणि मानव यांची चित्रं अतिशय दुर्मिळ आहेत. केरळमधील 'येझुथु गुहा' याठिकाणीही आपल्याला गुहाचित्रं दिसून येतात. याठिकाणी प्राण्यांची चित्रं आहेत पण मानवाची नाहीत. तर मध्य प्रदेशामधील 'जाओरा' याठिकाणी एक असे अमूर्त चित्रं मिळालेले आहे की ज्यावरुन मध्याश्मयुगीन मानवाच्या विश्वरचनेबद्दल दृष्टिकोन दिसून येतो. याठिकाणी आपल्यासमोर एक जग दिसत असून, त्यामध्ये हवा, पाणी, अग्नी इ. रेखाटनं दिसून येतात.

काही अभ्यासकांना असे वाटते की ही चित्रे मानवाने निव्वळ गुहा सजवण्यासाठी काढलेली नव्हती. तर ही चित्रे काढण्यामागे त्याचा धार्मिक दृष्टिकोन असावा. कारण ही चित्रे अशा गुहांत काढलेली असत की यांचा वापर मानव नियमितपणे रहाण्यासाठी करत नसे. शिवाय, बरीचशी चित्रेही अगोदरच्या चित्रांवर जणूकाही गिरवल्यासारखी काढलेली आहेत. जसे, एखादा प्राणी, वारंवार गिरवल्यावर तो मोठ्या प्रमाणावर आपल्याला मिळेल ही त्याची श्रध्दा असावी. एकंदरीत यावरुन असे दिसते की हा मानव, पूर्वीपेक्षा सामाजिकदृष्ट्या अधिक व्यवस्थित आणि संगठित झालेला आहे. तसेच, त्याने विविध प्रकारच्या उपजीविकेची माध्यमं हाताळलेली आहेत. अशा गोष्टींमुळेच तो कोणत्याही पर्यावरणावर नियंत्रण ठेवण्यात यश मिळवू शकला असावा. आणि त्यामुळेच त्याला आता अनुत्पादक अशा कलाविषयांकडे वळणे शक्य झाले असावे.

- **स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१ ....................या पूराश्मयुगीन स्थळांतून दातापासून बनवलेला ताईत मिळालेला आहे.

अ) लोहंडा नाला  ब) संगणकल्लू  क) हुणसगी  ड) भीमबेटका

२. पाटने या पुराश्मयुगीन स्थळातून मिळालेला मणी............यापासून बनवलेला आहे.

अ) सागरी शंख  ब) शहामृगाचे अंडे  क) अकीक  ड) बैलाचे हाड

३. मध्याश्मयुगात.................या हत्यारांचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरु झाला.

अ) सूक्ष्मास्त्रे  ब) पात्यांची हत्यारे  क) तोडहत्यारे  ड) हातकुऱ्हाडी

४. भारतीय मध्याश्मयुगीन गुहाचित्रांचा शोध...............यांनी लावला.

अ) कार्लाईल  ब) ल्युबॉक  क) चाईल्ड  ड) मार्शल

५. मध्याश्मयुगीन जीवनचक्र दाखविणारी चित्रे..............येथून मिळालेली आहेत.

अ) भीमबेटका  ब) बागोर  क) लांघणाज  ड) नेवासे

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. प्रागैतिहासिक काळ म्हणजे काय?

२. पुराश्मयुगीन मानवाच्या निवाऱ्याचे पुरावे कोठून मिळतात?

३. मध्याश्मयुगाची प्रमुख दोन वैशिष्ट्ये कोणती?

४. भीमबेटका येथील गुहाचित्रे कोणी शोधून काढली?

५. मध्याश्मयुगीन जाओर गुहाचित्रांचे वैशिष्ट्य काय?

### १.२.२ विभाग २ : आद्य शेतकरी आणि रहिवासी :

मध्याश्मयुगानंतर, भारतीय अश्मयुग हे एका नव्या वळणावर येऊन ठेपते. जवळजवळ दोन-अडीच लाख वर्षांच्या अनुभवाची शिदोरी या मानवाकडे असते. याच बैठकीवर हा मानव नवाश्मयुगात पोचतो. या युगात बरेच क्रांतीकारी बदल घडून येतात. अशा क्रांतीकारी नवाश्मयुगाच्या शिदोरीवर ताम्रपाषाणयुग अस्तित्वात येते. या काळात आद्य शेतकरी आणि त्यांच्या खेड्यांचा उदय होतो. याठिकाणी प्रथम आपण नवाश्मयुगाचा विचार करु.

**(अ) नवाश्मयुग :**

नवाश्मयुग म्हणजेच निओलिथिक (Neolithic) हा शब्दप्रयोग सर्वप्रथम सर जॉन लुबॉक यांनी आपल्या Prehistoric Times (१८६५) या ग्रंथात केला. घासून गुळगुळीत केलेली दगडाची हत्यारांना तो या नव्या युगाचे विशेष लक्षण मानतो. या नवाश्मयुगाची काही ठळक लक्षणे होती, जसे, शेतीचा शोध, पशुपालन, स्थिर स्वरुपाची वसाहत, पहिल्यावाहिल्या खेड्यांचा उदय इत्यादी. या काही सांस्कृतिक प्रक्रियांबरोबरच मृद्भांडी, घासून गुळगुळीत केलेली हत्यारे, हाडांची हत्यारे आणि अवजारे, मौल्यवान खड्यांचे मणी इ. या युगाची ठळक लक्षणे होती.

नवाश्मयुग हा मानवाच्या इतिहासातील क्रांतीकारक टप्पा होय. या काळात तो शेती करु लागला आणि घरं बांधून स्थिर होऊ लागला. आपल्याला शेती आणि पशुपालनाचे पहिलेवहिले पुरावे नवाश्मयुगापासून मिळण्यास सुरुवात होते. ही नवाश्मयुगीन स्थळे भारतातील काही ठराविक भागात वसलेली दिसून येतात, तशीच ती आपली काही प्रादेशिक वैशिष्ट्येही घेऊन येतात. नवाश्मयुगीन मेहेरगढमध्ये तो पशुपालक तर होताच शिवाय तो आता गहू (तीन जातींचा) आणि जव (दोन जातींचा) पिकवू लागला तसेच खजूरही उगवू लागला. तर राहण्यासाठी कच्च्या विटांची आयताकार घरे बांधू लागला. हा मानव सामुहिक स्वरुपात धान्य साठवण्यासाठी विविध कक्ष असलेल्या इमारतीही बांधू लागला. पुढील हडप्पा काळातील धान्यकोठारांची ही जणू काही नांदीच होती. येथील प्रदेशांचा याप्रमाणे पश्चिम आशियाशी संपर्क होता त्याचप्रमाणे मध्य आशियाशीही. त्यामुळे, त्यांना पश्चिम आशियातून विविध शोधांचा लाभ मिळाला त्याचप्रमाणे गव्हाच्या शेतीची माहिती मध्य आशियातून मिळालेली असावी.

या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घ्यावी. नवाश्मयुगामध्ये मानव शेती करु लागला याचा अर्थ असा नव्हे की त्याने पूर्वीचे शिकार, मासेमारी, फळे-कंदमुळे गोळा करणे हे मार्ग पूर्णपणे सोडले होते. हा मानव आपल्या उपजीविकेचे सर्व मार्ग वापरत होता. कारणे शेतीच्या तुलनेने दुसऱ्या मार्गातून त्याला उच्च प्रतीची प्रथीनं मिळत होती.

- **समाजजीवन, राहणीमान वगैरे :**

नवाश्मयुगीन **काश्मीरमध्ये** लोक थंडीपासून संरक्षण करण्यासाठी गर्तावासात (Pit dwellings) म्हणजे जमिनीत खड्डे/घरे करुन रहात असत (बूर्झाहोम). तर जमिनीवर या खड्ड्याच्या भोवती शंखाकृती गवताची झोपडी असावी. पुढे मात्र तो आयताकृती कुडांच्या झोपड्यात व मातीच्या विटांच्या घरांत राहू लागला. या मानवाने बैल, घोडा, शेळी, समुहातील प्राणी माणसाळवले होते. यातील रेडा व गाढवाचा (घोडा समुह) वापर तो ओझी वाहण्यासाठी करीत असे. तसेच तो धान्यांचीही, किमान पोटापुरती प्राथमिक स्वरुपातील पैदास करु लागला. यामध्ये, गहू, बार्ली, जवस यांचा समावेश होतो. याच्या हत्यारांमध्ये दगडी मात्र अधिक लांब व सुधारीत अशा कुऱ्हाडी, हाडांची सुधारीत अवजारे (बाणाग्र) तसेच हार्वेस्टरचा समावेश होतो (गुफकराल). असे दिसते की हा मानव आपल्या पूर्वजांप्रमाणेच विविध संस्कृत्यांशी संबंध ठेवून होता. हा त्यांच्याशी शंख, हार यामध्ये विनिमय करताना दिसतो. बुर्झाहोम येथील गर्तावास, तर गुफकराल येथील हार्वेस्टर आणि कुत्र्याची दफने त्याचा चीनी नवाश्मयुगीन लोकांशी संपर्क दाखवितात. तसेच, त्याच्या दफनामध्ये प्रेतासोबत मिळालेल्या विविध वस्तूवरुन असे दिसते की याच्या मरणोत्तर जीवनाबद्दलही काही श्रध्दा होत्या.

तर **आग्नेय उत्तर प्रदेशातील** चौपानी मंडो येथे मध्याश्मयुगाच्या शेवटी शेवटी मानव निम भटका असला तरी तो काही काळासाठी स्थिर रहात असून, शेती करीत होता. याठिकाणी झोपड्या, चुली, सूक्ष्मास्त्रं, जाती, रिंग स्टोन आणि हातावर बनवलेली मृद्भांडी तसेच जंगली तांदूळ, जंगली गुराबरोबरच पाळीव शेळ्या-मेंढ्यांची हाडे मिळालेली आहेत. असे कळते की, शेती आणि पशुपालनाअगोदरच या मानवाने मृद्भांड्यांचा शोध लावलेला होता. हे लक्षात ठेवले पाहिजे की येथील मृद्भांडी ही जगातील सर्वात पहिली मृद्भांडी आहेत (इसपू ९-८०००). असे दिसते की हा मानव अन्नसंग्रहणाबरोबरच, पशुपाला आणि थोडीफार शेती करुन स्थिर झालेला होता. उत्तर बिहार याठिकाणी पर्यावरणीय अनुकुलता असूनही, येथे तुलनेने फार पुढे (इसपू २०००-१६००) नवाश्मयुगीन वसाहती निर्माण झाल्या. येथे सेुआर, चिरांद याठिकाणी नवाश्मयुगीन अवशेष मिळालेले आहेत. हा मानव गहू, तांदूळ, जव, वटाणे आणि मसूर शिवाय हरभरा आणि मूग यांची लागवड करीत असे. दोन्ही ठिकाणी हाडांची उल्लेखनीय अशी हत्यारे मिळालेली आहेत.

**दक्षिण भारतामध्ये** विशेष पर्यावरणीय अनुकुलता नसतानाही (पावसाचे प्रमाण २५ सेमीपेक्षा कमी) उल्लेखनीय अशा नवाश्मयुगीन वसाहती दिसून येतात. या वसाहती डोंगराळ भागात तसेच कोरड्या दख्खनच्या पठारावर मिळालेल्या आहेत. येथील नागार्जुनकोंडा, संगणकल्लू या महत्वाच्या वसाहती होत. तो आता पूर्वीचे अन्नसंग्रहण बाजूला ठेवून, शेतीसह पशुपालनही करु लागलेला दिसून येते. अर्थात, शिकार

आणि मासेमारी हे पर्याय सोबत होतेच. याठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की या ठिकाणी पशुपालनाचा शोध शेतीच्या अगोदर लागलेला आहे.

पशुपालनाचा विचार करता, दक्षिण भारतीय नवाश्मयुगाचे आणखीन एक वैशिष्ट्य आपल्यासमोर येते. ते म्हणजे **'राखेचे ढिगारे'** (Ashmounds). या प्रदेशात कित्येक ठिकाणी मानवी वसाहतीपासून दूर राखेचे मोठमोठे ढिगारे दिसून येतात, जसे, बुधिहाळ, उटनूर, कोडेकल आणि कुपगल इ. ठिकाणी. साधारणत: १८३० आणि १८४० च्या दशकात हे राखेचे ढिगारे आढळून आले. मात्र त्यावेळी हे ढिगारे म्हणजे ज्वालामुखीची राख असावी असे समजले गेले. पुढे टी.जे.न्यूबोल्ड यांनी या ढिगाऱ्यांचे उत्खनन करुन हे सिध्द केले की, हे ढिगारे नैसर्गिक नसून मानवनिर्मित आहेत. पुढे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात रॉबर्ट ब्रुस फूट यांनी 'हे ढिगारे नवाश्मयुगीन असून, नवाश्मयुगातील पशुपालकांनी जे शेणाचे ढिगारे जाळले त्यापासून बनलेले आहेत' असे सिध्द केले. पुढे १९५० च्या दरम्यान अलचिन आणि झुनर यांनी उटनूर येथील राखेच्या ढिगाऱ्याचे उत्खनन केले. त्यांनी फूट यांच्या विधानाला दुजोरा दिला. तसेच त्यांनी हे सांगीतले हा नवाश्मुगीन मानव, फक्त एकदाच नव्हे तर वारंवार शेणाचे ढिग जाळत असावा. तसेच, त्यांनी हे ही सांगीतले की अशी 'वारंवार केली जाणारी एखादी कृती' या नवाश्मयुगीन मानवाच्या धार्मीक श्रध्दांकडे बोट दाखवते.

थोडक्यात, असे दिसते की हा दक्षिणेतील नवाश्मयुगीन पशुपालक मोठ्या प्रमाणावर आणि एका विशिष्ठ ठिकाणी शेण साठवून ठेवत असे. कालांतराने हा, हे शेणाचे ढिगारे पेटवून देत असावा. काही अभ्यासकांच्या मते या 'शेणाचे ढिगारे जाळणे' या कृतीला काही धार्मिक आशय असू शकतो व म्हणून, आजच्या होळीच्या सणाची पूर्वपरंपरा ही असावी. अर्थात आंध्र प्रदेशामध्ये मात्र असे राखेचे ढिगारे दिसत नाहीत. यासंदर्भात पी.सी. वेंकटसुबय्या असे म्हणतात की या भागातील नवाश्मुगीन मानव मुख्यत्वे शेतकरी असल्याने तो शेणाचा वापर खत म्हणून करीत असे म्हणून तो शेण जाळीत नसे.

दक्षिण भारताचे नवाश्मयुगीन जीवन पाहता असे दिसते की हा मानव पायऱ्यांची शेती करुन, गहू, कुळीथ, मूग आणि रागी पिकवित होता. तसेच, वजन वाहण्यासाठी तसेच नांगर चालवण्यासाठी पशुंचे पालन करीत होता. याशिवाय शिकार आणि मासेमारी हे त्याच्या अन्नवैविध्यासाठी महत्वाचे घटक होते. एकंदरीत असे दिसते की या मानवाच्या उपजीविकेमध्ये शेती, पशुपालन हे मुख्य घटक असून हा आता स्थिर झालेला होता. असा हा नवाश्मयुगीन मानव काही ठिकाणी छोट्या टोळीत रहात असे तर काही ठिकाणी मोठ्या. ज्या प्रकारच्या पर्यावरणात तो रहात असे त्याप्रमाणे त्याच्या टोळीचा आकार असे. तो शेती करीत असे. त्याचप्रमाणे 'उच्च प्रथिनांसाठी' तो पशुपालन करीत असे, तसेच, शिकार-मासेमारी आणि संकलाही करीत असे. शेतीच्या शोधामुळे हा मानव आता एकाच ठिकाणी अधिक काळ राहू लागला. त्यामुळे एकंदर जन्म दर वाढलेला दिसतो तर मृत्यु दर कमी झालेला दिसतो. म्हणूनच थोड्याच काळात मानवाची लोकसंख्या वाढलेली दिसून येते.

थोडक्यात एका ठिकाणी स्थिर राहण्याच्या गरजांतून, या मानवाने आता आपल्या निवासाचा गंभीरपणे

विचार करण्यास सुरुवात केली. पूर्वी तो गुहेत राहत असे तसेच गवताच्या झोपड्या बांधीत असे. मात्र ही घरे तात्पुरत्या स्वरुपाची असत. मात्र या काळात तो दीर्घकाळाचा विचार करु लागला. याठिकाणी थंडी प्रचंड असे त्याठिकाणी तो जमिनीत खड्डा करुन राहत असे (बूर्झाहोम). या खड्ड्यावर एक झोपडी बांधत असे. पुढे तो, जमिनीवर फांद्या-गवत यांचा वापर करुन गोलकार झोपडी बांधू लागला. तसेच, या झोपडयांना चिखलाने लिंपू लागला. अशा झोपड्याचे छत शंकाकृती आणि गवत/झावळ्यांचे असे. पुढे किंवा समांतरपणे तो आयताकृती झोपड्या बांधू लागला. तर भीतीसाठी आता तो या फांद्या-काठ्यांना चिखलाने लिंपू लागला. पुढे चिखलाऐवजी, कच्च्या (न भाजलेल्या आणि उन्हांत वाळवलेल्या) विटांचा तो वापर करु लागला. अशी घरं या काळात निर्माण झालेली दिसतात. अशा प्रकारे, नवाश्यमयुगातच अनेक घरांचे एक गाव निर्माण होऊ लागले. या गावामध्ये वेगवेगळ्या कामांसाठी वेगवेगळ्या जागा निर्माण होऊ लागल्या, जसे, प्राणी पाळण्याची जागा, प्राणी चरण्याची जागा, प्राणी मारण्याची जागा, उद्योगाच्या जागा, शेणांचे ढिगारे साठविण्याची जागा इ. तसेच, या गावात समुहाच्या गरजा भागविण्यासाठी काही सामुहिक इमारतीही बांधल्या जाऊ लागल्या, जसे, धान्यकोठार (मेहेरगढ). जेथे कोठार तयार होते तेथे लूटण्याचीही भिती असते. त्यामुळे अशा गावांना आता तटबंदीही येऊ लागली.

अशा समुहांमध्ये लिंगावर आधारलेले एक श्रेणीविभाजनही दिसून येते. पूर्वी पुरुष शिकार करीत असे तर स्त्रिया फळे-कंद संकलनाचे काम करीत असत. यातूनच, निरिक्षणांतून स्त्रियांना निसर्गचक्राची माहिती झाली. आणि या माहितीतून स्त्रियांनी शेतीचे प्रयोग करण्यास सुरुवात केली असावी. त्यामुळेच नवाश्मयुगामध्ये स्त्रियांनी शेतीची आणि शेतीउत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये सहभाग घेतलेला दिसून येतो. आपल्याला हे लक्षात येते की शेतीचे उत्पादन आणि साठपाची गरज यातून मातीच्या भांड्यांची गरज निर्माण झाली. त्यामुळे हे ही कार्य स्त्रिया करीत असाव्यात. तर, अशाच प्रकारे, शिकारी पुरुषांना, प्रायांच्या सवयीचा अभ्यास झालेला होता. त्यामुळे, पुरुषांनी पशूपालनाचा शोध लावला. यातून, त्यांना, निश्चितपणे, नियमितपणे आणि कायमस्वरुपी 'शिकार' करणे शक्य झाले.

पूर्वी हा मानव तात्पुरती हत्यारे बनवित असे त्याचप्रमाणे आपल्या अन्नाचा थोड्याच काळासाठी विचार करीत असे. मात्र या काळात मानव स्थिर झाल्याने त्याच्या सवयीत बदल झालेला दिसून येतो. तो अधिक काळ टिकतील अशी हत्यारे बनवू लागला. त्याचप्रमाणे तो दीर्घकाळासाठी अन्न साठवून ठेऊ लागला. यातूनच 'भांडी' तयार करण्यामध्ये विकास झालेला दिसून येतो.

आपण हे पाहिले की या नवाश्मयुगीन मानवाच्या काही धार्मीक श्रध्दा होत्या. हे 'शेणकुटांच्या वारंवार जाळण्याच्या' विधीवरुन दिसते. काही ठिकाणी सापडलेल्या मातृदेवता त्यांच्या दैवतकल्पनेकडे निर्देश करते. तसेच या मानवाच्या काही 'सामूहिक उत्सवाचे' संकेतही आपल्याला मिळतात. जसे, पद्द्या यांना 'बुधिहाळ'येथे एक चोपलेली जमिन दिसली. त्यावर सापडलेल्या अवशेषांवरुन, त्यांनी असे म्हटले की ही जागा म्हणजे एक 'प्राणी मारण्याची' सामूहिक जागा असावी. याठिकाणी एका विशिष्ठ दिवशी नवाश्मयुगीन समाज गोळा होत असावा. या चोपलेल्या जमिनीवर प्राणी मारले जात असावे. नंतर, हे मांस सर्वांमध्ये वाटून घेतले जात असावे.

तसेच, नवाश्मयुगीन मानवाच्या 'मरणोत्तर जीवनाबाबत' कल्पना विकसित झालेल्या होत्या. म्हणूनच, या काळातील दफनांमध्ये 'प्रेतासोबत (त्याच्या पुढील प्रवासाच्या सोयीसाठी) वस्तू' ठेवल्या जाऊ लागल्या. अशा दफनांचे तसेच त्यामागील संकल्पनांमध्ये विविध प्रकार आढळून येतात. मेहेरगढसारख्या ठिकाणी प्रेताला, दफन करण्याअगोदर लाल रंगांने रंगवले जात होते. तर बुर्झाहोम येथे मानवाला प्राण्याबरोबर दफन केले जात होते. काही ठिकाणी 'सामूहिक दफन' दिसून येतात. कदाचित कोणत्या तरी साथीच्या रोगांमध्ये यांचा मृत्यु झाला असावा किंवा ही मृत माणसं एकाच भावकीतील असावीत.

असा हा मानव विकसित होत होताच. त्याचप्रमाणे याचे आपल्या शेजारील ताम्रपाषाणयुगीन तसेच मध्याश्मयुगीन मानवाशीही संबंध असावेत. तो, या संस्कृतींशी देवाणघेवाण करीत असावा.

आपल्याला हे लक्षात येईल की अशा या नवाश्मयुगीन मानवाने भारताच्या पुढील विकासाची दिशा निश्चित केली. या काळाच्या वारश्यावर पुढे ताम्रपाषाणयुगाचा आणि त्ङ्मातील हडप्पा संस्कृतीचा उदय झाला. पुढील विभागात हे पहावयाचे आहे.

**(ब) दख्खनमधील ताम्रपाषाणयुग :**

ज्या काळातील मानव तांब्यासह अश्महत्यारेही वापरत होता त्या काळास 'ताम्रपाषाणयुग' असे म्हणतात. भारतीय ताम्रपाषाण युगाला 'आद्य शेतकऱ्यांचे' युग असे म्हंटले जाते. हा काळ साधारणत: इसवी सन पूर्व ४००० ते इसवी सन पूर्व ७०० असा ढोबळमानाने सांगता येईल. साधारणत: नवाश्मयुगानंतर भारतामध्ये ताम्रपाषाणयुग अवतरले. या काळात सर्वत्र आद्य शेतकऱ्यांची खेडी निर्माण झालेली होती. यातील सिंधु-सरस्वती खोऱ्यातील खेड्यांनी तुलनेने अधिक विकास केला. यातून या खोऱ्यात एक नागरी स्वरुपाची 'हडप्पा संस्कृती' निर्माण झाली.

भारताच्या भौगोलिक विविधतेमुळे, येथे ताम्रपाषाणयुगाच्या विविध उपसंस्कृतीही निर्माण झाल्या, जसे, राजस्थानमधील आहाड/बनास संस्कृती; माळवा (पश्चिम मध्यप्रदेश) येथील प्रथम कायथा, पुढे आहाड नंतर माळवा संस्कृती; महाराष्ट्रातील सावळदा ते जोर्वे संस्कृती इ. तर उत्तर कर्नाटकामध्ये नवाश्मयुग हे ताम्रपाषाणाबरोबर नांदताना दिसते. या सर्व संस्कृती देवाणघेवाणीच्या संबंधाने एकमेकांशी जोडलेल्या होत्या. याठिकाणी आपण दख्खनमधील-महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगाची विशेषकरुन माहिती घेणार आहोत.

**दख्खनमधील-महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुग :**

महाराष्ट्रातील ताम्रपाषाण युगाचे अवशेष हे तापी, गोदावरी, भीमा नदीच्या खोऱ्यात मिळालेले आहेत. यामध्ये प्रकाश, दायमाबाद, इनामगाव ही मोठी स्थळं तर जोर्वे, नाशिक, नेवासा, कवठे, वाळकी, सोनगाव, चांदोली अशी छोटी स्थळं आपल्याला दिसून येतात. या महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगाचे एकूण पाच उपकालखंड पडतात, सावळदा संस्कृती, उत्तर हडप्पा संस्कृती, माळवा संस्कृती, जोर्वे संस्कृती, उत्तर जोर्वे संस्कृती.

**सावळदा संस्कृती** (इसवी सन पूर्व २५००-२२००) ही मुख्यत्वे तापी-गोदावरी नदीच्या खोऱ्यात

उदयास आली आणि विकसित झाली. दायमाबाद हे याकाळातील एक विकसित खेडे होय. येथील लोक मातीच्या विटांनी बनवलेल्या चौकोनी घरात रहात. उत्तम चोपलेली जमिन आणि गवताने शाकारलेले छत अशा स्वरुपाची ही घरं असत. एकत्र कुटुंबपध्दती असल्याने, या घरांमध्ये एकापेक्षा अधिक खोल्या आढळून येतात. या काळातील तुलनने साध्या वसाहतीतील लोक मात्र खड्ड्यातील छोट्या झोपड्यांमध्ये रहात असत. अर्थात अशा झोपड्या या फक्त साठवणूकीसाठी असून, खरा वावर हा अंगणातच असे. या काळातील लोक स्थिर शेतकरी असून, गहू, बार्ली, वाटाणा, विविध डाळी पिकवत असत. हे लोक उत्तम कारागीरही होते. काळ्या रंगाने चितारलेली लाल मडकी हे बनवत असत. या मडक्यावर विविध चित्रे, नक्षी काढलेली असे. हे दगडाचे पाटा-वरंवटा बनवत. तांबे/कास्याच्या अंगठ्या, कार्नेलियन, अगेटच्या मण्या इ. आभूषणं ते बनवत. मात्र हरणांची हाडं वापरुन, त्यांनी मोठ्या प्रमाणावर हाडांच्या हत्यारांचा वापर केलेला दिसून येतो. हे लोक, हाडांची बाणाग्र असलेले बाण वापरुन शिकारही करीत असत. तसेच मासेमारीही करीत असत. यांच्या मडक्यांवर, मासे आणि मत्स्यबाणांची चित्रं आढळतात.

**पुढे उत्तर हडप्पा संस्कृतीचे लोक** (इसवी सन पूर्व २२००-२०००), गुजरातमार्गे महाराष्ट्रात आले. यांनी नियोजनबध्द वसाहतीची सुरुवात केली. आपल्या वसाहतींना मातीची तटबंदी बांधून सुरक्षित केले. तसेच पुराच्या पाण्यापासून वाचण्यासाठी नदीला बांधही घातला. हे विविध खोल्या असलेली, मोठी घरे बांधून रहात असत. यातील काही खोल्या फक्त धान्य साठविण्यासाठी, काही जनावरांचा गोठा म्हणून उपयोगी आणली जात असत. यातील काही मोठ्या कुटुंबांनी आपल्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र तटबंदीही बांधलेली होती. हे उत्तम शेतकरी होतेच. हे लाकडी नांगराच्या मदतीने गहू, बार्ली, मसूर, वाटाणे, तीळ, भाजीपाला, फळे पिकवीत असत. शेतीबरोबरच पशुपालन, शिकार, मासेमारी हे विविध पर्यायही हाताळले जात. हे गुरांबरोबरच शेळया-मेंढ्यांचेही पालन करीत. तर शिकारीसाठी हरीण, नीलगाय, ससे हे विशेष आवडीचे प्राणी होत. शिवाय यांना कारागीरीचेही उत्तम -ज्ञान होते. त्यामुळेच, या काळातील दायमाबाद येथून कास्याची गाडीवानासह बैलगाडी, हत्ती, रानगवा, गेंडा अशी उत्कृष्ठ शिल्पं मिळालेली आहेत. या लोकांची दफनं वसतीपासून दूर असत. यांची वसाहत ही मुख्यत्वे तापी नदीच्या खोऱ्यातच राहिली.

त्यानंतर, मध्यप्रदेशातून **माळवा संस्कृतीचे** लोक या खोऱ्यांमध्ये आले (इसवी सन पूर्व १७००-१४००). हे अगदी भीमा नदीच्या खोऱ्यापर्यंत महाराष्ट्रात पसरलेले होते. या संस्कृतीमध्ये महाराष्ट्राने समृध्दी पाहिली. येथील शेतकरी मातीच्या विटांनी बनवलेल्या मोठ्या आयताकृती घरांमध्ये रहात असत. यांची घरं ही नियोजनबध्द होती. शेती हे प्रमुख आहाराचे साधन. त्यामध्ये गहू, बार्ली, वाटाणा, तीळ इ. वैविध्यपूर्ण पीक ही पिकवित. शेतीबरोबरच यांची कारागीरीही वैशिष्ट्यपूर्ण अशी होती. हे विविध प्रकारची लाल मडकी बनवत. त्यांवर काळ्या रंगात विविध चित्रे काढीत असत. यांच्या चित्रांमध्ये भौमितिक आकृत्यांबरोबरच, विविध प्राण्यांचीही चित्रं आढळतात. जसे, हरीण, बैल, कुत्रा, सुसर, सरडे इ. मांसाहारासाठी हरणाचे मांस हे अधिक पसंतीचे त्यात त्यांची हाडंही टणक. यांचा वापर शस्त्रं तयार करण्यासाठी होतो. त्यामुळे यांच्या मडक्यांवर हरणांची चित्रे मोठ्या प्रमाणावर आढळतात. एका मडक्यावर, एका पुरुषासमोर विविध प्राणी नम्रपणे उभे आहेत असे एक चित्र आहे. यावरुन, यांच्या धार्मिक जीवनात 'पशुपती'चे पूजन होत असावे

असा एक संकेत मिळतो. यांच्या मुख्य वसाहतींमध्ये प्रकाश (तापी खोरे) दायमाबाद (गोदा खोरे) आणि इनामगाव (भीमाखोरे) या स्थळांचा समावेश होतो.

पुढे, मागील माळवा संस्कृती आणि उत्तर कर्नाटकातील नवाश्मयुगीन - ताम्रपाषाणयुगीन संस्कृतींच्या सहसंबंधातून, **जोर्वे संस्कृतीचा** उदय झाला (इसवी सन पूर्व १४००-१२००). या संस्कृतीतील लोक एकत्र कुटुंबपध्दतीत रहात असत. यांची नियोजनबध्द अशी मोठमोठी आयताकृती घरे होती. याबरोबरच चौकोनी आणि गोलाकार अशी घरंही बांधली जात. अशा घरांच्या ओळी असत आणि या ओळीमधून जाणारी वाटही होती. यांच्या घरांमध्ये एकापेक्षा अधिक खोल्या दिसून येतात. यातील स्वयंपाकघरामध्ये चुलीबरोबरच जमिनीमध्ये धान्याचे बळद असे तर साठपासाठी कणगीही असे. घराच्या जमिनीबरोबरच, अंगणसुध्दा अगदी चोपून तयार केलेले असे. या अंगणामध्येही बळद असे तसेच मोठे चुलाणे असे. साधारणत: वसाहतीचा मुख्य हा गावाच्या मध्यभागी रहात असे. या मुख्याचे घरही मोठे आणि नियोजनबध्द असे होते. याच्या घराजवळच एक धान्याचे कोठारही होते. म्हणजेच या मुख्याचे सर्व वसाहतीच्या अर्थकारणावर एकप्रकारे नियंत्रण होते. म्हणूनच याचे दफनही, इतरांच्या दफनापेक्षा वेगळे केलेले दिसून येते. या मुख्याच्या घराजवळच सुखवस्तू लोक रहाताना दिसतात. हे लोक उत्तम प्रथिनयुक्त आहार घेत असत. याच्यापासून काही दूर, बाकींच्या लोकांची घरं, तुलनेने निकृष्ठ स्वरुपाची दिसून येतात. यामध्ये कुंभाराचे, मणीकाराची, खाटकाची अशी घरं दिसून येतात.

या काळातील लोक मुख्यत्वे शेती करीत. जलसिंचनासाठी, इनामगावमधील लोकांनी, घोडनदीचे अतिरिक्त पाणी, कालव्याद्वारे एका तलावात साठवून ठेवलेले होते. त्यांना समांतर असा दगडमातीचा बांधही घातलेला होता. पाण्याच्या या बारमाही सोयीमुळे, हे लोक रब्बी आणि खरिप अशा दोन्ही हंगामात शेती करीत असत. येथे गहू, ज्वारी, बाजरी, सातू, वटाणे, कुळीथ इ.पीके घेतली जात. काही वेळा, मुख्य वसाहतीपासून सुपीक जमिन जर दूर असेल तर अशावेळी या लोकांनी हंगामी वसत्याही उभ्या केलेल्या आहेत. जसे इनामगावचे लोक संगमावरील वाळकीला येत असत. बैलाच्या हाडाचा नांगर वापरुन हे शेती करीत असत. थोडक्यात या काळात शेतीतून भरघोस उत्पादन काढले जाऊ लागले. शेतीबरोबरच गुरे, शेळ्या-मेंढ्या, डुकरं, कोंबड्यांचे पालन केले जाई. तसेच शिकार आणि मासेमारी हे पर्यायही होतेच. शेतीच्या विकासामुळे, कारागीरी आणि विनिमयही विकसित झालेला दिसतो. मुख्यत्वे साधने/हत्यारे ही गारेच्या दगडांची केली जात. 'मडकी' जीवनशैलीतील महत्वाचे साधन असल्याने, कुंभारकला अतिशय विकसित झालेली दिसते. दायमाबदमध्ये मोठ्या कुंभाराच्या भट्टया मिळालेल्या आहेत. लहान वाटग्यापासून साठपाच्या मोठ्या रांजणापर्यंत, या मडक्यांमध्ये विविधता येते. काळ्या रंगामध्ये चितारलेल्या चित्रांमध्ये, पारंपारिक भौमितिक आकृत्यांप्रमाणे, मानवाच्या अनुभवविश्वातील वनस्पती आणि प्राण्यांचाही समावेश होतो. या समाजात तांब्यात काम करणारे तांबट होते, सोनार होते, मणीकार होते, तसेच चुना तयार करणारे ही होते. हे लोक तांब्यामध्ये कुऱ्हाडी, छिन्नी, गळ, अलंकार, मणी तयार करण्यासाठी गिरमिटे, सोनारकामाचे चिमटे तयार करीत असत. तसेच सोन्याचे मणी, कर्णफुलं अशी आभूषणंही तयार करीत. यांचे कोकण, सौराष्ट्रातून, कर्नाटक इ. भागांशी सहसंबंध होते. कडवे वाल, सागरी मासे कोकणातून, सौराष्ट्रातून

शंख तर कर्नाटकातून सोने येत असे. 'मातृदेवतेला' यांच्या धार्मिक जीवनात महत्वाचे स्थान होते. अशा शिरोविहीन मातृदेवतेच्या मुर्ती इनामगावामध्ये मिळालेल्या आहेत. त्याचप्रमाणे 'बैलाचे' ही पूजन केले जात असावे. ही परंपरा अगदी हडप्पा संस्कृतीपासून दिसते. दफनांचा विचार करता, या काळातील मानवावर कर्नाटकातील नवाश्मयुगीन-ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो. यांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास असून, मृतांना घरांमध्ये अथवा घराजवळच पुरले जात असे. मृत मुलांचे ते, तोंडे जुळविलेल्या भांड्यामध्ये दफन करीत. तर प्रौढ मृतांचे, एका खड्डयात दक्षिणेकडे पाय करुन, उताणे ठेवून दफन केले जात असे. इनामगाव मध्ये अशा प्रौढ मृतांचे पाय घोट्यापासून तोडलेले आहेत. मात्र येथील मुखियाच्या दफनात वेगळेपणा दिसून येतो. याला एका मोठ्या रांजणात ध्यानस्थ स्वरुपात बसवलेले आहे. तसेच याचे पाय तोडलेले नाहीत. अशा मृतांबरोबरच, त्याचा पुढील प्रवास सुखकर व्हावा यासाठी विविध भांड्यामध्ये अन्न, पाणी, विविध वस्तूही ठेवल्या जात.

पुढे महाराष्ट्रातील हवामान हे शेतीसाठी प्रतिकूल झाले; पाऊस कमी झाला आणि हवामान हे अधिक कोरडे झाले. स्वाभाविकच यांची आर्थिक परिस्थती ढासळली. लोकसंख्याही कमी झाली. या काळाला **उत्तर जोर्वे कालखंड** असे म्हणतात (इसपू १२००-९००). इनामगावसारख्या ठिकाणी आपल्याला आता छोट्या छोट्या झोपड्या दिसून येतात. यांच्यामध्ये कोणत्याही स्वरुपाची नियोजनबध्दता दिसून येत नाही. झोपड्याही हंगामी स्वरुपाच्या दिसतात. यांच्या भांड्यांचा, हत्यारांचा दर्जाही खालावतो. अशा परिस्थितीत एका जागी स्थिर करुन शेती करीत राहणे या लोकांसाठी अशक्य बनते. ते पशुपालनाकडे वळतात. बैल, गायी सारख्या मोठ्या जनावरांना पाणी जास्त लागत असल्याने, यांनी, शेळ्या-मेंढ्याचे पालन करुन, निमभटकी जीवनशैली स्विकारली. त्यांच्या आहारामध्ये ही शेळ्या-मेंढ्यांचे प्रमाण अधिक आहे. तसेच शिकार, मासेमारीचे प्रमाणही वाढले. या काळात हरणांच्या शिकारीचे प्रमाणही वाढलेले दिसते. मात्र अशाही परिस्थितीत धार्मिक परंपराचे पालन पूर्वीप्रमाणेच केले जात असे. अर्थात, स्थैयासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी शिल्लक न राहिल्याने, या काळात हे लोक अन्नाच्या शोधात भटकू लागले. यावेळी त्यांचा महाश्मयुगीन लोकांशी संपर्क येऊ लागतो.

**या युगाची ठळक लक्षणे :** अशा या ताम्रपाषाणयुगीन खेड्यातील संस्कृतींची काही ठळक लक्षणे पुढीलप्रमाणे मांडता येतील. हे आयताकृती/गोल अशा कुडाच्या तसेच मातीच्या विटांनी बनवलेल्या घरांमध्ये रहात. या घरांमध्ये एकापेक्षा अधिक खोल्याही असत. व्यवस्थित चोपलेली जमिन आणि शाकारलेले छत हे मुख्य लक्षण. हे लोक शेतीबरोबरच, पशुपालन, शिकार आणि मासेमारी असे उपजीविकेचे वेगवेगळे पर्याय हाताळत. शेती ही हाडांच्या /लाकडाचा नांगर वापरुन, जलसिंचनाच्या वेगवेगळ्या योजना राबवून केली जात असे. यांच्या पशुपालनामध्ये गुरांचा समावेश हा प्रामुख्याने होता. मात्र यावेळी हवामान प्रतिकूल झाले त्यावेळी यांनी शेळया-मेंढ्यांना पाळायला मोठ्या प्रमाणावर सुरुवात केली. यांनी तांब्याच्या कारागीरीत विकासावस्था गाठलेली होती. ते तांब्याची तसेच तांब्याच्या मिश्र धातूची हत्यारे/साधने वापरीत. अर्थात राजस्थान वगळता, इतर प्रांतात तांबे दुर्मिळ असल्याने, मागील काळातील दगडी पात्यांपासून बनविलेली हत्यारे अधिक प्रचारात होती. तसेच हाडांची हत्यारेही वापरत असत.

मातीच्या भांड्यांना दैनंदिन जीवनामध्ये महत्वाचे स्थान असल्याने, गुणवत्ता आणि वैविध्य दिसून येते. साधारणत: हे 'काळ्या रंगाने चित्रित लाल भांडी' वापरत असत. अर्थात यांच्यामध्ये संस्कृतीनिहाय वैविध्य जाणवते. हे काही वस्तूंमध्ये विनिमयही करीत असत. यांचा एकमेकांशी, विशेषत: शेजारील उपसंस्कृतीशी सहसंबंध असे. हे पशू आणि मातृदेवतेचे पूजक होते. तसेच यांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास होता. त्यामुळे मृतांचे शक्यतो घरांमध्येच किंवा घराजवळ, विविध वस्तूंसह दफन केले जाई.

- **स्वंय अध्ययन प्रश्न – २**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. निओलिथिक (नवाश्मयुग) हा शब्दप्रयोग............यांनी सर्वप्रथम केला.

अ) लुबॉक ब) मार्शल क) व्हिलर ड) लुकास

२. .............येथून नवाश्मयुगीन मातीच्या भांड्यांचे पहिलेवाहिले अवशेष मिळतात.

अ) चौपानी मंडो ब) बूर्झाहोम क) उटनूर ड) जोर्वे

३. .........याठिकाणी नवाश्मयुगीन 'प्राणी मारण्याची' सामुहिक जागा मिळालेली आहे.

अ) बुधिहाळ ब) उटनूर क) नाशीक ड) बहाळ

४. ताम्रपाषाणयुगीन कालवा आणि बांध................याठिकाणी मिळालेले आहे.

अ) इनामगाव ब) नेवासा क) चांदोली ड) दायमाबाद

५. ताम्रपाषाणयुगामध्ये सोने...............याठिकाणाहून आणले जाई.

अ) कर्नाटक ब) सौराष्ट्र क) कोकण ड) बंगाल

**ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१. नवाश्मयुगातील कोणते अवशेष हे भारताचा चीनी नवाश्मयुगाशी संपर्क दाखवितात?

२. दायमाबाद येथून कास्याचे कोणते अवशेष मिळालेले आहेत?

३. महाराष्ट्रीय ताम्रपाषाणयुगामध्ये कोणकोणते उपकालखंड पडतात?

४. इनामगावामधील लोकांनी जलसिंचनासाठी कोणत्या उपाययोजना केलेल्या होत्या?

५. ताम्रपाषाणयुगामध्ये कोणत्या स्वरुपाची भांडी वापरली जात?

### १.२.३ विभाग ३ : हडप्पा संस्कृती–पहिले नागरीकरण :

आपण हे पाहिले की ताम्रपाषाणयुगामध्ये भारतभर विविध उपसंस्कृती दिसून येतात. 'आद्य शेतकरी व खेडी' हे सर्वसाधारण वैशिष्ट्य या युगाचे दिसून येते. यातील सप्तसिंधूच्या प्रदेशातील खेड्यांचा विविध

कारणांनी विकास झाला. या ठिकाणी भारतातील पहिली नगरं निर्माण झाली-एक नागरी संस्कृती विकसित झाली. या काळात भारतातील पहिले नागरीकरण अवतरले. या संस्कृतीचे पहिलेवाहिले अवशेष हडप्पा या ठिकाणाहून मिळाले. म्हणून या संस्कृतीस 'हडप्पा संस्कृती' असे म्हणतात. साध्या खेड्यापासून ते विकसित प्रचंड शहरापर्यंत आणि पुन्हा ऱ्हासापर्यंत, जवळजवळ अडीच-तीन हजार वर्षे प्रवास केलेली ही एक सांस्कृतिक प्रक्रिया होती. या प्रक्रियेची सुरुवात ही नवाश्मयुगामध्ये झाली (इसपू ८००० ते ४०००). पुढे ही प्रक्रिया पूर्व हडप्पा काळ (इसपू ४००० ते २६००)-विकसित हडप्पा काळ (इसपू २६०० ते १८००)-उत्तर हडप्पा काळ (इसपू १८०० च्या पुढे) अशा विविध टप्प्यातून उलगडताना दिसते.

आतापर्यंत हडप्पा संस्कृतीची जवळजवळ २००० स्थळं सापडलेली आहेत. सर्वसाधारणत: ही संस्कृती पूर्व अफगाणिस्तान, पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम/वायव्य भारत या विस्तृत क्षेत्रात पसरलेली असून, डोंगराळ भाग, मैदानी भाग, नद्यांची खोरी, वाळवंट, समुद्रकिनारा इ. सर्व प्राकृतिक वैशिष्ट्यांत वसलेली आहेत. असे असले तरी यांच्यात आपल्याला ऐक्य दिसून येते. हे ऐक्य दिसते, एकसमान लिपीत, वजन-मापांत, शिक्क्यांत, प्रमाणबद्ध विटांत (४:२:१), सुनियोजित नगररचनांतून, एकसमान तांबे आणि कास्यांच्या विविध अवजारे आणि साधनांतून मृद्भांड्यांच्या आणि त्यांच्यावरील चित्रांच्या एकरुपतेतून! मोहेनजोदाडो, हडप्पा (पाकिस्तान); कालीबंगन (राजस्थान); राखीगढी, भीरराणा (हरियाणा); लोथल,धोलावीरा (गुजरात); दायमाबाद (महाराष्ट्र) इ. महत्वाच्या शहरांचा या संस्कृतीत समावेश होतो. या संस्कृतीची वैशिष्ट्ये तिच्या विकसित अवस्थेत परिपूर्ण होतात. ती पुढीलप्रमाणे:

**(अ) नगररचना व घरे :**

**हडप्पा :** हडप्पा (पाकिस्तान) हे ठिकाण रावी नदीच्या डाव्या किनाऱ्यावर वसलेले आहे. या नगराचे बालेकिल्ल्याचा भाग (Citadel) व लोकवस्तीचा भाग (Lower Town) असे दोन भाग पडतात. नगररचनेचा विचार करता, या नगराची, मुख्य उंचवटयावर तटबंदी असलेला बालेकिल्ला, बालेकिल्ल्याच्या वायव्येला कामगारांच्या चाळी व धान्य कुटायची जागा, तर या जागेच्या जवळच उत्तरेस नदीलगत धान्य कोठारे आणि बालेकिल्याच्या दक्षिणेस कबरस्थान अशी रचना दिसून येते. तर बालेकिल्ल्यातील घरांचा विचार करता, एक चौकानी अंगण आणि त्याच्या चारही बाजूला खोल्यांची रचना दिसून येते. तसेच, काही घरांमध्ये तर जवळजवळ १२ खोल्या दिसून येतात. याहीपेक्षा मोठी घरे आढळलेली असून, यामध्ये स्वयंपाकघर तसेच शौचालयांची सोय करण्यात आलेली होती. काही धनाढ्यांच्या घरांमध्ये स्वतंत्र जलतरण तलावाचीही सोय होती. येथील घरांचे दरवाजे अरुंद गल्ल्यांमध्ये उघडत असत. येथील घरांच्या रचनांवरुन येथील सामाजिक-आर्थिक भेदाचेही संकेत मिळतात. तर, लोकवस्तीच्या भागात, घरांबरोबरच, कारागीरांच्या कार्यशाळा आणि दुकाने ही होती, जसे, कुंभारांच्या भट्ट्या, रंगाऱ्यांचे कुंड, धातुमध्ये काम करणाऱ्यांच्या, शंख-शिंपल्यांचे अलंकार करणाऱ्यांचे तसेच मणीकारांची.

**मोहेनजोदडो :** मोहेनजोदडो (पाकिस्तान) हे सिंधु नदीच्या काठी वसलेले शहर होते. हे शहर हे दोन भागात वसलेले होते, बालेकिल्ल्याचा भाग व लोकवस्तीचा भाग. यातील बालेकिल्ल्याच्या भागात,

महास्नानगृह, तिच्या पश्चिमेस धान्याचे कोठार, तर बालेकिल्ल्याच्या दक्षिणेस एक सभागृह असून सर्व एका तटबंदीने वेढलेले आहेत. तर लोकवस्तीचा भाग उत्तर-दक्षिणेस १०७० मी. तर पूर्व-पश्चिम ६८५ मी. असा पसरलेला आहे. यामध्ये रस्ते उत्तर-दक्षिण जाणारे असून, एकमेकांना व्यवस्थित काटकोनात छेदतात. यातील मोठा रस्ता हा कमीतकमी १० फूट रुंद आहे. येथील घरे ही भाजीव वीटांची बांधलेली असून, यामध्ये अंगण व अंगणाभोवती ४-६ राहण्याच्या खोल्या, बाथरुम तसेच स्वयंपाकघर अशी रचना दिसून येते. यातील एका मोठ्या घरात तर जवळजवळ ३० खोल्या आहेत तर काही घरं दुमजलीसुध्दा आहेत. पाणीपुरवठ्यासाठी साधारण घरांमध्ये विहिरीची सोय केलेली दिसते. या लोकवस्तीच्या भागास मात्र तटबंदीची सोय आढळून येत नाही.

**कालीबंगन :** सध्या कोरडी पडलेल्या सरस्वतीच्या किनारी कालीबंगन (राजस्थान) हे शहर वसविले गेले. हे शहर बालेकिल्ला व लोकवस्तीचा भाग अशा दोन भागात वसलेले आहे. येथील बालेकिल्ल्याच्या दक्षिण भागात मातीच्या विटांनी बांधलेल्या जोत्यांवर अग्नीवेदी बांधलेल्या आहेत. जवळच एक विहिर व अंघोळीसाठी उंचवटे केलेले आहेत. अर्थातच, स्नान व त्यानंतर पूजापाठ करण्याची ही जागा असावी. तर, लोकवस्तीचा भागही (२४० मी. पू-पु ३६० मी.उ-द) तटबंदीने बंदिस्त असून, त्यास पश्चिमेस (बालेकिल्ल्याकडे जाण्यासाठी) व वायव्येस (नदीकडे जाण्यासाठी) असे दोन दरवाजे आहेत. येथे सांडपाणी वाहून जाण्यासाठी उतम व्यवस्था असून, गटारे विटांनी बांधलेली आहेत. येथील रस्ते उत्तर-दक्षिण व पूर्व-पश्चिम जाणारे असून, यास गल्ल्यातील रस्ते (१.८ मी. ते ७.२ मी. रुंद) जोडलेले आहेत. येथील घरे ही, एक अंगण व त्याभोवती बांधलेल्या खोल्या, अशा रचनेची आहेत. या खोल्यांचा विचार करता असे दिसते की एक खोली प्रार्थनागृह म्हणून वापरली जात असावी. तर घरांची जमिन मातीच्या/मातीच्या विटांनी तयार केलेली असून, काही ठिकाणी फरश्याही बसवलेल्या आहेत. तसेच गुरांना चारा खाण्यासाठी व पाणी पिण्यासाठी अंगणात मातीच्या विटांचे एक मोठे भांडे व जमिनीत एक मडके पुरलेले आहे. अर्थातच, या घराचा अंगणात घडणारा दरवाजा हा बैलगाडी जाण्याइतका मोठा केलेला आहे. कालीबंगनच्या नगररचनेचा विचार करता असे दिसते की, बालेकिल्ल्याचा भाग व लोकवस्तीचा भाग वगळता, बालेकिल्ल्याच्या दक्षिणेस थोडी दूर काही घरे दिसून येतात. यांना कोणत्याही स्वरुपाचे कुंपण नसून, येथील घरे अतिशय साध्या स्वरुपाची आहेत. येथे कदाचित कामगार/कनिष्ठ वर्गाचे लोक रहात असावेत.

**लोथल :** लोथल (गुजरात) हे भोगाव नदीच्या काठी वसलेले असून याठिकाणी हडप्पा संस्कृतीचे महत्वाचे मानवनिर्मित बंदर होते. ही भोगाव नदी साबरमती नदीची एक उपनदी असून, कँबेच्या आखाताद्वारे अरबी समुद्राला जाऊन मिळते. हे शहर दोन भागात वसलेले असून दोघांना मिळून एक समान तटबंदी आहे. अर्थात बालेकिल्ल्याचा भाग हा लोकवस्तीच्या भागापेक्षा वेगळा दाखविण्यासाठी तो एका तयार अशा उंचवट्यावर वसलेला आहे. येथील बालेकिल्ल्यात एका उंचवट्यावर (४ मी. उंच) १२ स्नानगृहांच्या रांगा आहेत. तसेच स्नानासाठी एका विहिरीचीही सोय केलेली आहे. येथून जाणारे सांडपाणी पुढे एकत्र करुन एका मोठ्या गटारीमध्ये सोडण्याची व्यवस्था आहे. हा उंचवटा धार्मिक उपयोगासाठी वापरात असावा. तर,

या शहराच्या पश्चिमेस, नदीच्या बाजूने, एक डॉकयार्डही (२१६ मी.उ -दु ३६ मी. पू-प) आहे. तर बालेकिल्ल्याच्या भागात, धक्क्याजवळच एक मालाचे कोठार आहे.

लोकवस्तीच्या भागाचा विचार करता येथे उत्तर दक्षिण जाणारे रुंद ( ४ ते ६ मी.) असे रस्ते असून यांना बाजूच्या गल्ल्यांचे रस्ते जोडलेले आहेत. याठिकाणी विविध कारागीरांची घरे व त्यांच्या भट्ट्या पसरलेल्या आहेत, जसे, तांबट, सोनार, मणीकार इ.

धोलावीरा : धोलावीरा (ता. बछाऊ, जि. कच्छ) हे गुजरातमधील कच्छच्या वाळवंटातील 'खादिर' नावाच्या बेटावर बसलेले आहे. धोलावीरा येथे पूर्व हडप्पा काळातच आयताकृती तटबंदीयुक्त नगर उभारले गेले (टप्पा १). ही तटबंदी रुंद अशी असून हिचा पाया ११ मीटरचा होता. तर घरं मातीच्या विटांनी बांधलेली होती. हे लोक शंख-शिंपले, स्टेटाईट, मौल्यवान दगड व तांबे यातून विविध वस्तू तयार करीत असत. पुढील टप्प्यात (टप्पा २) जसजशी धोलावीराची लोकसंख्या वाढत गेली. तसतसा नगररचनेत बदल होत गेला. तटबंदी तीन मीटरने अधिक वाढविली गेली व तिला चुन्याचा गिलावा देण्यात आला. मातीच्या विटा टिकून रहाव्यात तसेच कच्छचा उन्हाळा सुसह्य व्हावा यासाठी येथील घरांनाही चुन्याचा गिलावा देण्यात आला.

पुढील टप्प्यात (टप्पा ३ अ) धोलावीराची आणखीन प्रगती झाली. याठिकाणी नगरचनेत काही मूलभूत बदल केले गेले. याठिकाणी तटबंदीयुक्त बालेकिल्ला बांधण्यात आला. याच्या उत्तरेला असणारी घरे तोडून काढून बालेकिल्ल्याला जोडूनच, मात्र तटबंदीबाहेर असे एक 'खुले सभागृह' (Ceremonial Ground) निर्माण करण्यात आले. तर बालेकिल्याच्या पश्चिमेला जोडूनच, मात्र स्वतंत्र तटबंदीची 'निवासी-कार्यालयीन संकुल' (Residential/cum office complex) उभारण्यात आली. येथे मुख्यत्वे व्यापारी प्रशासनाचे कार्यालय असावे. तर, वाढीव लोकसंख्येची मागणी विचारात घेता, बालेकिल्ल्याच्या उत्तरेस असणारा लोकवस्तीचा भाग-१ (Middle Town) हा अधिक वाढविण्यात येऊन, तिच्या तटबंदीची मजबूती करण्यात आली. या सर्वांसाठी एक समना तटबंदी असून यास चार प्रवेशद्वारे होती. तर पाण्याच्या सोयीसाठी नाल्यांना बांध घातले गेले आणि तलावांची मालिका तयार करण्यात आली. पुढील काळात (टप्पा ३ ब, ४) वाढीव लोकसंख्येसाठी पूर्वीच्या विभागांच्या पूर्वेस लोकवस्ती-२ (Lower Town)) हा भाग निर्माण करण्यात आला व त्याभोवतीही एक तटबंदी बांधली गेली. या काळात धोलावीराची - बालेकिल्ला, खुले सभागृह, निवासी-कार्यालये, लोकवस्तीचा भाग-१, लोकवस्तीचा भाग-२, तलावांची मालिका व प्रत्येकास स्वतंत्र आणि सर्वांना समना तटबंदी अशी नगररचना पूर्ण झाली. त्याचबरोबर या काळात धोलावीराला भूकंपाचेही धक्के बसले.पुढे उत्तर हडप्पा काळात (टप्पा ५ ते ७) धोलावीराची वैभवशाली नगररचना, तेथील व्यवस्थापन हे संपूर्णत: कोसळले जाऊन हे शहर ओसाड झाले (इ.स.पू. १६००).

- **हडप्पा संस्कृतीतील महत्वाच्या इमारती :**

हडप्पा संस्कृतीमध्ये भारताचे पहिले नागरीकरण घडून आले. 'सार्वजनिक इमारती' या कोणत्याही

नागरीकरणाची महत्वाची दृश्य अशी खूण असते. हडप्पा संस्कृतीतही काही सार्वजनिक इमारती दिसून येतात.

**महास्नानगृह :** मोहेनजोदडोच्या बालेकिल्ल्यातील महास्नानगृह हे ६० x ३६ मी. असून, मध्यभागी पोहण्यासाठी १२ x ७ मी चा तलाव (३ मीटर खोल) होता. हे भाजीव विटांनी बांधलेले आहे. याच्या तळाशी २ ते ३ मी. रुंद अशी जमिन असून पाणी झिरपू नये यासाठी आतील बाजूने चुन्याचा गिलावा केलेला होता. या तलावात उतरण्यासाठी पायऱ्या असून, कपडे बदलण्यासाठी तसेच पूजाविधी करण्यासाठी भोवताली खोल्याही आहेत. यात सतत पाणीपुरवठा व्हावा यासाठी जवळच एक तळे आहे तर सांडपाण्यासाठी ही व्यवस्था आहे.

**धान्याचे कोठार :** हडप्पा येथे नदीच्या दक्षिणेस व धान्यांच्या उंचवटयाजवळ धान्यकोठार आहे. हे कोठार एकूण ५५ x ३ मीटरच्या क्षेत्रात तयार केलेले आहे. यामध्ये कोठारांच्या एकूण दोन रांगा असून, प्रत्येक रांगात सहा कोठारे (प्रत्येकी १५ x ६ मी.) आहेत. या कोठारांचा पाया भाजीव वीटांचा असून, हवा जाण्यासाठी छिद्रं तयार केलेली आहेत. या धान्यकोठारालगतच उत्तरेस रावी नदी वाहते. तर, कामगारांच्या चाळीलगतच, धान्य कुटण्यासाठी उंचवटे तयार केलेले आहेत. एकूण पाच पूर्वपश्चिम रांगात हे उंचवटे असून, प्रत्येक रांगात सहा उंचवटे आहेत. हे उंचवटे (३.५ मी व्यासाचे) भाजीव विटांच्या वेटोळ्यांनी वेढलेले असून, त्यामुळे मध्यभागी खोलगट भाग तयार झालेला आहेत.

**राजमहाल :** मोहेनजोदडो येथे, महास्नानगृहाजवळ राजमहलाची एक लांब (२३० x ७८ फूट) इमारत आहे. या इमारतीला तीन व्हरांडे असून, समोरच ३३ चौरस फुटाचे अंगण पसरलेले आहे. तर मुंडिगाक येथे एक खांबांची रांग असलेला मोठा महाल ही सापडलेला आहे. हे अवशेष राजमहालासारख्या इमारतीकडे निर्देश करतात.

**सभागृह :** मोहनेजोदडो येथील सभागृह आठ मीटर लांबी रुंदीचे असून, हे चार रांगात, प्रत्येकी पाच अशा २० खांबांनी बांधलेले आहे. हे सभागृह एकूण ७५० चौ.मी. इतक्या जागेत बांधलेले आहे. असेच एक धोलावीरा येथे, बालेकिल्ल्याला जोडूनच 'खुले सभागृह' आढळते.

**कामगारांच्या चाळी :** हडप्पा येथे बालेकिल्याच्या वायव्येस कामगारांच्या चाळी असून त्याभोवती छोटी तटबंदी आहे. या चाळी पूर्वपश्चिम अशा दोन रांगात वसलेल्या आहेत. यामध्ये प्रत्येक घरास (१७ x ७ मी) एक खोली व अंगणाची सोय केलेली आहे.

- **पाण्याची सोय :**

सर्वसाधारणत: घरोघरी आड (बिनपायऱ्यांची, पिण्याच्या पाण्यासाठी उपयुक्त अशी विहिर) आपल्याला दिसून येतात. त्याचबरोबर बारव (पायऱ्यांची विहीर) ही दिसून येते. तसेच धार्मिक स्थळी, स्नानाला महत्व असल्याने, विहीरींची सोय दिसून येते. मात्र धोलावीरा येथे जलव्यवस्थापनाचा एक आदर्श नमुना दिसून येतो. धोलावीरा येथे पाण्याची सदैव चिंता आजही आहे. येथील स्टेज ३ अ च्या हडप्पावासियांनी याठिकाणी एक

अभिनव कल्पना वास्तवात आणली. धोलावीराच्या दक्षिण व उत्तर बाजूंनी पावसातच वाहणारे नाले होते. यांनी या नाल्यांना बांध घालून यातील पाणी शहरात वळविले. त्यांनी शहरातील तटबंदीला जोडून आतल्या बाजूस, चारी बाजूनी थोड्या थोड्या अंतराने तलाव बांधलेली होते. त्यांनी नाल्याचे वळविलेले पाणी या तलावंच्या मालिकेत साठवून ठेवले व अशा रीतीने धोलावीरासमोरील पाण्याचा प्रश्न सोडविला.

- **हडप्पा संस्कृतीतील नगररचनेची वैशिष्ट्ये :**

या ठिकाणी शहराचे दोन भाग पडलेले होते, महत्वाच्या व्यक्तीसाठी बालेकिल्ला (Citadel) व इतर लोकांसाठी लोकवस्तीचा भाग (Lower Town). हे शक्यतो एकमेकांपासून वेगळे व स्वतंत्र तटबंदी असलेले असे होते. काही ठिकाणी एक वेगळी वस्ती तटबंदीच्यां बाहेर ही असे. (फक्त धोलावीरामध्ये लोकवस्तीचा भाग-२ आहे). येथील नगररचना नियोजनबद्ध असून याठिकाणी भाजक्या विटांनी बांधलेल्या इमारतींचे सार्वजनिक व खाजगी असे दोन भाग पडतात. यामधील सार्वजनिक स्थापत्यात महास्नानगृह, धान्यकोठारे, सभागृह, बंदर इ.चा समावेश होतो. या सार्वजनिक स्थापत्यावर पुरोहित वर्गाचे वर्चस्व होते. तर, खाजगी स्थापत्यात चार ते ३० खोल्यापर्यंत असणाऱ्या एक/दुमजली घरांचा समावेश होतो. ही घरे चौरस असून, मध्यभागी चौक व सभोवती खोल्या अशी रचना असे. काही घरांचे दरवाजे हे बैलगाडी ये-जा करु शकेल एवढे मोठेही असत. ही घरे रस्त्याच्या कडेला जरी असली तरी त्यांची तोंडे हि गल्ल्यात घडणारी असत. येथील रस्ते उ-द- व- पू-प जाणारे असून रुंद असत. यांना गल्लीतील रस्ते मिळत असत. येथे वापरलेल्या विटांचे ४:२:१ (लांबी : रुंदी : जाडी) असे प्रमाणबध्द आकार आहेत. या ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी साधारणत: प्रत्येक घरात विहिरीची सोय होती. तर सांडपाणी वाहून नेण्यासाठी मातींच्या विटांची बांधिव अशी गटारे होती. (धोलावीरामध्ये तलावांची मालिका आहे). या लोकांना एकंदर शिस्तप्रियता, नियमबध्दता व स्वच्छतेची आवड दिसते. प्रमाणबध्द वीटा, सरळ-रुंद रस्ते, उभ्या आडव्यास छेदणाऱ्या रस्त्यांनी शहराची बुध्दिबळाच्या पटासारखी केलेली मांडणी, विहिरी, स्नानगृह, सांडपाणी व्यवस्थित वाहून नेण्यासाठी बांधीव भुयारी गटारे व सामूहिक मोठे गटार इ. वरुन हडप्पा संस्कृतीची नागरी जाणीव किती प्रखर होती हे दिसून येते. ही शहरे पूर अथवा भूकंप अशा नैसर्गिक आपत्तीमुळे ऱ्हास पावली असावीत.

**(ब) राजकीय आणि आर्थिक व्यवस्था :**

- **राजकीय व्यवस्था :**

हडप्पन समाजात कोणत्यातरी प्रकारची शासनव्यवस्था असण्याचे संकेत मिळतात. असे दिसते की, याठिकाणी, सर्वसाधारणत: तीन प्रकारचे प्रभावशाली वर्ग दिसून येतात, राज्यकर्ते, व्यापारी आणि पुरोहित. किंवा असेही असू शकते की एकच प्रभावशाली वर्ग अस्तित्वात असावा, जसा पुरोहित वर्ग, याच्याकडे वरील तिन्ही सत्ता असाव्यात. कारण, मोहेनजोदडो येथील महास्नानगृहाजवळच धान्यकोठार असणे, कालींबगन मध्ये बालेकिल्ल्यामध्ये यज्ञवेदी असणे, लोथल मध्ये यज्ञवेदीजवळ धान्यकोठार असणे वरील बाबींची पुष्टी करतात. काहीही असले तरी, एवढ्या विस्तृत प्रदेशामध्ये-विविधता असूनही सांस्कृतिक एकता राखून ठेवणे हे व्यवस्थित राजकीय व्यवस्थेशिवाय अशक्य वाटते.

- **आर्थिक व्यवस्था : शेती, पशुपालन, उद्योग, व्यापार**

**शेती :**

हडप्पा संस्कृती मुख्यत्वे नद्यांच्या खोऱ्यात विकसित झाल्याने येथील शेती सुपीक अशा स्वरुपाची दिसून येते. हे, गहू (दोन जाती), बार्लि, ज्वारी, बाजरी, तेलबीया, मटार, वटाणा, तीळ, मोहरी (तेलासाठी), तांदूळ, कापूस इ. पिकवित असत. मोहेनजोदडोमध्ये सूती कापडाचा जो तुकडा मिळालेला आहे त्यावरुन दिसते की हे लोक कापसाच्या शेतीबरोबरच वस्त्रोद्योगामध्येही गुंतलेले होते. हे शेतीसाठी दगडी/लाकडी फाळ असलेला लाकडी नांगर, खुरपे, छोटे फावडे इ. अवजारे वापरत असत. कालीबंगन येथील पूर्व हडप्पा काळामध्ये एक नांगरलेले शेत आढळलेले असून, तेथील लोक शेतीतून आंतरपीके घेत असत. यावरुन हेही लक्षात येते की, या काळापासूनच या लोकांना लाकडी नांगराचा परिचय होता.

**पशुपालन :**

अशा वैविध्यपूर्ण शेतीबरोबरच, पशुपालनाचाही व्यवसाय येथे मोठ्या प्रमाणावर होता. यामध्ये, शेळ्या, मेंढ्या, बैलांबरोबरच कोंबड्यांचाही समावेश होता. तसेच, काही ठिकाणी वराह, म्हैशी, हत्ती, ऊट यांचीही हाडे मिळालेली आहेत.

**उद्योग :**

हडप्पा संस्कृती शेतीप्रधान जरी असली तरी याठिकाणी विविध धातू आणि वस्तूंतील कारागीरी अतिशय उल्लेखनीय अशी होती. याठिकाणी उद्योग व कारागिरीचे विशेषीकरण (Specilization) झालेले दिसून येते.या संस्कृतीमध्ये मणीकारी उद्योग अतिशय विकसित स्वरुपाचा होता. यामध्ये विविध प्रकारच्या दगडांच्या हत्यारांसह, मौल्यवान दगडांचा मण्यांसाठी वापर केला जात असे. असे मणी बनवण्यासाठी, दगडाला भोके पाडण्यासाठी ड्रिल, ऐरण, दगड कापणारी यंत्रं तसेच भट्टया यांचा वापर केला जाई. यामध्ये सेलखडीबरोबरच अकीक (Carnelian) वैदुर्य, गोमेद (Agate), नीलम (Jasper) अशा मौल्यवान खड्यांमध्ये काम केले जात असे. तसेच, या मणींचा कच्चा माल स्थानिक स्तरावर मिळत नसे. अशा वेळी विविध प्रदेशातून वेगवेगळ्या प्रकारचे मौल्यवान दगड आणवून त्यांचे मणी, आभूषणे बनविली जात. या संस्कृतीतील लोथल हे अकीकसारख्या मौल्यवान दगडाचे मणी तयार करण्यात प्रसिध्द होते.

मणीकारीबरोबर या ठिकाणी तांबे व कास्य तंत्रज्ञानात उच्च प्रगती दिसून येते. धातूकामामध्ये विटांच्या भट्टया वापरुन छोटे फावडे, सुया, खुरपे, गळ, चपट्या कुऱ्हाडी, छिन्न्या, सुरे, भाल्यांची टोके, बाणांची टोके, तलवारी (तांबे), प्राण्यांच्या/नर्तकीच्या मुर्ती (कांस्य) तयार होत असे. शिवाय, धातूचे दोन तुकडे जोडून भांडी बनवण्याचे तसेच कास्यांच्या मूर्त्या, खेळण्या बनविण्याचे अवघड तंत्रज्ञानही त्यांना अवगत होते. त्याचप्रमाणे सोन्यामध्येही काम केले जात असे, जसे, मण्या, ताईत, सूया, अलंकार व आभूषणे इ. तर चांदीची भांडी, थाळ्या, मणी, आभूषणे इ. बनविली जात असत. मोहेनजोदडो येथे तर दागिन्यांचा मोठा साठा मिळालेला आहे. मोहेनजोदडो येथे उत्कृष्ट असे तांबे आणि कास्यांतील शिल्पकार दिसून येतात. तर

लोथल येथे लोकवस्तीच्या भागात तांबट, सोनार इ. विविध कारागिरांची घरे व त्यांच्या भट्ट्या पसरलेल्या आहेत. अशा धातूकामाबरोबर कुंभारकलाही विकसित झालेली होती. 'काळ्या रंगातील चित्रित लाल भांडी' हे हडप्पा संस्कृतीतील भांड्यांचा विशेष प्रकार होता. यामध्ये साठपाच्या सर्वसाधारण भांड्यांबरोबरच आलंबयुक्त थाळी (Dish-on-stand), जाळीदार उभट भांडे (Perforated Jar) हे विशेष उल्लेखनीय होत. यावरील चित्रांचा विचार करता, जाड रेषा, पानं, तराजु,जाळीदार काम, पिंपळाचे झाड, भौमितिक आकार, मानवी आकार इ. आकृत्या दिसून येतात.

याबरोबरच चन्हुदडो (सिंध) तसेच बालाकोट (बलुचीस्तान) येथील शिंपल्याच्या वस्तू (मणी, ब्रेसलेट, अंगठ्या, कोरीव काम) तसेच बांगड्या प्रसिध्द होत्या. तसेच, सेलखडीमध्ये शिक्के आणि हस्तीदंतांच्या कंगवे, फण्या, शिक्क्यांसाठी कोरीव ठोकळे, कोरण्या, टाचण्या तयार करणारेही होते. येथे पाथरवट ही (दगडांची साधने बनविणारे) असून, गारांचे विळे, नांगराचा फाळ इ. शेतीची अवजारे दगडापासून बनवत. रोहरी व सक्कर येथून चुनखडीचा दगड येत असून त्याचा वापर दगडाची पाती बनवण्यासाठी होत होता. शिवाय मातीच्या टकळ्या वापरु सूतकाम-वीणकाम केले जात असून हा एक कुटिरोद्योग असावा असे दिसते. यासोबत विटा बनवणे, गवंडीकाम इ. उद्योग ही मोठ्या प्रमाणावर चालत असावेत.

**कच्चा माल :** हडप्पा संस्कृतीमधील अवशेषांमध्ये आणि त्यानुषंगाने कच्च्या मालामध्ये वैविध्य दिसून येते. असे दिसते की तांबे राजस्थानच्या खेत्री खाणीतून तसेच बलुचिस्तान, वायव्य सीमाभागातून; तर सोने कार्नाटकातील कोलार क्षेत्रातून; चांदी अफगाणिस्तना, इराण तसेच मेसोपोटेमियामधून; शीसे काश्मीर अथवा राजस्थान मधून मिळवले जात होते. तर मणीकारीसाठी वैदुर्य बदक्शान येथून; जेड आणि फिरोजा मध्य आशियातून; गोमेद सौराष्ट्र येथून तर शिपंले गुजरातच्या किनारपट्टीवरुन मिळवले जात. तर, लाकूड जम्मू येथून मिळवले जात असे. हडप्पाच्या काही वसाहती अशा संसाधनाच्या ठिकाणीच वसलेल्या दिसून येतात, जसे बदक्शानच्या परिसरातील शोर्तुघई आणि अल्तिन देपे या वसाहती. तसेच सुतकाजेन-डोर सारखी बिगरशेती शहरं हडप्पा आणि मेसोपोटेमिया यामधील व्यापारात एकप्रकारे व्यापारी चौकीसारखे कार्य करीत असत. अर्थात, नगरांतील प्रशासा यंत्रणा या एकंदर व्यापारी जाळ्यावर नियंत्रण ठेवत असे.

**व्यापार आणि वाणिज्य :** हडप्पन नगरातील धनाढ्य तसेच प्रभावशाली लोकांची गरजा पूर्ण करण्यासाठी मुख्यत्वे दूरदेशी व्यापाराला प्रोत्साहन मिळालेले दिसते. येथील लिपीची समानता, व्यापारातील वस्तूंची विविधता व आंतरराष्ट्रीयता यावरुन हे निश्चित की हडप्पा संस्कृती ही व्यापारप्रधान होती. येथील महत्वाची शहरे हडप्पा संस्कृतीच्या इतर शहरांबरोबरचे, भारतातील दुसऱ्या शहरांशी/संस्कृतींशी तसेच आशियातील संस्कृतींशी एका व्यवस्थित व्यापारी जाळ्याने/नेटवर्कने जोडली गेली होती. लोथल हे हडप्पा संस्कृतीचे अरबी समुद्राकडे घडणारे एक महत्वाचे बंदर होते.

**अ. अंतर्गत व्यापार :** कच्च्या मालाच्या गरजेतून हडप्पा संस्कृतीची विविध प्रदेशात काही केंद्रे निर्माण झाली. तसेच, याठिकाणी पूर्वीपासूनच काम करत असणारी केंद्रे दळणवळणाच्या साधनांनी जोडली गेलेली दिसून येतात. यामधून सोने (उ. कार्नाटकातून), तांबे (खेत्री: राजस्थान), मौल्यवान दगडांमध्ये (मणी

तयार करण्यासाठी) ॲमेथिस्ट (महाराष्ट्र), गोमेद/अगेट, चॅल्सिडोनी, अकिक (सौराष्ट्र) इ. कच्चा माल मिळवला जात असे.

**ब. आंतरराष्ट्रीय व्यापार :** हडप्पाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विचार करता मुख्यत्वे मेसोपोटेमिया आणि इराणशी होणारा व्यापार लक्षात घ्यावा लागतो. मेसोपोटेमिया मधील सूसा, ऊर, निप्पूर, किश, उम्मा, तेल अस्मार अशा ठिकाणी हडप्पा संस्कृतीची शिक्के, वजन-मापे, मातीच्या तसेच टेराकोटाच्या मुर्ती, अकिकाचे मणी, नक्षीदार हाडे सापडलेले आहेत. यातील काही शिक्क्यांवर एकशिंगी प्राणी तसेच हडप्पा लिपी मिळालेली आहे. तसेच, पर्शिया/इराण येथील फेलका, बहारीन इ. ठिकाणीही अशा प्रकारचे हडप्पा शिक्के मिळालेले आहेत. तर हडप्पा स्थळांमध्ये मात्र मेसोपोटेमियाच्या वस्तू कमी प्रमाणावर मिळालेल्या आहेत. कदाचित असे असावे की मेसोपोटेमिया, कपडे, लोकर, वासाचे तेल, कातडी वस्तू इ. सारख्या नाशवंत मालामध्ये व्यापार करीत असल्याने या वस्तूंचे अवशेष टिकलेले नाहीत. मात्र हडप्पा स्थळांतील चांदीच्या वस्तू आणि काही लंबाकार शिक्के आणि तांब्याचा धातूपिंड निश्चितच मेसोपोटेमियाकडे बोट दाखवितात.

**क. आयात व निर्यात :** यातील आयात मालांचा विचार करता चांदी (अफगाणिस्तान, इराण), मौल्यवान दगडांमध्ये (मणी तयार करण्यासाठी) वैदुर्य (बदक्शान, इशान्य अफगाणिस्थान), नीलमणी (Turquise) (मध्य आशिया, इराण), जेड (मध्य आशिया) याचा विचार होतो. तर निर्यातीमध्ये मेसोपोटेमियाशी होणाऱ्या व्यापारात तांबे, सोने, अकिक, हस्तीदंत, मोती, कापूस, मसाल्याचे पदार्थ, वेगवेगळ्या प्रकारचे लाकूड इ. नाशवंत बाबींचा समावेश होतो.

**ड. वजन-मापे :** येथील वजनमापांमध्येही एक प्रकारची प्रमाणबध्दता दिसून येते. या वजनांची एक मालिका असून, प्रथम दुपटीत म्हणजे १, २, ४, ८, ६४ अशी व नंतर १६ च्या पटीतील दशमान पध्दतीची म्हणजे ३२०, ६४०, १६००, ३२००, ६४०० अशी होती. येथे लांबी '३७.६ सेमी चा एक फूट' अशी मोजपट्टीने मोजली जात होती. ही वजनं गारगोटी,जास्पर, स्टेटाईट तसेच चुनखडीपासून बनवलेली असत. तर यासाठी तांब्याचा तराजू वापरला जात असे. वजनमापांतील अशा प्रमाणबध्दतेतून हडप्पा प्रशासनाचा विस्तृत प्रदेशांवरील नियंत्रणाचा यशस्वी प्रयत्न दिसून येतो.

**इ. शिक्के व मुद्रा :** व्यापारी मालाची हमी देण्यासाठी शिक्क्यांचा वापर केला जात होता. हडप्पा संस्कृतीतून जवळजवळ २००० पेक्षा अधिक शिक्के मिळालेले आहेत. हे साधारणतः चौकोनी असून, स्टेटाईटपासून बनवलेले असत. हे शिक्के १ ते ५ सेमी पर्यंत आकाराचे असून, साधारणतः त्यांच्या एका बाजूवर चित्र तर दुसऱ्या बाजूस अक्षरे दिसतात. प्राण्यांच्या आकृतींचा विचार करता यामध्ये भारतीय हत्ती, रेडा, गेंडा, वाघ आणि मुख्यत्वे वशिंडयुक्त बैल दिसून येतात. त्याचप्रमाणे काही संयुक्त पशु ही दिसून येतात. तर काही शिक्क्यांवर पशुपती आणि मातृदेवता ही दिसून येतात. कदाचित असे शिक्के धार्मिक उपयोगासाठी वापरले जात असावेत.

**फ. वाहतुकीची साधने :** हा व्यापार विविध अशा साधनांद्वारे केला जात असे. या वाहतूक

साधनांत, अंतर्गत व्यापारासाठी बैलगाड्या, बैलांचे तांडे, ऊंट यांचा वापर केला जात असे. तसेच, दूरवरील व्यापारासाठी पशुपालक जमातीच मुख्यत्वे बैलांचे तांडे घेऊन माल वाहतूकीची कामं करीत असत. तर सागरी व्यापाराचा विचार करता, मोहेनजोदडो आणि हडप्पाच्या शिक्क्यांवर जहाज, नावांच्या आकृत्या दिसतात तर लोथलमध्ये एका जहाजाची मातीची प्रतिकृतीही मिळालेली आहे. अर्थातच, सागरी व्यापार याद्वारे केला जात असून पश्चिम किनारपट्टीवर लोथल, बालाकोट सारखी बंदरे तर मकरान किनाऱ्यावर सुत्काजेने-डोर (पाकिस्तान आणि इराणच्या रस्त्यावर), सुत्काकोह अशा चौक्या दिसतात.

लोथल येथील डॉकयार्डची सोय विशेष लक्षणीय आहे. लोथल (गुजरात) हे भोगाव नदीच्या काठी वसलेले असून या ठिकाणी हडप्पा संस्कृतीचे महत्वाचे बंदर होते. ही भोगाव नदी साबरमती नदीची एक उपनदी असून, कँबेच्या आखाताद्वारे अरबी समुद्राला जाऊन मिळते. या शहराच्या पश्चिमेस, नदीच्या बाजूने एक डॉकयार्ड (२१६ मी. उ-द ु ३६ मी. पू-प) आहे. हे भाजीव वीटांच्या भीतीने (४.३ मी.उंच x १.२ मी. रुंद) बंदिस्त केलेले आहे. हे डॉकयार्ड नदीला एका कालव्याने (७ मी. रुंद) जोडलेले आहे.असे दिसते की व्यापारी जहाजे ही अरबी समुद्र-कॅबेंचे आखात-साबरमती-भोगाव अशा मार्गो प्रवास करीत येत असत. पुढे ही जहाजे भोगावती नदीतून प्रवास करुन, भरतीच्या वेळी, यो कालव्यातून लोथलच्या डॉकयार्डमध्ये येऊन थांबत असत. पुढे, डॉकयार्डला जोडूनच एक धक्काही आहे. या धक्क्यावर हा माल उतरवला जात असे/जहाजांत चढवला जात असे. पुढे ओहोटीच्या वेळी ही जहाज पुन्हा कालवा-भोगाव नदी-साबरमती-कँबेचे आखात-अरबी समुद्र अशी जात असत.

### क) सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती :

- **सामाजिक परिस्थिती :**

**अ. सामाजिक भेद :** हडप्पा संस्कृती ही एक नागरी संस्कृती असून यामध्ये विविध वर्ग व त्यामध्ये भेदही असावा. येथील नगररचना तसेच येथे सापडणाऱ्या अवशेषातील विविधता अशा समाजातील भेदांकडे बोट दाखवतात. जसे कालीबंगनच्या समाजाचा विचार करता याठिकाणी त्रिस्तरीय सामाजिक भेद दिसून येतात जसे, बालेकिल्ल्यात रहाणारा पुरोहित वर्ग, लोकवस्तीच्या भागात रहाणारा शेती-उद्योग करणारा वर्ग आणि कष्टकरी/कनिष्ठ वर्ग. मोहेनजोदडो, लोथल येथील पुरावेही वरील बाबीस पुष्टी देतात. म्हणजेच, या समाजामध्ये पुरोहित वर्ग (शासनकर्ता वर्ग), व्यापारी वर्ग, कारागीर वर्ग, शेतकरी वर्ग, व्यापारी पशुपालक जमाती, साधा कामगार/कष्टकरी इ. वर्गांचा समावेश होतो. यामध्ये पुरोहित वर्गाचे धार्मिक, आर्थिक (धान्यपुरवठयावर) तसेच सामाजिक वर्चस्व दिसून येते. तर, ही संस्कृती व्यापारप्रधान असल्याने त्यांचेही समाजात निश्चितच महत्वाचे स्थान असावे.

**ब. भाषा आणि लिपी :** ही संस्कृती मुख्यत्वे व्यापारप्रधान असल्याने लोकांना भाषेचे आणि लेखनाचे ज्ञान होते. हडप्पा संस्कृतीचा एकंदर मोठा विस्तार पाहता या संस्कृतीत वेगवेगळ्या भाषा बोलल्या जात असणे स्वाभाविक आहे. तर, लिखाणाचा विचार करता, या संस्कृतीची व्यवस्थित लिपी होती हे आपल्याला कळते. विविध वस्तूंवर आपल्याला लेखाचे पुरावे आढळून येतात. निव्वळ हडप्पा येथून अशा

३७०० वस्तू मिळालेल्या आहेत की ज्यावर काहीतरी लिहिलेले आहे. हे लिखाण मुख्यत्वे शिक्के आणि छापांवर (शिक्के ज्यावर उमटलेले आहेत तो भाग) दिसून येते. याशिवाय, विविध वस्तूंवरही दिसून येते, जसे,तांब्याची वडी,तांबे/कास्याची साधने,भांडी इ. ही लिपी चिन्हांच्या स्वरुपात असून,साधारण ५ चिन्हांचा एक लेख असतो. यातील सर्वात मोठा लेख जवळजवळ २६ चिन्हांचा आहे. हे लिखाण उजवीकडून डावीकडे केले जात असावे. ही लिपी जास्तीत जास्त शिक्क्यांवर आपल्याला दिसून येते. हे शिक्के बहुधा व्यापाऱ्यांचे असावेत. व्यापारी आपला माल अधिकृत करण्यासाठी हे शिक्के मारत असावेत.

आपण पाहिले की शिक्क्यांव्यतिरिक्त इतरही वस्तूवर आणि विविध उद्देशांसाठी लेखन दिसून येते.धोलावीरा येथे प्रवेशद्वारासमोर नगराच्या नावाचे लाकडी फलकही बसवण्यात आले. येथे उत्तरेकडील प्रवेशद्वारावरील फलकावर खाचा पाडून त्यामध्ये सेलखडीची (स्टेटाईट) १० अक्षरे (३३ सेमी उंच x २७ सेमी रुंद) बसवण्यात आलेली होती. तर, याठिकाणी काही धातूच्या आणि मातीच्या वड्यांवरही लेखन सापडलेले आहे. मोहेनजोदडो याठिकाणी एक लेखन असलेली आयताकृती तांब्याची वडी सापडलेली आहे. अशा वड्यांचा उपयोग धार्मिक विधीसाठी केला जात असावा. तसेच, मातीच्या भांड्यांवरही आपल्याला लेखन आढळून येते. याबरोबरच, तांबे/कास्यांची हत्यारे, बांगड्या, हाडांच्या पिना आणि अलंकारांवरही लेखन आढळते. अशी हडप्पा संस्कृतीतील लिपी आजपर्यंत वाचता आलेली नाही. तरीही, इतक्या विस्तृत प्रदेशावर समान लिपी सापडणे हे हडप्पा संस्कृतीचा एकसंघपणा दर्शविते.

**क. आहार :** आहाराचा विचार करता, या संस्कृतीतील लोक आहारात गहू, जव (सिंध आणि पंजाबमध्ये), जव (राजस्थान), बाजरी, तांदूळ (गुजरातमध्ये), वटाणे वापरत असत. तर तेलासाठी मोहरी, तीळ आणि तूपाचा वापर करीत असत. हे लोक अन्नात गोडपणा आणण्यासाठी मधाचा वापर करत असावेत. तर, फळांचा विचार करता हे, केळी, डाळींब, अंजीर, आंबे खात असावेत. याचबरोबर, आहारात, दुग्धजन्य पदार्थांचाही वापर असावा. अशा शाकाहाराशिवाय ते मांसाहारासाठी हरीण, अस्वल, शेळ्या, मेंढ्या, वराह, मासे यांचा वापर करीत असत. केनॉयर, केनेडी, लुकास इ. अभ्यासकांच्या म्हणण्यानुसार, या काळातील मानवाचा आहार हा एक समतोल आहार होता. यांच्या आहारात एंकदर जीवनसत्व आणि प्रथिने योग्य प्रमाणात असत.

**ड. वेशभूषा-केशभूषा :** येथील वेशभूषेचा विचार करता, स्त्रिया गुडघ्यापर्यंत पोचणारे अधोवस्त्र वापरत तर पुरुष धोतर व उपरणे वापरित असत. हे कपडे सुती असून, कुटिरोद्यागातून तयार होत असावे. क्वचित लोकरीचे कपडेही वापरत असावेत. येथील स्त्रि-पुरुष, दोघांनाही केस वाढविण्याची आवड होती असे दिसते. पुरुष केसांचा मधोमध भांग पाडून मागे बांधत असत. ते दाढी ठेवत मात्र मिशा काढत असत. तर स्त्रिया आंबाडा बांधीतच शिवाय पागोट्यासारख्या आकर्षक केशरचनाही करीत असत.त्याचप्रमाणे स्त्रिया पंख्याच्या आकाराचे शिरोभूषणही घालीत. पुरुष मात्र डोक्यावर काही घालत नसत. काही मात्र पागोटे घालत असावेत.

**इ. सौंदर्यप्रसाधने-अलंकार :** तर, सौंदर्यप्रसाधने व अलंकाराची रेलचेल पाहता, या सुखवस्तू

लोकांचा एकंदर नटण्यामुरडण्याकडे कल असावा असे दिसते. विशेषत- स्त्रिया पंख्याच्या आकाराचे शिरोभूषण, त्यावरील अलंकार, बिंदी, कर्णभूषणे, बाहुभूषणे, विविध प्रकारचे हार, कमरपट्टा, अंगठ्या, पैंजण असे अलंकार घालत असून यासाठी सोने, चांदी, तांबे, हस्तींदंताचा वापर सर्रास केला जात असे. पुरुषही हार, अंगठ्या, बाहुभूषणे असे अलंकार घालीत. शिवाय स्त्रिया सौंदर्यप्रसाधनासाठी खास पेटी वापरत असून, यामध्ये भुवया-चेहरा-ओठ रंगविण्यासाठी पाऊडर, काजळ-व ते लावण्यासाठी काडी, हस्तीदंती कंगवे, पीना-आकडे इ.चा समावेश होता.

**फ. कला :** हडप्पा संस्कृतीच्या लोकांनी भाजीव माती, तांबे, कास्य, सेलखडीसारखे मऊ दगड आणि दगड वापरुन आपला प्रगत कलाविष्कार केलेला दिसून येतो. मोहेनजोदडो येथे मिळालेली कास्यांतील नर्तिकेचा पुतळा हा हडप्पा संस्कृतीतील कलेच्या विकासाचे दर्शन घडवतो. त्याचबरोबर रेडा आणि शेळ्यांच्या छोट्या-छोट्या मूर्तीही सुंदर आहेत. छोट्या मुलामुलींच्या खेळण्या हा आणखीन मजेदार विषय. यामध्ये, भोवरा,लगोरी खेळण्यासाठी चकत्या, चेंडू, खुळखुळा, शिट्या, सुटे करता येण्यासारखे भाग असलेल्या बैलगाड्या, चाकावरील प्राणी इ. प्रकार असत. या खेळण्या बहुतेकदा भाजक्या मातीच्या बनवत. यातील भोवरा हा एक गंमतशीर प्रकार. हे भोवरे भाजक्या मातीचे बनवत. यांचे जमिनीवर फिरणारे टोक मात्र तांब्याचे असे. तर मुलींसाठी 'भातुकली'चे ही खेळणे दिसते. यामध्ये छोटी चूल, छोटी भांडी, छोटा बिछाना यांचा समावेश असे. दायमाबाद येथील गाडीवानासह बैलगाडी, हत्ती, रेडा, गेंडा इ. कास्यांतील शिल्पं (खेळण्या) अतिशय विस्मयकारक आहेत. कास्यांबरोबर मोहेनजोदडो येथील स्टेटाईटच्या पुरोहितचा पुतळा ही महत्वाचा आहे. तर हडप्पा येथील पुरुषांच्या अर्धशिल्पाची कलाकृती या इतक्या उत्तम आहेत की त्या फार आधुनिक काळातीलच वाटतात. तसेच, मातीमध्ये तयार केलेल्या छोट्या मूर्ती, शिल्पं मात्र मोठ्या प्रमाणावर सापडतात. यामध्ये पक्षी, माकडं, कुत्री, शेळ्या-बकऱ्या, तसेच वशिंडयुक्त आणि वशिंडरहित असे बैल अशा पशुपक्ष्यांचा समावेश असून, यांचा उपयोग खेळणी किंवा पूजेसाठी केला जात असे. याबरोबरच काही टेराकोटाच्या (भाजक्या मातीच्या) छोट्या बैलगाड्याही मिळतात. यामध्ये, विविध मुद्रांवर/शिक्क्यांवर कोरलेल्या विविध आकृत्यांचाही समावेश होऊ शकेल.

**ग. छंद-आवड :** या सुखवस्तू समाजास संगीत-नृत्यासारच्या कलांची आवड होतीच शिवाय प्राण्यांच्या टकरी/झुंजी-शिकार-मासेमारीसारखे छंदही होते. त्याचप्रमाणे मनोरंजनाचेही विविध प्रकार दिसून येतात, जसे, मातीची खेळणी, जुगार इ. थोडक्यात हडप्पा संस्कृती ही नागरी संस्कृती असून, येथे सामाजिक भेदांसह, एकंदर सुखवस्तुपणा दिसून येतो.

- **धार्मिक परिस्थिती :**

**अ. दैवते :** हडप्पा संस्कृतीत सापडलेले विविध शिक्के तसेच मातीच्या आणि टेराकोटांच्या मूर्ती येथील देव-देवतांबद्दल लक्षणीय माहिती पुरवतात. याठिकाणी मातृदेवता, पुरुषदेवता, प्राणी विशेषत: बैल, वनस्पती, संयुक्त/काल्पनिक अशा देवदेवतांचे पूजन होत असे. जगातील कोणत्याही शेतीप्रधान समाजात सुरुवातीला 'मातृदेवतेला' महत्वाचे स्थान असते. हडप्पा संस्कृतीमध्येही 'मातृदेवता' आणि तिचे पूजन हा

एक महत्वाच विशेष आहे. या संस्कृतीत आपल्याला भाजक्या मातीच्या कित्येक स्त्री-मूर्ती मिळतात. याठिकाणी एका शिक्क्यावर, वृक्षाला जन्म देणाऱ्या एका स्त्रीची आकृती आपल्याला दिसते. हिचे साम्य पूर्वमध्ययुगीन शाखंबरी देवतेशी दिसून येते. हडप्पा येथे अशीच एक मातृदेवता आपल्याला मिळते. काही मातृदेवता या गरोदर अवस्थेत दिसतात तर काही बाळांबरोबरही दिसतात. हे समृध्दीचे पूजन असते. तसेच काही स्त्री-मूर्तींच्या डोक्यावर पणतीचा आकार दिसतो. याठिकाणी कदाचित पणती लावली जात असावी. या मूर्त्या यज्ञामध्ये अर्पण करण्यासाठी किंवा मुख्य देवतेच्या पूजाविधीसाठी वापरल्या जात असाव्यात. तर काही स्त्री-मूर्ती या तुटलेल्या स्वरुपात आढळलेल्या आहेत. या काही प्रासंगिक धार्मिक विधीसाठी यज्ञामध्ये अर्पण करण्यासाठी किंवा तात्पुरत्या पूजाविधीसाठी वापरल्या जात असाव्यात. अर्थात अशा मातृदेवता आपल्याला मोहनजोदडो, हडप्पा, बनावली याठिकाणी मिळतात. मात्र कालिबंगन, लोथल, सुरकोटडा, मिताथल याठिकाणी यांचा अभाव जाणवतो. याचा अर्थ हडप्पा संस्कृतीमध्ये एकाच प्रकारची धर्मव्यवस्था नांदत नसावी.

पुरुष देवतेचा विचार करता सर्वात महत्वाची म्हणजे 'पशुपती' ही देवता. सर जॉन मार्शल यांना मोहनजोदडो येथे एक देवतेचा शिक्का सापडला. त्यांनी त्यास 'पशुपती' असे म्हटले. अशाच शिंगधारी देवता आपल्याला कोट दिजी येथील भांड्यावर, कालिबंगन येथील भाजक्या मातीच्या वडीवर तसेच पादरी येथील रांजणावर दिसून येते. त्याचप्रमाणे लेवान येथील पूर्वहडप्पा भांड्यावरही दिसून येते. याचाच अर्थ पूर्वहडप्पा काळापासूनच ही देवता हडप्पा संस्कृतहीमध्ये पूजली जात होती.अशा मातृदेवता आणि पुरुष देवतांबरोबर, आपल्याला 'सृजनाची' काही प्रतिकं दिसून येतात. जसे कालीबंगनमध्ये लिंग आणि योनीपीठ यांच्याशी सदृश्य असणाऱ्या काही मूर्ती सापडलेल्या आहेत.

अशा पुरुष आणि मातृदेवतांबरोबरच, काही वृक्षदेवताही दिसून येतात. विशेषत: पिंपळाचे महत्व अगदी पूर्वहडप्पा काळापासून (ते आजपर्यंतही!) दिसून येते. काही शिक्क्यांवर सभोवती पार असलेला पिंपळ दाखविलेला आहे. तसेच, एका ठिकाणी एका देवतेच्या डोक्यावरील शिंगामधून एक झाड उगवताना दिसते. मोहेनजोदडो येथील एका शिक्क्यावर एक लांबसडक केस असलेलर देवता पिंपळाच्या फांद्यांमधून वर येताना दिसते. तिच्यासमोर एक व्यक्ती साष्टांग नमस्कार घालत आहे व सोबत सात आकृत्या आहेत. काही विद्वानांच्या मते यांतूनच पुढील काळातील 'साती आसरा (अप्सरा)' किंवा 'सप्तर्षी' उदयास आले असावेत.हडप्पा संस्कृतीध्ये प्राण्यांचेही पूजन केले जात होते. बैल, साप, हत्ती, गेंडा, काळवीट, मगर, वाघ हे प्राणी दिसून येतात. वरील दैवतांसह स्वस्तिक/चक्र अशी शूभचिन्हे पुजली जात असावीत किंवा ती ताईत म्हणून वापरली जात असावीत.

**ब. पूजन/धार्मिक विधी स्थाने :** हडप्पा संस्कृतीमध्ये निश्चित अशी मंदिरांसारखी रचना दिसून येत नाही. तरी पूजास्थाने अथवा काही धार्मिक विधीच्या जागा आपणास दाखवता येतात. जसे, मोहनजोदडो येथील लोकवस्तीच्या भागामध्ये एक, मध्यवर्ती मंच असलेली मोठी इमारत मिळालेली आहे. हिला एक मोठे प्रवेशद्वार असून, मंचाकडे जाण्यासाठी दुहेरी पायऱ्याही आहेत. हे एक पूजास्थान असावे. येथील

महास्नानगृहाजवळ पूजापाठासाठी खोल्या दिसून येतात. तसेच लोथल मध्येही बालेकिल्ल्यात एका उंचवट्यावर (४ मी. उंच) १२ स्नानगृहांच्या रांगा आहेत. कालीबंगनमध्येही अग्नीवेदीजवळ, विहीर व अंघोळीसाठी उंचवटे केलेले होते. हे पुरावे धार्मिक विधीतील स्नानाचे महत्व दाखवितात.

याठिकाणी कालीबंगन येथील पुरावे विशेष महत्वाचे आहेत. येथील बालेकिल्ल्याच्या दक्षिण भागात धार्मिक स्थळे आहेत. याठिकाणी मातीच्या विटांनी बांधलेले उंच जोते दिसून येतात. या जोत्यांवर सात अग्नीवेदी बांधलेल्या आहेत. या वेदीमध्ये राख, कोळसा, भाजक्या मातीच्या वड्या सापडलेल्या आहेत. कदाचित या वेदींमध्ये आहूती दिली जात असावी. या वेदींजवळ एक बसण्याची जागा आहे. जवळच जमिनीत पुरलेले एक मातीचे भांडे आहे. म्हणजे, एका जागी बसून, जवळच्या भांड्यामधील वस्तू घेऊन, त्या वस्तूंची समोरील वेदीमध्ये आहूती देण्याची एकंदर सोय करण्यात आलेली आहे. या जवळच एक विहिर व अंघोळीसाठी उंचवटे केलेले आहेत. अर्थातच, स्नान व त्यानंतर पूजापाठ करण्याची ही जागा असावी. अशाच प्रकारच्या यज्ञवेदी बनवली, लोथल, आमरी, नागेश्वर, वागड (गुजरात); राखीगढी (हरयाणा) येथे सापडलेल्या आहेत. मात्र कालीबंगन आणि बनावली येथील या व्यवस्था सामुहिक पूजापाठांसाठी आहेत. तर, बाकी ठिकाणी व्यक्तीगत धार्मिक विधींसाठी आहेत.

**क. धार्मिक संकल्पना :** आपण हे पाहिले की हडप्पा संस्कृतीत विविध देवदेवता दिसून येतात. त्याचबरोबर अशांची धार्मीक स्थानं ही आपण पाहिली. या व्यतिरिक्त हडप्पा संस्कृतीत काही विशिष्ठ अशा धार्मिक संकल्पनाही आपल्याला दिसून येतात. या संस्कृतीत स्नानाला धर्मविधीमध्ये महत्वाचे स्थान होते. मोहनजोदडो येथील पूजास्थानाजवळील महास्नानगृह हेच दर्शविते. त्याचबरोबर लोथल, कालीबंगनसारख्या ठिकाणी जेथे जेथे अग्नीवेदी मिळालेली आहे. त्याजवळ स्नानाची व्यवस्था (जसे, अंघोळीसाठी उंचवटा आणि विहिर) दिसून येते. या संस्कृतीमध्ये बळी देण्याचे प्रकार दिसून येतात. कालीबंगन मध्ये यज्ञवेदीजवळ एक भाजक्या मातीची वडी सापडलेली आहे. या वडीवर एका बाजूला शिंगधारी देवता दिसते तर दुसऱ्या बाजूला एक व्यक्ती, दोऱ्याने एका प्राण्याला खेचत चाललेला दाखविलेला आहे. तसेच, विविध देवतांना स्वतंत्रपणे आणि कायमस्वरुपी पूजले जात असावे असे दिसते. त्याचप्रमाणे काही प्रासंगिक उत्सवासाठी काही वेगळ्या देवतांना पूजले जात असावे असे दिसते. तसेच, गळ्यात वेगवेगळे ताईत घालणे ही एक संकल्पना आपल्याला दिसून येते.

**ड. अंत्यसंस्कार पध्दती :** अंत्यसंस्कार पध्दतीला धार्मिक जीवनात एक महत्वाचे स्थान असते. यातून, त्या संस्कृतीच्या मरणोत्तर जीवनावरील विश्वास आणि कल्पना दिसून येतात. अर्थात हडप्पा संस्कृती ही मोठ्या प्रदेशात वितरीत झाली असल्याने अत्यसंस्काराच्या विविध परंपरा असणे स्वाभाविक आहे. जसे, पूर्ण दफन, अंशत: दफन (मोहेनेजोदडो आणि हडप्पा), दहनोत्तर दफन, प्रतिकात्मक दफन (कालीबंगन), भांड्यामधून दफन (मोहनेजोदडो आणि हडप्पा), पती-पत्नीचे दफन (लोथल) इ. येथे मृतदेहाचे दफन करताना त्याबरोबर शिंपल्यांच्या बांगड्या, हार, कर्णभूषण, तांब्यांचे आरसे, काज्जलशलाका, मातीचे लाडू, चमचे, मणी, हस्तीदंती वस्तू सोबत ठेवली जात. यावरुन मरणोत्तर जीवनाबद्दल त्यांच्या काही कल्पना असाव्यात असेही दिसते. यांची स्मशानभूमी शहरांपासून स्वतंत्र असे.

हडप्पा संस्कृतीतील एकंदर धार्मिक परिस्थितीचा विचार करता, विविध क्षेत्रांमध्ये विविध प्रकारचे विधी प्रचलित होते असे आढळते. जसे, कालीबंगा-लोथल मध्ये अग्नीवेदी दिसतात, मात्र इतरत्र कुठे नाही. तर, या दोघांबरोबर, मोहेनजोदडो येथे स्नानाचे पूजाविधीसाठी महत्व दिसते, हडप्पा मध्ये नाही. अंत्यसंस्कारामध्ये ही एक प्रेत, जोडी प्रेत, सामुहिक दफनं इ. वैविध्य दिसून येते. अर्थातच, हडप्पा संस्कृतीचा प्रचंड विस्तार आणि तत्कालिन मर्यादित दळणवळण/संपर्क व्यवस्थेमुळे हे स्वाभाविकच होते. त्याचबरोबर यातून हडप्पा संस्कृतीच्या समाजजीवनाचे वैविध्यपूर्ण स्वरुप आणि तरीही सांस्कृतिक ऐक्य आपल्याला बरेच काही शिकवू पाहते!

अशी ही वैभवशाली संस्कृती पर्यावरणाच्या ऱ्हासाने सावकाशीने नष्ट होत गेली. पावसाचे कमी झालेले प्रमाण, वाढते कोरडे हवायान, नद्यांच्या प्रवाहातील बदल, आकस्याक आलेले पूर आणि भूकंप अशा विविध कारणांमुळे येथील नगरं धोक्यात आली. शेती-व्यापारामध्ये समृध्दी गाठलेल्या या लोकांना, गाई, शेळ्या-मेंढ्या पाळून, जगण्याची पाळी आली. ते पुन्हा एकवार पशुपालनाकडे वळले. कुरणांच्या शोधात ते सप्तसिंधूच्या प्रदेशामध्ये भटकू लागले.

- **स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. हडप्पा हे स्थळ..................नदीच्या किनारी वसलेले आहे.

अ) रावी ब) सिंधू क) सतलज ड) सरस्वती

२. दायमाबाद...................या राज्यात येते.

अ) राजस्थान ब) महाराष्ट्र क) कर्नाटक ड) उत्तर प्रदेश

३. ...............या ठिकाणाहून प्रवेशद्वारावरील लिखित फलक सापडलेला आहे.

अ) धोलावीरा ब) हडप्पा क) कालीबंगन ड) लोथल

४. हडप्पा संस्कृतीतील मोजपट्टी............सेमीची असे.

अ) ३७.६ ब) ३० क) ३५.५ ड) ३५.२

५. हडप्पा संस्कृतीतील जहाज बंदर आणि गोदी...............या ठिकाणी आढळून येते.

अ) मोहनेजोदडो ब) हडप्पा क) कालीबंगा ड) लोथल

**ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१. हडप्पा संस्कृतीमध्ये कोणकोणत्या देवतांचे पूजा केले जात असे?

२. हडप्पा संस्कृतीतील नांगरलेले शेत कोठे आढळून आलेले आहे?

३. हडप्पा संस्कृतीतील विटांचे प्रमाण काय आहे?

४. हडप्पा संस्कृतीच्या कोणत्या शहरात तलावांची मालिका दिसून येते?

५. हडप्पा संस्कृतीचा ऱ्हास कोणत्या कारणाने झाला?

## १.३ सारांश :

प्राचीन भारताच्या इतिहासाचा प्रारंभ हा प्रागैतिहासिक कालखंडापासून होतो. या काळालाच अश्मयुगीन कालखंड असे म्हंटले जाते. या काळातील मानव हा त्याच्या भोवतालच्या पर्यावरणाचा एक घटक असतो. तो, या पर्यावरणातील संसाधनाचा वापर करुन आपले जीवन विकसित करतो. जसजसे पर्यावरण बदलत जाते, बुध्दिमत्ता विकसित होते त्याचप्रमाणे याच्या जीवनशैलीमध्येही बदल होत जातो. हा त्याचा विकास त्याच्या अश्महत्यारांतून, गुहाचित्रांतून दिसून येतो. अश्मयुगाच्या शेवटी आणि पूर्वानुभवातून, हा शेती, पशुपालनाचा शोध लावतो. आणि अशाप्रकारे या 'नवाश्मयुगात' याच्या स्थिर राहण्यास सुरुवात होते. अशा प्रागैतिहासिक विकासाच्या बैठकीवर मानव ताम्रपाषाणयुगामध्ये प्रवेश करतो. या काळात त्याला धातूचा शोध लागतोच. शिवाय, या आद्य शेतकऱ्यांची पहिलीवाहिली खेडी अस्तित्वात येतात. यातीलच, वायव्य भारतातील-सप्तसिंधूच्या प्रदेशातील काही खेडी अधिक विकसित होतात. त्यांचे नगरांमध्ये रुपांतर होते. अशा प्रकारे भारताचे पहिले नागरीकरण याठिकाणी घडून येते. याला 'हडप्पा संस्कृती' असे म्हणतात. लाखो चौरस किमी पसरलेली असूनही, तसेच, विविध श्रध्दा असतानाही यांच्यात एक विशिष्ट प्रकारचे सांस्कृतिक ऐक्य दिसून येते. पर्यावरणीतील बदलामुळे या संस्कृतीतील वैभवशाली नगरांचा ऱ्हास होतो.

## १.४ शब्द, पारिभाषिक संज्ञा आणि अर्थ :

प्रागैतिहास (Prehistory) : लेखनकला अवगत होण्याआधीच्या काळातील मानवाचा इतिहास म्हणजे प्रागैतिहास. या कालखंडात भारतातील अश्मयुग येते.

पुरातत्वशास्त्र (Archaeology) : मानवाने हेतूपूर्वक/निर्हेतूकपणे आपल्या मागे सोडलेल्या भौतिक अवशेषांचा अभ्यास करुन त्याच्या इतिहासाची पुनर्बांधणी आणि विश्लेषण करणारे शास्त्र होय.

नागरीकरण : नागरीकरण हा मानवी विकासाच्या प्रक्रियेतील एक टप्पा असून, हिची, नियोजनबध्द आणि तटबंदीयुक्त शहरे, सार्वजनिक इमारती, लोकसंख्येत वाढ, सामाजिक स्तरीकरण, शेतीतील अतिरिक्त उत्पादन, व्यवसायाचे विशेषीकरण, मोठ्या व्याप्तीचा व्यापार, प्रमाणबध्द वस्तू आणि मानकं, वजनमापं, नाणी आणि एकंदर प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणारी व्यवस्था इ. ठळक लक्षणं मांडता येतात.

सप्तसिंधूचा प्रदेश : भारताच्या वायव्येकडील हा प्रदेश. सिंधू, सरस्वती, रावी, चिनाब, सतलज, व्यास, झेलम अशा सात नद्यांमुळे, एकत्रितपणे, त्या नद्यांचं खोऱ्यांना 'सप्तसिंधूचा प्रदेश' असे म्हंटले जाते.

## १.५ स्वयं अध्ययनाची उत्तरे :

- **स्वंय अध्ययन प्रश्न – १**

अ) १. लोहंडा नाला, २. शहामृगाचे अंडे, ३. सूक्ष्मास्त्रे, ४.कार्लाईल, ५. भीमबेटका

ब) १. प्रागैतिहासिक काळ म्हणजे मानवाच्या इतिहासातील प्रारंभीचा कालखंड. या काळास 'अश्मयुग' असेही म्हंटले जाते. या युगामध्ये पुराश्मयुग, मध्याश्मयुग आणि नवाश्मयुग हे उपकालखंड येतात.;

२. हुणसगी, भीमबेटका;

३. सूक्ष्मास्त्रे, गुहाचित्रे,

४. व्हि.एस.वाकणकर,

५. मानवाच्या विश्वरचनेबद्दल दृष्टिकोन दिसून येतो.

- **स्वंय अध्ययन प्रश्न – २**

अ) १. लुबॉक, २. चौपानी मंडो, ३. बुधिहाळ, ४. इनामगाव, ५. कर्नाटक

ब) १. हार्वेस्टर, कुत्र्याची दफने;

२. बैलगाडी, हत्ती, रानगवा, गेंडा अशी उत्कृष्ठ शिल्पं;

३. सावळदा, उत्तर हडप्पा, माळवा, जोर्वे, उत्तरजोर्वे;

४. घोडनदीचे अतिरिक्त पाणी, कालव्याद्वारे एका तलावात साठवून ठेवलेले होते. त्यांना समांतर असा दगडमातीचा बांधही घातलेला होता.;

५. काळ्या रंगाने चित्रित लाल भांडी

- **स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

अ) १. रावी, २. महाराष्ट्र, ३. धोलावीरा, ४.३७.६, ५. लोथल

ब) १. पशुपती, मातृदेवता, वृक्ष, प्राणी; २. कालीबंगन; ३. ४:२:१ ४. धोलावीरा; ५. भूकंप, दुष्काळ, पूर, नद्यांच्या पात्रात बदल, कोरडे हवामान इ. नैसर्गिक कारणाने

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

- **दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. भारतीय अश्मयुगीन जीवनाची माहिती द्या.

२. भारतीय नवाश्मयुगीन मानवी जीवन स्पष्ट करा.

३. दख्खनमधील ताम्रपाषाणयुगाची माहिती द्या.

४. हडप्पा संस्कृतीची नगररचना स्पष्ट करा.

५. हडप्पाकालीन आर्थिक परिस्थिती स्पष्ट करा.

६. हडप्पा संस्कृतीतील सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती स्पष्ट करा.

- **टीपा लिहा :**

१. पुराश्मयुगीन हत्यारे

२. मध्याश्मयुगीन गुहाचित्रे

३. नवाश्मयुगीन राखेचे ढिगारे

४. नवाश्मयुगीन शोध

५. धोलावीरा

६. हडप्पाकालीन कला

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :


१) म. के. ढवळीकर, 'कोणे एकेकाळची सिंधु संस्कृती', राजहंस प्रकाशन.

२) म. के. ढवळीकर, 'महाराष्ट्राची कूळकथा', राजहंस प्रकाशन.

३) शां. भा. देव, 'भारतीय पुरातत्वविद्या', काँटिनेंटल प्रकाशन.

**मराठी विश्वकोश :**

४) य.ना. कदम, 'प्राचीन भारताचा इतिहास', फडके प्रकाशन.

५) ए.जी. थोरात आणि निरंजन कुलकर्णी (संपा.) प्राचीन भारताचा इतिहास, बी.ए.-३/पेपर क्र.४, घटक २ ते ३, स्वयं-अध्ययन साहित्य, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ

६) निरंजन कुलकर्णी आणि टी.एस.पाटील (संपा.) प्राचीन भारतीय राजकीय आणि आर्थिक संस्था, एम.ए.-१, घटक २ ते ३, स्वयं-अध्ययन साहित्य, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ.

७) निरंजन कुलकर्णी आणि टी.एस.पाटील (संपा.) प्राचीन भारतीय समाज आणि संस्कृती, एम.ए.-२, घटक १, स्वयं-अध्ययन साहित्य, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ.


❖ ❖ ❖

## घटक –२

# वैदीक संस्कृतीतील संक्रमण

**अनुक्रमणिका :**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

 २.२.१ आर्यांचे वसतीस्थान / वसतीस्थानाबाबत भिन्न मते

 २.२.२ वेदकालीन राजकीय परिस्थिती

 २.२.३ वेदकालीन सामाजिक परिस्थिती

 २.२.४ वेदकालीन आर्थिक परिस्थिती

 २.२.५ वेदकालीन धार्मीक परिस्थिती

 २.२.६ वैदिक साहित्य

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक संज्ञा, संकल्पना व अर्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

## २.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

- प्राचीन भारतीय वैदिक संस्कृतीचा परिचय होईल.
- आर्य संस्कृतीच्या भारतातील व जगभरातील वसतीस्थानांविषयीची माहिती समजून घेण्यास मदत होईल.
- वैदिक संस्कृतीच्या कालखंडाची माहिती समजेल.
- वैदिक कालीन व उत्तरवैदिक कालीन भारतातील राज्यविस्ताराची माहिती समजण्यास मदत होईल.

- पूर्व वैदिक कालीन भारतीय सामाजिक, आर्थिक धार्मिक व सांस्कृतिक घटकांची माहिती समजण्यास मदत होईल.
- उत्तरवैदिक कालखंडातील आर्यांच्या विस्ताराबरोबरच राजकीय सामाजिक आर्थिक धार्मिक सांस्कृतिक घटकांची माहिती समजेल.

## २:१ प्रस्ताविक :

प्राचीन भारतीय इतिहासातील हडप्पा संस्कृतीनंतरचा कालखंड हा वैदिक संस्कृतीचा कालखंड म्हणून ओळखला जातो. वैदिक वाङ्मयातील 'आर्य' संस्कृत शब्द वंशिक अर्थाने किंवा मानववंशशास्त्रीय संदर्भात वापरण्यात येत नाही. तर 'अर्' मूळ धातूपासून निर्माण झालेल्या या शब्दाचा 'शेतीवर उपजीविका करणारी व्यक्ती' किंवा तज्ज्ञ शेतकरी असा होतो. या बरोबरच सर्वसाधारणपणे आर्य म्हणजेच 'चांगल्या कुटुंबातील व्यक्ती' किंवा 'सद्गुणी आणि सज्जन' या अर्थाने आर्य हा शब्द वापरला जातो. ऋग्वेदामध्ये आर्य या शब्दाचा उल्लेख आलेला आहे. ऋग्वेदकालीन आर्य ग्रामीण लोक होते. ते सुदृढ, सशक्त आणि निर्भय होते. ते पशुपालक होते. ते चांगले लढवय्ये होते, आक्रमण आणि संरक्षण शस्त्राचा परिणामकारक वापर कसा करावयाचा याचे ज्ञान त्यांना होते.

आर्यांबद्दलची माहिती आपल्याला प्रामुख्याने वैदिक वाङ्मयावरून मिळते. जर्मन पंडित मॅक्समुलर व ए.एल. बॅशम यांच्या मते, आर्य किंवा द्रविड हे शब्द जातीवाचक किंवा वंशवाचक नाहीतर आर्य हा शब्द संस्कृतीवाचक आहे. प्राचीन भारतीय आर्यांची संस्कृती ही 'वैदिक संस्कृती' या नावाने ओळखली जाते. वैदिक वाङ्मय विस्तृत आणि बहुसमावेशक स्वरूपाचे असून आर्यांचे सर्वात मौल्यवान योगदान म्हणजे 'ऋग्वेद' होय. भारताला जगातील अत्यंत प्राचीन व प्रभावाशाली वैदिक संस्कृतीचा वारसा लाभला आहे. भारत या एका वेदकालीन जमातीच्या नावावरून भारत हे नाव पडले. यातूनच वैदिक संस्कृतीची देणगी लक्षात येते.

## २.२ विषय विवेचन :

भारतीय संस्कृतीचा मूलाधार वैदिक संस्कृती असून तिचे शिल्पकार आर्य होते. अनेक शतकाच्या आघातानंतरही वैदिक संस्कृतीने आपले अस्तित्व धर्म, तत्त्वज्ञान, साहित्य, कला, शास्त्रे व राजनितीच्या रूपाने आजही जीवंत ठेवले आहे. अध्यात्मिक मूल्य, सामाजिक स्थैर्य प्राप्त करून देणाऱ्या विवाहसंस्था, कुटुंबपद्धती, आश्रमव्यवस्था याच संस्कृतीने निर्माण केल्या. त्याबरोबरच जाती प्रथेसारख्या घातक रूढी देखील याच संस्कृतीचे देणे आहे. या वैदिक संस्कृतीचे दोन भागात विभाजन केले जाते. (१) पूर्ववैदिक संस्कृती, (२) उत्तर वैदिक संस्कृती.

### १.२.१ आर्यांचे वसतीस्थान / वसतीस्थानाबाबत भिन्न मते :

मागील दोनशे वर्षांपासून आर्यांच्या मूळ वसतीस्थानाबाबत खूप मोठ्या प्रमाणावर संशोधन झालेले असले तरी त्यांच्या मूळ वसतीस्थानाबाबत संशोधकामध्ये एकमत नाही. वैदिक संस्कृतीच्या अभ्यासासाठी वाङ्मयीन साधनांबरोबरच, भौतिक साधनांमध्ये फक्त बोघाजकोई शिलालेख उपलब्ध आहे. भारतामध्ये वैदिक संस्कृती

निर्माण करणाऱ्या आर्यांच्या मूळ स्थानाबाबत आपण (अ) विदेशी, (ब) भारतीय अशा दोन भागात विभाजन करूया.

तत्पूर्वी आर्यांनी भारतामध्ये निर्माण केलेल्या वैदिक संस्कृतीच्या बोली व वाङ्मयीन भाषा संस्कृत आणि ग्रीक – लॅटीन या प्राचीन युरोपीय भाषांतील साम्य दर्शविण्याचे श्रेय फ्लिप्पो सास्सेटी यांना द्यावे लागते. त्याच्यामुळेच प्राच्यविद्यापंडीत भारतशास्त्राच्या अभ्यासकांनी, त्याबरोबरच संस्कृत व अन्य भारतीय भाषांच्या युरोपीय अभ्यासकांनी याची गंभीर दखल घेतली व याचाच परिणाम म्हणजे सर विल्यम जोन्स (इ.स. १७४६–१७९४) यांनी इ.स. १७८४ मध्ये 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल' या संस्थेची स्थापना केली. परिणामत: जोन्स आणि संस्कृत भाषेच्या युरोपियन अभ्यासकांच्या पहिल्या गटाने प्राचीन युरोपीयन आणि एशियन भाषांतील साम्याचा अभ्यास करण्यास सुरूवात केली व प्राचीन कालखंडामध्ये भारतीय व युरोपीयनाचे पूर्वज एकाच वेळी एकाच प्रदेशात वास्तव्य करीत असतील आणि एकच भाषा बोलत असतील अशा निष्कर्षापर्यंत आले. त्यांनी या काल्पनिक भाषेला 'इंडो युरोपीयन भाषा' हे नाव दिले व ती बोलणाऱ्यांना 'इंडो युरोपीयन प्रदेश' बहाल केले.

**अ) आर्यांचे वसतीस्थान भारताबाहेर आहे असे मांडणारे संशोधक :**

१) पॅन्का यांच्या मते : आर्य व जर्मन्स यांच्यातील भाषा, शरीररचना यातील साम्य लक्षात घेता जर्मनी हेच आर्यांचे मुळ स्थान आहे.

२) टिळक : 'The Arctic Home of the Vedas' या ग्रंथात उत्तर ध्रूव हे आर्यांचे वसतीस्थान आहे असे टिळकांनी म्हटले आहे.

३) फ्रेडरिक मॅक्समुलर (१८२३–१९०९) यांच्या मते : आर्याचे मुळ वस्तीस्थान मध्यअशियात असावे.

४) प्रो. मायर्स आणि चाईल्ड यांच्या मते : दक्षिण रशिया हे आर्याचे मुळ ठिकाण असावे.

५) महात्मा फुले यांच्या मते : ''गुलामगिरी'' या ग्रंथात आर्यांचे वसतीस्थान इराण हा देश होता असे म्हटले आहे.

६) आशिया मायनर मधील बोघाजकोई येथे साडलेल्या शिलालेखावरून इ.स. पूर्व १४०० च्या दरम्यान आर्य लोक अशिया मायनरमध्ये होते.

**ब) आर्यांचे वसतीस्थान भारत आहे असे मत व्यक्त करणारे संशोधक :**

१) राजबली पांडे यांच्या मते : आर्यांचे मुळ वसतीस्थान भारतातच आहे. त्यासाठी पांडे यांनी ऋग्वेदातील नदी सुक्ताचा अर्थ विचारात घेवून आर्याचे मूळस्थान मध्यप्रदेश म्हणजेच सध्याचे अलाहाबाद व अयोध्या यामधील प्रदेश असला पाहिजे असे मत व्यक्त केले.

२) डॉ. ए. सी. दास यांच्या मते : Rigvedic India या ग्रंथात श्री दास यांनी आर्यांचे मुळ स्थान सप्तसिधूंचा प्रदेश होय असे म्हटले आहे.

३) निलकंठशास्त्री यांच्या मते : मध्यदेश म्हणजेच सिंधू व गंगा या नद्यांचे खोरे हेच आर्यांचे मूळ स्थान होते.

४) म. म. पंडित गंगानाथ झा यांच्या मते : आर्यांचे मूळ स्थान ब्रह्मर्षी देशात असावे. ब्रह्मर्षी देश म्हणजे पूर्व राजपूताना, रोहिलखंड, गंगा-यमुनामधील दोआब यांच्या परिसरातील देश होय.

५) डॉ. एस. कल्याण रामन यांच्या मते : चेन्नई येथील सरस्वती रिसर्च सेंटरचे डायरेक्टर डॉ. रामन यांच्या मते आर्यांचे मूळ स्थान म्हणजे सरस्वती नदी व दृषद्वती या पवित्र नद्यांचा परिसर होय.

याबरोबरच अविनाशचंद्र दास, डी. एस. त्रिवेदी, डॉ. पावत्री इत्यादी विद्वानांनी आर्यांचे मुळ वस्तीस्थान भारतदेशच असल्याचे निष्कर्ष आपल्या ग्रंथामधून काढलेले आहेत.

आर्य भाषा बोलणारे लोक मध्य आशियातून भारतात आले या संबंधीच्या सिद्धांताला आधुनिक जैविक विज्ञानातील शोधांमुळे समर्थन मिळते. मानवी शरीरातील रक्तपेशीवरून उत्पत्ती संबंधी संकेत मिळतात. डी.एन.ए. (D.N.A.) वरून मिळणाऱ्या उत्पत्ती संबंधीच्या संकेतावरून अनुवंशिकता सिद्ध होते. वैज्ञानिकांच्या मतानुसार इ.स. पूर्व ८००० च्या सुमारास मध्य अशियाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत काही विशिष्ट संकेत मिळतात. उत्पत्तीसंबंधी अशा संकेतांना एम 17 (M-17) असे म्हटले जाते आणि मध्य आशियातील 40 टक्केहून अधिक लोकात ते सापडतात. संशोधनामध्ये दिल्लीच्या ३५ टक्क्यांहून अधिक हिंदी भाषकांत एम १७ (M 17) सापडला पण द्रविड भाषा बोलणाऱ्या केवळ १०% टक्के लोकांत तो सापडला. यावरून हिंदी / आर्य भाषा बोलणारे लोक मध्य अशियातून भारतात आले हे सिद्ध होते.

- **कालखंड :**

भारतीय आणि पाश्चात्य संशोधकांनी वैदिक संस्कृतिचा शोध घेत असतांना वैदिकसंस्कृतीचा कालखंड निर्धारीत करण्याचा प्रयत्न केला. वेगवेगळ्या कसोट्या लावून संशोधकांनी वैदिक कालखंडाला एक निश्चित कालावधीमध्ये बांधण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक संशोधकानी वेगवेगळा कालखंड निश्चित केल्यामुळे या कालखंडाविषयी विद्वानांमध्ये मोठ्या प्रमाणात मतभिन्नता असलेली दिसून येते.

मॅक्समूलर यांनी वैदिक काळ हा इ.स.पूर्व १२०० ते इ.स.पू. १००० हा मांडलेला आहे. विटंरनिटस्झ यांनी मॅक्समूलरचे मत मान्य केलेले आहे. तर लोकमान्य टिळक यांनी वैदिक कालखंड इ.स. पू. ६००० ते इ.स.पू/ ४००० असावा असे मत व्यक्त केले. तर हर्मन याकोबी यांनी हा कालखंड इ.स.पू. ४५०० ते इ.स.पू. २५०० मानलेला आहे. डॉ. राधाकृष्णन यांनी इ.स.पू. २००० ते इ.स.पू. १५०० हा वैदिक कालखंड सांगितलेला आहे. तर मार्टीमर व्हिलर या संशोधकाने इ.स.पू. १७५० ते इ.स.पू. १२५० असे वैदिक कालखंडांचे अस्तीत्व गृहीत धरलेले आहे. वैदिक वाङ्मयात आढळणाऱ्या विविध पुराव्यावरून आधुनिक काळातील संशोधक विद्वानांनी इ.स.पू. १५०० ते इ.स.पू. १००० हा वैदिक वाङ्मयाचा कालखंड मानलेला असून अनेक विचारवंतांनी या इ.स.पू. १५०० ते इ.स.पू. १००० या कालखंडाचे समर्थन केलेले आहे, मान्य केलेले आहे. आर्य भारतात येऊन स्थायिक झाल्यानंतरच वैदिक संस्कृतीला प्रारंभ झाला; हे आता सर्वमान्य झालेले आहे.

सर्वप्रथम सप्तसिंधूच्या प्रदेशात त्यांच्या वसाहती स्थापन झाल्या. विविध कालखंड आणि वैशिष्ट्यांच्या दृष्टीने आर्य संस्कृतीचे ऋग्वेदकाळ, ब्राह्मणकाळ व उपनिषद-महाकाव्यकाळ असे टप्पे केलेले आहेत. त्याबरोबरच आर्य संस्कृतीचे वैदिक कालखंड व उत्तरवैदिक कालखंड अशी विभागणी सुद्धा करण्यात आलेली आहे.

- **आर्यांचा भारतातील राज्यविस्तार :**

वैदिक वाङ्मयामधून आर्यांचे तत्त्वज्ञान, धर्म, समाजजीवन याबरोबरच अर्थव्यवस्थेची माहिती मिळते. परंतू राजकीय इतिहासाची माहिती मिळत नाही. मात्र महाकाव्य व पुराणांमधून विविध राजवंशाचा इतिहास वर्णिलेला आहे. पार्जीटर या विद्वानांनी सुद्धा पुराणाचे ऐतिहासिकत्व प्रतिपादीत केलेले आहे. वरील ग्रंथामधून आर्यांच्या राजकीय इतिहासपट उलगडता येऊ शकतो.

आर्यांचा पहिला राजा वैवस्तत मनु होता. लोकांनी त्यांना राजा होण्याची विनंती केली. मनुच्या पुत्रांपैकी इक्ष्वाकुने मध्यप्रदेशात अयोध्येच्या परिसरात स्वतंत्र राज्याची स्थापना केली. पुढे हाच वंश मानववंश, इक्ष्वाकुवंश किंवा सूर्यवंश म्हणून प्रसिद्ध असून याच वंशाच्या पुढच्या विसाव्या पिढीतील मांधाता या राजाने बराच राज्यविस्तार केला. लव कुशानंतर मनुच्या प्रमुख इक्ष्वाकू वंशाचा अस्त झाला. मनुपुत्र नेदिष्टाने वैशाली, करूष याने बुंदेलखंड, शैर्यतीने गुजरात येथे राज्य स्थापन केली. त्याबरोबरच मनुपुत्र पुरुरवा व मुलगी इला यांनी प्रयागच्या भूमीत नवीन राज्यांची स्थापना केली. या वंशाला चांद्रवंश, कुरुवंश किंवा पौरवंवश अशी नावे पडली. पुरुरवा नंतर त्यांचा नातू नहूष, ययाती, धृतराष्ट्र, पंडू, पांडव, कौरव इ. पराक्रमी राजे झाले. त्यानंतर चांद्रवंशाचा अस्त झाला. हस्ती नावाच्या राजाने हस्तीनापूर राजधानीची स्थापना केली. चांद्रवंशाचे प्रमुख सत्ताकेंद्र 'कुरुक्षेत्र', हस्तीनापुर, पंजाबच्या गंगा यमुनाच्या परिसरात होते. मात्र पूर्ण आर्यावर्तात ह्या वंशातील राजानी विविध राजवंशाची स्थापना केली.

ययातीपुत्र तुर्वसू प्रयागच्या दक्षिणेस तर यदुने द्वारकेच्या गुजरात परिसरामध्ये, अनुने अयोध्येच्या शेजारी, द्रह्यूने सरस्वती यमुनेच्या परिसरात राज्यांचा विस्तार केला. यांच्या वंशजानी बिहार, अंग, वंग, कलिंग, पुंड व सुम्हणी येथे राज्य विस्तार केला. ययातीपूत्र द्रव्हयूच्या वंशजाने तर गांधारमध्ये नवीन राज्याची निर्मिती केली.

यातील सम्राट पूर्णत: जरी ऐतिहासिक वाटत नसले तरी कोशांबी, कोशल, काशी, मगध, अंग, वंग, कंलिग, पुंड्र, मत्स्य, चेदी, कुरु, पांचाल विदर्भ, द्वारका, विराटनगर, हस्तिनापूर, तक्षशिला ही ऐतिहासिक राज्य होती व वैदिक वाङ्मयामध्ये वर्णीलेली राज्ये हीच आहेत. वैदिक कालखंडांची राजकीय उणीव पुराणांनी भरून काढली. आर्य टोळ्या महत्त्वाकांक्षी असल्यामुळेच त्यांनी राज्य विस्तारास प्रारंभ केला.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -१**

**अ)**

१) 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल' या संस्थेची स्थापना ............ यांनी केली.

१) मॅक्स म्युलर  २) सर विल्यम जोन्स  ३) फ्लिप्पा सास्सेटी  ४) पॅन्क

२) ........... यांच्या भाषिक साम्य शोधण्याच्या योगदानामुळे प्राच्य विद्यापंडीत व युरोपीयन पंडीत यांनी युरोपीन व एशियन भाषेतील साम्याचा अभ्यास केला.

१) फ्लिप्पो सास्सेटी २) राजबली पाण्डये ३) मॅक्स म्यूलर ४) प्रो. मायर्स

३) The Arctic Home of the Vedas या ग्रंथाची रचना कोणी केली.

१) डॉ. ए.सी.दास २) डॉ. निलकंठ शास्त्री ३) महात्मा फुले ४) लोकमान्य टिळक

४) 'गुलामगिरी' या ग्रंथामध्ये महात्मा जोतिबा फुले यांनी .............हा आर्याचा मुळ देश आहे असेसांगितले.

१) बोघाजकोई २) इराक ३) इराण ४) युरोप

५) वैदिक संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी उपलब्ध असलेला एकमेव शिलालेख ........ येथे आहे.

१) बोघाजकोई २) ब्रहमर्षी ३) दृषद्वती ४) हस्तिनापूर

**ब) खालील उपप्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगालची स्थापना केव्हा झाली?

२) Rigvedic India या ग्रंथाचे लेखन कोणी केले?

३) आधुनिक जैविक विज्ञानानुसार आर्याचे मूळ वसतीस्थान कोठे होते?

४) आर्यांचा पहिला राजा कोण होता ?

५) 'भारत' या आर्यांच्या टोळीचा प्रमुख कोण होता ?

## २.२.२ वेदकालीन राजकीय परिस्थिती :

- **आर्यावर्त :**

आर्यांच्या वसाहतीला पूर्वी आर्यावर्त ही संज्ञा होती. ऋग्वेदीक कालखंडामध्ये सप्तसिंधूच्या परिसरात वैदिक संस्कृती होती. आर्य हळूहळू या प्रदेशातून पूर्वेकडे व दक्षिणेकडे विस्तार करू लागले. ब्राह्मण ग्रंथाची निर्मिती ज्या केंद्रात झाली तो प्रदेश म्हणजे आर्यावर्त होय. वसिष्ठ, बोद्धायन व मनूने आर्यावर्ताच्या सीमा स्पष्ट केलेल्या आहेत.

- **ऋग्वेद काळ (पूर्व वैदिक काळ) दशराज युद्ध :**

आर्यांचे आगमन भारतात झाल्यानंतर त्यांची भटकी अवस्था संपते कारण सप्तसिंधुचे खोरे अत्यंत सुपीक होते. त्यामुळे पूर्वीच्या टोळ्यांचे आता प्रादेशिक राज्यात रुपांतर होवू लागले. त्यामध्ये पुरु, अनू, द्रह्यू, यदू व तुर्कश यांना पंचजन असे म्हटले जात असे. यावेळी आर्यांच्या टोळीचे राज्य होते. त्यास भरत

म्हटले जात असे. त्याचा प्रमुख सुदास होता. आपला पुरोहित विश्वामित्र यांची सुदास याने गच्छंती करून वसिष्ठ यांची पुरोहितपदी निवड केली. परिणामत: विश्वामित्र यांने १० राज्यांचा एक संघ तयार करून भरताविरुद्ध युद्ध पुकारले. मात्र भरत टोळीचा विजय झाला. सुदास यांनी हारलेली १० राज्ये खालसा करून आपल्या राज्यात सामावून घेतली. या भरत टोळीवरून पुढे आपल्या देशला 'भारत' हे नाव पडले. विजयी राजाने पराभूत राजावर वर्चस्व गाजविणे ही साम्राज्य विस्ताराची कल्पना ऋग्वेदकालखंडा पासूनच अस्तित्वात आली.

- **ऋग्वेदकालीन/पूर्ववैदिक कालीन राजकीय परिस्थिती :**

आर्यानी भारतात वसाहतींना प्रारंभ केल्यानंतर लहान लहान टोळी राज्यांचा उदय झाला. त्यांना 'जन' व प्रमुखास 'राजन' असे म्हटले जात असे. ह्या कालखंडामध्ये आर्यांचा राज्य विस्तार उत्तर पश्चिम भारतापुरताच (सप्तसिंधु) मर्यादित असल्याने मोठी मोठी साम्राज्ये उदयाला आली नव्हती.

आर्यांची ग्रामीण जीवनपद्धती असल्यामुळे त्यातून मोठी कुटुंबे निर्माण झाली. कुटुंबास 'कुल' व कुटुंब प्रमुखास 'कुलप' म्हटले जात असे. अशा अनेक कुटुंबांनी मिळून एक 'ग्राम' होत असे तर त्यांच्या प्रमुखास 'ग्रामणी' म्हणत. ठराविक ग्रामाच्या विभागाला 'विश' म्हटले जात असे तर 'विशपती' हा विशांचा प्रमुख होता. अनेक विशांनी मिळून बनलेल्या राजकीय घटकास 'जन' म्हणत असत. या जनांचा प्रमुख राजन होता. या जनास 'राष्ट्र' ही म्हणत. आणि राष्ट्रप्रमुखाला उद्देशूनच सम्राट, विराट, एकराष्ट्र अशी नावे दिली गेली.

पूर्ववैदिक कालखंडामध्ये जनतेचे संरक्षण व हीत करण्याच्या उद्देशाने राजसत्तेचा उदय झाला. पूर्ववैदिक कालखंडामध्ये लोकांच्या इच्छेमधून राजसत्ता उदयास आली. ऋग्वेदांमध्ये राजाला 'गोपजनस्य' (जनांचा प्रमुख गोप) म्हटलेले आहे. अकार्यक्षम राजाला सत्तेवरून काढून टाकण्याचा अधिकार पूर्व वैदिक कालखंडामध्ये प्रजेला होता. ऋग्वेदामध्ये काही राजांना पदच्युत केल्याचा उल्लेख आहे. राजाची निवड करण्याचा अधिकार समितीला होता. याचाच अर्थ राजपदावर समिती व प्रजेचे नियंत्रण होते. ऋग्वेदामध्ये सभा, समिती, विद्या व गण इत्यादी कुळावर आधारीत संघटनांचे उल्लेख सापडतात. या संघटना सैनिकी आणि कुळावर आधारित संघटनाचे उल्लेख सापडतात. या संघटना सैनिकी आणि धार्मिक कार्याची देखभाल करीत. त्याबरोबरच प्रजा व राष्ट्ररक्षणाची जबाबदारी सम्राटाची असे. 'बली' नावाचा कर प्रजा राजाला देत असे. बली म्हणजे अर्पण केलेले राजा कोणतीही स्थायी सेना बाळगत नसे. परंतु युद्धाच्या वेळी स्वजनांची सेना संघटीत केली जाई. प्रांत, गण, ग्राम आणि सर्ध नावाने परिचित वेगवेगळ्या टोळ्या लढाईत भाग घेत असत. पूर्व वैदिक कालिन राजकीय जीवन हे सैनिकी तत्व प्रमुख असणारे हे एक टोळी शासन होते. लोक सतत स्थलांतर करीत असल्यामुळे आणि नवीन भूभागावर वस्ती पसरत असल्यामुळे नागरी वा प्रादेशिक प्रशासनाची घडी बसत नव्हती.

**सभा :** ही पूर्व वैदिक काळातील महत्त्वपूर्ण व्यक्तीची संघटना होती. यामध्ये प्रतिष्ठित मंडळी, विद्वान ज्ञानी व वयोवृद्ध लोकांचा समावेश होता. सभेच्या अध्यक्षाला 'सभापती' म्हणत तर सभेच्या सदस्याला सभासद म्हणत.

**समिती :** राजाला कारभारात मदत करणारी महत्त्वाची संघटना. ही सभेपेक्षा राज्य अधिकाराच्या दृष्टीने व्यापक होती. राजाच्या निवडीपासून ते राजाला मार्गदर्शन करणे किंवा राजाला पदच्यूत करणे येथपर्यंत समिती महत्त्वपूर्ण भूमिका बवाजवत असे.

**मंत्री व अधिकारी :** पूर्व वैदिक कालखंडात जरी रितसर मंत्रिपरिषद अस्तित्वात नसली तरी पुरोहित, सेनानी, हेर आणि दुत या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून प्रशासनाची घडी बसण्याचा प्रयत्न पूर्व वैदिक कालखंडामध्ये करण्यात आला.

**न्यायदान पद्धती :** पूर्ववैदिक कालखंडामध्ये न्याय व्यवस्था व कायदा पद्धती पूर्णपणे विकसीत झालेली नव्हती. धर्मातील तत्त्वांना अनुसरून सौम्य शिक्षा देण्यात येत असत. सामान्यत: समाज नितिमान व धर्माचे आचरण करणारा असल्यामुळे गुन्ह्याचे प्रमाण कमी होते. आधुनिक विचारसणीप्रमाणे विचार केल्यास पूर्व वेदिक कालखंडामध्ये आर्यांनी न्यायसंस्था ही कार्यकारी विभागापासून स्वतंत्र ठेवल्याचे जाणवते.

- **उत्तर वैदिक कालीन राजकीय जीवन :**

**राज्यविस्तार :**

उत्तर वैदिक कालखंडामध्ये भरत व इतर टोळ्यांची राज्ये मागे पडून नवीन टोळ्यांची राज्ये मध्यदेश व लगतच्या परिसरात विस्तारत होती. यांची माहिती आपल्याला ऋग्वेदीक काळानंतर रचल्या गेलेल्या साहित्यामध्ये सापडते. उदा. सामवेद, यजुर्वेद आणि अथर्ववेद संहिता. उत्तर वैदिक काळातील हे सर्व ग्रंथ गंगेच्या उत्तर भागातील मैदानी प्रदेशात इसवी सन १००० ते ५०० च्या सुमारास रचले गेलेले आहेत. उत्खनन आणि सर्वेक्षणातून सुमारे ७०० वस्त्यांचे अवशेष या प्रदेशांमध्ये सापडलेले आहेत. उत्तर वैदिक कालीन ग्रंथ आणि लोहयुगीन पुरातत्वीय संशोधनात मिळालेली धुरकट रंगाची खापरे यावरून इ.स. पू. १००० ते ५०० च्या सुमारास राजकीय विस्तार मोठ्या प्रमाणात झाला.

उत्तरवैदिक काळात 'अधिराज', 'सम्राट', 'राजाधिराज' अशा राजांच्या उपाधी असून या उपाधी म्हणजे सामर्थ्य व साम्राज्यवादाचे प्रतिक आहेत. ऐतरेय ब्राह्मण या ग्रंथात साम्राज्य भौग्य, स्वराज्य, वैराज्य, पारमेष्ठम अशा नावांचा उल्लेख आहे. यावरून उत्तरवैदिक कालखंडामध्ये सामर्थ्यशाली व साम्राज्यवादी राज्यांचा उदय झाल्याचे जाणवते जो राजकीय विस्तार पूर्ववैदिक कालखंडापेक्षा खूप विस्तीर्ण होता. आर्यांच्या या सर्वसमावेशक विस्तारामुळे विस्तारीत सर्वसमावेशक राजकीय संस्कृती तयार झाली. बलशाली राज्यांचा उदय झाल्यामुळे साम्राज्यवादाची संकल्पना भक्कम झाली होती हे उत्तर वैदिक कालखंडातील राजकीय सत्तांतरणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट होते.

पूर्ववैदिक कालीन राज्यव्यवस्थेपेक्षा उत्तर वैदिक कालीन राज्यव्यवस्थेचा विकास खूपच मोठ्या प्रमाणावर झाला. राज्याचे स्वरूप वेगवेगळ्या पदव्या देण्यात होऊ लागल्या. जसे अधिराज, सम्राट, राजाधिराज विराट इ. ऋग्वेद काळापेक्षा उत्तर वैदिक कालखंडातील राजसत्तेचे स्वरूप बदलत जाऊन सामर्थ्यशाली युद्धप्रिय व धाडसी राज्यकर्त्यांचा उदय झाला. त्या बरोबरच उत्तरवैदिक कालखंडामध्ये

अनियंत्रित राजेशाही अस्तित्वात आली. वंशपरंपरागत व निरंकुष राजेशाही/राजसत्ता हे उत्तर वैदिक कालखंडाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. उत्तर वैदिक कालखंडातील आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे राजसत्तेचे महत्त्व उत्तरोत्तर वाढत जाऊन सभा व समितीचा प्रभाव कमी झाला. ऋग्वेद काळात सभा व समितीचा राजसत्तेवर असलेला दरारा नाहीसा झाला वचक नाहीसा झाला. सभा व समिती फक्त राजाला सल्ला देणाऱ्या नाममात्र संस्था राहिल्या. वैदिक कालखंडामध्ये स्त्रीयांचा यामध्ये थोडाफार सहभाग असेलही. मात्र उत्तर वैदिक कालखडामध्ये स्त्रीयांच्या सहभागाचा अभाव होता.

- **उत्तर वैदिक कालीन अधिकारी वर्ग 'रत्नीन' :**

वैदिक कालीन साम्राज्य विस्तारामुळे राजसत्तेची जबाबदारी परिणामत: सम्राटाला राज्यकारभारामध्ये मदत करण्यासाठी मंत्रिमंडळ अस्तित्वात आले. या मंत्रीमंडळाला व उत्तरवैदिक कालखंडामध्ये 'रत्निन' संबोधले जाई त्यांची नेमणूक व बडतर्फी राजाद्वारेच केली जात असे. उत्तर वैदिक कालखंडामध्ये १) युवराज, २) महिषी - राजाची पट्टराणी, ३) पुरोहित - ब्राह्मणवर्गाचा प्रतिनिधी यज्ञाविधी व कर्मकांड करणारा व ४) सेनांनी - हा लष्कर व संरक्षण प्रमुख होता. तर इतर मंत्र्यांमध्ये 'सुत' युद्धाच्या वेळी रथाचे सारथ्य करणारा व महाराजांचा विश्वासू व खाजगी सचिव, 'संग्रहीत' जो कोषाध्यक्षाचे काम करत असे, भागदूत - जो धान्याच्या रुपाने महसूल गोळा करत असे, पालागल याद्वारे संदेशवहनाची जबाबदारी पार पाडली जात असे. याबरोबरच ग्रामणी, 'अक्षवप' (जुगार निरीक्षक), 'तक्षण', रथव्यवसायक प्रमुख इ. अधिकारी उत्तर वैदिक कालखंडामध्ये राजाला प्रशासनामध्ये सहाय्य करीत असत.

- **उत्तरवेदकालीन कायदा पद्धती :**

उत्तरोत्तर होणाऱ्या राज्यविस्तारामुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढले व धर्मग्रंथामधून कायदा पद्धतीचा विकास झाला. जमिनीचे तंटे, खाजगी मालमत्तेचा प्रश्न, वारसा हक्क याच कालावधीमध्ये विकास पावले. याच उत्तरवैदिक कालखंडामध्ये स्त्री ही पुरुषाची मालमत्ता झाली. शूद्रांनाही मालमत्तेचा हक्क नाकारला गेला. दिवाणी व फौजदारी कायदे अस्तित्वात आले.

- **उत्तरवेदकालीन न्यायव्यवस्था :**

वरचेवर वाढत जाणाऱ्या गुन्ह्याच्या प्रमाणामुळे या कालावधीत न्याय व्यवस्थेची व्याप्ती वाढली. राजाला न्यायदानात मदत करण्यासाठी दहा सभासदांची 'परिषद' अस्तित्वात आली. राजा सर्वोच्च न्यायाधीश असला तरी तो स्वत: 'अदंड्य'-शिक्षेच्या पलीकडील होता. उत्तर वैदिक कालखंडामध्ये शिक्षा देतांना मात्र पक्षपात केला जात असे. उदा. शूद्रांना जास्त शिक्षा होत्या. गुणदोषयुक्त शिक्षा उत्तरवैदिक कालखंडामध्ये अस्तित्वात होती.

### २.२.३ वेदकालीन सामाजीक परिस्थिती :

पूर्व वैदिक कालीन सामाजिक संघटनांचा मूल आधार गोत्र किंवा वंशिक संबंध होता. जन म्हणून

ओळखल्या जाणाऱ्या समूहाशी लोक आपली बांधिलकी मानीत. आर्यांनी आपल्या दैनंदिन जीवन पद्धतीमधून समाज जीवनाचे दर्शन घडविले. सामाजिक स्थैर्याचा पाया आर्यांनी घातला. आर्यांनी पराभूत अनार्यांना प्रारंभी प्रमुख समाज प्रवाहापासून वेगळे ठेवले व नंतर दस्यूच्या रुपाने त्यांना आपल्या समाजव्यवस्थेत समावून घेतले. ऋग्वेदकालीन आर्यांनी केलेला संयुक्त कुटुंब पद्धतीचा प्रयोग व निर्माण केलेली विवाह संस्था,भारतीय जीवनाला हजारो वर्षांपर्यंत स्थैर्य देणाऱ्या ठरल्या. आर्यांनी सामाजिक जीवनात प्रामुख्याने कुटुंब संस्था, विवाह संस्था, वर्णव्यवस्था, आहार विहार, वेषभूषा, अलंकार, घरे, मनोरंजनाची साधने इत्यादी घटकांचा समावेश होतो.

- **संयुक्त कुटुंब पद्धती :**

संयुक्त कुटुंबपद्धतीचा उदय ऋग्वेद काळातच झाला. पुरुषाला कुटुंबात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. साधारत: चार ते पाच पिढ्यांची २५ ते ३० एकाच कुटुंबात राहत. थोरला मुलगा कुटुंब प्रमुख असून त्याला 'कुलप', 'गृहपती' किंवा 'दम्पती' म्हटले जाते. त्याचे सर्व मालमत्तेवर नियंत्रण असे. स्त्रियांना देखील मालमत्तेमध्ये हक्क असून मुलगा दत्तक घेण्याची प्रथा होती. आर्याच्या कृषीप्रधान ग्रामीण जीवनासाठी ही कुटुंब पद्धती उपयुक्त होती.

- कुटुंब संस्था ही माणसाच्या संस्कृतपणाची प्राथमिक शाळा होती.
- कृषीप्रधान अर्थव्यवस्थेला पुरक होती.
- मानवी जीवनाला स्थैर्य प्राप्त करून देण्याबरोबरच संरक्षण या संयुक्त कुटुंब पद्धतीनेच दिले.

- **पितृसत्ताक कुटुंब पद्धती :**

ऋग्वेदकाळामध्ये पुरुषप्रधान कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. त्यामुळे कुटुंबावर गृहपतीची अनियंत्रित सत्ता चालत असे. कुटुंबाची प्रतिष्ठा कायम ठेवणे, लग्नकार्य करणे, आर्थिक व्यवहार सांभाळणे इत्यादी कार्ये पुरुष करत असत. संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी पित्याकडे असण्याबरोबरच तो सर्व कुटुंबाचा संरक्षक व नियंत्रक होता. युद्धरत असणाऱ्या पितृसत्ताक कुटुंबात वीर पुत्रांच्या प्राप्तीसाठी देवतांची प्रार्थना केली जात असे. ऋग्वेदात मुलीची कामना केलेली आढळत नाही.

- **वर्णव्यवस्था :**

आर्य अनार्य हा भेद वर्णव्यवस्थेतून जन्माला आला. मूलत: ऋग्वेद कालखंडामध्येच याज्ञीक व अयाज्ञीक, वैदीक व अवैदीक असे भेद निर्माण झाले. आणि उत्तरोत्तर सप्तसिंधूच्या परिसरामध्ये स्थिरावल्यानंतर वेगवेगळा व्यवसाय करू लागले. त्यातूनच नवे वर्ग उदयाला आले. ऋग्वेद कालखंडामध्ये आर्यांनी अनार्यांचा पराव केला. त्यांना युद्धकैदी, दस्यु म्हणून हिणवले. डॉ. जोशी, पी. जी. यांच्या मते ऋग्वेदकाळी चातुवर्ण्य पद्धती नसून वर्गव्यवस्था होती. वेदसुक्त रचणारे वैदिक ऋग्वेदातच आहे. एकंदरीत ऋग्वेदकाळामध्ये चार वर्गाची निर्मिती गुण-कर्म तत्त्वाप्रमाणे झालेली होती.

**१) ब्राह्मण :** 'ब्रह्म' धातूपासून ब्राह्मण शब्द निर्माण झाला. बुद्धीमान, नितीमान व त्यागी जीवन जगणारा ब्राम्हण म्हणून ओळखला जात असे. बौद्धिक, धार्मिक कार्ये, वेदाची रचना, अध्ययन-अध्यापन, यज्ञ करणे इ. कार्य करत असत.

**२) क्षत्रिय :** 'क्षेत्र' धातूपासून क्षत्रिय शब्द बनलेला असून जो धाडसी, पराक्रमी सामर्थ्यशाली आहे त्यास समजले जात असे.

**३) वैश्य :** 'विश' या धातूपासून वैश्य शब्द निर्माण झाला असून वैश्य म्हणजे शेती, व्यापार, व्यवसाय करणारा व राष्ट्राची संपत्तीतवाढ करणारा वर्ग म्हणजे वैश्य होता. हा वर्ग अर्थव्यवस्थेचा कणा होता.

**४) शूद्र :** वर्ण व्यवस्थेतील हा शेवटचा घटक, सहसा आर्यांद्वारे पराभूत झालेल्या लोकांना दास केले व त्यांना शूद्र असे नाव दिले. वरील तिनही वर्णांचीसेवा करणे हे शूद्राचे काम होते.

पूर्व वैदिक कालखंडामध्ये वर्णव्यवस्था शिथील होती. त्रेवर्णिकात रोटी बेटी व्यवहार होत असत. एका वर्णातून दुसऱ्या वर्णात जाण्याची मुभा होती. या कालखंडात वर्ण हा पात्रता व कामावरून ठरविला जात असे. जन्मावरून ठरविण्याची परंपरा या कालखंडात अस्तित्वात नव्हती. पूर्ववैदिक कालखंडातील वर्ग-वर्णव्यवस्था ही शिथील स्वरूपाची होती.

- **विवाह संस्था :**

भारतीय समाज जीवानला स्थैर्यप्राप्त करून देणाऱ्या विवाह संस्थेचा उदय ऋग्वेदकाळातच झाला. विवाह हा एक पवित्र धर्मसंस्कार मानला गेला. विवाह विच्छेदनास (घटस्फोटास) मान्यता नव्हती. एकपती-एकपत्नी विवाह प्रचलित होता. स्वयंवर प्रथा (स्त्रिला पती निवडण्याचे स्वातंत्र्य) असण्याबरोबरच अंतर्वर्णीय विवाह होत असत, बालविवाहास मान्यता नव्हती. सती प्रथेचा अभाव होता. पुनर्विवाहाला धार्मिक व कायदेशीर मान्यता होती.

- **स्त्रीयांचे जीवन :**

ऋग्वेदीक स्त्रीयांना समाजात मानाचे स्थान होते. धार्मिक व सामाजिक कार्यात स्त्रीया पुरुषांच्या बरोबरीने सहभाग घेत असत. स्त्रीयांचा नैतिक दर्जा उच्च असून स्त्रीयांना अर्धांगी, दंपती, गृहस्वामीनी या बरोबरच राष्ट्र रक्षणासाठी शूर सैनिकाना जन्म देणारी माता अशी प्रतिष्ठा होती. ऋग्वेद कालखंडामध्ये स्त्रियांचा दर्जा उंचावलेला होता.

- **शिक्षणपद्धती :**

ऋग्वेदीक कालखंडामध्ये शिक्षणाला महत्त्व होते. विद्यार्थ्यांना गुरुग्रही राहून शिक्षण घ्यावे लागत असे. ज्ञान हे गुरु-शिष्य परंपरेनुसार पिढ्यानपिढ्या मुखोद्गत करून दिले जाई. शारीरिक विकासाबरोबर बौद्धीक व मानसिक विकास हे शिक्षणाचे ध्येय होते.

- **आहार :**

ऋग्वेदीक अर्थ व्यवस्था ही कृषी प्रधान अर्थव्यवस्था असल्यामुळे शेतीकला आत्मसात केली होती. शेतीमध्ये उत्पादीत करण्यात येणाऱ्या धान्यात विविधता होती. तांदुळ, गहू, बार्ली, तीळ, सातू यांचा आहारात समावेश होता. डाळी व गळीताच्या धान्याचा आहारात वापर केला जात असे. याबरोबरच कंदमुळे, फळे, भाजीपाला व दुधदुभत्यांचा लोक भरपूर प्रमाणात उपयोग करीत असत. शिवाय मासे व मांसाचा आहारात समावेश होता. लोक गोमांस भक्षण करत असत. सुरा आणि सोमरस ही आवडती पेये होती. खाद्य पदार्थांमध्ये विविधता होती.

- **वेशभूषा :**

आर्य सुती व लोकरी कपडे वापरत, स्त्री व पुरुषांचा पोषाखात फारसा वेगळेपणा नव्हता. पुरुष निवी (धोतर) वासस (उपरणे), अधिवासस (अंगरखा) व तुष्णीव (फेटा) हे कपडे वापरत तर स्त्रीया द्रुपी (घागऱ्यासारखे वस्त्र) कंचुकी (ब्लाऊज) वापरत असत. स्त्री, पुरुष विविध प्रकाराच्या आकर्षक केशरचना करत असत. ऋषीमुनी झाडाच्या साली व पानांची वल्लेल नसत. सालीच्या कांडापासून बनवलेल्या ब्रशने केस विंचरले जात.

- **अलंकार व सौंदर्यप्रसाधने :**

आर्यांना अलंकार व सौंदर्य प्रसाधनेची आवड होती. सोने, चांदी, मोती व रत्नाचे अलंकार स्त्री पुरुष वापरत. कर्णकुंडले, मुकुट, अंगठ्या व कंठमाला हे पुरुषांचे अलंकार होते. तर स्त्रीया बांगड्या, पैंजण, अंगठ्या, हार, कंठमाला व कर्णफुले इ. आभूषणे धारण करीत. सुगंधी तेल, चंदनतेल, उटणे, काजळ, ओष्ठरंग, गजरे व पुष्पमाला ही सौंदर्य प्रसाधने होती.

- **करमणुकीची साधने :**

पूर्व वैदिक काळात करमणुकीच्या साधनांमध्ये तंतूवाद्य, ढोल, झांज, तबला, करकरी, बासरी आदि अनेक मनोरंजनात्मक साधनांचा वापर करण्यात येत असे. यज्ञातील मंत्र तालासूरात म्हणण्याच्या उद्देशातून संगीताचा उदय झालेला होता, धार्मिक उत्सव, यज्ञ, समारंभ, राज्याभिषेक अशा प्रसंगी नृत्याचे मनोरंजनाचे कार्यक्रम होत असावेत.

ऋग्वेदामध्ये गायन-वादनाचे, मृदंग, वीणा, झांज, दुभुंगी, कर्करी, वन, नाडी इत्यादी वाद्यांचे उल्लेख आलेले आहेत. शिकार, संगीत, नृत्य, रथ व गोड्यांच्या शर्यती ही मनोरंजनाची साधने होती.

- **निवासस्थाने :**

वैदिक संस्कृतीचे भौतिक पुरावे सहसा उपलब्ध होत नाहीत. ऋग्वेदातील कृषीपरंपरेनुसार साधी सुधी गृहरचना होती. ग्रामीण संस्कृती अस्तित्वात असल्यामुळे दगड, माती, विटा, बांबू, लाकूड, झाडांची पाने, गवतापासून बनविलेली घरे होती. प्रत्येक घरामध्ये गोशाला, यज्ञशाला, पाकगृह, स्नानगृह व प्रशस्त अंगण

होते. संरक्षणाच्या दृष्टीकोणातून गावाला तटबंदी-खंदक असत.

- **पारलौकिक कल्पना :**

ऋग्वेदकालीन आर्य भौतिकवादी होते. त्याबराबेरच मृत्यूनंतरच्या पारलौकिक जीवनाच्या कल्पना देखील निर्माण झाल्या होत्या. आर्य, प्रेताची दहनक्रिया करण्याबरोबरच यज्ञ ही मृत्युची देवता असून तिचे स्थान दक्षिणेकडे आहे असे समजत असत. स्वर्ग-नरक, कर्म, पाप, पुण्य, पवित्र, अपवित्र या संकल्पना पूर्व वैदिक कालखंडामध्ये अस्तित्वात होत्या.

- **उत्तरवैदिक कालीन समाजजीवन :**

उत्तरवैदिक कालीन समाजजीवनामध्ये अनेक परीवर्तने झाली. हे सामजजीवन गुणदोषमुक्त वैशिष्ट्यांनी व्यापलेले होते. पूर्व वैदिक कालखंडाच्या तुलनेत वर्णव्यवस्थेतील विकृतीमधून जातीप्रथेचा उदय झाला. विवाहाचे बरेवाईट प्रकार वाढीस लागण्याबरोबरच समाजामध्ये आश्रमव्यवस्थेचा उदय झाला. याच कालखंडामध्ये स्त्रीयांचे समाजातील स्थान उत्तरोत्तर दुय्यम बनत गेले. शूद्रांची तर अवस्था अतिशय बिकट झाली. कर्मकांडाला प्रोत्साहन मिळाले. याचा सविस्तर आढावा खालीलप्रमाणे आपण पाहू -

- **कुटुंब संस्था :**

पूर्व वैदिक कालीन अस्तित्वात असलेल्या कुटुंब संस्थेला उत्तर वैदिक कालखंडामध्ये व्यापक स्वरूप आले. कुटुंबातील पुरुषांचे वर्चस्व अधिकार व जबाबदाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये वाढ होऊन उत्तर वैदिक कालखंडामध्ये कुटुंब संस्था तत्कालिन संस्काराची पाठशाळा बनली.

- **वर्णव्यवस्था :**

उत्तरवैदीक कालीन समाजव्यवस्थेमध्ये अस्तित्वात असलेली वर्णव्यवस्था ही जन्मावरून ठरू लागली. वर्णव्यवस्थेची बंधने कठोर झाली. श्रेष्ठ, कनिष्ठता मानली जाऊ लागली. उत्तर वैदिक काळामध्ये वर्णव्यवस्थेमध्ये विकृती अस्तित्वात आली. वर्णव्यवस्थेमध्ये कर्मठपणा अस्तित्वात आला. पूर्व वैदिक काळामध्ये कुणालाही आपला वर्ण बदलता येत असे. आपापल्या बौद्धिक, शारीरिक क्षमतेनुसार समाजाचे कोणतेही अंग, स्वीकारता येत असे. हे चित्र उत्तरवैदिक कालखंडामध्ये बदलले. प्रत्येक वर्णांनी ज्या वर्णात आपला जन्म झाला त्याच वर्णाची कामे करावीत असे कडक नियम अस्तित्वात आले.

**ब्राह्मण :** उत्तरवैदिक काळात ब्राह्मणांच्या अधिकारात वाढ होण्याबरोबरच आपल्या पूर्वीच्या व्यवसायाशिवाय संकटकाळी ते इतर वर्णीयांचे व्यवसाय ही करू शकत.

**वैश्य :** हाच वर्ग उत्तरवैदिक कालीन अर्थव्यवस्थेचा कणा होता. राजास कर हाच वर्ग देत असे. या वर्णातील लोकांचे व्यापारवर्ग लक्ष केंद्रित असल्यामुळे वैश्य हा शब्द व्यापारी अर्थाने रूढ झाला.

**शूद्र :** उत्तरवैदिक कालखंडामध्ये वरील तिनही वर्णांची सेवा करणे एवढेच काम या शुद्र वर्गाला होते.

त्रैवर्णीकांच्या तुलनेत शुद्रांना दिल्या जाणाऱ्या शिक्षेचे स्वरूप खूपच गंभीर होते. कुठलेही वैदिक अधिकार या वर्गाला दिले गेले नव्हते. शूद्राच्या हाताचे अन्न ब्राह्मणाने खाऊ नये असा निर्बंध होता. तो न्यायाधिश होउ शकत नसे किंवा धर्मोपदेश करण्याचा अधिकार त्याच्याकडे नव्हता. उत्तर वैदिक युगामध्ये अतिशय हालाखीचे जीवन शूद्रांच्या वाट्याला आलेले होते.

ही वर्णव्यवस्था उत्तरवैदिक कालखंडामध्ये उत्तरोत्तर वंशपरंपरागत बनत गेली. याबरोबरच वर्णद्वेष व उच्चनिष्ठतेची भावना वाढत गेली. शूद्र व हलकी कामे करणाऱ्या वर्गांना हिन दर्जाची वागणूक देण्यात आली. त्यातूनच जातीयता व अस्मृतश्यतेसारखा रंगाने देशाला ग्रासले.

याबरोबरच उत्तर वैदिक काळामध्ये ब्राह्मण-क्षत्रिय वर्गामध्ये वैमनस्य वाढत गेले. वंशश्रेष्ठत्वाची भावना वाढीस लागली.

- **वर्णव्यवस्थेचे जातीसंस्थेत रुपांतर :**

वर्णव्यवस्थेचे जातीसंस्थेत रुपांतर होणे हे उत्तर वैदिक काळाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. पूर्व वैदिक कालखंडामध्ये कोणालाही आपला वर्ण बदलता येत असे. मात्र उत्तर वैदिक युगामध्ये हे चित्र बदलले. या कालावधीमध्ये प्रत्येकाने ज्या जातीत जन्म घेतला त्याच जातीत त्याला मरावे लागत असे. अनुलोम-प्रतिलोम विवाहांमुळे २०४ नवीन जाती निर्माण झाल्याची माहिती मनू व स्मृतीकारांच्या ग्रंथामध्ये सापडते. उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या वर्णव्यवस्थेच्या बंधनामुळे जातीप्रथेचे स्तोम निर्माण झाले.

- **विवाह पद्धती :**

उत्तर वैदिक काळात विवाहाचे अनेक प्रकार रूढ झाले होते. त्यापैकी आठ प्रकार स्मृतीमध्ये दिलेले आहेत. या काळात वधु वरांना एकमेकांची निवड करण्याचे स्वातंत्र्य राहिले नाही. शिवाय विवाहाची वयोमर्यादा सुद्धा खाली आली. या आठ विवाह प्रकारांपैकी चार समाजमान्य तर बाकीचे चार विवाह निशिद्ध मानण्यात आले.

**१) ब्राह्म विवाह :** विद्वान सदाचारी अनुरूप वरास सालंकृत कन्यादान करणे.

**२) दैवविवाह :** यज्ञाविधी करून कन्यादान करणे.

**३) आर्ष विवाह :** वराकडून नाममात्र दक्षिणा देवून कन्यादान करणे.

**४) प्रजापत्य :** कोणत्याही प्रकारे कन्याशुल्क न घेता किंवा देता योग्य वरास विधीसह कन्या अर्पण करणे.

**५) असुर विवाह :** पित्याकडून कन्या विकत घेवून तिच्याशी विवाह करणे.

**६) राक्षस विवाह :** वधूपित्या विरुद्ध युद्ध करून त्याचा पराभव करून विवाह करणे.

**७) पिशाच्च विवाह :** मद्य पाजवून बेशुद्ध झालेल्या स्त्रीवर अत्याचार करून विवाह करणे.

८) **गांधर्व विवाह :** स्त्री-पुरुष परस्पर प्रेमसंबंधातून होणारा विवाह.

या विवाहाबरोबरच उत्तर वैदीक युगात विवाह संस्थेमध्ये खालील दोन महत्त्वपूर्ण बदल झाले.

१) **अनुलोम विवाह :** उच्च वर्णीय पुरुष व कनिष्ठ वर्णीय स्त्री यांच्यात झालेला विवाह. उदा. ब्राह्मण पुरुष व शुद्र स्त्री.

२) **प्रतिलोम विवाह :** उच्च वर्णीय स्त्रीचा, कनिष्ठ वर्णीय पुरुषांशी विवाह.

असे दोन अंतर्जातीय विवाह उत्तरवैदिक काळात अस्तीत्वात आले.

- **स्त्रीयांचा दर्जा खालावला :**

उत्तर वैदिक युगात अतिशय झपाट्याने स्त्रीयांचा दर्जा खालावत गेला. तिचे समाज व कुटुंबातील स्थान नष्ट होत गेले. पतिनिवडीचा हक्क नष्ट झाला. स्वयंवर पद्धतीवर मर्यादा आल्या. विवाहाचे वर कमी होऊन बालविवाहाचे प्रमाण वाढले. स्त्री पुरुषाची मालमत्ता असून पारतंत्र्यात जीवन व्यतीत करत होती. सार्वजनिक जीवनात व राज्यकारभारामध्ये स्त्रीयांना भाग घेता येत नव्हता. मुलींचा जन्म म्हणजे दु:खाचे मुळ समजून तिची तुलना मद्य व धूत या व्यसनाबरोबर केली जात असे.

अपत्याचे संगोपन व गृहकृत्य हीच स्त्रीयांची प्रमुख कर्तव्ये उत्तरवैदिक कालखंडामध्ये मानली गेली. स्त्रीयांना पुनर्विवाह करण्याची परवानगी नाकारली गेली. विवाह संस्थेतील स्त्रीयांचे सर्वच अधिकार काढून घेण्यात आले. बहूपत्नीत्वाची प्रथा या युगात रूढ झाली. त्याबरोबरच नियोग पद्धत, बहुपत्नीत्वाला धर्मशास्त्राची मान्यता मिळाली. शिवाय सतीची पद्धत, उत्तर वैदीक युगात अस्तित्वात होती. स्त्रीयाना गौणत्व बहाल करण्याचे सर्व श्रेय या युगास जाते.

- **आश्रमव्यवस्था :**

उत्तरवैदिक काळात आश्रम व्यवस्था ही आर्याच्या सामाजिक जीवनाचे एक वैशिष्ट्य होते. आयुष्याचे चार टप्पे कल्पून विभागणी करण्यात आली. या विभागणीस 'आश्रम' असे नाव दिले. यातून भौतिक व अध्यात्मिक उन्नती साध्य करण्याचा प्रयत्न केला गेला.

१) **ब्रह्मचर्याश्रम :** या कालावधीत विद्यार्थी गुरुग्रही आश्रमात पाठविला जात असून शिक्षण व शिस्त हा यामागचा उद्देश होता. मात्र त्रैवर्णिकानाच ही मूभा होती. शूद्रांना या आश्रम व्यवस्थेत स्थान नव्हते.

२) **गृहस्थाश्रम :** वैवाहिक जीवनाला सरुवात करण्याबरोबरच धर्म, अर्थ, काम या पुरुषार्थाची पूर्तता करण्यासाठी दुसऱ्या टप्प्यातील या व्यवस्थेमुळे धर्म, अर्थ, काम व मोक्षाची प्राप्ती होती अशी धारणा होती.

३) **वानप्रस्थाश्रम :** प्रपंचामधून हळूहळू अलिप्त होवून अध्यात्मिक जीवनाकडे वळण्याची व्यवस्था म्हणजेच वानप्रस्थाश्रम होय. मोक्षाची पूर्व तयारी ह्या आश्रमात करीत.

४) **संन्यासाश्रम :** हा या आश्रम व्यवस्थेचा व जीवनाचा अंतीम टप्पा होय. सर्व सुखांचा त्याग करून

अरण्यात जाऊन ईश्वर चिंतनात वेळ घालविणे व अध्यात्मिक उन्नती साधणे अशी आश्रम व्यवस्था उत्तरवैदिक युगीन समाजव्यवस्थेचे खास वैशिष्ट्य होते.

- **सोळा संस्कार :**

उत्तर वैदिक काळात संस्काराचे महत्त्व अतिशय वाढले. मानवी जन्मापासून ते मृत्यूपर्यंत सर्व जीवन संस्कारांनी व्याप्त होते. १०८ संस्कार सांगितले होते. पण त्यापैकी १६ महत्त्वपूर्ण असून या मागचा उद्देश उच्च नैतिक व आदर्श स्वरूपाचे सामाजिक व धार्मिक जीवन आचरणात यावे हा होता. सोळा संस्कार खालीलप्रमाणे -

१) **गर्भाधान :** गर्भधाणेपूर्वी चांगली संतती होण्यासाठी करावयाचा विधी.

२) **पुसंवन :** फक्त मुलगाच व्हावा या साठी केला जाणारा विधी.

३) **सीमंतोन्नयन :** गर्भास संरक्षण मिळण्यासाठी करावयाचा विधी.

४) **जातकर्म :** मुल जन्मल्यानंतर मध व तूप चाटवीणे.

५) **नामकरण :** मुलाचे नाव ठेवण्याचा विधी

६) **निष्क्रमण :** मुलाला प्रथम घराबाहेर देवदर्शनासाठी नेण्याचा विधी.

७) **अन्नप्राशन :** बाळाला प्रथम अन्न खाऊ घालण्याचा सोहळा.

८) **चुडाकर्म :** विधीवूर्पक केशकर्तन - जावळ काढणे.

९) **कर्णवेध :** सुवर्णकाराच्या हाताने कान टोचून कानात अलंकार घालणे.

१०) **उपनयन :** हा ब्राह्मणत्व देण्याचा संस्कार विधी असून ७ ते १२ वर्षां दरम्यान उपनयन संस्कार केला जाईल.

११) **मेधाजनन :** पळस वृक्षाच्या फांदीचे पूजन करून सतेज बुद्धी प्राप्तीसाठी

१२) **गोदान :** उपनयनाच्या वेळी ब्रह्मणास गाय दान देण्याचा विधी.

१३) **समावर्तन :** गुरुग्रही शिक्षण पूर्ण झाल्यानंतर करण्यात येणारा विधी.

१४) **विवाह :** गृहस्थाश्रमात प्रवेश करण्यासाठी करण्यात येणारा विधी.

१५) **अग्निपरिगृह :** दररोजच्या गृहयज्ञास प्रारंभ करावयाचा विधी.

१६) **अंत्येष्टी :** मनुष्याच्या मृत्यूनंतर श्राद्धपूर्वक करण्यात येणारा विधी.

- **पितृप्रधान संयुक्त कुटुंब पद्धती :**

उत्तरवैदिक कालखंडामध्ये कौटुंबिक जीवनात बरेच परिवर्तन झाले. कुटुंब प्रमुखाचा कुटुंबावरील प्रभाव

दिवसेंदिवस वाढत गेला. आज्ञापालन व कठोर शिस्तीला महत्त्व आले. मोठ्यांचे लहानांवर दडपणांबरोबरच स्त्रीयांचे कुटुंबातील अस्तित्व दुय्यम झाले. वैचारिक स्वातंत्र्याचा ऱ्हास होत जाऊन परिणामी कुटुंबात वैचारिक संघर्षाचे प्रसंग येवू लगाले. सर्व संपत्ती मोठ्या मुलाच्या हाती असल्यामुळे आर्थिक स्वातंत्र्यावर बंधने या कालखंडात येऊ लागली.

- **आहार व प्येय :**

उत्तर वैदीक युगात आर्यांच्या कृषी अर्थव्यवस्थेची प्रगती झाल्यामुळे आहारात विविधता झाली. विविध प्रकारच्या धान्याचे उत्पादन शेतामध्ये घेण्यात येऊ लागले. त्यामूळे पूर्ववैदिक अन्नधान्याशिवाय इतर पदार्थांचा आहारात समावेश होत असे. त्यात तीळ, सातू, गुळ, फळे कंदमुळे अपूप, पुरोडाश, पायस इ. अनेक विविध पक्वानांचा समावेश होता.

- **वेशभूषा :**

उत्तर वैदिक युगामध्ये वेषभूषा पद्धतीत बरीच प्रगती झालेली होती. राजे, व्यापारी, श्रीमंत व ब्राह्मण रेशमी वस्त्र वापरत तर साधारण लोक लोकरीची वस्त्रे परिधान करत. सर्वच वस्त्रांवर सुंदर नक्षीकाम करण्याची कला या युगाने साधली या युगातील स्त्री पुरुषांची वेषभूषा आकर्षक असण्याबरोबरच ते, हस्तिदंत, लाकुड व सळीच्या कांडापासून बनविलेल्या कंगव्यानी केस स्वच्छ ठेवीत व सुगंधी तेलाचा वापर करीत असत.

- **अलंकार व सौंदर्य प्रसाधने :**

उत्तर वैदिक युगामध्ये उत्तरोत्तर सौंदर्य प्रसाधनांबाबतीत लोक दक्ष असल्याचे दिसून येते. स्त्री पुरुष सोने-चांदी, रत्न, माणिक, हिरे, मोती, शंख, शिंपले व मणी यापासून बनविलेले अलंकार वापरीत असत. स्त्रियांच्या दागिन्यामध्ये बाजूबंद, कमरपट्टा, कर्णफुले, कंठहार, पैंजण, वाळे, अंगठ्या व नथ इत्यादींचा समावेश होतो. गळ्यातील ''निष्क'' व ''श्यागर'' हे स्त्रियांचे वैशिष्ट्यपूर्ण आकर्षक केंद्र होते. याशिवाय चंदनलेप, उटणे, काजळ, मेंदी, ओष्टरंग, सुगंधी तेल व पुष्पमालांचा सौंदर्य खुलविण्यासाठी उपयोग होत असे.

- **मनोरंजनाची साधने :**

उत्तरवैदिक युगामध्ये तालासुरात मंत्र म्हणण्याच्या पद्धतीतून सामवेदाची निर्मिती झाली. भारतीय संगीतशास्त्राच्या विकासाला पोषक वातावरण या युगात निर्माण झाले. धार्मिक, सार्वजनिक उत्सव, सण समारंभ, राज्याभिषेक, लग्न इ. प्रसंगी संगीत नृत्य व मनोरंजनाचे कार्यक्रम होत असत. समाजामध्ये गायक, वादक व नटाचा एक स्वतंत्र वर्ग होता. याशिवाय द्यूत हे मनोरंजनाचे प्रमुख साधन होते. त्यामुळे सार्वजनिक द्यूतगृहे होती. रथ, घोड्याच्या शर्यती, प्राण्याच्या झूंजी, शिकार, कुस्ती, मल्लयुद्ध व शस्त्र स्पर्धा ह्या मनोरंजनासाठी भरवल्या जात असत.

- **निवास स्थाने :**

उत्तर वैदिक युगामध्ये आर्यांच्या ग्रामीण जीवनाचे रुपांतर हळूहळू नागरी जीवनात होऊ लागले.

राज्यविस्तार व व्यापारामुळे हळूहळू मोठमोठ्या शहरांचा उदय होऊ लागला. त्यामुळे खऱ्या अर्थाने निवासस्थानामध्ये परिवर्तने होवू लागली. या युगात लोक खेड्या बरोबरच शहरात राहू लागली. घरांना 'हर्म्य' म्हटले जात असे. खेड्यातील घरे दगड, माती, लाकूड, बांबू, गवत शिवाय झाडांच्या पानांपासून बनविली जात असत. तपस्वी पर्णकुटीत राहत असत.

नगरांना 'पूर' व बंदरांना 'पट्टन' असे संबोधले जाईल. शहरातील घरे, विटा, दगड, लाकूड व चुन्यापासून बनविल्या जात असत. सुंदर व भव्य इमारती कार्यालये, राजवाडे, दरबार, उद्याने, तलाव इ. नी नगरे सुशोभित होती.

वैदिक ग्रंथामध्ये निवासाविषयक हर्म्य (घरे), पत्नी सदन (शय्यागृह), धनधानीगृह (कोठार), सभागृह, पुर, संग्रहण (बाजारपेठा) इ. चे उल्लेख आढळून येतात. स्थापत्यशास्त्राची प्रगती झाल्यामुळे नियोजित व सुंदर निवासस्थाने निर्माण झाली. कंपील, अयोध्या, काशी, कुरुवण, मिथीला, विराटनगर, हस्तिनापूर ही व याबरोबर अनेक शहरे उत्तर वैदिक युगामध्ये अस्तित्वात आली.

- **अंत्यसंस्कार :**

उत्तर वैदिक युगामध्ये तर १६ संस्कारापैकी एक म्हणजेच अंत्येष्टीचा समावेश करण्यात आलेला होता. या काळात पारलौकिक जीवनाचा विकास हा त्याच्या सर्वोच्च टोकावर होता. त्यामुळे अंत्यसंस्कारांनाही महत्त्व होते. त्यामुळे मृत्यूनंतरचे अनेक धर्मविधी अस्तित्वात आले. अग्नीसंस्कार (दहन), श्राद्ध, पिंडदान व दानधर्म इ. विधी मृत्यूनंतर बारा दिवसांपर्यंत केले जात असत. पक्ष व श्राद्धांद्वारे पितरांना अन्नपाणी देऊन मृतात्म्यांना संतुष्ट करण्याची कल्पना उत्तर वैदीक कालखंडामध्ये आर्यांनी रूढ केली.

- **उत्तर वैदिक कालखंडातील सामाजिक जीवनातील स्थित्यंतरे :**

  - उत्तर वैदिक कालखंडामध्ये समाजिक प्रथा व कर्मकांडाचा मोठ्या प्रमाणामध्ये समाजामध्ये अंतर्भाव झाला.
  - सामाजिक कर्तव्यासह, संयुक्त कुटुंबपद्धतीच्या विकासाचे वर्णन गृह्यसूत्रामध्ये करण्यात आले.
  - समाजातील स्त्रीयांचे स्थान कमी झाले. स्त्रीयांचा सन्मान केला जात असला तरी कुटुंबामध्ये त्यांचे स्थान दुय्यम स्वरूपाचे होते.
  - कन्याजन्माचे ओझे वाटत नसले तरी पुत्रजन्म विशेष अगत्याने आणि आनंदाने साजरा केला जात असे.
  - सामाजिक व धार्मिक बाबतीत स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने वागवण्यात येत असले तरी त्यांना राजकीय बाबींमध्ये सहभागी होता येत नसे. पुरुषांप्रमाणे सभा व समितीच्या बैठकीत हजर राहता येत नसे.
  - एकाच स्त्रीने अनेक पुरुषांशी विवाह करण्याची पद्धत निषिद्ध मानली जात असे.

- या कालखंडात जाती पद्धतीचा उदय झाला.
- कार्यविभाजनावर आधारित असलेले सामाजिक वर्गीकरण घडून आले.
- यज्ञयागाचा वाढता प्रभाव आणि वैदिक धर्माच्या गुंतागुंतीमुळे समाजातील क्लिष्टता वाढतच गेली.
- समाजामध्ये ब्राह्मण व क्षत्रियांचे प्राबल्य वाढले.
- अन्य दोन वर्णांपैकी वैश्यांची संख्या अधिक असून समाजात त्यांना महत्त्वाचे स्थान मिळाले.
- समाजाच्या तळातील भूमिहीन, शेतमजूर, अशिक्षित आणि अंगमेहनतीचे काम करणारे अकुशल कामगार, घरकाम, करणारे गडी यांचा समावेश शूद्रांमध्ये होत असे. शूद्रांना कोणतेही अधिकार नसत. तसेच ते समाजाच्या अगदी खालच्या तळावर होते आणि समाजाचे अत्यावश्यक अंग होते.
- उत्तर वैदिक कालखंडामध्ये चांडाळ या शूद्रातील अतिशय खालच्या थरातील लोकांचा उदय झाला.
- ब्राह्मणी पंथाच्या प्रचंड विस्तारामुळे वर्ण पद्धत कायम झाली या पद्धतीला सामाजिक आणि धार्मिक मान्यता मिळाली. हळूहळू वर्णपद्धत वंशपरंपरागत बनल्यामुळे व्यावसायिक आणि पेशाविषयक तंत्रज्ञानांकडे दुर्लक्ष होऊन प्रत्येक वर्णात जाती निर्माण झाल्या. यथावकाश व्यवसायापैकी जन्मावरून जात ठरवली जाऊ लागली व उत्तर वैदिक कालखंडात ती अतिशय परीदृढ झाली.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश न – २**

**अ)**

१) ऋग्वेदकालीन किंवा पूर्ववेदकालीन कुटुंब प्रमुखास ........... म्हणजे जात असे.

१) कुल २) कुलप ३) ग्रामणी ४) विशपती

२) पूर्ववैदिक काळात प्रजेद्वारे राजास देण्यात येणाऱ्या करास ........... म्हणत असत.

१) विराट २) गोप ३) बली ४) व्रात

३) कोसल राज्याची राजधानी ........... होती.

१) अयोध्यानगरी २) काशी ३) गिरीव्रज्य ४) पांचाल

४) सम्राटाला राज्य कारभारामध्ये मदत करणाऱ्या मंत्रीमंडळाला उत्तरवैदिक कालखंडामध्ये ............ या नावाने संबोधलेजात असे.

१) पुरोहित २) सूत ३) पालागल ४) रत्निन

५) युद्धाच्या वेळी राजाच्या रथाचे सारथ्य करणाऱ्यास ............ म्हणत असत.

१) अक्षवप २) सूत ३) संग्रहीत ४) महिषी

**ब) खालील उपप्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) पूर्ववैदिक कालखंडातील वर्णव्यवस्था ही कशावरून ठरविली जात असे ?

२) समाजजीवनामध्ये जातीयतेचा उगम कोणत्या युगामध्ये झाला?

३) प्रतिलोम विवाहामध्ये पुरुषाचा वर्ण स्त्रीच्या वर्णापेक्षा कसा असे?

४) फक्त मुलगाच व्हावा यासाठी करण्यात येणारा संस्कार कोणता होता?

५) उत्तरवैदिक युगातील घरांना काय म्हटले जात असे.

**२.२.४ वेदकालीन आर्थिक परिस्थिती :**

**• पूर्व वैदिक आर्थिक जीवन :**

प्राचीन भारतीय निव्वळ अध्यात्मवादी होते. त्यामुळे त्यांचे भौतिक जीवनांकडे दुर्लक्ष झाले अशी चुकीची टिका पाश्चात्यानी केली. परंतू वैदिकांनी चार पुरुषार्थात 'अर्थ' हा एक पुरुषार्थ मानला. यातूनच अध्यात्मवादी जीवनाबरोबर भौतिक जीवनामध्ये ही सुधारणा केल्या. यावरून आर्य जीवननिष्ट होते हे दिसून कृषी व्यवसायामुळे भारतात स्थायीक झाल्यानंतर त्यांचे भटके जीवन संपुष्टात येऊन स्थिर जीवनाला प्रारंभ झाला. स्थिर जीवनाबरोबर शेती, पशुपालन व विविध व्यवसाय त्यांनी सुरू केले. पशुधनाबरोबर, पशुपालनाद्वारे, पूर्ववैदिक आर्यांनी आर्थिक समृद्धी घडवून आणली.

**• कृषी व्यवसाय :**

आर्यांचा प्रमुख व्यवसाय शेती होता. आर्यांच्या धार्मिक जाणिवा, कल्पना व सामाजिक जीवन हे ग्रामीण कृषी उद्योगांशी अनुरुपच होते. भारतात आल्यानंतर त्यांनी शेतीची प्रगती केली. शेतीमुळेच आर्यांच्या स्थिर जीवनास सुरूवात झाली. ऋग्वेदांमध्ये शेतीला 'क्षेत्र' म्हटले जात असे. नांगरणी, प्रेरणी, कापणी, मळणी इ. शेतीविषय कामे पूर्ववैदिक कालखंडात केली जात असे. ते ६, ८, ,११, १२ बैलांचा नांगर मशागतीसाठी वापरत. याबरोबरच ऋवेदामध्ये रोगराईमुळे काही पिकांची नासाडी होऊ नये म्हणून मंत्राची निर्मिती करण्यात आलेली होती. शेतामध्ये भरपूर पिक यावे यासाठी ऋग्वेदांमध्ये अनेक प्रार्थना व धर्मविधी सांगितलेले आहेत. 'कुल्या' व 'कुपां' (कालवे व विहीरी) द्वारे शेतीसाठी कृत्रीम पाणी पुरवठा ते करत असावेत. त्याबरोबरच आर्यांनी मोठ्या प्रमाणामध्ये आपल्या शेतीमधून गहू, तांदुळ, यव (बार्ली), ऊस, तीळ व कापूस ही पिके घेत असत. एकंदरीतच पूर्व वैदिक आर्यांची संस्कृती ग्रामीण असल्यामुळे शेती हाच आर्यांच्या अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा भाग होता.

- **गोपालन / पशूपालन :**

सुरूवातीपासूनच पशुपालन विशेषत: गोपालन हा आर्याचा प्रमुख व्यवसाय होता. ऋग्वेदामध्ये 'गोपाल' 'गोष्ठ' व घोषा' असे पशुपालन विषयी संदर्भ आलेले आहेत. पशुंना 'गो' व गोठ्याला 'गोष्ट' व गुराख्याला 'गोपाल३ आणि कुरणांना 'घोषा' म्हटले जात असे. वैदीक पशुपालनामध्ये गाई, बैल, घोडा, बकरी, मेंढ्या, म्हैस, रेडा, कुत्री, गाढव यांचा समावेश होता. गाय अनेक अर्थाने पवित्र व उपयुक्त पशु होता.

शेतीची मशागत, संरक्षण, दळणवळण, खतपुरवठा व दुध दुभत्यांच्या रुपाने पशूंचा उपयोग होत असे. त्याबरोबरच पशूंच्या देवाण घेवाणीच्या स्वरूपातच व्यापार व आर्थिक व्यवहार होत असत. विशेषत: ऋग्वेदीक युगातील सर्व युद्धे गोधनावरूनच (गविष्टी) झाल्याचे पुरावे सापडतात.

एकंदरीत आर्याच्या अर्थव्यवस्थेत पशुपालन हा मुख्य घटक होता. भूमीपेक्षा पशुपालनाला तत्कालीन आर्यांच्या आर्थिक जीवनामध्ये अतिशय महत्त्व होते.

- **उद्योग व व्यवसाय :**

व्यापार हा आर्याचा दुय्यम व्यवसाय होता. सिंधु, कुल्या व नौका इत्यादि जलवाहतूकीचे संदर्भ ऋग्वेदामध्ये सापडतात. पूर्ववैदिककालीन व्यापार हा सप्तसिंधूच्या जलमार्गाने चालत होता. त्याबरोबरच भूमार्गाने देखील अंतर्गत व्यापार चालत होता. वैश्याच्या हाती व्यापाराची सर्व साधने असली तरी पूर्ववैदिक कालखंडामध्ये परदेशी व्यापार अद्याप सुरू झालेला नव्हता. जन्मजात व्यवसाय करण्याचे बंधन या कालखंडामध्ये नव्हते. व्यवसाय स्वातंत्र्य असल्यामुळे एकाच घरातील लोकही निरनिराळे व्यवसाय करत असल्याची उदाहरणे आपल्याला पूर्ववैदिक कालखंडामध्ये सापडतात.

पूर्ववैदिक कालखंडामध्ये अनार्याची 'पणी' नावाची जमात व्यापारात अग्रेसर होती. पशु, भांडी, कापड, अन्नधान्य, शेतीची अवजारे व दैनंदिन गरजेच्या वस्तूचा व्यापार चालत असे. दैनंदिन गरजा आणि कृषी व्यवसायाच्या अनुषंगाने अनेक व्यवसाय व व्यावसायीक निर्माण झाले. व्यवसाय विभाजनाच्या भूमिकेमधूनच आर्यांच्या वर्णव्यवस्थेचा उदय झाला. प्रत्येकाला व्यवसायाचे स्वातंत्र्य असून एकाच कुटुंबातील माणसे विविध व्यवसाय करीत असत. म्हणजेच एका अर्थाने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे प्रमुख व्यावसायिक होते.

**सुतारकाम :** काही लोक लाकडांपासून वेगवेगळ्या वस्तू बनवून उपजिवीका करत. उदा. शेतीची साधने, खेळणी इ.

**धातू काम :** शेतीची लोखंडी अवजारे, नांगर, फाळ, घरगुती लोखंडी उपकरणे व युद्धासाठी धातूचे साहित्य तयार करणारा वर्ग.

**सोनार :** सोन्या, चांदीचे अलंकार तयार करणारा वर्ग. ऋग्वेदामध्ये सोनारासाठी 'हिरण्यकार' हा शब्द आहे.

**चर्मकार :** प्राण्यांची कातडी कमावून त्यापासून हा चर्मकार वर्ग पखाली, पादत्राणे, लगाम, चाबूक,

बाणाला लागणाऱ्या दोऱ्या इ. वस्तू तयार करीत असत.

**विणकाम :** पूर्ववैदिक काळात विणकरास 'वाय' तर चरख्यास 'तसर' म्हणत. विणकाम करणाऱ्या स्त्रीस सिरी व कपड्यावर नक्षी काम करणाऱ्या स्त्रीस 'पेशस्कारी' म्हटले जाई. यावरून सूतकताई व विणकाम मोठ्याप प्रमाणात केले जात असे.

शिवाय विविध प्रकारची मातीची भांडी तयार करणारा कुंभाराचा वर्ग, नाभिक, कोळी, नर्तक इ. समाजोपयोगी व्यावसायीक गट होते. हे सर्व वर्ग अर्थव्यवस्थेचे आधार होते.

- **कर आकारणी :**

पूर्व वैदिक युगामध्ये 'बली' नावाचा कर धान्य व पशूच्या रुपाने घेतला जात असे. शिवाय राज्याचा आर्थिक डोलारा चालविण्यासाठी जमिन महसूल युद्धातील लूट, खंडणी नजराणे व विविध वस्तूंवरील कर ही राज्याच्या उत्पादनांची साधने होती.

पूर्ववैदिक कालीन अर्थव्यवस्था जरी फारशी विकसित नसली तरी खरेदी विक्रीचे व्यवहार 'देवाण घेवाणी'च्या (Barter system) पद्धतीने होत असत. 'गायी' हे जरी वस्तूविनिमयाचे साधन असले तरी ऋग्वेदांमधील वर्णनांच्या आधारे 'निष्क' नावाचा सोन्याचा तुकडा किंवा दागिना चलनासाठी वापरला जाई. अर्थव्यवस्थेच्या भरभराटीसाठी लागणारे रस्ते व दळणवळणाची साधने अपूरी होती. 'पूषण'ही मार्गाची देवता मानली जात असत तर 'अनस' म्हणजेच बैलगाड्यांचा वापर प्रवासासाठी करण्यात येत असे.

- **उत्तर वैदिक कालीन आर्थिक जीवन :**

उत्तर वैदिक कालीन अर्थव्यवस्थेमध्ये खूप मोठे परिवर्तन झालेले आपल्याला पहावयास मिळते. बलवान राजसत्ता, साम्राज्यवादाचा उदय, मोठी नगरे व व्यापारी वर्गाच्या उदयामुळे उत्तरवैदिक काळात आर्यांच्या आर्थिक जीवनात भर पडली. तत्कालीन वाङ्मयातून कृषी, वाणिज्य व विविध व्यवसायाची माहिती मिळते.

**कृषी उद्योग :** पूर्व वैदिक युगाप्रमाणेच उत्तरवैदिक युगामध्ये कृषी उद्योग हा अर्थव्यवस्थेचा कणा होता. अथर्ववेद व ब्राह्मण ग्रंथामध्ये नांगरणी, पेरणी, कापणी, मळणी व शेतीविषयक उल्लेख सापडतात. ४, ८, १२, २४ बैलांच्या नांगराचा उपयोग करण्याबरोबरच शेणखताचा (षिरिष) पीक वृध्दीसाठी वापर केला जात असे. शिवाय ओलिताची शेती करण्याचे तंत्र अवगत होते. पूर्ववैदिक धान्याचे उत्पादन घेण्याबरोबर उत्तरवैदिक युगांमध्ये कृमीकिटक, रोगराई व नैसर्गिक आपत्तीपासून शेतीचे रक्षण व्हावे म्हणून मंत्राची रचना करण्यात आली. भरपूर उत्पादन व्हावे यासाठी यज्ञ व इतर धार्मिक विधी उत्तर वैदिक युगामध्ये केले जात असत.

**पशुपालन :** गोपालनासंबंधी चालत आलेली परंपरा उत्तरवैदिक काळातही चालू होती. शेतीची कामे पशूपालनावर अवलंबून होती. त्यामुळे जोडधंदा म्हणून पशुपालन केले जात असे. सम्राटांकडे हजारोंच्या संख्येने पशुधन होते. शिवाय सामान्य लोकांच्याही घराशेजारी गोठा असे. उत्तरवैदिक युगात तर पशुधन प्राप्तीसाठी 'गविष्टी' नावाची युद्धे होत असत. त्यावरून आपल्याला पशुधनाचे महत्त्व कळते. शेतीची

मशागत, संरक्षण, युद्ध, व्यापार, मांसाहार, खत व दळणवळणासाठी पशूंचा उपयोग होत असे. शिवाय या युगामध्ये यज्ञातील बलिदानासाठी पशूंचा उपयोग केला जात असे. पशुपालनाची वृद्धी होण्यासाठी उत्तरवैदिक काळात 'वृषोप्सर्ग' नावाचा यज्ञ केला जात असे. त्याबरोबरच व्यापार व आर्थिक व्यवहारासाठी पशुंची खरेदी विक्री होत असे.

यज्ञगृहाच्या बाहेर गोहत्या करणाऱ्यास देहांताची शिक्षा अथर्व वेदात सांगितलेली आहे. मोठ्या प्रमाणात सुव्यवस्थित बांधलेले गोठे, गोधनाच्या वृद्धीसाठी प्रार्थना, देवघेणीचे माध्यम म्हणून गाईचे स्थान इत्यादी घटकांकडे पाहता उत्तरवैदिक कालखंडांमध्ये गोपालनास विशेष महत्त्व होते हे लक्षात येते.

- **उद्योग व व्यवसाय किंवा व्यापार :**

उत्तर वैदिक कालखंडामध्ये सहाजिकच शक्तिशाली राजसत्ता धनिक व व्यापारी वर्गाच्या उदयामुळे उद्योग व व्यवसायाची भरभराट झाली. या कालखंडामध्ये अनेक शहरे व बंदरे उदयास आली. त्यास काशी, अयोध्या, मिथिला, कंपील, विराटनगर, हस्तिनापूर, द्वारका, प्रतिष्ठान, असंवदीत व गिरीव्रज या सारखी अनेक शहरे उदयास आली. या शहरांमध्ये विविध व्यावसायिक व व्यापारी वर्ग राहत असून वैश्य वर्गाकडे व्यापार असून या युगातही बहुतांशी व्यापार, देशांतर्गतच होतो. जलमार्गे व भूमार्गे व्यापार होत असे, धान्य, कापड, भांडी, दागिणे, रथ, पादत्राणे, शस्त्रे, पशू व घरगुती वस्तूंचा व्यापार चालत असे या बरोबरच शिजविलेल्या खाद्यपदार्थांचीही विक्री होत असे.

व्यापाऱ्यांचे संघ असत व या संघावरच्या अधिकाऱ्यास 'श्रेष्ठीन' असे म्हटले जात असे. वस्तूंच्या किंमतीवर शासनसंस्थेची देखरेख असे. गृहसुत्रांमध्ये व्यापारात यश मिळावे म्हणून 'पण्यसिद्धी' नावाचा विधी सांगितला आहे. तसेच पाणिनीच्या सुत्रांमध्ये अनेक आयात वस्तूंचा उल्लेख आहे. व्यापारात भेसळ, लबाडी, अतिरिक्त नफा यावर शासनसंस्था लक्ष ठेवित असे.

**दळणवळण :** उत्तरवैदिक युगात शहरांबरोबर बऱ्या वाईट रस्त्यांचाही विकास झालेला होता. व्यापार हा जमिनीवरून होत असे. शिवाय समुद्रमार्गे सुद्धा होत असल्याचे उल्लेख आपल्याला ब्राह्मणग्रंथात सापडतात. सूत्रकाळामध्ये तर रथ हेच मुख्य वाहन होते. त्याबरोबरच घोडी व हत्ती यांचा वापर फिरण्यासाठी केला जात असे. मालाच्या वाहतूकीसाठी विविध प्रकारच्या प्राण्यांचा वापर केला जात असे. त्यामध्ये हत्ती, बैल, रेडा, होड्या, पालख्या इ. रस्ते अवघड असल्यामुळे दळणवळणाची साधने अपुरी होती. प्रवास खडतर होता.

**इतर व्यवसाय :** उत्तरवैदिक काळात शेतीला पुरक असे अनेक जीवनोपयोगी व्यवसाय निर्माण झाले होते. उदा. विणकर, न्हावी, परीट, सुतार, शिंपी, लोहार, सुवर्णकार, कुंभार, चर्मकार, गवंडी, कोळी, तेली इत्यादी वरील सर्वच व्यवसाय हे जातीनिहाय असून वादक, जोतिष, आचारी, रथकार, सूत (सारथी) संदेशवाहक शिवाय अतिशय घरगुती स्वरुपांच्या व्यवसायामध्ये काशिदा, विणकाम, रंगकला इत्यादी छोटे मोठे व्यावसायिक या काळामध्ये निर्माण झाले होते.

**चलनपद्धती :** पूर्व वैदिक काळापेक्षा उत्तरवैदिक काळामध्ये चलनाचा वापर जास्त प्रमाणात सुरू झालेला होता. तरीही बहुतांशी व्यवहार हे वस्तूविनिमय पद्धतीनेच चालत असत. उत्तर वैदीक ग्रंथामध्ये काही नाण्यांची यादी दिलेली असून ही नाणी सोन्याचांदीची होती. 'मान' हे चलनाचे परिमाण होते. 'कृष्णाल', 'शतमान', निष्क, 'पाण', 'पाद' वाह आणि 'कार्षापण' ही नाणी प्रचलित होती. पाणिनीच्या सूत्रांमध्ये नाण्याबद्दल माहीती दिलेली आहे.

**करपद्धती :** धर्मसूत्रामध्ये विविध प्रकारच्या कराचे उल्लेख आलेले आहेत. विविध व्यवसाय व व्यापाराची वृध्दी झाल्यामुळे उत्तर वैदिक युगामध्ये कर वाढल्याचे संकेत धर्मसुत्रात मिळतात. शिवाय प्रजेकडून मिळणाऱ्या करातूनच राज्यकारभाराचा खर्च भागवला जात असे. ब्राह्मण व क्षत्रिय यांना कर माफ असे. कराचा सर्वभार हा फक्त व्यावसायिक वैश्य वर्गावरच होता. 'भागदूत' नावाचा अधिकारी कर वसूल करीत असे. युद्धातील खंडणी लूट, नजराणे, दंड, नुकसानभरपाई, जमिनी, खाणी ही उत्पन्नाची इतर साधने होती. याबरोबरच शेतीच्या महसूल कराचे उत्पन्न हे प्रमुख साधन असून १/६, १/८, १/१० या प्रमाणात शेतसारा घेतला जात असे. पशुधनावर १/५, व्यापारावर १/२० व फळे औषधी भाजीपाला, मांसान्नावर १/६० कर होता.

ब्राह्मण, विद्यार्थी, विद्वान, अपंग, रोगी, शूद्र, विधवा आणि स्त्रीया इत्यादी घटक करमुक्त होते. आयात निर्यात मालावर कर आकारला जात असे. धान्य, पशू व पैशाच्या रूपाने कर गोळा केला जात असे व खर्च हा प्रजेच्या कल्याणासाठी येत असे.

- **उत्तर वैदिक कालखंडातील आर्थिक जीवनातील स्थित्यंतरे :**

अन्य दोन वर्णांपैकी वैश्यांची संख्या अधिक असून अर्थव्यवस्थेमध्ये वैश्यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. वैश्य देशाची संपत्ती निर्माण करण्याबरोबरच सर्वात प्रभावी करदता वर्ग म्हणून उदयाला आला.

उत्तर वेदकाळामध्ये राज्याच्या अर्थव्यवस्थेवर वैश्याचे नियंत्रण असल्यामुळे वैश्यांना सर्व राजकीय अधिकार मिळाले.

### २.२.५ वेदकालीन धार्मीक परिस्थिती :

- **पूर्ववेदकालीन धार्मिक जीवन :**

ऋग्वेदांमध्ये आर्यांच्या धार्मिक जीवनाविषयीची माहिती मिळते. त्यावरून एक गोष्ट लक्षात येते की, पूर्व वेदकाळातील धार्मिक संकल्पना प्रगल्भावस्थेत होत्या. यज्ञविधी कल्पनेच्या उदयाबरोबरच अनेक निसर्गदेवतांचे अस्तित्व या काळात उदयास आले. याबरोबरच पूर्ववेदकालखंडामध्ये विविध देवता, नीती कल्पना, एकेश्वरवाद, उपासनाविधी, सृष्टीनिर्मितीच्या संकल्पना उदयास आल्या. निसर्गात होणारे बदल, प्रत्येक वेळेस बदलणारे हवामान, रात्र-दिवस, प्रकाश अंधार, पाऊस, विजेचा लखलखाट यांची वैज्ञानिक कारणे माहिती नव्हती. या सर्वांमागे काहीतरी धार्मिक शक्ती असलेल्या समजातून पूर्व वैदिककालीन आर्यांनी देवदेवतांचे विविध प्रकार पाडले.

१) **स्वर्गीय देवता :** आकाश, वरूण, सूर्य, मित्र, विष्णू, उषा, सविता, आप, पूषण.

२) **अंतरिक्ष देवता :** इंद्र, वायू, मरुत, पर्जन्य.

३) **भू-देवता :** पृथ्वी, अग्नी, बृहस्पती, सरस्वती, सोम.

अशाप्रकारे तिन स्तरांवर देवता होत्या. प्रत्येक ठिकाणी राहणाऱ्या देवतांची संख्या अकरा होती. एकूण तेहतीस देवतांच्या निर्मितीस तेहतीस कोटी (प्रकार) भिन्न भिन्न देवता मानलेल्या होत्या.

- **प्रमुख देवतासंबंधी आर्यांच्या संकल्पना :**

**वरूण :** ही पूर्ववैदिक कालीन आर्याची सर्वश्रेष्ठ देवता होती. ही विश्वदेवता असून ती सृष्टीचे नियमन व नियंत्रण करते. अशा वरूणासंबंधी ऋग्वेदामध्ये सातवे मंडल रचले आहे.

**इंद्र :** दुसरी महत्त्वपूर्ण अंतरीक्ष देवता. यासाठी ऋग्वेदात २५० सुक्ते रचलेली असून युद्ध व नंतर पर्जन्य देवता म्हणून लोकप्रिय झाली. इंद्र हा देवाचा राजा असून त्याचे आवडते पेय सोमरस आहे.

**सूर्य :** ही तेजाची व विश्वाचे पोषण करणारी देवता आहे. अज्ञांनधकाराचा नाश करून ज्ञानाचा प्रकाश निर्माण करणारी देवता म्हणजे सूर्य. ऋग्वेदामध्ये सूर्याच्या रथाचे व सात घोड्यांचे वर्णन आढळते.

**अग्नी :** ऋग्वेदामध्ये २०० सूक्तांतून अग्नीची प्रार्थना केलेली आहे. देव व माणूस यांच्यातील दूत असणारी देवता म्हणजे अग्नी होय. त्यामुळेच यज्ञसंस्थेमुळे अग्निचे महत्त्व वाढलेले दिसून येते.

**पृथ्वी :** पृथ्वी ही ऋग्वेदात मातृदेवता म्हणून वर्णिलेली आहे. ऋग्वेदातील बाराव्या मंडलातील पहिले सूक्त पृथ्वीविषयक आहे.

**उषा :** ऋग्वेदांमध्ये उषेची स्तूती केलेली आहे. उषा ही स्त्री देवता आहे.

**यम :** ही मृत्युची देवता होय. मृतात्म्यांना त्यांच्या क्रमानुसार स्वर्गात पाठवायचे की नरकात हे हा देव ठरवत असे. त्यास मृत्युसम्राट असे म्हटले जात असे.

- **इतर देवता :**

**सोम :** ही वनस्पतींची भूदेवता मानली जात असे. यज्ञात देवतांना प्रसन्न करण्यासाठी सोमरसाची आहूती देत असत. ऋग्वेदातील ९ व्या मंडळात सोम देवतेची स्तूती आहे.

**सविता :** सोनेरी वर्णाचा उगवता सूर्य जो जगाला प्रेरणा व चेतना देतो. त्यास सविता समजून आर्य त्यांची पूजा करत.

**अश्विनी :** देवतांचा वैद्य म्हणून अश्विनीचे वर्णन ऋग्वेदामध्ये केलेले आहे.

**पर्जन्य :** ज्यामुळे पिके येतात, चारा मिळतो व मानवाच्या सर्वांग प्रगतिला पोषक अशी देवता.

**मरुत :** म्हणजे वादळी वारे संचारणारा देव.

**वायू :** वैदिक ऋषींच्या कल्पनेत वायू हा जगाचा आत्मा आहे. ऋग्वेदात इंद्र व वायूची एकत्रित स्तूती केलेली आहे.

**सरस्वती :** ही आर्यांची मौन देवता होय व ही नदीरुपी देवता आहे.

याशिवाय बृहस्पती बुद्धी व वाचेची वाक्‌देवता होती. तर मरुतगण ही समुहात्मक वायुदेवता होती. याबरोबरच अनेक देवदेवतांचे अस्तित्व ऋग्वेद काळामध्ये दाखविण्यात आलेले आहे.

- **उपासनापद्धती :**

पूर्व वैदिक कालखंडामध्ये अस्तित्व असलेली उपासना पद्धतीही सुबोध होती. कर्मकांडाचा लवलेश ही नव्हता. विविध सूक्ते व मंत्रोच्चाराच्या माध्यमातून देवतांची स्तूती करण्यात येत असे.

**यज्ञ :** देवतांना प्रसन्न करण्यासाठी यज्ञ हा उपासनेचा महत्त्वपूर्ण मार्ग आर्यांनी निर्माण केला. विविध वस्तू अर्पण करून देवाला आपल्याकडे आकर्षित करण्यात येत असे. पूर्ववैदिक कालखंडात मात्र वैयक्तिक यज्ञाचा प्रधान होता. त्यांना 'गृह यज्ञ' म्हटले जात असे व राजांच्या पुढाकाराने घडवून येणाऱ्या यज्ञांना 'सोमयाग' असे नाव होते. यज्ञ संरचेसंबंधी विंटरनिझ असे म्हणतात की 'यज्ञ' हा धर्माच्या केंद्रस्थानी होता तर धर्म हा समाजाचा केंद्रबिंदू होता.

- **एकेश्वरवाद व नीतिकल्पना :**

पूर्ववैदिककालीन विविध देवदावतांच्या उदयासंबंधी ऋग्वेदामध्ये एकेश्वरी संकल्पनाचे उल्लेख आढळतात त्या बरोबरच त्यांच्या उपासनेमध्ये मंत्र व यज्ञविधीप्रमाणेच निती कल्पनेला सुद्धा प्राधान्य दिलेले होते. आर्यांच्या देवता ऋतूवान, नितिमान होत्या. सदाचरण व अध्यात्म्याची व्याख्या ही पूर्ववैदिक धर्मसत्तेचे प्रमुख तत्त्व होते.

गुरु-शिष्य परंपरेतून अखंड सद्वर्तन, नितिनियमाचा विकास साध्य करण्याची प्रेरणा पूर्ववैदिक धर्मतत्त्वातून मिळते. या काळात मंदिर किंवा इतर पूजाप्रकार अस्तित्वात नव्हता. यज्ञाचे स्वरूप तांत्रिक व व्यापक असे या काळात अस्तित्वात नव्हते. देवता या एकाच श्रेष्ठ तत्त्वांची किंवा परमेश्वराची रुपे आहेत असे आर्य मानत. त्याबरोबरच देवांना वळविण्याचे सामर्थ्य मंत्रात आहे. अशी त्यांची धारणा होती. वैदिकधर्मामध्ये निराशावादास कोठेही स्थान नव्हते.

- **उत्तर वैदिककालीन धार्मिक जीवन :**

उत्तर वैदिक काळामध्ये धार्मिक जीवनामध्ये खूपच परिणामकारक बदल झाले. धर्मातील तत्त्वांमध्ये बदल झाले. यज्ञविधी व कर्मकांडाची गुंतागुंत वाढली आणि सनातन वैदिक हिंदुधर्माचा पाया या काळातच घातला गेला, उत्तर वैदिक युगामध्ये खऱ्या अर्थाने कर्माची गुंतागुंत वाढली. धर्म हा खर्चिक व गहन बनला नवनवीन देवतांची भर पडली.

**देवता :** ऋग्वेदकालीन इंद्र, वरूण, सोम व रुद्र ह्या देवतांचे महत्त्व कमी होऊन या कालखंडामध्ये 'ब्रह्म्-विष्णू-महेश' या देवता प्रभावी ठरल्या. आर्य आणि अनार्याच्या सांस्कृतिक एकीकरणाला प्रारंभ या काळात झाला. अनार्याच्या शिव या देवतेला महत्त्व आले. 'विष्णू' ही उत्तर वैदिक कालीन सर्वश्रेष्ठ देवता होती. तर ब्रह्मदेव ही तिसरी वैशिष्ट्यपूर्ण देवता या कालावधीत निर्माण झाली.

**चार पुरुषार्थ :** उत्तर वैदिक काळात भौतिकवादी जीवनाचा अतिरेक होऊन मनुष्य भ्रष्ट, चैनी व विलासी याबरोबरच अनितीमान बनत चालला होता. त्यावर अध्यात्मिक जीवनाचे नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी हे पुरुषार्थ सांगितलेले आहेत.

**धर्म :** जो समाजाची धारणा करतो तो धर्म, मनुष्याची भौतिक व नैतिक उन्नती म्हणजे धर्म, ऐहिक व पारलौकिक विकासाचा राजमार्ग म्हणजे धर्म ही संकल्पना या काळात रूढ झाली.

**अर्थ :** द्रव्यार्जन समाजमान्य मार्गानेच केले पाहिजे.

**काम :** वैषयिक इच्छा व कामवासनेवर नियंत्रण हवे.

**मोक्ष :** मोक्ष म्हणजे मुक्ती, धर्म, अर्थ, काम या पुरुषार्थाचे योग्य पालन केले की मोक्षाची दारे खूली होतात. ह्या चार पुरुषार्थांना तत्कालीन धार्मिक जीवनात महत्त्वपूर्ण स्थान होते.

- **ऋणमुक्ती व नितीकल्पना :**

उत्तरवैदिक कालखंडामध्ये ऋणमुक्तीची संकल्पना उदयाला आली. त्यत पाच ऋणे सांगितलेली आहेत. त्याबरोबरच धार्मिक विधी व यज्ञ मार्गाने ईश्वराला संतुष्ट करून देव ऋणांची पूर्तता करून उपकारांची परतफेड करावी. पापातून मुक्त व्हावे हा विचार अंगीकारला गेला.

त्याबरोबरच या काळात कर्मकांडाबरोबरच सदाचरण, तपश्चर्या व नितीकल्पनेलाही महत्त्व आले. पावित्र्य व नितीशी संबंधीत संकल्पनाचा विकास या कालावधीत मोठ्या प्रमाणात झाला. चित्तशुद्धी, परोपकार, स्नेहभाव, संयम त्याग व सदाचरण इ. उच्च दर्जाच्या नितीकल्पना या काळात विकसीत झाल्या.

- **यज्ञविधी व कर्मकांड :**

उत्तरवैदिक कालामध्ये धार्मिक जीवनात यज्ञसंस्थेचे महत्त्व वाढले. कोणत्याही कार्याकरीता यज्ञ केले जात असत. जात यज्ञविधी क्लिष्ठ होती. लोक मोक्षप्राप्तीसाठी, पुत्रप्राप्तीसाठी, विवाहासाठी, शेतीतील उत्पादनाच्या वृद्धीसाठी, संपत्तीसाठी, युद्धात विजय मिळविण्यासाठी यज्ञ करित. एकंदरीतच मानवी जीवनाला यज्ञमय स्वरूप प्राप्त झाले होते.

'यज्ञकर्ता आपल्या इच्छेप्रमाणे प्रत्यक्ष देवालाही कार्य करावयास भाग पाडू शकतो' असा विश्वास निर्माण झाल्यामुळे यज्ञकर्त्या पुरोहिताचे महत्त्व वाढले. शिवाय या काळात फक्त यज्ञासाठी प्राणी हत्येला सुरूवात झाली. त्यामुळे कर्मकांडाला जास्त महत्त्व प्राप्त झाले. यज्ञ हाच उपासनेचा प्रमुख मार्ग निर्माण

झाल्यामुळे 'यजुर्वेद' व 'सामवेदा'ची निर्मिती केवळ यज्ञासाठीच झाली. जन्मापासून मृत्यूपर्यंत, रावापासून रंकापर्यंत यज्ञाचे महत्त्व वाढले व यज्ञाचे वेगवेगळे प्रकार या कालखंडामध्ये अस्तित्वात आले. जास्त खर्च करून यज्ञ केल्यास जास्त पुण्य प्राप्त होते, यज्ञामुळेच स्वर्गाची व मोक्षाची प्राप्ती होते, असा विचार या युगात अंगीकारण्यात आला. त्यामुळे उत्तर वैदिक कालखंडामध्ये;

१) गृहयज्ञ - विवाहानंतर गृहस्थाने दररोज करावयाचा यज्ञविधी.

२) राजसूययज्ञ - राज्याभिषेकाप्रसंगी करावयाचा यज्ञ विधी.

३) अश्वमेध यज्ञ - साम्राज्य विस्तारानंतर करावयाचा यज्ञ विधी.

४) वाजपेय - मोक्षप्राप्तीसाठी करावयाचा यज्ञविधी

५) व्रात्यस्तोम - वर्णशुद्धी करणासाठी करावयाचा यज्ञविधी.

६) सर्वमोघ यज्ञ- आत्म्याच्या मुक्तीसाठी करावयाचा यज्ञविधी.

यासारख्या अनेक यज्ञांचे पेव फुटले. यज्ञाचे साधे सोपे सरळ रूप नाहीसे होऊन यज्ञातील मंत्र नाहीसे झाले व तंत्र शिल्लक राहिले.

### • पुरोहिताचे महत्त्व :

उत्तर वैदिक काळात धार्मिक विधी करणाऱ्या पुरोहित वर्गाचे प्रस्थ खूपच वाढले. कुठलाही धार्मिक विधी हा पुरोहिताशिवाय संपन्नच होत नसे. 'पुरोहिताशिवाय केलेले यज्ञ देवता स्वीकारत नाही' असा समज निर्माण करण्यात आला. उत्तर वैदिक काळात पुरोहित सधन झाला. अश्वमेध यज्ञाच्या वेळी ब्राह्मणांना जमिनी दान दिल्याचे उदाहरणे 'शतपथ' ब्राह्मण ग्रंथात आढळतात.

### • उत्तर वैदिक कालखंडातील धार्मिक जीवनातील स्थित्यंतरे :

पूर्व वैदिक काळापेक्षा उत्तर वैदिक कालखंडामध्ये धार्मिक जीवनामध्ये महत्त्वपूर्ण बदल घडून आला. त्यामध्ये देवदेवतांच्या कल्पनेमध्ये बदल झाला. उत्तर वैदिक आर्याच्या प्रादेशिक विस्तारामुळे आर्यअनार्य संयोगोतून निर्माण झालेल्या संस्कृतीतून नविन देवदेवतांचा उदय झाला. उत्तरवैदीक युगामध्ये वैदिक युगातील निर्गाधिष्ठित देवता मागे पडल्या व यज्ञाशी संबंधीत देवदेवतांचे महत्त्व वाढले. उत्तर वैदिक युगामध्ये देवतांमध्ये श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद निर्माण करण्यात आला. यज्ञसंस्थेचे महत्त्व प्रचंड वाढले. संपूर्ण मानवी जीवनच यज्ञसंस्थेभोवती गुंफले गेले.

या कालावधीमध्ये यज्ञाचे विविध नित्ययज्ञ, कमेष्टीयज्ञ व सोमयाग असे यज्ञप्रकार रूढ झाले. यज्ञाला उत्सवात स्वरूप प्राप्त झाले. इंद्र या देवताचे प्रस्थ या कालखंडामध्ये कमी झाले. या युगात राजसूय व अश्वमेघ यज्ञाला प्रतिष्ठा प्राप्त झाली. या कालावधीमध्ये व्यक्तिगत सुखाबरोबरच समाजसुख व राष्ट्रकल्याण याचाही विचार यज्ञसंस्थेद्वारेच केला गेला. या युगात ब्राह्मण पुरोहिताचे महत्त्व वाढले व हा पुरोहित वर्ग ब्रह्मण

असल्यामुळे या वर्गाची छाप समाजावर पडली. शिवाय तत्कीलन राजेलोकांनी सुद्धा ब्राह्मणवर्गाचे प्रभुत्व मान्य केले. क्षत्रियांपेक्षाही ब्राह्मण वर्गाचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले आणि यज्ञामुळे अपूर्वशक्ती निर्माण होते अशा विचारामुळे यज्ञविधीचे शास्त्र विकसीत होवून यज्ञविधीतील गुंतागुंत वाढली. त्याबरोबरच या युगामध्ये संपूर्ण मानवी जीवनच यज्ञसंकल्पनेभोवती गुंफले गेल्यामुळे यज्ञ ही श्रीमंताची मक्तेदारी बनली. शतपथ ब्राह्मणात म्हटले आहे की, 'अग्नीतून यज्ञ उत्पन्न झाला. तो यजमानाची पापे जाळतो. त्यामुळे यजमानास ब्रह्मतेज, संपत्ती सुख मिळते. त्यामुळे यजमानाने नेहमी यज्ञ करावा.' या युगामध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्थेनुसार देवतांची विभागणी करण्यात आली. उदा. १) ब्राह्मण - अग्नी, बृहस्पती, २) क्षत्रिय - इंद्र वरून सोम, यम, ३) वैश्य - वसूल, रुद्र, मरुत, ४) शुद्र - पूषण इ.

एकंदरीत उत्तर वैदिक युगामध्ये धार्मिक जीवनामध्ये महत्त्वपूर्ण धार्मिक स्थित्यंतरे घडून आली.

- **उत्तर वैदिक काळातील धार्मिक जीवनातील स्थित्यंतरे :**

१) नविन देवतांचा उदय.

२) यज्ञ आणि ब्राह्मणांच्या वर्चस्वामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ.

३) धार्मिक जीवनात यज्ञाला अनन्यसाधारण महत्त्व.

४) पितृ ऋण, ऋषी ऋण व देवऋणांबरोबरच उत्तर वैदिक युगामध्ये अतिथी ऋण व भूत ऋण या पंच महायज्ञ संकल्पनेचा विकास झाला.

५) तपस्येचे महत्त्व खूप वाढणे हे या युगातील महत्त्वपूर्ण स्थित्यंतर होते. शरीराला तिव्र स्वरूपाच्या वेदना देवून मोक्ष मिळवता येतो हा विचार परिपक्व झाला.

६) उत्तर वैदिक युगामध्ये अंधश्रद्धा, जादुटोणा, भूत या गोष्टींवर लक्ष केंद्रित झाले. अथर्ववेदामध्ये मंत्राचे पठण करून रोग्यांवर उपचार करण्यात येण्याचे पुरावे सापडतात.

### २.२.६ वैदिक साहित्य :

- **पूर्ववैदिक साहित्य :**

पूर्ववैदिक कालीन आर्यांनी आपल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व जीवनाबरोबर आपल्या सांस्कृतिक जीवनामध्ये खूप व्यापक प्रगती केली. या प्रगतीचा आढावा खालीलप्रमाणे -

या कालावधीमध्ये ज्या ग्रंथाने जगाच्या साहित्यावर प्रभाव पाडला अशा चार वेदांपैकी ऋग्वेद या ग्रंथाची निर्मिती करण्यात आली. 'विद' या मूळ संस्कृत धातूपासून 'वेद' या शब्दाची निर्मिती झाली.'विद' म्हणजे जाणून किंवा समजून घेणे यावरुन वेद म्हणजे ज्ञान असा अर्थ होतो.

**ऋग्वेद :** आर्यांचा हा सर्वात महत्त्वाचा धर्मग्रंथ असून कदाचित तो जगातील सर्वात जुना ग्रंथ असावा. ऋग् म्हणजे प्रशस्ती किंवा स्तूती; म्हणूनच पवित्रसूक्त किंवा मंत्राचा संग्रह म्हणजेच ऋग्वेद होय. ही सूक्ते

देवतांची स्तुती करण्यासाठी रचण्यात आली. मूळ ऋग्वेद आज उपलब्ध असून त्यात १०१७ असमान ऋचा आहेत. या ऋचांचे सात भाग (मंडल) असून त्यात साधारणतः १०,५०० श्लोक आहेत. यातील काही अतिरिक्त ऋचांचे स्वरूप कर्मकांडाचे आहे. अनेक ऋषींनी मिळून ऋचांची रचना केली. मुळ ऋग्वेद जुन्या संस्कृत भाषेतील आहे. ऋग्वेदामध्ये निसर्गाच्या वर्णनाबरोबरच एकेश्वर आणि बहुदेवतावाद यांचे सुंदर मिश्रण आढळते.

- **उत्तर वैदिक साहित्य :**

उत्तर वैदिक युगामध्ये ऋग्वेद सोडून बाकी साहित्याचा विकास झाला. त्यामध्ये

**१) यजुर्वेद :** उत्तर वैदिक काळात यजुर्वेदाची रचना करण्यात आली. तेव्हा आर्य संस्कृती सरस्वती नदीपासून गंगा नदीच्या खोऱ्यापर्यंत पोहोचली होती. वैदिक कालीन धर्म सातत्याने गुंतागुंतीचा आणि कर्मकांडाचा होत असल्याचे यजुर्वेद हे गमक आहे. यजुर्वेद कालीन युगात नैसर्गिक शक्ती ऐवजी कर्मकांडाचे प्रस्थ होते.

यजुर्वेद म्हणजे हवनांच्या प्रार्थनांचा संग्रह होय. यजुर्वेदाच्या दोन आवृत्त्या असून शुक्ल यजुर्वेद व कृष्ण यजुर्वेद असे त्यांना म्हटले जाते. यजुर्वेदावरून आर्यांच्या संस्कृतीचे नेमके दर्शन घडते.

**२) सामवेद :** साम या संस्कृत शब्दाचा अर्थ स्वरमाधुर्य असा असून, सामवेद हा प्रार्थना ग्रंथ आहे. सामवेदात १५४९ ऋचा त्यापैकी ७५ ऋचा कवनाच्या रूपात आहेत. सामवेदावरून आपल्याला कळते की, आर्य हे धार्मिक वृत्तीचे असले तरी ते निसर्गावर प्रेम करीत असत आणि ते खुशालचेंडू वृत्तीचे होते. त्यांना अनेक वाद्याच्या तालावर गायला आवडत असे आणि ते निश्चितच कर्मठ वृत्तीचे नव्हते हे सामवेदावरून सिद्ध होते.

**३) अथर्ववेद :** वेदकाळाच्या अखेरच्या पर्वातच त्याला वेदाची मान्यता मिळाली. भूतखेते, रोग आणि वाईट प्रवृत्ती यांचे निवारण करण्यासाठी म्हणण्यात येणाऱ्या मंत्राचा अथर्ववेदामध्ये समावेश आहे. अर्थवेदाची २३ कांडे असून त्यामध्ये ७३१ मंत्र आणि सुमारे ६,००० कवने आहेत. ऐहिक लाभाच्या प्राप्तीसाठी, वाईट प्रवृत्तीचे समाधान करण्याचा हेतू त्यामागे असल्याचे जानवते. अर्नोल्ड टॉयंबीच्या मते अथर्ववेद म्हणजे ब्राह्मणी पंथाची जागतिक अवस्था होय.

अर्थवेदामुळे तत्कालीन राजकीय भूगोलाची कल्पना येण्याबरोबरच अथर्ववेद हा औद्योगिक कल आणि तंत्रज्ञान, गणित, खगोलविज्ञान आणि अन्य भौतिक विज्ञानाच्या विकासाची माहिती मिळते. शिवाय आयुर्वेद या आर्यांच्या वैद्यकीय व्यवस्थेची मुळे अथर्ववेदामध्ये सापडतात.

**४) ब्राह्मणे :** ब्राह्मणे या ग्रंथाची रचना देशाच्या निरनिराळ्या भागामध्ये केली. वैदीक ग्रंथाचे स्पष्टीकरण करण्यासाठी धार्मिक तज्ज्ञ किंवा पुरोहितांनी यांची रचना केली. त्यात ऐतरेय, कौषितकी शतपथ गोपथ ब्राह्मणे यांचा समावेश होतो. यातून तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थिती माहिती मिळते.

**५) आरण्यके :** वेदातील तात्वीक विचारांचा उहापोह करतात. आरण्यके अंतर्मनाच्या शुद्धतेवर, नैतिकता, सद्‌गुण आणि ध्यान धारणेवर भर देतात. वैदिक कर्मकांडातील कर्ममार्ग आणि उपनिषदातील ज्ञानमार्ग यांच्या दरम्यानचे अंतर कमी करण्याचा एक सेतू असे त्यांचे स्थान आहे.

**६) उपनिषदे :** उपनिषदांचा शब्दश: अर्थ जवळ बसणे किंवा बैठक असा होतो. एकूण १०८ उपनिषदे असून त्यापैकी १२ प्रसिद्ध आहेत. अनेक अभ्यासकांनी उपनिषदांच्या रचना केल्या असून 'उच्चकोटीचे अध्यात्मिक तत्त्वज्ञान' उपनिषदामध्ये सामावलेले आहे.

**७) सूत्र वाङ्‌मय :** वेदकाळाच्या अखेरच्या काळात यांची रचना झाली. समाजाचे सामाजिक व सांस्कृतिक पैलू स्पष्ट करण्याचा सूत्र लेखनाचा उद्देश होता.

**८) वेदांगे :** एकूण सहा वेदांगे आहेत. शिक्षा, छंद, व्याकरण, निरुक्त, कल्प आणि ज्योतिष यामधूनही विविध समारंभ व खगोलविज्ञानाची माहिती मिळते.

**९) उपवेद :** यातून वाङ्‌मयकला आणि वास्तूकला याची वाढ आणि विकास, तसेच सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्राशिवाय, वास्तुकला संगित, नृत्य आणि ललित कला याची माहिती मिळते.

**१०) षड्‌दर्शने :** दर्शन या संस्कृत शब्दाचा अर्थ 'अध्यात्मिक ज्ञानाचे शास्त्र' असा असून त्यामध्ये आधुनिक हिंदु धर्मशास्त्राची अध्यात्मिक आणि तात्विक विचार व्यक्त झालेले आहेत. कपीलाचे सांख्यदर्शन, पतंजलीचे योगदर्शन, गौतमाचे न्यायदर्शन, कणादाचे वैशेषिक दर्शन, बादरायण उत्तरमिमांसा व पूर्वमिमांसा अशी षडदर्शने आहेत. यामधून मानवी प्रतिभा व बुद्धीचा योग्य उपयोग करून भारतीय संस्कृतीचा वारसा सांगणारे तत्त्वज्ञान उभे केले गेले.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**अ)**

१) पूर्ववैदिक कालखंडामध्ये अनार्याची ............. नावाची जमात व्यापारात अग्रेसर होती.

१) दस्यु  २) गोष्ठ  ३) पणी  ४) सोनार

२) वैदिक संस्कृतीमधील दळणवळणासाठी बैलगाड्या वापरल्या जात त्यांना ........... असे म्हटले जात असे.

१) पूषण  २) हिरण्यकार  ३) तसर  ४) अनस

३) उत्तर वैदिक युगात पशुधन प्राप्तीसाठी करण्यात येणाऱ्या युद्धाला ............ असे म्हटले जात असत.

१) गविष्ठी  २) वृषोण्सर्ग  ३) षिरिष  ४) श्रेष्ठीन

४) उत्तर वैदिक युगामध्ये व्यापारी वर्गाच्या संघावरील अधिकाऱ्यास ......... म्हटले जाईल.

१) पूषण २) श्रेष्ठीन ३) गोष्ट ४) पण्यसिद्धी

५) .......... नावाचा अधिकारी उत्तर वैदिक युगामध्ये कर वसूल करीत असे.

१) भागदूत २) श्रेष्ठिन ३) पणी ४) बृहस्पती

**ब) खालील उपप्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) पूर्ववेदकालीन आर्याची प्रमुख देवता कोणती होती?

२) वर्णशुद्धी करण्यासाठी करावयाच्या यज्ञाविधीस कोणत्या नावाने ओळखले जाते?

३) उत्तरवेदकालीन आर्यांची प्रमुख देवता कोणती होती?

४) आर्यांचा सर्वात प्राचीन ग्रंथ कोणता होता ?

५) कुणाच्या मते अथर्ववेद म्हणजे ब्राह्मणी पंथाची जागतिक अवस्था होय?

## २.३ सारांश :

प्राचीन भारतीय वैदिक संस्कृती ही भारतच नव्हे तर जगातील एक महान संस्कृती असून आर्यांनी या वैदिक संस्कृतिची निर्मिती केली. या संस्कृतीची पूर्ववैदिक व उत्तर वैदिक अशी दोन टप्प्यात विभागणी करता येते. सप्तसिंधू या प्रदेशावर पहिल्या टप्प्यात स्थिरावलेल्या या आर्यांनी उत्तर वैदिक कालखंडामध्ये मध्यदेश, आर्यावर्त पासून ते दक्षिणेकडे शिवाय गंगानदीपासून पूर्वभारतापर्यंत प्रादेशिक विस्तार केला.

पूर्ववैदिक व उत्तरवैदिक कालखंडा मध्ये सामाजिक, धार्मिक,राजकीय व आर्थिक या बरोबरच अध्यात्मिक या सर्वच क्षेत्रात अतिशय उत्तुंग प्रगती केली. ऋग्वेद हा तर जगातील मार्गदशर्न करणारा उत्कृष्ट ग्रंथ निर्माण केला. जीवनातील सर्व अंगाना स्पष्ट करण्याबरोबरच कायमस्वरूपी स्थैर्य प्रदान करणाऱ्या विविध संस्था आणि संघटनांची निर्मिती या वैदिक युगाने केली.

उत्तर वैदिक कालखंडामध्ये तर या सर्व संस्था व संघटना स्थिर होण्याबरोबरच वर्णव्यवस्था, जातव्यवस्था, स्त्रियांची दु:खद स्थिती या बरोबरच अनेक विघातक प्रथा व परंपरांनी समाजस्वास्थ्य बिघडविले. यज्ञाचे उत्तरोत्तर वाढते महत्त्व आणि पुरोहित वर्गाचे समाजावर प्रस्थापित झालेले नियंत्रण यातून तर ब्राह्मणांचे क्षत्रिय वर्गावर, राजावर व पर्यायाने राष्ट्रव्यवस्थेवर धार्मिक नियंत्रण प्रस्थापित होऊन वांशिक व वर्णसंघर्षाची परिस्थिती निर्माण झाली.

मात्र साहित्य व संस्कृतीचा अमर ठेवा या युगाने भारताला दिला. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे, वेदांगे, सूत्रे, उपवेद, षडदर्शने इ.साहित्य निर्माण केले. त्या बरोबरच विविध कलांची निर्मिती करून उल्लेखनीय वारसा या वैदिक संस्कृतीने मागे ठेवला.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**निष्क्रमण :** मुलगा किंवा मुलगी चार महिन्याची झाल्यावर पहिल्यांदा घराबाहेर जाण्याचा संस्कार म्हणजे निष्क्रमण. मुलाला बाह्य वातावरणामध्ये नेण्याचा हेतू असून अपत्य व माता यांना निसर्गाच्या सानिध्यात किंवा शुद्ध हवेत येण्याचा हेतू या संकारामध्ये आहे.

**उपनयन :** उपनयन म्हणजे विद्या शिकवण्यासाठी मुलाला 'गुरु-जवळ' घेऊन जाणे. ब्रह्मचर्याश्रमाचा प्रारंभ या संस्कारामुळे होतो. हा संस्कार फक्त त्रैवर्णिकांनाच लागू होता. कालांतराने हा संस्कार त्रेवर्णीक व शुद्र यांच्यातील भेदाचे प्रतिक बनला.

**द्विज :** द्विज म्हणजे दुसऱ्यांदा जन्म देणेदोनवेळा जन्म घेणे. मनुष्य जन्मत: शुद्रच असतो. मात्र उपनयनत संस्कार विधिमुळे तो दुसऱ्यांदा जन्म घेऊन पवित्र होतो अशी धारणा होती.

**संस्कार :** संस्कार म्हणजे एखाद्या व्यक्तीमध्ये गुणाधिक्य निर्माण करणे होय. व्यक्तीला शिकविणे, शुद्ध करणे, अधिक परिपूर्ण करणे म्हणजेच संस्कार. म्हणजे संस्कार केवळ बाह्य बदल होणे या अर्थाने अपेक्षित नसून व्यक्तीचा आंतरिक विकास अपेक्षित आहे.

**शुद्र :** आर्यांचा अनार्यांशी संघर्ष होऊन आर्यांनी अनार्यांना आपले दास बनविले. यातूनच शुद्र वर्गाचा उदय झाला. तिन्ही वर्णाची सेवा हे एकच शुद्राचे कर्तव्य होते. मात्र शुद्र हे गुलाम होते असे दिसून येत नाही.

**पुरुषार्थ :** उत्तरवैदिक युगामध्ये मानवाची इष्ट कर्तव्ये कोणती याचा पुरुषार्थाच्या कल्पनेत अंतर्भाव करण्यात आला. त्यानुसार प्रामुख्याने चार प्रमुख पुरुषार्थ मानले जातात. धर्म, अर्थ, कर्म आणि मोक्ष.

**आर्यावर्त :** उत्तरवैदिक कालखंडामध्ये आर्यानी सप्तसिंधूच्या परिसरामध्ये पूर्वेकडे व दक्षिणेकडे विस्तार केला. तो प्रदेश म्हणजे आर्यावर्त होय. ज्या प्रदेशात कृष्णमृग अविरतपणे संचार करतो तो प्रदेश म्हणजे आर्यावर्त होय.

**ब्राह्मण :** ब्राह्म धातूपासून ब्राह्मण शब्दाची निर्मिती झाली असून बुद्धिमान, नितीमान व त्यागी जीवन जगणारा ब्राह्मण म्हणून ओळखला जातो.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे :

**१) स्वयं अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे.**

**अ)** १) सर विल्यम जोन्स २) फ्लिप्पो सास्सेटी ३) लोकमान्य टिळक

४) इराण ५) बोघाज कोई.

**ब)** १) १७८४ २) डॉ. ए. सी. दास ३) मध्य आशिया

४) वैवस्वतमनू ५) सुदास

**स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे**

**अ)** १) कुलप २) बली ३) अयोध्यानगरी

४) रत्निन ५) सूत

**ब)** १) कर्माद्वारे २) उत्तर वैदिक ३) कनिष्ठ

४) पुसंवन ५) हर्म्य

**स्वयं अध्ययन प्रश्न ३ ची उत्तरे**

**अ)** १) पणी २) अनस ३) गविष्ठी

४) श्रेष्ठीन ५) भागदूत

**ब)** १) वरूण २) व्रात्यस्तोम ३) विष्णू

४) ऋग्वेद ५) टॉयन्बी

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) आर्यांच्या मूळ वसतीस्थानाविषयी सखोल माहिती लिहा.

२) आर्यांच्या कालखंडाविषयी असणाऱ्या विविध मतांची सखोल चर्चा करा.

३) उत्तर वैदिक युगामध्ये निर्माण झालेल्या सामाजिक स्थित्यंतराबद्दल माहिती लिहा.

४) पूर्ववैदिक काळातील राजकीय जीवनाचे विवेचन करा.

५) पूर्ववैदिक काळातील धार्मिक स्थितीचा आढावा घ्या.

६) पूर्ववैदिक आणि उत्तरवैदिक काळातील स्त्री जीवनाच्या स्थित्यंतरावर प्रकाश टाका.

७) आर्यांच्या पूर्ववैदिक व उत्तरवैदिक आर्थिक जीवनावर चर्चा करा.

८) पूर्व व उत्तर वैदिक युगामध्ये निर्माण झालेल्या वर्ण व जातीव्यवस्थेबद्दल थोडक्यात माहिती लिहा.

**ब) टिपा लिहा.**

१) आश्रमव्यवस्था २) सभा ३) समिती

४) ऋग्वेद ५) निष्क्रमण ६) सोळा संस्कार

७) वर्ण व जातीतील फरक ८) वैदिक वाङ्मय ९) आर्यावर्त १०) उपनिषदे

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :


१) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : वैदिक संस्कृतीचा विकास, प्रज्ञा पाठशाला, वाई

२) जोशी पी. जी. : भारताचा इतिहास प्रारंभ ते ६५० पर्यंत, विद्या प्रकाशन, नागपूर २००२

३) डॉ. जे. एल.मेहता, सरिता मेहता : हिस्टरी ऑफ एन्शंट इंडिया, प्राचीन भारताचा समग्र इतिहास (मराठी अनुवाद एम. व्ही. काळे), के. सागर, पब्लिकेशन्स, पूणे- २०१६ दुसरी आवृत्ती २००६.

४) डी. डी.कोसंबी : प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-३० मराठी प्रथम आवृत्ती २००६.

५) रामशरण शर्मा : प्राचीन भारताचा परिचय (अनुवाद डॉ. बिंदा परांजपे) ओरिएन्ट लाँगमने प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २००७.

६) डॉ एस.एस. गाठाळ, भारताचा इतिहास व संस्कृती (इ.स. ६५० पर्यंत), कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००७

७) एस.एल. नागोरी : प्राचीन भारतीय संस्कृती, पोईन्टर पब्लिशर्स, जयपूर, प्रथमावृत्ती २००६

८) प्रा. डॉ. सौ. लता अकलूजकर व इतर : प्राचीन भारताचा इतिहास (प्रागैतिहासिक काल ते इ.स. ६५०) अक्षरलेख प्रकाशन, सोलापूर, प्रथमावृत्ती २००५

९) प्रा. गजानन भिडे : प्राचीन भारताचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१०) डॉ. प्रभाकर देव : प्राचीन भारतीय संस्कृती, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९७.


❖ ❖ ❖

## घटक – ३

# दुसरे नागरीकरण आणि अवैदिक धर्मांचा उदय

**अनुक्रमणिका :**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ नागरीकरणाचे स्वरूप : नागरीकरण आणि महाजनपदे

  ३.२.२ जैन धर्म

  ३.२.३ बौद्ध धर्म

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक संज्ञा, संकल्पना व अर्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


## ३.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

- नागरीकरण व महाजनपदांचा आढावा घेता येईल.
- जैन धर्माचा उदय कसा झाला ते स्पष्ट करता येईल.
- वर्धमान महावीर यांचे चरित्र, शिकवण व जैन धर्माचे तत्वज्ञान विशद करता येईल.
- बौद्ध धर्माच्या उदयाची वैचारिक व राजकीय पार्श्वभूमी स्पष्ट करता येईल.
- गौतम बुद्धांचा पूर्ववृत्तांत व बौद्ध धर्म यासंबंधी माहिती स्पष्ट करता येईल.
- बौद्ध संघ, बौद्ध धर्म ग्रंथ, बौद्ध धर्म परिषदा या संबंधीची माहिती विशद करता येईल.

## ३:१ प्रस्ताविक :

इ.स. पूर्व ६ वे शतक हे प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये क्रांतीकारी व वैभवशाली शतक मानले जाते. कारण या काळात धार्मिक पुनरुज्जीवनाची सुधारणावादी चळवळ सुरू होऊन जैन धर्माचा विकास व बौद्ध धर्माचा उदय झाला. महावीरांच्या दैदिप्यमान व्यक्तीमत्वाने जैन धर्म आणि गौतम बुद्धांच्या लौकिकाने संपूर्ण जगाला स्वयंप्रकाशीत करणारा बौद्ध धर्म यांनी धार्मिक स्थितीमध्ये परिवर्तन केले. या काळात धार्मिक परिवर्तनामुळेच या काळाला बौद्धीक आणि धार्मिक क्रांतीचे युग मानले जाते.

या काळात सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात ही परिवर्तन घडून आले. कृषीव्यवस्था स्थिर झाली. अनेक व्यवसायांचा विकास झाला. उद्योगधंद्यांची भरभराट झाली. अनेक नगरांचा उदय झाला. या सर्वच अर्थाने प्राचीन भारताचे नागरीकरण घडून आले.

## ३.२ विषय विवेचन :

इ.स. पूर्व ६ व्या शतकात भारतात अनेक राजकीय स्थित्यंतरे घडून आले. पहिले नागरीकरण हडप्पा संस्कृतीच्या कालखंडात घडून आले होते. त्यानंतर इ.स.पू. ६ व्या शतकात लोकांच्या जीवनाला स्थिरता प्राप्त झाली, कृषी व्यवस्था भक्कम झाली. अनेक वस्त्या अस्तित्वात आल्या, व्यवसायात नाण्यांचा वापर सुरू झाला. यातूनच दुसऱ्या नागरीकरणाची सुरुवात झाली. भारतातील राज्यांचे स्वरूप, राज्यांची नांवे, शेजारची राज्ये, प्रशासक या सर्वांची माहिती 'महापरिनिर्वाणसूत्र' या बौद्ध ग्रंथात मिळते. गौतमबुद्धांच्या जन्मापूर्वी उत्तर भारतात काही प्रबळ महाजनपदे उदयाला आली. या महाजनपदांची माहिती अंगुत्तरनिकाय, दिघनिकाय या ग्रंथातून, दीपवंश आणि महावंश या महाकाव्यातून आणि महापरिनिर्वाणसूत्र या ग्रंथातून मिळते.

### ३.२.१ नागरीकरणाचे स्वरूप-नागरीकरण आणि महाजनपदे :

इ.स.पू. ६ व्या शतकापासून उत्तर भारतात प्रादेशिक राज्यांचा उदय झाला. उपलब्ध माहितीच्या आधारे तत्कालीन भारतात १६ महाजनपदे, काही गणराज्ये आणि टोळी राज्ये होती. या राज्यांमध्ये कधी संघर्षाचे तर कधी सलेख्याचे संबंध होते. बौद्ध काळात राजकीय स्थित्यंतराची चाहूल लागते. प्रस्थापित आत्मवादी तत्त्वचिंतन, ब्रह्मवादी विचार नाकारून नवे तत्त्वविचार गौतम बुद्ध आणि वर्धमान महावीर यांनी मांडले. गौतम बुद्धांच्या तत्त्वचिंतनाने एक नवे युग अवतरले. म्हणूनच हा कालखंड बौद्धकालखंड म्हणून संबोधला जातो. तत्त्व चिंतनाच्या पातळीवर जसे स्थित्यंतर या काळात घडून आले, तसेच राजकीय संरचनेच्या क्षेत्रातही घडले. हे स्थित्यंतर राजसत्ताक पद्धतीच्या संरचनेकडून गणराज्य पद्धतीच्या संरचनेकडे जाणारे आहे. त्यामुळे या काळात गणराज्यात्मक संरचना असलेली टोळी राज्ये प्रभावी बनलेली दिसतात.

संपन्न शेती, स्थिर लोकवस्ती, लोखंडाचा विस्तृत वापर, नाण्यांचा शोध व वापर, लेखन-कलेचा विकास यातून नवीन नगरे, व्यापारी केंद्रे म्हणून उदयास आली. ही नगरे मुख्यत: उत्तर भारतातील गंगा नदी किनारी विकसीत झाली. कौशांबी, श्रावस्ती, राजगृह, उज्जयनी, वैशाली, काशी, तक्षशिला, चम्पा, साकेत, पाटलीपूत्र, बनारस ही त्या कालखंडातील भरभराटीस आलेली तत्कालीन प्रसिद्ध नगरे होती. उत्कृष्ट नगर रचनेची वैशिष्ट्ये या

ठिकाणी प्राप्त झालेली हेती. या नगरातून अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार ही भरभराटीस आलेला होता. ही सर्व नगरांची प्रक्रिया प्राचीन कालखंडांची समृद्धी दाखवते. ह्या सर्व नगरांचा उदय उत्तर हिंदुस्थानमध्ये झाल्याचे दिसून येते.

- **महाजनपदे :**

इ.स. पूर्व ६ व्या शतकामध्ये सोळा मोठी राज्ये अस्तित्वात होती. त्यांनाच महाजनपदे असे म्हणत. सुरूवातीला प्राचीन भारतातील लहान लहान राज्यांना जनपद असे म्हणत. पुढे ही जनपदे बलिष्ठ झाली. शक्तीशाली झाली. जवळच्या आसपासच्या जनपदांना जिंकून त्यांचे महाजनपदात रुपांतर झाले. अशी १६ महाजनपदे उदयाला आली. यांची माहिती जैन व बौद्ध ग्रंथ यातून मिळते. तसेच हिरोडोटस् प्लीनी, एरियन, कार्टियस व थुसीडिडज या परकीय लेखकांनी १६ महाजनपदा बद्दल विश्वसनीय माहिती लिहिलेली आहे. महागोविंद सूत्रातून आणि पुराणग्रंथातून देखील महाजनपदांचे संदर्भ आढळतात. या सर्व ग्रंथातून १६ महाजनपदे ही संख्या समान दिसते. मात्र त्यांच्या नावांबाबत मतभिन्नता दिसते. मात्र ही महाजनपदे राजकीय दृष्ट्या स्वतंत्र व सार्वभौम होती. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे -

**१) अंग :** सध्याच्या बिहारमधील भागलपूर आणि मोहिर जिल्हयाच्या परिसरात चंपा नदीच्या तीरावर अंग हे महाजनपद वसलेले होते. चंपा ही अंग राज्याची राजधानी होती. हे एक सामर्थ्यशाली महाजनपद असून ही नगरी मालिनी या नावाने ही ओळखली जाई. हे नगर महागोविंदाने वसविले असून बौद्ध कालखंडातील महत्त्वपूर्ण नगरात चंपाचा समावेश होता. चंपा हे तत्कालीन व्यापारी नगर असून सुवर्णद्वीपाशी त्यांचा व्यवहार चाले. हे नगर व्यापार व संपत्तीसाठी प्रसिद्ध होते. इ.स. पूर्व ६ व्या शतकात हे महाजनपद मगधात विलीन झाले.

**२) मगध :** अंग राज्याच्या पश्चिमेला चंपा नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर गंगा आणि शोण नद्यांच्या सुपिक भूभागात मगध हे राज्य वसले होते. हे राज्य आधुनिक बिहार मधील पाटणा व गया परिसरात उदयाला आले होते. गिरव्रज (राजगृह) ही या राज्यांची राजधानी होती. पाटलीपूत्र यासारख्या प्रसिद्ध नगरी या महाजनपदाचे वैभव मानल्या गेल्या. प्राचीन भारतातील वैभवशाली साम्राज्य स्थापन करण्याची ईर्षा असल्यामुळे या महाजनपदाचा इतर महाजनपदाशी सतत संघर्ष झाला. त्यात ते विजयी झाले आणि एक शक्तीशाली राज्य बनले. बिंबिसार, आजतशत्रू, महापद्मनंद, चंद्रगुप्त मौर्य आणि अशोकाने मगधावर राज्य केले.

**३) काशी :** आधुनिक बनारसच्या परिसरात व गंगा नदीच्या काठावर वसलेले काशी हे राज्य प्रचंड विस्तारलेले होते. वाराणसी ही या राज्याची राजधानी होती. जैन तीर्थंकर पार्श्वनाथाचे वडील अश्वस्वेन काशीचे राजे होते. अनेक बौद्ध व जैन साहित्यातून काशीचे राज्य भरभराटीस व समृद्ध असल्याचे वर्णन आहे. काशीचा कोसल, अंग आणि मगधाशी सतत संघर्ष होता.

**४) कोसल :** सध्याच्या अयोध्येच्या परिसरात बौद्ध काळात कोसल जनपद होते. गंडकनदी आणि सार्दिका नदी यांच्या मध्ये हे राज्य वसलेले होते. शरयू ही या राज्यातील मोठी नदी. या नदीने उत्तर कोसल व दक्षिण कोसल अशी या राज्याची विभागणी झाली होती. हे राज्य शक्तीशाली होत. 'श्रावस्त्री' ही उत्तर कोसलची राजधानी होती.

सिद्धार्थ गौतम बुद्धाच्या समकालीन असलेला कोसलचा राजा प्रसेनजीत हा तत्कालीन भारतातील एक श्रेष्ठ राजा होता. त्याची बहीण कोसल देवी ही मगध सम्राट बिंबिसार ह्याला दिलेली होती. पुढे कोसल व मगध यांच्यात शत्रूत्व निर्माण झाले व हे राज्य लयाला गेले.

**५) वृज्जी :** वृज्जी हे जनपद नऊ जमातींचे संघराज्य होते. यापैकी विदेह, लिच्छवी, वृज्जी व वज्जी या प्रमुख जमाती होत्या. वैशाली ही त्यांची राजधानी होती. आजच्या बिहार प्रांतातील मुझफरपूर जिल्ह्यात वैशाली ही नगरी होती. ही नगरी तिन्ही बाजूंनी भक्कम तटबंदी आणि टेंहाळणी बुरुज असलेली सुसज्ज होती. वर्धमान महावीरांची आई वैशालीची राजकुमारी होती.

**६) मल्ल :** मल्ल हे सुद्धा वृज्जीसारख्या ९ राज्यांचा संघ असलेले महाजनपद होते. या राज्याचे दोन भाग असून कुशीनगर व पावा या दोन राजधान्या होत्या. या स्थळांना बुद्धकाळात अत्यंत महत्त्व होते मल्लांच्या राज्यात जैन आणि बौद्ध धर्माचा लक्षणीय प्रभाव होता.

**७) चेदी :** कुरु आणि वत्स या जनपदांच्या मध्ये होते. चेदीची राजधानी शक्तीमती असून चेदिंनी कलिंग परिसरातही राज्य स्थापन केल्याचा संदर्भा हाथीगुंफा शिलालेखात येतो. आजच्या बुंदेलखंड परिसरात चेदिचे राज्य होते.

**८) वत्स :** यमुनातीरावरील हे एक जनपद असून प्रयाग व अलाहाबादचा प्रदेश म्हणजे वत्स राज्य होय. कोशांबी हा त्याची राजधानी होती व उदयन हा बौद्ध काळातील प्रसिद्ध राजा होता. त्याचे व्यक्तीमत्त्व विलोभनीय होते. धर्मशास्त्र, वेदांत व तत्त्वज्ञानात तो प्रविण होता. त्याने आपल्या राज्याच्या संरक्षणासाठी भव्य किल्ले व प्रचंड हत्ती दल उभारले होते. तो सुरूवातीला वैदिक धर्माचा कट्टर अनुयायी होता. पुढे गौतम बुद्धांच्या संपर्कात आल्यामुळे त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला भासांच्या 'स्वप्नवासदवत्ता' या नाटकातील प्रमुख व्यक्तीरेखा उदयन हाच आहे.

**९) कुरु :** महाभारत काळातील एक प्रमुख सत्ता असून 'इंद्रप्रस्थ' ही त्याची राजधानी होती. आजच्या मिरत जिल्ह्याच्या परिसरात कुरुंचे राज्य होते. बौद्ध काळात 'कौरव्य' नावाचा जनपती होता. महाभारत काळात हे जनपद राजसत्ताक पद्धतीचे होते. नंतर तेथे गणराज्य पद्धतीचा स्विकार केलेला दिसतो. वैदिक काळात कुरुंचे राज्य वैभवशाली होते.

**१०) पांचाल :** वैदिक काळात प्रसिद्ध पावलेले दुसरे राज्य म्हणजे पांचालचे राज्य होते. आजचा रोहिल खंडाचा प्रदेश म्हणजे पांचाल राज्य होते. पाच राज्यसंघांचा मिळून पांचाल राज्याची निर्मिती झाली होती. याचे उत्तर पांचाल व दक्षिण पांचाल असे दोन विभाग पडले होते. उत्तर पांचालची राजधानी अहिछत्र व दक्षिण पांचालची राजधानी काविल्यनगर होती. प्राचिन भारतातील व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्ध पावलेले कनौज हे पांचालच्या राज्यात होते. तसेच महाभारताची नायिका द्रौपदी ही पांचाल राजकन्या होती. इ.स. पूर्व ५ व्या शतकापासूनच पांचालचे अस्तित्व नष्ट झाले.

**११) मत्स्य :** राजस्थानमधील जयपूरच्या परिसरात हे राज्य होते. विराटनगर ही त्याची राजधानी होती.

महाभारत काळातील विराट राजाने वसवलेली नगरी असून पांडवांनी वनवासातील आज्ञात वर्षे विराटच्या नगरीतच गुप्तरूपाने घालवली होती.

**१२) शूरसेन :** यमुनेच्या काठावर मथुरेच्या परिसरात हे जनपद होते. मथुरा ही त्याची राजधानी होती. शूरसेनचा राजा अवलंतीपूर्वक हा गौतम बुद्धाच्या समकालीन होता. यामुळेच मथुरा परिसरात बौद्ध धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. कौटिल्याने मथुरेचा उल्लेख 'कृषीसंघ' म्हणून केला आहे.

**१३) अवंती :** मध्यप्रदेशातील उज्जैयच्या परिसरातील एक प्रमुख जनपद असून ती एक प्रबळ सत्ता होती. विंध्य पर्वतामुळे अवंतीचे दोन भागात विभाजन झाले होते. त्यामुळे उत्तरेची राजधानी उज्जैन तर दक्षिणेची राजधानी महिष्मती होती. गौतम बुद्ध आणि वर्धमान महावीरांच्या काळातील या दोन्ही नगरींना महत्त्व होते. इ.स. पूर्व ६ व्या शतकात प्रद्योत राजा सत्तेवर होता. तो पराक्रमी होता व बौद्ध धर्माचा उपासक असल्यामुळे अवंती हे बौद्ध धर्माचे मुख्य केंद्र बनले. नंतर ते मगधात विलिन झाले.

**१४) गांधार :** आजच्या पेशावर व रावळपिंडीच्या परिसरात गंधार हे जनपद अस्तित्वात होते. तक्षशिला ही त्याची राजधानी होती. गंगाधरचे राजे धार्मिक दृष्ट्या उदारमतवादी होते. 'पुक्कीसानी' राजा हा मगध सम्राट बिंबिसारचा समकालीन दिसतो. त्याने मगध राज्य शिष्टमंडळ पाठवल्याचा उल्लेख गुणाढ्य लेखकाच्या लेखनात येतो. धृतराष्ट्राची पत्नी ही गंधारची राजकुमारी होती.

**१५) कंबोज :** हे महाजनपद, मध्य आशियामध्ये होते. पुढे ते हिंदुकुश ते पंजाब भागात पसरले. 'राजपुरा' ही त्याची राजधानी होती.

**१६) अश्मक :** हे राज्य दक्षिण भारतात गोदावरी नदीच्या परिसरात होते. याची राजधानी पैठण होती. वायू पुराणातील वर्णनानुसार येथील राजे हे इक्ष्वाकू वंशाचे होते. अश्मक व अवंती या दोन राज्याचे संघर्ष असे. अवंतीच्या राजाने अश्मकाचा पराभव हे आपल्या राज्याला जोडले.

इ.स.पूर्व ६ व्या शतकातील भारतात वरील १६ महाजनपदे असून यांच्यामध्ये सतत संघर्ष होत असे. त्यातून अनेक महाजनपदे नष्ट झाली. अनेकांचे महत्त्व कमी होत गेले. यातूनच मगध साम्राज्य उदयाला आले. ही महाजनपदे उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, मराठवाड्यापर्यंत प्रदेशात अस्थित्वात होती. या महाजनपदांची स्थित्यंतर प्रथम टोळी राज्यातून राजसत्ताक पद्धतीच्या जनपदात झाले. बौद्ध काळात राजसत्ताक जनपदांचा प्रभाव कमी होत जाऊन गणराज्यांचे महत्त्व वाढले.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -१**

**अ) खालील विधानात रिकाम्या जागी योग्य पर्यायी शब्द लिहा.**

१) इ.स. पू. ६ व्या शतकामध्ये सोळा मोठी राज्ये उदयाला आली. त्यांना ......... म्हणत.

अ) जनपद ब) महाजनपद क) राज्य ड) साम्राज्य

२) अंग ची राजधानी ............ आहे.

अ) गिरीब्रज ब) पाटलीपूत्र क) चंपा ड) वैशाली

३) वर्धमान महाविरांची आई ........... ची राजकुमारी होती.

अ) मगध ब) कोसल क) लिच्छवी ड) वैशाली

४) ........... हा कोसल महाजनपदाचा राजा होता.

अ) प्रसेनजीत ब) बींबीसार क) अजातशत्रू ३) उदयन

५) आजच्या पेशावर व रावळपिंडीच्या परिसरात ........... हे जनपद अस्तित्वात होते.

अ) शूरसेन ब) अवंती क) गांधार ड) कंबोज

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणत्या शतकात १६ महाजनपदांचा उदय झाला?

२) कुरु राज्याची राजधानी कोणती ?

३) वत्स येथे बौद्ध काळातील प्रसिद्ध राजा कोण होता?

४) महाभारताची नायीका द्रौपदी ही कोणत्या राजाची राजकन्या होती?

५) कोसल राज्याची विभागणी कोणत्या नदीने झाली होती?

### ३.२.२ जैन धर्म :

इ.स.पू. ६ वे शतक हे प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये वैभवशाली व धार्मिक क्रांतीचे युग म्हणून ओळखले जाते. या शतकात धर्माच्या क्षेत्रात व्यापक प्रमाणात परिवर्तन झाले आणि या परिवर्तनामुळेच या काळात बौद्धीक व धार्मिक क्रांतीचे युग मानले जाते. या शतकात महाविरांच्या दैदिप्यमान व्यक्तीमत्त्वाने प्रसारित झालेला जैन धर्म व गौतम बुद्धांच्या व्यक्तीमत्त्वाने जगाला स्वयं प्रकाशित करणारा बौद्ध धर्म याचा उदय व प्रसार ही घटना भारतातील सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाची नांदी होते. हे दोन्ही धर्म वैदिक धर्माहून वेगळे होते. या धर्मांना अवैदिक धर्म असे म्हणतात.

- **अवैदिक धर्माच्या उदयाची कारणे (पार्श्वभूमी) :**

वैदिक काळामधील धर्माचे साधे स्वरूप पुढे बदलून किचकट व गुंतागुंतीचे बनते. धर्मबाह्य आचारावर भर दिला जाऊ लागला. धर्मातील जातीप्रथेने विकृत स्वरूप धारण केले. त्यामुळे समाजामध्ये वेगवेगळ्या नवीन पंथ उदयास आले. लोकांना साधा, सोपा, सरळ अशा नवीन धर्माची आवश्यकता वाटू लागली. जैन आणि बौद्ध धर्माचा उदय याच पार्श्वभूमीवर झाला, त्याची अनेक कारणे आहेत :

**१) वैदिक धर्माची अवस्था :** वैदिक धर्माचे मूळ तत्त्व बाजूला जाऊन यज्ञ व कर्मकांडाला महत्त्व प्राप्त झाले. यज्ञ हा जीवनाचा अविभाज्य भाग बनला. याचा फायदा पुरोहित वर्गाने घेतला. प्रत्येक गोष्टीसाठी यज्ञ सक्तीचा केला. हे यज्ञ विधी इतके खर्चिक होते की ते सर्वसामान्यांना परवडणारे नव्हते. पूर्व वैदिक काळातील विधी अत्यंत चांगले, सोपे व सर्वांना परवडणारे आणि सात्विक स्वरूपाचे होते. मात्र पुरोहित वर्गाकडे हा अधिकार गेल्यानंतर साहित्यासाठी पैशाची मागणी वाढली. सामान्य माणूस यज्ञाच्या खर्चाच्या ओझ्याखाली दबून गेला व नवीन धर्माकडे आकर्षित झाला.

**२) यज्ञाचे महत्त्व :** निरनिराळ्या देवदेवतांना प्रसन्न करण्यासां पशूबळी व क्वचित प्रसंगी नरबळी देण्यात येऊ लागले. त्यामुळे सर्वसामान्य माणूस हादरून गेला. धर्मातील हे कर्मकांड बंद होणे आवश्यक वाटू लागले.

**३) वाङ्मय :** वैदिक काळातील सर्व वाङ्मय संस्कृत भाषेतील होते. त्याचे आकलन सर्वसामान्यांच्या पलिकडील होते. कारण या काळात ज्ञान संपादन करण्याचा अधिकार ठराविक वर्गासाठी मर्यादित होता. सामान्य लोकांना ही संस्कृत भाषा कळत नव्हती. ज्ञान किंवा धर्माचे तत्त्वज्ञान हे साधे, सोपे व लोकांना समजेल अशा बोलीभाषेत देणारे धर्म म्हणजे जैन व बौद्ध धर्म होय. त्यामुळे लोक याकडे आकृष्ट झाले.

**४) मंत्रतंत्रावरील श्रद्धा :** यज्ञातील कर्मकांडाप्रमाणेच अनेक कारणांसाठी मंत्राचा वापर केला जाऊ लागला. सात्विक ऋचांची जागा मंत्रांनी घेतली. रोगनिवारण, शत्रूचा नाश, भरभराटीसाठी, समृद्धीसाठी मंत्रतंत्राची पद्धत पडली. मंत्रावर सर्वसामान्यांची श्रद्धा निर्माण झाली. याचा फायदा भोंदू, साधू मांत्रिकाने घेऊन सामान्य माणसाची फसवणूक करण्यास सुरूवात झाली. त्यामुळे धर्मजागृतीची गरज समाजात निर्माण झाली.

**५) पुरोहितवर्गाची मक्तेदारी :** जन्मापासून मृत्यूपर्यंतचे सर्वच विधी पुरोहितामार्फतच होत असत. त्यामुळे समाजात त्याला विशेष मात्र व दर्जा प्राप्त झालेला होता. त्यामुळे पुरोहितवर्गात अहंकार वाढला व ते सामान्य माणसांची फसवणूक व शोषण करू लागले. परिणामी नवीन धर्मप्रवाह उदयास आले.

**६) जातींचे प्राबल्य :** वैदिक काळात वर्णाश्रम व्यवस्था अधिक बळकट झाली. त्यामुळे जातीभेद तीव्र झाले. ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व वाढले. शूद्रांची परिस्थिती दयनीय झाली. त्यामुळे समाजातील लोकांना नवीन धर्माची गरज निर्माण झाली. क्षत्रीय वैश्यासाठी वेगळे नियम होत.

**७) वेद मतभेद :** वैदिक धर्मात वेद हे सर्व श्रेष्ठ मानले आहे. वेदांत सांगितलेला धर्म सर्वसामान्यांना कळत नव्हता. अगदी तत्कालीन विद्वानांना सुद्धा संस्कृत भाषेतील सिद्धांताबद्दल ठाम माहिती सांगता येत नव्हती. तसेच वेद हे अपौरुषेय मानले आहे. कारण ते ब्रह्मदेवाच्या मुखातून निघालेले आहेत अशी लोकांची श्रद्धा होती. वेद हेच अंतिम सत्य अशी लोकांची धारणा होती. परंतू धर्माचे मूळ तत्त्वज्ञान बाजूला जाऊन रूढी-परंपरा वाढत गेल्या. परिणामी त्यास विरोध झाला.

**८) अंधश्रद्धा :** तत्कालीन समाजामध्ये जादूटोणा भूतपिशाच्च यावर लोकांचा अधिक विश्वास निर्माण

झाला होता. त्यातून अनेक अंधश्रद्धा निर्माण झाल्या. समाज दिशाहीन बनला. त्यातून मार्ग काढण्यासाठी जैन बौद्ध धर्माचा उदय झाला.

**९) अनेकेश्वरवाद :** वैदिक काळात सुरूवातीला ३३ देवता होत्या. त्यात सातत्याने भर पडत गेली. पूजा केल्याने मोक्ष मिळतो. या कल्पनेत कालांतराने बदल झाला. मनुष्य हा स्वत:चा भाग्य विधाता आहे. त्याला देवदेवतांवर विश्वास ठेवण्याची गरज नाही हे तत्त्व पुढे आले.

**१०) आर्थिक कारण :** वेदोत्तर काळात जन्मावरून जात ठरवली जात होती व प्रत्येक वर्णाचा स्वतंत्र व्यवसाय ठरलेला होता. त्यामुळे व्यवसायात बदल करता येत नव्हता. जर व्यवसाय बदलण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला दंड केला जात होता.

**११) नेतृत्वाचा अभाव :** मानवी जीवनाचे अंतिम ध्येय मोक्षप्राप्ती होय. मोक्षाचा नवीन मार्ग कोणीतरी सांगावा आणि त्याप्रमाणे मोक्ष मिळवावा अशी लोकांची अपेक्षा होती. पण असे नेतृत्व कोणीच पुढे न आल्याने नवधर्माची निर्मिती या काळात झाली.

वरील सर्व कारणांमुळे मोठ्या प्रमाणात वैचारिक प्रगती होण्यास सुरूवात झाली. महावीर व गौतम बुद्धांनी नवीन ज्ञानांची प्राप्ती करून जैन व बौद्ध धर्म स्थापन करून, प्रसार करून सर्वसामान्यांची गरज पूर्ण केली.

### ३.२.२ जैन धर्म उदय – विकास :

जैन या शब्दाची उत्पत्ती 'जिन' या शब्दापासून झाली. जिनला परम पूज्य मानणाऱ्यांचा धर्म म्हणजे जैन धर्म, जिन म्हणजे तिर्थंकर होय. जैन धर्म हा प्राचीन धर्म असून ते वैदिक धर्माएवढा प्राचीन आहे. जैन धर्माचा संस्थापक म्हणून पहिले तिर्थंकर ऋषभदेवांना मानतात. जैन धर्मामध्ये २४ तिर्थंकार होऊन गेले. काही तिर्थंकाराची माहिती मिळत नसली तरी जैन धर्माला यशाच्या शिखरावर नेण्याचे कार्य २३ वे तिर्थंकर पार्श्वनाथ व २४ वे तिर्थंकर महावीर यांनी केले. या जैन धर्मातील २४ तिर्थंकर पुढीलप्रमाणे –

१) ऋषभदेव, २) आदीनाथ, ३) संभव, ४) अभिनंदन, ५) सुमती, ६) पद्मप्रथा, ७) सुपार्श्व, ८) चंद्र प्रभू, ९) सुविधी, १०) शीतल, ११) श्रेयांस, १२) वासुपुज्य, १३) विमल, १४) अनंत, १५) धर्म, १६) शांती, १७) कुंथ, १८) अमर, १९) मल्ले, २०) मुनिसवीर, २१) नमी, २२) अरिष्ठ नेमी, २३) पार्श्वनाथ, २४) वर्धमान महावीर.

- **पार्श्वनाथ :**

जैन धर्माचे २३ वे तिर्थंकर म्हणून पार्श्वनाथ मानले जातात. यांचा जन्म महाविरांच्या पूर्वी २५० वर्षे झाला असून वाराणसीचे राजे अश्वसेन यांचे पुत्र होते. वयाच्या ३० व्या वर्षी राजघराण्याचा त्याग करून कठोर तपश्चर्या करून त्यांना कैवल्यज्ञान प्राप्त झाले. त्यांनी जैन धर्माची सत्य, अहिंसा, असेच व अपरिग्रह ही चार तत्त्वे सांगितली.

## • वर्धमान महावीर (इ.स. पू. ५९९ ते इ.स.पू. ५२७) :

जैन धर्मातील २४ वे व शेवटचे तीर्थंकर म्हणून वर्धमान महावीर परिचित आहेत. त्यांचा जन्म इ.स.पू. ५९९ मध्ये कुंडग्राम मध्ये झाला. त्यांच्या वडीलांचे नाव सिद्धार्थ होते. तर आई त्रिशलादेवी या वैशाली चा राजा चेटक याची बहिण होत्या. त्यामुळे महावीरांना वैशालीचा गणराज्याकडून राजघराण्याचा वारस लाभला होता. त्याचे पिता सिद्धार्थ हे क्षत्रियातील ज्ञात किंवा ज्ञातृक या कुळाचे प्रमुख होते. मातापित्यांनी त्यांचे नाव वर्धमान ठेवले होते. वर्धमान ३६ वर्षाचे असताना त्यांच्या माता-पित्यांचा मृत्यू झाला व त्यांचे वडीलबंधू नंदिवर्धन यांच्याकडे कुटुंबाचे सर्व अधिकार आले. महावीरांचे माता-पिता धार्मिक वृत्तीचे होते. त्यांनी उपोषण व व्रतकाव्ये करूनच देहत्याग केला. याचा ही महाविरांच्या मनावर परिणाम झाला. त्यांनी आपले वडील बंधू नंदीवर्धन यांची संमती घेऊन त्यांनी संन्यास धर्म स्विकारला.

## • ज्ञानप्राप्ती

गृहत्याग केल्यानंतर त्यांनी १२ वर्षे खडतर तपश्चर्या केली. नंतर त्यांनी वस्त्रांचाही त्याग केला. अखेर त्यांना ऋजीपालिका नदीच्या तटावर शाल वृक्षाखाली केवलज्ञानाची प्राप्त झाली. त्यांनी आपल्या विकार व वासनांवर विजय मिळविला. सर्व इंद्रियांवर विजय मिळविणारा म्हणून त्यांना जीन असे म्हणू लागले. यांचे शिष्य व धर्मास 'जैन' हे नाव मिळाले. वयाच्या ४२ व्या वर्षी 'महावीर' ही उपाधी प्राप्त झाली.

## • धर्मविचारांचा प्रसार :

ज्ञान प्राप्तीनंतर महावीराने तीस वर्षे प्रवास करून धर्मविचारांचा प्रसार केला. विदेह, मिथील, अंग, मगध व कोसल इ. राज्यांमध्ये जैन धर्माचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. लिच्छवी राजा चेटक यांची कन्या पद्मावती ही महावीरांची पहिली शिष्या होती. मगधचा राजा अजातशत्रू व बिंबिसार हे त्यांचे शिष्य बनले. प्रवचने संवाद व वादविवाद याद्वारे जनमानसात मोठे परिवर्तन घडवून आणले. त्यांना एकूण १४ हजार शिष्य मिळाले. वयाच्या ७२ व्या वर्षी महावीर इ.स.पू. ५२७ मध्ये पाटणा जिल्ह्यातील 'पावा' येथे मृत्यू पावले.

## • जैन धर्माची शिकवण (तत्त्वज्ञान) :

जैन तत्त्वज्ञान वेद प्रामाण्य मानत नाही. त्यामुळे ते अवैदिक मानले जाते. या जैनतत्त्व ज्ञानाला अर्हत प्रवचन, जैन शासन, अनेकांतवाद अशी ही नांवे दिलेली आहेत. वर्धमान महावीरांनी भारतीय समाजाला रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, वर्णभेद यातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या उपदेशामध्ये धर्मसंबंध आचरण करण्याचे निती नियम सांगितले. त्यास जैन धर्माची शिकवणूक असे म्हणतात.

## • जैन धर्माची त्रिरत्ने :

सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान व सम्यक चरित्र या त्रिरत्नाचे आचरण केल्यास मोक्षप्राप्ती होऊ शकते. मोक्ष म्हणजे सकल कर्माचा क्षय, ज्ञान प्राप्त झाल्यावरच अशा कर्माचा क्षय होऊ शकतो. महावीरांनी त्रिरत्नाचे अनुकरण करण्याचा उपदेश केला.

१) सम्यक दर्शन – सत्यावर विश्वास ठेवणे.

२) सम्यक ज्ञान – महावीरांनी सांगितलेल्या ज्ञानावर श्रद्धा, विश्वास ठेवणे.

३) सम्यक चरित्र – नैतिक आचारांची शुद्धता राखणे.

महावीरांच्या शिकवणुकीप्रमाणे योग्य आचरण ठेवण्यासाठी पाच नियम सांगितले. त्याला पंचमहाव्रते असे म्हणतात.

**२) पंचमहाव्रते :**

१) सत्य : नेहमी सत्य बोलावे

२) अहिंसा : शब्द, विचार वा कृतीद्वारे हिंसा करू नये.

३) अस्तेय : कोणत्याही गोष्टीची आसक्ती धरू नये, चोरी करू नये.

४) अपरिग्रह : आवश्यक ते जादा पैशाचा साठा करू नये.

५) ब्रह्मचर्य : प्रत्येकाने इच्छा, वासना, भावना यावर नियंत्रण ठेवावे. विचार शब्द कृत्यामध्ये पावित्र्य असावे.

**३) आत्मा :** जीवाचे मूलतत्व शरीर नसून आत्मा आहे. महावीर परमेश्वराचे अस्तित्व मान्य करत नाहीत. त्यांच्या मते प्रत्येकाचा आत्मा परमेश्वर आहे. म्हणून आत्मनिरीक्षणाने आत्म्याचे खरे ज्ञान प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करावा.

**४) वेद अमान्य :** वेदातील तत्त्वज्ञानाने मोक्ष मिळतो हे महावीरांना मान्य नव्हते. त्यांच्या मते, कर्मापासून जीव मुक्त झाला की तो मोक्षाप्रत जातो.

**५) तप व चिंतन :** ज्ञानप्राप्तीसाठी संन्यास वृत्ती तपश्चर्या, चिंतन, मनन, ध्यानधारणा, समाधी इत्यादी मार्गाने इंद्रियांवर विजय मिळवावा असे महावीरांनी सांगितले. त्यासाठी देहदंड करावा.

**६) स्त्री स्वातंत्र्य :** जैन धर्माच्या संघात साध्वी म्हणजेच श्रमणी यांना पार्श्वनाथ व महावीरांनी प्रवेश दिला. त्यामुळे स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबर अध्यात्मिक विकासाची संधी प्राप्त झाली. अनेक स्त्रीयांनी जैन धर्माची दिक्षा घेतली. उपासिका (श्राविका) आणि साध्वी (श्रमणी) नावाच्या दोन स्त्री वर्गाची जैन संघात स्थापना करण्यात आली.

**७) जातीव्यवस्थेला विरोध :** मनुष्य आपल्या कर्मावरून ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य व शुद्र बनू शकतो असे महावीरांचे मत होते. त्यामुळेच जैन धर्मात त्यांनी सर्व जातीतील लोकांना प्रवेश दिला होता.

- **जैन धर्माचा प्रसार :**

जैन धर्माचे तत्त्वज्ञान सोपे व आचरण साधे असल्यामुळे अनेक लोक या धर्माकडे आकर्षित झाले.

सोळा महाजनपदांपैकी महावीर कोसल, विदेह, मगध, अंग इ. राज्यात धर्मप्रसारार्थ गेले. शिशुनाग वंशीय राजा बिंबिसारने जैन धर्माची दिक्षा घेतली. कलींग राजा खारवेलने हा धर्म स्वीकारला. नंदराजांनी या धर्माला पाठींबा दिला. चंद्रगुप्त मौर्य, अजातशत्रू यांनीही या धर्माचा स्वीकार केला होता. अशोकाचा नातू संपती जैन धर्मावलंबी होता. आंध्र, तेलंगणा व तमिळ प्रदेशातही जैन धर्माचा प्रसार घडून आला. मथुरा व उज्जैन ही जैन धर्माची प्रसिद्ध केंदे होती.

- **जैन धर्मपंथ :**

जैन धर्मात जे पंथ निर्माण झाले ते म्हणजे श्वेतांबर व दिगंबर. दिगंबर म्हणजे आकाश हेच ज्याचे वस्त्र आहे व श्वेतांबर म्हणजे शुभ्र वस्त्रधारी मूलतत्त्वाच्या बाबतीत या दोन पंथांमध्ये फारसे भेद नाहीत.

**१) दिगंबर पंथ :** हा सनातन पंथ असून महावीरांना थोर आत्मा पुरुष मानतात. हे नग्नावस्थेमध्ये जीवन व्यतीत करतात. यांच्या मते स्त्रीला मोक्ष प्राप्ती होत नाही. यांना मूर्तीपुजा मान्य नाही. चिंतन, मनन, ध्यान, धारणा, जप, तप, मान्य विपुल जलाने मूर्तीला स्नान घालून अक्षता वाहतात. लोकभाषा म्हणून अर्धमागधीचा वापर करतात. प्रमुख ग्रंथ संस्कृत भाषेत आहेत. केवल ज्ञानच अंतिम ज्ञान मानतात.

**२) श्वेतांबर पंथ :** परिस्थितीनुसार बदलणारे सुधारणावादी पंथ असून पांढरी वस्त्रे परिधान करतात. स्त्रीला कैवल्य प्राप्ती होऊ शकते. महावीरांना ईश्वर मानतात व मूर्ती पूजेस मान्यता. १९ वी तीर्थंकर मल्ली स्त्री होती अशी धारणा मूर्तीला फूले वाहून मिठाईचा नैवेद्य दाखवतात. थोडे जल शिंपडून जिन मूर्तीवर पुष्पे घालतात. यांचे बहुसंख्य ग्रंथ अर्धमागधी भाषेत आहेत.

- **जैन धर्मग्रंथ :**

जैन धर्माचे मूळ धार्मिक ग्रंथात बारा अंग म्हणजे भाग होते. जैन धर्मात जे प्रमुख ग्रंथ आहेत त्यांना 'आगम' असे म्हटले जाते. आगम म्हणजे उपदेश. महावीरांनी केलेल्या प्रवचनामधून जैन विचारांचा उपदेश केला. त्यातून जैन ग्रंथ व तत्त्वज्ञानाची निर्मिती झाली. बरेच विद्वान साहित्यिक व आचार्य यांनी अनेक ग्रंथांची रचना केली. जैन ग्रंथ अर्धमागधी (प्राकृत) व संस्कृत भाषेत तयार झाले. आचार्य हेमचंद्र यांनी तर्कशास्त्र, शब्दकोश, काव्यशास्त्र, योगशास्त्र व इतिहासावर ग्रंथ रचले. जैन साहित्यात हेमचंद्र सूरी यांना सर्वश्रेष्ठ स्थान मिळाले.

- **जैन धर्माचे भारतीय संस्कृतीला योगदान :**

**१) साहित्य :** जैन धर्माने साहित्याच्या क्षेत्रात काव्य, कादंबरी, नाट्य, ललित वाङ्मय यामध्ये मोठी भर घातली. तर व्याकरण काव्य, कोश, रसायनशास्त्र, छंदशास्त्र, गाथा, गणित, योगशास्त्र इत्यादी विभिन्न विषयावर जैन लेखकांनी मोलाची ग्रंथरचना केली. या शिवाय तमीळ, तेलगू, हिंदी, मराठी, राजस्थानी, गुजराती भाषेमद्ये जैन साहित्याची मोठी वाङ्मय निर्मिती झाली.

**२) कला :** विविध कलांच्या क्षेत्रात जैन धर्माने योगदान दिले आहे. वास्तुकला मंदिर निर्माण कला, मूर्तीकला, चित्रकला इत्यादीनी जैन धर्माच्या प्रसारास चालना दिली.

**३) अहिंसेचा सिद्धांत :** जैन धर्मातील अहिंसेच्या सिद्धांताच्या प्रभावामुळे वैदिक धर्मातील पशूहत्या व नरबळी प्रथा बंद झाली. पुढील काळात म. गांधीजींच्या राष्ट्रीय आंदोलनाचे प्रमुख हत्यार अहिंसा होते. पं. नेहरूंच्या पंचशील धोरणाचा आधार सुद्धा अहिंसा हाच होता. त्यामुळे जैन धर्माची सर्वात मोठी देणगी अहिंसा सिद्धांत हा होता.

**४) नैतिक आचरणावर भर :** महावीरांनी दैनंदिन जीवनात श्रेष्ठ, नैतिक आचरण व सदाचारावर जोर दिल्याने जैन धर्म साधा, सरळ व नैतिकता या सिद्धांताने परिपूर्ण बनला.

**५) सामाजिक समतेचा पुरस्कार :** महावीरांनी सर्व जातीतील लोकांसाठी धर्माची द्वारे खुली केली व सामाजिक समतेचा पुरस्कार केला.

**६) वैदिक धर्मास विरोध :** जैन धर्माने वैदिक धर्मातील कर्मकांडाला विरोध केला. त्यामुळे पुरोहितांचे महत्त्व संपुष्टात आले.

**७) राजकीय क्षेत्रातील योगदान :** जैन धर्माच्या अहिंसा या तत्त्वामुळे जनतेने युद्धाचा त्याग करून शांततापूर्ण जीवन जगण्यास प्रारंभ केला.

**८) चित्रकलेच्या क्षेत्रातील योगदान :** जैन आचार्यांच्या हस्तलिखित पुस्तकात अनेक सुंदर चित्रे असून त्यांच्या रंगामध्ये विविधता होती. जैन चित्रकलेवर राजपुत चित्रकला शैलीचा विशेष प्रभाव होता.

**९) स्थापत्य क्षेत्रातील देणगी :** स्थापत्य कला, मूर्तीकला, चित्रकला या माध्यमातून जैन धर्माने आपला धर्म प्रसार केला. वेरूळची लेणी, अंबेजोगाई लेणी, खजुराहो येथील जैन मंदिरे, गिरनार, पावापूरी, राजगृह येथील मंदिरे, श्रवण बेळगोळ येथील बाहूबलीची प्रचंड मूर्ती या स्थापत्य कला कृतींनी भारतीय सांस्कृतिक जीवनात महत्त्वाचे योगदान दिलेले आहे.

वरील सर्व योगदानामुळेच जैन धर्म प्राचीन भारताच्या इतिहासात एक महत्त्वाचा धर्म ठरला व आज ही त्याचे अस्तित्व टिकून असल्याचे दिसून येते.

### ३.२.३ बौद्ध धर्म :

इ.स.पूर्व ६ व्या शतकात अनेक धार्मिक चळवळी व नवीन धर्मपंथ उदयाला आले. त्यामध्ये जैन धर्माचा प्रसार व बौद्ध धर्माचा उदय ही फार मोठी क्रांतीकारी घटना आहे. बौद्ध धर्माच्या उदयामुळे वैदिक धर्मातील कर्मकांडावर दोषांवर कडाडून हल्ला झाला व अस्वस्थ समाजाला प्रकाशाकडे नेण्याचे काम धर्मसंस्थापक गौतम बुद्धांनी केले.

गौतम बुद्धांचा जन्म इ.स.पू. ५६७ मध्ये नेपाळच्या दक्षिण सरहद्दीवर असलेल्या कपिलवस्तू नगराजवळ लुंबिनी येथे झाला. वडील शुद्धोदन शाक्य घराण्याचे राजे होते व आई माहामाया गौतम बुद्धांच्या जन्माच्या सातव्या दिवशी वारल्या. गौतमांचे पाळण्यातील नाव सिद्धार्थ होते. परंतू आईच्या मृत्यूनंतर मावशी गौतमी हीने त्यांचे पालन पोषण केले. म्हणून ते पुढील काळात गौतम या नावाने ओळखले जाऊ लागले. बालपणापासूनच

सिद्धार्थ काहीसा विरक्त होता. त्यामुळे आई वडीलांनी त्याला सर्व सोई सुविधा पुरवून त्याचे पालन पोषण काळजीपूर्वक केले. त्याचे बालपण अतिशय लाडात व ऐश्वर्यात गेले. कोणत्याही प्रकारचे दु:ख त्याच्या जवळ येणार नाही याकरीता सर्व सोईनियुक्त असा सुंदर राजवाडा बांधून दिला. यशोधरा नावाच्या सुंदर राजकन्येशी त्याच विवाह झाला. पुढे त्याला एक मुलगा झाला. त्याचे नांव राहूल. वयाच्या २८ व्या वर्षापर्यंत सिद्धार्थ याप्रमाणे सुखोपभोगात जीवन घालवित होता.

- **गौतमाचा गृहत्याग :**

संसार सुखात सिद्धार्थचे मन रमत नव्हते. तो सदैव चिंतनात मग्न असे. शुद्धोदन राजाने सिद्धार्थचा राज्याभिषेक करण्याचे ठरविले. त्याला आपल्या राज्याची कल्पना यावी म्हणून छन्ना नावाच्या एका विश्वासू सारथ्याबरोबर राज्य पाहण्यासाठी पाठविले. रस्त्याने जात असताना महारोगाने त्रस्त झालेला एक रोगी, वार्धक्याने जर्जर झालेला एक म्हातारा व प्रेताच्या मागून रडत जाणारे लोक अशी तीन दृश्ये पाहिली आणि सिद्धार्थच्या जीवनाला कलाटणी मिळाली. घटना पाहून पाहून त्याचे मन अत्यंत दु:खी झाले. जगात दु:ख आहे याची जाणीव त्याला पहिल्यांदा झाली. त्या दु:खातून मुक्त कसे व्हावे ही एकच चिंता त्याच्या मनाला लागून राहिली. त्यावर उपाय शोधण्याचा त्याने निश्चय केला. त्यातून वयाच्या २९ व्या वर्षी सर्वसंगपरित्याग करून, पत्नी व पुत्राचा त्याग करून सत्य शोधण्यासाठी बाहेर पडला. कपडे, दागिने व इतर वस्त्रे काढून भगवी वस्त्रे परिधान करून वनात निघून गेला.

- **आत्मज्ञान प्राप्ती :**

सत्य शोधण्यासाठी बाहेर पडलेल्या सिद्धार्थने सलग सहा वर्षे भटकंती केली. आलारकलाम व उद्दक राजपुत्र या दोन साधूंचे शिष्यत्व पत्करले. योगसाधना केली. पण समाधान लाभेना. तेव्हा तो बोधगयेच्या अरण्यात तप करण्यासाठी निघून गेला व एका पिंपळाच्या झाडाखाली चिंतन करत बसला. पाच वर्षाच्या घोर तपश्चर्येनंतर अनेक यातना, कष्ट सोसल्यानंतर व ४९ दिवस समाधी लावल्यानंतर वैशाख शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी धर्माचा खरा राजमार्ग दिसला. ज्ञानप्राप्ती झाली. लोक त्यास बोध झाला म्हणून 'बुद्ध' म्हणू लागले. ज्या वृक्षाखाली बसून त्याला हे ज्ञान प्राप्त झाले त्या वृक्षाला 'बोधिवृक्ष' म्हणतात.

- **गौतम बुद्धांचे सारनाथ येथील पहिले प्रवचन :**

दिव्य ज्ञान प्राप्त झाल्यानंतर गौतम बुद्धांनी आपले पहिले प्रवचन काशीजवळ सारनाथ या ठिकाणी दिले. तेथील बिंबिसार राजाने महायज्ञाची तयारी केली होती. त्यात बळी देण्यासाठी आणलेल्या मुक्या प्राण्याकडे पाहून बुद्धास अत्यंत दु:ख झाले. तेथे जमलेल्या सर्व लोकांस त्यांनी 'अहिंसा परमो धर्म' या तत्वाचा उपदेश केला. परिणामी बिंबिसारने आपल्या प्रजेसह बुद्धांचे अनुयायित्व स्विकारले. ते बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी ठिकठिकाणी फिरले. कपिलवस्तू शहरी येथून आपल्या माता पित्यास बौद्ध धर्माची दीक्षा दिली. आजूबाजूच्या प्रदेशात जाऊन सदाचार, दान, दया व अहिंसा या तत्त्वांचा उपदेश करून हजारो शिष्य मिळविले. अशा या महान तथागत गौतम बुद्धांचे महानिर्वाण इ.स.पूर्व ४८३ साली वयाच्या ८० व्या वर्षी गोरखपूर जिल्हयातील कुशिनारा या ठिकाणी झाले.

- **बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान :**

गौतम बुद्धांचा धर्म अत्यंत साधा, सरळ व सर्वांना समजेल अशा भाषेत होता. जीवनातील दु:खापासून मनुष्य मात्राची सुटका करण्यासाठी त्यांनी दु:ख मुक्तीचा व्यावहारिक मार्ग सांगितला. याकरीता वेदाचे प्रामाण्य नाकारताना यज्ञातील पशू हत्येचा निषेध केला. देवाचे अस्तित्व नाकारले. बुद्धांची शिकवण पुढीलप्रमाणे.

- **चार आर्यसत्ये :**

१) दु:ख: जगात सर्वत्र दु:ख आहे.

२) दु:ख समुदाय : दु:खाचा उदय, निर्माण जेथून होतो. त्यास दु:ख समुदाय म्हणतात. या दु:खाचे तृष्णा हे मूळ आहे. तृष्णेमुळे पुनर्जन्म, भोगेच्छा, अनित्य बाबी हे त्रिविध दु:ख येते हे दुसरे आर्य सत्य होय.

३) दु:खनिरोध : कारण नष्ट झाले म्हणजे दु:खाचा निरोध होतो.

४) दु:ख निरोधनाचा मार्ग : दु:खाचा निरोध करावयाचा असेल तर मार्ग ही आहे. तो म्हणजे अष्टांग मार्ग होय.

**अष्टांग मार्ग :** बौद्ध धर्माच्या शिकवणुकीचे इच्छेचा नाश करण्यासाठी गौतम बुद्धांनी पुढील आठ मार्ग सांगितले.

१) सम्यक दृष्टी : बुद्धांनी सांगितलेल्या चार आर्य सत्यांची सतत जाणीव ठेवणे.

२) सम्यक संकल्प : इच्छेचा त्याग करून कर्मापासून मुक्ती मिळवावी.

३) सम्यक भाषा : कोणालाही वाईट वाटेल असे भाषण करू नये. सत्य बोलावे, मृदू बोलावे.

४) सम्यक कर्मान्त : नेहमी सत्कर्म करीत जावे.

५) सम्यक उपजीविका : नीति मार्गाने मिळविलेल्या संपत्तीवर उदरनिर्वाह करावा.

६) सम्यक स्मृती : विषयभोग दु:खमय आहे ही जाणीव सतत बाळगावी.

७) सम्यक चिंतन : नीतीच्या व परहिताच्या चिंतनात कालक्रमणा करावी.

८) सम्यक समाधी : मनाची एकाग्रता वाढविणे.

**तीन धर्मस्कंद :** गौतम बुद्धांच्या अष्टांगमार्गाचे सार म्हणून आपण या तीन धर्मस्कंदाकडे पाहतो.

१) प्रज्ञा : धर्माचे पूर्ण ज्ञान.

२) शील : सर्व पापांपासून मुक्त, चारित्र्य.

३) करूणा : प्रेम, दया, स्व-एकाग्रता साधणे.

**पंचशील तत्त्वे :** गौतम बुद्धांनी आपल्या अनुयायांना ५ नियम घालून दिले आहेत. त्यांना पंचशील तत्वे असे म्हणतात.

१) अहिंसा : हिंसा करू नये.

२) सत्य : नेहमी सत्य बोलावे.

३) अस्तेय : जे आपल्या मालकीचे नाही त्याची आसक्ती धरू नये.

४) अपरिग्रह : आवश्यकतेपेक्षा जास्त संपत्तीचा साठा करु नये.

५) ब्रह्मचर्य : व्यभिचार करु नये, ब्रह्मचर्याचे पालन करणे.

- **बौद्ध धर्मसंघ :**

गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी भिक्षु आणि भिक्षुणीचे संघ स्थापन केले. त्यांचे शिष्य दोन प्रकारचे होते. १) संन्यास वृत्तीचे (भिक्षु), २) संसारी (उपासक). भिक्षू आणि भिक्षुणींना संन्यासी राहून धर्मप्रसाराचे कार्य करावे लागत होते. प्रसारासाठी संघटीतपणे प्रयत्न करणारे गौतम बुद्ध हे पहिलेच धर्म संस्थापक होते.

- **भिक्षूसाठीचे नियम :**

१) भगवी, कफनी, साधे वस्त्र, २) अन्नप्राप्तीसाठी भिक्षा मागणे. ३) जमिनीवर झोपणे, ४) ठराविक वेळेतच अन्नग्रहण, ५) सुखासिन जीवनापासून अलिप्त

संघात दाखल झाल्यानंतर भिक्षुला दहा नियमांचे पालन करावे लागे.

१) हिंसा न करणे, २) चोरी न करणे, ३) ब्रह्मचर्य करणे, ४) असत्य बोलू नये, ५) मद्यपानाचा त्याग, ६) अवेळी भोजन करू नये, ७) नृत्य, गायन व वादन यांचा त्याग, ८) सौंदर्य प्रसाधने वापरू नयेत, ९) मऊ बिछान्याचा त्याग, १०) सोने चांदी दान स्विकारू नये.

भिक्षूंना दीक्षा घेतेवेळेस तीन प्रतिज्ञा घ्याव्या लागत. त्यानुसार प्रत्येक भिक्षुला बुद्ध, धर्म आणि संघाला शरण आल्याचे वचन देणे आवश्यक होते. मनुष्यमात्र आणि सर्व प्राण्यांच्या हिताकरीता भिक्षू संघाची स्थापना झाली होती.

- **बौद्ध धर्मग्रंथ :**

गौतम बौद्धांच्या मृत्यूनंतर त्यांनी सांगितलेले विचार, उपदेश आणि प्रवचने बौद्ध पंडितांनी केलेले भाष्य या दोन माध्यमातून बौद्ध धर्म ग्रंथाची निर्मिती झाली. बौद्ध धर्म ग्रंथ हे पाली, अर्धमागधी, संस्कृत व परकीय भाषेतही लिहिले आहे. सूत्तपीटक, विनयपिटक व अधिधम्म पिटक हे तीन ग्रंथ, आरि धम्मपद, थेरगाथा व थेरीगाथा हे काव्य ग्रंथ आहेत. दीपवंश व महावंश हे सिंहली भाषेत तर दिव्यावदान हे ग्रंथ तिबेटी भाषेत प्रसिद्ध आहेत.

- **बौद्ध धर्मातील पंथ :**

गौतम बुद्धांच्या निर्वाणानंतर त्यांच्या शिष्यात मतभेद होऊन बौद्ध धर्मात महायान व हिनयान असे दोन पंथ निर्माण झाले.

**१) महायान :** महायान पंथाचा उदय इ.स. पू. पहिल्या शतकात आंध्रमध्ये झाला असावा. कनिष्काच्या काळात चौथ्या बौद्ध धर्मपरिषदेत महायान पंथाला मान्यता दिली. बुद्धांना देवता समजून पूजा करणारा, पुजा अर्चा, प्रार्थना व मोक्ष विधीमंत्र्यांचा स्वीकार करणारा हा पंथ होता. चीन, तिबेटी, मध्य व पूर्व आशिया येथे या पंथाचा प्रसार झाला.

**२) हिनयान :** हा पंथ संन्यासी मूळ धर्म स्वरुपात कायम असणारा, सनातनी, कर्मठ मार्गाचा पुरस्कार करणारा आणि फक्त बुद्धांचे उपदेश मान्य असणारा, मूर्तीपुजा मान्य नसलेला हा पंथ होय. या पंथाचा प्रसार सिलोन, ब्रह्मदेशात झाला.

- **बौद्ध धर्मपरिषदा :**

गौतम बुद्धांच्या मृत्यूनंतर बौद्ध भिक्षूकांमध्ये मतभेद निर्माण झाले. ते मतभेद दूर करण्यासाठी बौद्ध धर्मपरिषदांचे आयोजन करण्यात आले.

**१) पहिली बौद्ध धर्म परिषद :** इ.स. पू. ४८७ मध्ये गौतम बुद्धांच्या मृत्यूनंतर पहिली धर्मपरिषद राजगृह येथे मगध सम्राट अजातशत्रूने आयोजित केली होती. महाकश्यप हा या परिषदेचा अध्यक्ष होता. या परिषदेला पाचशे अनुयायी उपस्थित होते. या परिषदेत विनयपिटक व धर्मपिटक या ग्रंथाची रचना करण्यात आली.

**२) दुसरी बौद्ध धर्मपरिषद :** बुद्धांच्या मृत्यूनंतर १०० वर्षांनी इ.स.पु. ३८७ मध्ये वैशाली येथे राजा काकवर्णी कालाशोक याने आयोजित केली होती. बौद्ध भिक्षूंच्या दैनंदिन आचाराविषयी मतभेद होते की जे विनयपीटकाच्या विरुद्ध होते, ते या बौद्ध सभेत चर्चेस घेण्यात आल्या.

**३) तिसरी बौद्ध धर्मपरिषद :** धार्मिक मतभेद दूर करण्यासाठी सम्राट अशोकाने इ.स.पू. २५१ मध्ये पाटलीपुत्र येथे मोगली पुत्र तिस्स यांच्या अध्यक्षतेखाली या परिषदेचे आयोजन केले होते. ही परिषद गौतम बुद्धांच्या मृत्यूनंतर २३६ वर्षांनी झाली. बौद्ध धर्मातील मतभेद मिटवून प्रमाणित बौद्ध धर्म ग्रंथाची रचना करणे हा मुख्य उद्देश या परिषदेचा होता.

**४) चौथी बौद्ध धर्मपरिषद :** सम्राट कनिष्काच्या कारकिर्दीत काश्मीर मध्ये कुंडलवन येथे वसुमित्र यांच्या अध्यक्षतेखाली ही धर्मपरिषद आयोजित केली होती. या परिषदेत त्रिपिटकावर 'महाविभाषा' ही टिका लिहिली गेली. या परिषदेने महायान पंथाला मान्यता दिली.

- **बौद्ध धर्माचा प्रसार :**

बौद्ध धर्माचा प्रसार सिलोन, ब्रह्मदेश, चीन, तिबेट, कोरिया, जपान, नेपाळ येथे झाला.

- **बौद्ध धर्माचे भारतीय संस्कृतीला योगदान :**

भारतीय संस्कृतीच्या प्रत्येक क्षेत्रात बौद्ध दर्माचा व्यापक प्रभाव पडलेला आहे.

१) **साधा आणि सोपा धर्म :** सोपी भाषा, सोपा सदाचार, सोपी शिकवण इ. मुळे हा धर्म भारतात प्रचंड लोकप्रिय झाला. या धर्माने प्राचीन काळापासून चालत आलेल्या रूढी, परंपरा आणि वैदिक धर्मातील अनिष्ट परंपरा दूर केल्या.

२) **अहिंसेचे महत्त्व :** यज्ञातील हिंसाचाराची अमानुषता दाखवून दिली. त्यामुळे पुढे हिंदू धर्मात अहिंसेचे महत्त्व वाढत गेले.

३) **उच्च नैतिक शिकवण :** बौद्ध धर्माने उच्च व श्रेष्ठ आदर्शावर भर दिल्यामुळे समाजातील चारित्र्य संवर्धनाला मोठ्या प्रमाणात मदत झाली.

४) **समतेचा स्विकार :** बुद्धांनी वर्णव्यवस्था नाकारली. मानव समाज समान असून अध्यात्मिक प्रगती करण्याचा व निर्वाणप्राप्तीचा अधिकार प्रत्येकाचा आहे असा संदेश दिला.

५) **वैदिक धर्मावर प्रभाव :** बौद्ध धर्मातील अहिंसा तत्व, बळींची प्रथा व मानवतावादी विचारसरणींचा स्विकार, वैदिक धर्माने केला.

६) **मठपद्धती (विहार) :** मठ, विहाराद्वारे मोफत शिक्षण व धर्माचा प्रसार अशा विविध पद्धतींचा स्विकार बौद्ध धर्मात झाला. ईश्वरचिंतन करीत असताना आपल्या धर्माचा प्रसार सुद्धा करावा ही नविनच कल्पना बौद्ध धर्मात भारताला दिली.

७) **मूर्तिपूजा :** वैदिक काळात मूर्ती पूजेला स्थान नव्हते. बौद्ध धर्मातील महायान पंथाने या गोष्टी स्विकारल्या आहेत.

८) **बोलीभाषेचा विकास :** बौद्ध धर्माने धर्मप्रचारासाठी, तत्त्वज्ञान सांगण्यासाठी, दीक्षा देण्यासाठी तसेच ग्रंथांचीही भाषा बोलीभाषाच ठेवली होती. बौद्ध धर्माने पाली या बोलीभाषेचा स्विकार केला.

९) **वैचारिक स्वातंत्र्य :** गौतम बुद्धांनी वास्तववादी दृष्टीकोन आपल्या अनुयायांमध्ये निर्माण केला. कोणत्याही गोष्टीचा स्विकार करताना डोळसपणे विचार करावा असे सांगितले.

१०) **कला क्षेत्रातील प्रसार :** कलेच्या क्षेत्रात बौद्ध धर्माने क्रांतीच घडवून आणली. स्थापत्य, चित्र व शिल्पकला यामध्ये अमूलाग्र बदल झाला. शिल्पकलेची सुरूवात बौद्ध धर्माच्या आश्रयानेच झाली. विहार, चैत्य, स्तूप, मंदिर व स्मारके यासारख्या अप्रतिम कलाकृती बौद्ध कलेच्या उत्कृष्ट कलाकृती म्हणून आजही प्रचलित आहेत.

११) **इतर पंथांचा उदय :** भागवत धर्म, शैव व इतर पंथांच्या निर्मितीसाठी अप्रत्यक्षपणे बौद्ध धर्मच कारणीभूत ठरला.

**१२) जगभर प्रसार :** भारतीय संस्कृतीचा प्रसार जगभर करण्याचे कार्य बौद्ध धर्माने केले. अनेक देशात धर्मप्रसारक पाठवल्यामुळे जगाशी संबंध प्रस्थापित झाले. भारताचा पवित्र भूमी म्हणून उल्लेख केला जाऊ लागला. चीन, जपान, श्रीलंका, नेपाळ, भूतान व आग्नेय आशियातील देशांमध्ये बौद्ध धर्माने प्रचार केला.

बौद्ध धर्माच्या उदयाने, उपदेशाने व तत्त्वज्ञानाने भारतीय संस्कृतीसंपन्न झाली.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**अ) खालील विधान रिकाम्या जागी योग्य पर्यायी शब्द लिहा.**

१) जैन धर्माचे पहिले तिर्थंकर ............. हे होत.

अ) पार्श्वनाथ ब) आदिनाथ क) शांतीनाथ ड) महावीर

२) वर्धमान महावीरांचा जन्म ............. येथे झाला.

अ) कुशीनारा ब) पाटणा क) कुंडग्राम ड) गुजरात

३) कलिंगचा राजा ............. याने जैन धर्माचा स्विकार केला.

अ) समुद्रगुप्त ब) चंद्रगुप्त क) खारवेल ड) अश्वसेन

४) महावीरांनी ............ भाषेतून आपले तत्त्वज्ञान मांडले.

अ) गुजराती ब) अर्धमागधी क) पाली ड) संस्कृत

५) लिच्छवी राजाची ............. ही राजकन्या महावीरांची पहिली शिष्या होती.

अ) पद्मावती ब) यशोमती क) चेलन्ना ड) शुभ्रशी

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) गौतम बुद्धांचा जन्म कोठे झाला?

२) गौतम बुद्धांना दिव्यज्ञानाची प्राप्ती कोठे झाली?

३) गौतम बुद्धांनी आपले पहिले प्रवचन कोठे दिले?

४) बौद्ध धर्मात कोणते दोन पंथ उदयास आले?

५) बौद्ध धर्माच्या पहिल्या परिषदेचा अध्यक्ष कोण?

## ३.३ सारांश :

इ.स.पू. ६ वे शतक अनेक अर्थाने क्रांतीकारी ठरले. प्राचिन भारताच्या इतिहासात याच काळात धार्मिक क्रांती झाली. लोखंडाचा शोध व त्यामुळे शेती व्यवसायात झालेली प्रगती हा अमुलाग्र बदल घडून आला. यातून उत्पादन वाढल्यामुळे व्यापाराची आवश्यकता निर्माण झाली. यातूनच नागरी समाजाचा उदय झाला. व्यापारी केंद्रे

अस्तित्वात आली. अयोध्या, कपीलवस्तू, श्रावस्ती, कुशीनगर, बनारस, वैशाली, पाटलीपुत्र, चंपा ही भरभराटीस आलेली नगरे यांचा उदय उत्तर हिंदुस्थान मध्ये झाला. इ.स.पू. ६ व्या शतकामध्ये १६ मोठी राज्ये अस्तित्वात आली. या राज्यांनाच महाजनपदे म्हणतात. याच कालखंडात उदयास आलेल्या व संपूर्ण मानव जातीला कल्याणकारी मार्गावर नेणाऱ्या जैन व बौद्ध धर्माचा उदय हा प्रस्थापित धर्माविरुद्ध केलेला एक प्रकारचा उठावच होता. या धर्माने अहिंसा मार्गाने केलेले अनुकरण त्यामुळे सर्वत्र शांतीचे वातावरण निर्माण झाले. लोकभाषेचा वापर हा सामान्य जनतेला आकृष्ट करणारा ठरला. अनेक लोकांनी हा धर्म स्विकारला. प्राचीन जैन धर्माची वाढ ही भारतात मर्यादित राहिली. बौद्ध धर्माला मात्र लोकाश्रय व राजाश्रय मिळाल्यामुळे व गौतम बुद्धांनी प्रभावी प्रचार यंत्रणा व व्यवहारवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार केल्याने बौद्ध धर्म हा भारताबाहेर मोठ्या प्रमाणावर प्रसारीत झाला. हजारो वर्षापासून बंदनात असणाऱ्या स्त्रीयांना सन्मानाचे स्थान मिळवून देण्याचे कार्य जैन व बौद्ध धर्माने केले आहे. तसेच भारतीय समाजाच्या सामाजिक, धार्मिक, स्थापत्य व कला क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले.

## ३.४ पारिभाषिक शब्द–शब्दार्थ :

महाजनपदे – प्रादेशिक राज्ये

महावीर – जेता

जिन – विकारांना जिंकणारा

तीर्थंकर – ईश्वराचा दूत

त्रिपिटक – गौतम बुद्धांच्या वचनाचे तीन भाग

अष्टांग मार्ग – दुख दूर करण्याचा मार्ग

महापरिनिर्वाण – महान व्यक्तींचा मृत्यू

आजिवक – नियतीला श्रेष्ठ मानणारे

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयंअध्ययन प्रश्न –१**

अ) १) महाजनपद, २) चंपा, ३) वैशाली, ४) प्रसेनजीत, ५) गांधार

ब) १) इ.स.पू. ६ वे शतक, २) इंद्रप्रस्थ, ३) उदयनराजा, ४) पांचाल, ५) शरयू नदी

- **स्वयं अध्ययन प्रश्न – २**

अ) १) आदिनाथ, २) कुंडग्राम, ३) खारवेल, ४) अर्धमागधी, ५) पद्मावती

ब) १) लुंबिनी, २) गया, ३) सारनाथ, ४) हिनयान व महायान, ५) महाकश्यप.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सोळा महाजनपदांची थोडक्यात माहिती सांगा.

२) जैन धर्माचा उदय व विकास कसा झाला याचा आढावा द्या.

३) गौतम बुद्धांचे जीवन चरित्र व शिकवण सांगा.

**ब) टीपा लिहा.**

१) वर्धमान महावीर

२) बौद्ध धर्म परिषदा

३) बौद्ध धर्माचे भारतीय संस्कृतीला योगदान

४) जैन धर्माचे तत्त्वज्ञान.

## ३.७ संदर्भ :


१) कुलकर्णी अ. रा. (१९६२) प्राचीन भारत, संस्कृती आणि इतिहास, देशमुख प्रकाशन, पुणे.

२) गायधनी र. राहूरकर, व.ग. (१९१४), प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेन्टल पब्लीकेशन, पुणे.

३) कदम य. ना. (२००९) समग्र भारताचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर.

४) देव प्रभाकर (१९९५), प्राचीन भारत, विद्या प्रकाशन, नागपूर.

५) कोलरकर श. गो., प्राचीन भारताचा राजकीय सामाजिक, सांस्कृतिक इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९१.

६) चौधरी प्र. का. (२००२) प्राचिन भारताचा इतिहास व संस्कृती, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

७) आठल्ये वि. भा. (२००८), प्राचीन व मध्ययुगीन भारत, सर साहित्य केंद्र, नागपूर.

८) दीक्षित नी. सी, प्राचीन भारताचा इतिहास, पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर १९८७.


❖ ❖ ❖

घटक –४

# मौर्य साम्राज्य

**अनुक्रमणिका :**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ विभाग पहिला – मौर्य घराण्याचा राजकीय इतिहास

अ) चंद्रगुप्त मौर्य

ब) बिंदूसार

क) सम्राट अशोक

४.२.२ विभाग दुसरा : अशोकाचा धम्म

४.२.३ विभाग तिसरा : मौर्यांचे प्रशासन, स्वरूप, रचना

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक संज्ञा, संकल्पना व अर्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


## ४.० उद्दिष्ट्ये :

या घटकातून आपल्याला –

- मौर्य घराण्याचा राजकीय इतिहास अभ्यासता येईल.
- सम्राट अशोकाच्या धम्माबद्दल तसेच त्याने धर्म प्रसारासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती मिळेल.
- मौर्य कालीन केंद्रीय व प्रांतीय प्रशासन व्यवस्था अभ्यासता येईल.

## ४:१ प्रस्ताविक :

मौर्य साम्राज्याची स्थापना ही प्राचीन भारताच्या इतिहासातील अतिशय महत्त्वाची घटना आहे. मौर्य वंशाच्या स्थापनेने एक नवीन युगास आरंभ झाला. मौर्य शासकांनी भारतात एका सामर्थ्यशाली संपन्न, कार्यक्षम व प्रबळ राज्याची निर्मिती केली. त्यांच्या एकछत्री साम्राज्य स्थापनेमुळे भारतात राजकीय ऐक्य निर्माण झाले. विशाल साम्राज्य, एकसंघी बलवान सत्ता, प्रजाहितदक्ष राजे, उत्कृष्ठ प्रशासन यंत्रणा, आर्थिक सुव्यवस्था, दीर्घकालीन शांतता, व्यापार, उद्योगधंदे, विज्ञान, वाङ्‌मय कला क्षेत्रात झालेली प्रगती ही मौर्य साम्राज्याची खास वैशिष्ट्ये सांगता येतील. चंद्रगुप्त मौर्याने नंद घराण्याचा पराभव करून मगधावर मौर्य घराण्याची स्थापना केली.

- **राजकीय परिस्थिती :**

चंद्रगुप्त हा मौर्य घराण्याचा व भारतातील पहिल्या साम्राज्याचा संस्थापक होता. त्याने पहिल्यांदा भारताचे राजकीय एकीकरण घडवून आणले. चंद्रगुप्त नंतर त्याचा मुलगा बिंदुसार सम्राट झाला. त्याने २५ वर्षे राज्य केले. चंद्रगुप्ताने मिळविलेले साम्राज्य त्याने व्यवस्थीत सांभाळले. त्याच्यानंतर अशोक हा मुलगा सिंहासनावर आला. जगातील थोर राज्यकर्त्यामध्ये त्यांची गणना होते. या महान व प्रजाहितदक्ष सम्राटांची कारकिर्द अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. या काळात भारतीय परंपरेतील विश्वबंधुत्व व मानवतावादी मूल्यांची प्रस्थापना झाली. तसेच भारतीय संस्कृती व धर्माचा भारताबाहेर शांततामय मार्गाने प्रचार करण्याचा महान प्रयत्न झाला.

- **मौर्य घराण्याच्या इतिहासाची साधने :**

मौर्य घराण्याविषयी माहिती सांगणारी अनेक साधने उपलब्ध झालेली आहेत. कौटिल्याचे अर्थशास्त्र, विशाखादत्ताचे मुद्राराक्षस, विष्णुपुराण, जैन व बौद्ध ग्रंथ, मॅगेस्थेनिसचा 'इंडिका' जस्टीन, स्ट्रॅबो, प्लुटार्क, डिमॅकस, प्लीनी, हिरोडोट्स व डायनोसियनचे लेखन, टॉलेमी व चीनी प्रवाशांची वर्णने, अशोकाचे शिलालेख, पाटलीपुत्राचे अवशेष, सांचीचा स्तुप, गिरनार आलेख, असंख्य नाणी इत्यादी साधनांच्या आधारे मौर्यकाळाची माहिती मिळते.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ विभाग पहिला : मौर्य घराण्याचा राजकीय इतिहास –

**अ) चंद्रगुप्त मौर्य** (इ.स.पू. ३२२ ते इ.स.पू. २९८)

**१) पूर्ववृत्तांत :** चंद्रगुप्ताचा जन्म शाक्य घराण्यातील मुरा नावाच्या एका क्षत्रिय शाखेत झाला. चंद्रगुप्ताच्या कुळाविषयी विद्वानांच्या मध्ये अनेक मतभेद आढळतात. प्रसिद्ध बौद्धग्रंथ महावंश यानुसार चंद्रगुप्त पिप्पालवन येथील मोरिय या क्षत्रिय घराण्यातील होता. डॉ. स्पुनरच्या मते चंद्रगप्त पर्शियन होता. विष्णूपुराणात तो दासीपुत्र सांगीतले आहे. जैन पंडित हेमचंद्रानी 'परिशिष्ट पर्वन' या ग्रंथात मोराचे वास्तव्य ज्या परिसरात होते. तेथील क्षत्रिय वंशातच चंद्रगुप्ताचा जन्म झाला असा उल्लेख केलेला आहे. डायोडोरस व प्लुटार्कने चंद्रगुप्ताचा उच्चकुलीन म्हणून उल्लेख केलेला आहे.

बौद्ध ग्रंथानुसार चंद्रगुप्ताचे वडील हे मौर्य जमातीचे एक प्रमुख सेनानी होते. सरहद्दीवरील बंड मोडण्यासाठी गेले असताना ते युद्धात ठार झाले. त्यावेळी चंद्रगुप्ताची आई आपल्या भावाकडे पाटलीपुत्र येथे स्थायीक झाली. चंद्रगुप्ताने तक्षशिला विद्यापीठात वेगवेगळ्या प्रकारचे शिक्षण घेतले. तो राजकारण, युद्धकला इ. क्षेत्रात प्रविण झाला. त्याने तरूण वयात नंदराजाच्या सैन्यात प्रवेश केला. परंतु त्याचे नंदराजाशी पटले नाही. विष्णूगुप्त / कौटिल्याशी संगनमत करून नंद सत्ता उलथून टाकण्याचा प्रयत्न केला. पण तो अयशस्वी ठरला. नंदराजाने त्यास हद्दपार केले.

- **अलेक्झांडरकडे नोकरी :**

हद्दीपारीच्या काळात चंद्रगुप्त पंजाबमध्ये गेला व अलेक्झांडरला भेटला. चंद्रगुप्ताने अलेक्झांडरकडे नोकरी करण्यास सुरूवात केली. त्याने आपल्या पराक्रमाने नावलौकीक मिळविला. त्याची किर्ती अलेक्झांडरकडे पोहचली. त्याने त्याची भेट घेतली. चंद्रगुप्ताने नंद घराण्याचा पाडाव करण्यासाठी अलेक्झांडरच्या लष्कराची मदत मागीतली. पण अलेक्झांडरला संपूर्ण भारत जिंकायचा असल्याने चंद्रगुप्त त्याला शत्रू वाटू लागला. त्याचवेळी चंद्रगुप्ताने अलेक्झांडरची नोकरी सोडली. चंद्रगुप्ताने साम्राज्य स्थापनेची प्रेरणा अलेक्झांडरकडून घेतली. आणि तेथून परत आल्यानंतर त्याने भारतामध्ये साम्राज्य स्थान करण्याचा निश्चय केला.

- **आर्य चाणक्यांशी भेट व धनानंदाचा पराभव :**

नंद साम्राज्याच्या उत्तरेकडील हिमालय परिसरात भटकत असतानाच चंद्रगुप्ताची भेट चाणक्यशी झाली. चाणक्याचे मूळ नाव विष्णूगुप्त उर्फ कौटिल्य असे होते. तो वेद विद्या इतर शास्त्रात प्रविण होता. तेजस्वी व बुद्धीमान होता. धनानंदाच्या दरबारात तो राजपुरोहित म्हणून काम पहात होता. काहींच्या मते दानशाळेचा अध्यक्ष होता. परंतु धनानंदाच्या बरोबर काही कारणामुळे त्याचे पटले नाही. धनानंदाने त्याचा अपमान केल्यामुळे त्याने नोकरी सोडली. ''नंद वंशाचा समूळ उच्छेद करीन'' अशी त्याने प्रतिज्ञा केली असे बौद्ध वाङ्मयात आहे व तो नंदराजाच्या राज्याबाहेर पडला. हिमाचल प्रदेशात भटकत असतानाच त्याची व चंद्रगुप्ताची भेट झाली. दोघांचा हेतू समान होता. चाणक्याने आपल्या अपमानाचा सूड घेण्यासाठी चंद्रगुप्ताचे सहाय्य घेतले. कौटिल्याने नंदाच्या शत्रूशी मैत्री केली. उत्तर व मध्य भारतातील अनेक राज्यांची मदत मिळविली. पर्वतक राजा, सिंधूचा सिंधूबेण, मलयचा सिंहनाद, कुल्लूचा चित्रवर्मा, पर्शियाचा मोघाक्ष, काश्मिरचा पुष्करा‍क्ष आणि मलयकेतू, शक, यवन कंबोज, पारसिक व बाल्टिक ह्या स्वकीय-परकीय सत्तांचे अनेक गणराज्ये व जंगली जमातीच्या राज्यांची चंद्रगुप्ताने मदत मिळविली. चंद्रगुप्ताने नंद साम्राज्यावर आक्रमण केले. पाटलीपुत्र येथे नंदसैन्याशी झालेल्या घनघोर युद्धात धनानंद व त्याचे आप्तस्वकीय मारले गेले. चंद्रगुप्त व मगधाची जनता धनानंदाच्या जुलमी राजवटीला कंटाळली होती. मद्राराक्षस नाटकात व मिलिंद पन्हो या बौद्ध ग्रंथात मौर्य व नंद यांच्यातील युद्धाचे वर्णन आहे. चंद्रगुप्ताला या युद्धात विजय मिळाला. चंद्रगुप्ताने मगधावर स्वतंत्र व प्रबळ मौर्य घराण्याची सत्ता स्थापन केली. इ.स. पूर्व ३२१ मध्ये चंद्रगुप्ताचा सम्राट झाला.

• **चंद्रगुप्ताचे विजय :**

**१) ग्रीक सत्तेचे उच्चाटन :**

मगधाचा सम्राट झाल्यानंतर चंद्रगुप्ताने साम्राज्य विस्तारवादी धोरण स्विकारले. नंदराजाचा पराभव केल्यामुळे त्याला विशाल साम्राज्याचा (मगधाचा) वारसा मिळालेला होता. अलेक्झांडरने वायव्य भारतावर विजय मिळविल्यानंतर मिळालेल्या प्रदेशाचे सहा विभागात विभाजन केले होते. यापैकी तीन विभाग सिंधू नदीच्या पूर्वेला होते तर तीन पश्चिमेला. यातील प्रत्येक भागावर एक-एक ग्रीक अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. अलेक्झांडर परत जाताच चंद्रगुप्ताने पराभूत झालेल्या राज्यांचे सैन्य एकत्र केले व ग्रीकांच्या ताब्यातील प्रदेशावर आक्रमण केले. त्याने नदीपर्यंतचा प्रदेश ग्रीकांच्याकडून जिंकून घेतला व ग्रीक राज्यपाल यूडेमॉस व फिलीप यांना भारतातून हाकलून लावले. परकीयांची सत्ता नष्ट करण्यात त्याला यश मिळाले. भारताच्या वायव्येकडील प्रदेशात एकसंघी व बालवान सत्ता स्थापन करण्यात तो यशस्वी झाला.

• **सेल्यूकस निकेटरवर विजय :**

चंद्रगुप्त आपल्या साम्राज्याची घडी नीट बसवीत असतानाच चंद्रगुप्तावर एक संकट आले. ते म्हणजे सेल्युकस निकेटरची चंद्रगुप्तावर झालेली स्वारी होय. अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर त्याच्या विशाल साम्राज्याचा ताबा मिळविण्यासाठी त्याच्या सेनापतीमध्ये संघर्ष सुरू झाला. अलेक्झांडरचे आशियात जे साम्राज्य होते त्यासाठी सेल्युकस व ॲटिगोनस यांच्यात बराच काळ युद्ध झाले व त्यामध्ये सेल्युकस निकेटरचा विजय झाला. त्याची राजधानी सिरिया होती. आपल्या राज्याची घडी नीट बसविल्यानंतर साम्राज्य विस्ताराच्या महत्त्वाकांक्षेने प्रेरीत होऊन व ग्रीकांनी गमावलेला भारतीय प्रदेश जिंकण्यासाठी इ.स. पूर्व ३०५ मध्ये आपल्या प्रचंड सैन्यानिशी भारतीय प्रदेशावर आक्रमण केले. यावेळी भारतात मौर्यांचे साम्राज्य चंद्रगुप्ताच्या अधिपत्याखाली स्थिरावले होते. यावेळी झालेल्या युद्धात सेल्युकस निकेटरचा चंद्रगुप्ताने पराभव केला. यावेळी त्याच्या नेतृत्वात संपूर्ण भारत संघटीत झाला. तसेच ग्रीकापेक्षा आपले लष्करी कौशल्य व सामर्थ्य श्रेष्ठ असल्याचे सिद्ध केले. सेल्युकस निकेटरने शरणागती स्विकारून चंद्रगुप्तांशी तह केला.

• **चंद्रगुप्त-सेल्युकस निकेटर तह (इ. पू. ३०३)**

१) सेल्युकस निकेटरने काबूल, कंदाहार, बलुचिस्तान, हेरात हे प्रांत दिले.

२) चंद्रगुप्ताला खंडणी देण्याचे मान्य केले.

३) चंद्रगुप्ताने सेल्युकसला ५०० हत्ती दिले.

४) सेल्युकस निकेटरने आपली मुलगी हेलेना हिचा विवाह चंद्रगुप्ताशी लावून दिला.

त्याने मॅगेस्थेनिस नावाचा आपला राजदूत चंद्रगुप्ताच्या दरबारी ठेवून त्याच्या बरोबर राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. या विजयामुळे मौर्यांचे लष्करी सामर्थ्य श्रेष्ठ असल्याचे सिद्ध झाले. या तहामुळे मौर्याच्या साम्राज्याच्या सीमा हिंदूकूश पर्वतापर्यंत विस्तारित झाली. डॉ. स्मिथ म्हणतात, ''भारताच्या ह्या पहिल्या सम्राटाने

हा जो प्रदेश मिळविला. तो प्राप्त करण्यात अजिंक्य असे ब्रिटिश हे असमर्थ ठरलेत तसेच यापूर्वी सोळाव्या व सतराव्या शतकात मुगल सम्राट ही हा प्रदेश कधी मिळवू शकले नाहीत.'' चंद्रगुप्त मौर्य हा एकमेव सम्राट होता की, ज्याने एवढा विस्तृत प्रदेश आपल्या साम्राज्याचा हिस्सा बनविला हे ह्या तहाचे अतिशय महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

- **दक्षिण व पश्चिम भारतातील विजय :**

चंद्रगुप्ताने सेल्युकस निकेटरचा पराभव करून भारतात सार्वभौम सत्ता निर्माण केली. त्याच्या सत्तेला विरोध करणारी कोणतीही सत्ता राहिली नव्हती. बृहत्कथाकोश कोश, भद्रबाहू चरित्र (जैनग्रंथ) जस्टीन, प्लूटार्कच्या लेखनातून आणि जुनागड शिलालेखामधून चंद्रगुप्ताने दक्षिण भारतावर स्वारी करून तो प्रदेश जिंकल्याची माहिती मिळते. अशोकाच्या शिलालेखातून दक्षिणेचा प्रदेश चंद्रगुप्तानेच जिंकल्याचे स्पष्ट होते. जैन वाङ्मयात चंद्रगुप्ताने आयुष्याच्या अखेर जैन धर्माचा स्विकार केल्याचे नमूद केले आहे. प्रसिद्ध जैनमुनी भद्रबाहूकडून चंद्रगुप्ताने जैन धर्माची दिक्षा घेतली. जैनांच्या ग्रंथाप्रमाणे आपल्या जीवनातील शेवटची वर्षे म्हैसूरमधील श्रवण बेळगोळ या ठिकाणी घालविली व तेथेच त्यांचे इ.स.पू. २९८ मध्ये निधन झाले. आजही तेथे एक जैन मंदिर, भद्रबाहु गुहा व चंद्रगुप्त बस्ती नांवाचे खेडे आहे. चंद्रगुप्ताचे साम्राज्य पश्चिमेकडे सौराष्ट्र पर्यंत पसरले होते. याची माहिती रुद्रदामनच्या जुनागड शिलालेखातील मजकुरावरून मिळते. कारण त्यात चंद्रगुप्ताचा सुभेदार पुष्यगुप्त सौराष्ट्रांत होत आणि त्याने तेथील सुदर्शन तलावाचे बांधकाम केले होते असा उल्लेख आहे.

- **चंद्रगुप्ताचा साम्राज्य विस्तार :**

आपल्या असामान्य व लष्करी सामर्थ्याने चंद्रगुप्ताने प्रचंड साम्राज्य निर्माण केले. त्याने वायव्येस हिंदुकूश पर्वतापासून आग्नेयेस बंगालच्या उपसागरापर्यंत व उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस कृष्णा नदीपर्यंत त्याने आपल्या साम्राज्याचा विस्तार केला. प्राचीन भारतात प्रस्थापित केलेले हे एकमेव विस्तारीत साम्राज्य होते. डॉ. सुधा कुसूम मुखर्जी म्हणतात की, चंद्रगुप्त हा एक विशाल साम्राज्याचा शासक होता. जश्टीन म्हणतो की, संपूर्ण भारत वर्ष चंद्रगुप्ताच्या अधिपत्याखाली होते. डॉ. स्मिथ म्हणतात की, अफगाणीस्तान, बलुचिस्तान, हिंदुकुश पर्वताचा भाग, पंजाब, उत्तर प्रदेश, काठेवाड इत्यादी चंद्रगुप्ताच्या साम्राज्याचेच भाग होते.

- **चंद्रगुप्ताची योग्यता :**

प्राचीन भारताच्या इतिहासातील पहिला श्रेष्ठ सम्राट म्हणून चंद्रगुप्ताचा उल्लेख केला जातो. एक थोर साम्राज्य संस्थापक, यशस्वी राज्यप्रशासक म्हणून भारताच्या इतिहासात त्याचे नांव अढळ आहे. म्हणून त्याची योग्यता मोठी ठरते.

**१) महान योद्धा व विजेता :**

चंद्रगुप्त शूर सेनानी, धोरणी, मुत्सद्दी व कार्यक्षम राज्यकर्ता होता. भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य युद्धातील सेनापती बनून भारतातील परकीय सत्ता नामशेष केली. धाडस व पराक्रम हे त्याच्या व्यक्तीमत्त्वाचे पैलू होते. त्याने केलेला पराक्रम व विजय त्याच्या योद्धेपणाची महती पटवतात. तो मुत्सदी सेनापती व युद्धतंत्रामध्ये पारंगत होता.

वीस वर्षाच्या अल्पावधीत बलाढ्य साम्राज्याचा वारसा निर्माण करणारा महान विजेता होता.

**२) प्रभावी व्यक्तीमत्त्व :**

चंद्रगुप्ताचे व्यक्तीमत्व अष्टपैलू होते. व्यवहार कौशल्य, मुत्सद्दीपणा, प्रसंगावधान, साहस, अचाट बुद्धीमत्ता, दूरदर्शीपणा, महत्त्वकांक्षा हे त्याचे गुण होते. विद्वानांचा व कलेचा तो भोक्ता होता. जैन धर्माभिमानी चंद्रगुप्त इतर धर्माशी सहिष्णुतने वागणारा होता. कौटील्याच्या मार्गदर्शनामुळे त्याला राजनितीचे सखोल ज्ञान प्राप्त झाले होते. मॅगेस्थेनीस चंद्रगुप्तबद्दल लिहितो की, 'तो रात्रंदिवस राज्यकारभाराची कामे करण्यात गुंतलेला असे. तो उत्तम प्रशासक होता. त्याला न्यायशास्त्र व कायद्याची जाण होती. शिपायांना आवडणारा तो महान योद्धा होता. धाडस, बुद्धीमत्ता, रसिकता, मुत्सदीपणा या सर्व गुणांनी असे अलौकिक व्यक्तीमत्त्व बनलेला तो भारत सम्राट होता.

**३) मौर्य घराण्याचा संस्थापक :**

चंद्रगुप्ताच्या पूर्वी भारतात अनेक राज्ये अस्तित्वात होती. त्यापैकी नंदाचे साम्राज्य मोठे असले तरीही त्यात स्थैर्य, शांतता व सुव्यवस्था नव्हती. अत्याचार, अराजक, कारस्थाने, यामुळे ते राज्य पोखरले होते. देशात इतर ठिकाणी घडणाऱ्या घडामोडींच्याकडे त्यांचे लक्ष नव्हते.याचाच दुष्परिणाम म्हणजे सिकंदरची भारतावर झालेली स्वारी. भारतातील अनेक भागात राजकीय अस्थिरता होती. सर्व सर्व परिस्थिती चंद्रगुप्ताने बदलून टाकली. नंद साम्राज्याचा नाश करून त्याठिकाणी सामर्थ्यशाली राज्याची निर्मिती केली. वैभवशाली मौर्य घराण्याची त्याने स्थापना केली.

**५) कल्याणकारी प्रशासक :**

विशाल साम्राज्याप्रमाणेच चंद्रगुप्ताने कार्यक्षम कल्याणकारी प्रशासन यंत्रणा कौटिल्याच्या मार्गदर्शनाखाली निर्माण केली होती. केंद्रीय प्रशासन, संरक्षण व्यवस्था, नगर प्रशासन, सचिवालय, मंत्रीपरिषद, अधिकारीवर्ग व प्रांतीय व्यवस्था ही त्याच्या राज्यव्यवस्थेची वैशिष्ट्ये होती. त्याने कार्यक्षम, एकनिष्ठ अधिकारी नेमलेले होते. सचिवालय, विविध खाती, लेखी कारभार व भरपूर कर्मचारी वर्ग ही आधुनिकतेची वैशिष्ट्ये चंद्रगुप्ताच्या शासनात दिसून येतात. त्याने प्रजेसाठी पाटबंधारे, रस्ते, दवाखाने यांची सोय करून प्रजेच्या सुखात भर घातली. शेतकऱ्यांना विहिरी, तलाव व कालव्याद्वारे पाणी पुरवठ्याची सोय केली. रुद्रदामनच्या शिलालेखावरून चंद्रगुप्ताच्या आज्ञेवरून त्याच्या सौराष्ट्र प्रांताच्या पुष्पगुप्त नावाच्या प्रांतीय अधिकाऱ्याने पर्वती नदीला बांध घालून सुदर्शन तलाव बांधल्याचे स्पष्ट हेते. शिक्षण संस्थांना राज्याकडून अनुदान मिळत असे. या व्यतिरिक्त गरीब, दु:खी, अनाथ, पिडीत यांनी शासनाकडून मदत केली जाई. अनेक विद्वानांनी त्याच्या राज्य व्यवस्थेचे कौतूक केलेले आहे.

**५) विशाल साम्राज्याचा निर्माता :**

चंद्रगुप्ताने विशाल साम्राज्याची निर्मिती शून्यातून केलेली होती. ग्रीकांचा पराभव करून परकीयांच्या सत्तेचे उच्चाटन केले. नंदराज्याचा नाश करून राजनैतिक संघटन केले. वायव्येस हिंदूकूश पर्वतापासून आग्नेयेस बंगालच्या उपसागरापर्यंत व उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस कृष्णा नदी पर्यंत त्याने आपल्या साम्राज्याचा विस्तार केला होता. नंतरच्या मोंगल व इंग्रज सत्ताधिशापेक्षा विशाल साम्राज्य चंद्रगुप्ताने निर्माण केले. प्राचीन भारतात

एवढ्या मोठ्या प्रमाणात राजकीय एकीकरण घडवून आणणारा हा सत्ताधीश होता. राष्ट्रऐक्य, राष्ट्रनिष्ठा, लोकाभिमुख शासन व परचक्रापासून मुक्तता हे राष्ट्र निर्मितीचे घटक त्याच्या कर्तृत्वात दिसून येतात. म्हणूनच त्याला ''अखंड विजयी सम्राट'' असे संबोधले जाते.

**६) महान त्यागी :**

चंद्रगुप्ताने जसे साम्राज्य मिळवले तसा त्याने त्याचा त्यागही झटकन केला. जैनधर्म स्विकारला व संसार, राजवैभव, सत्ता यांचा त्याग करून आपल्या साम्राज्याची जबाबदारी पुत्र बिंदूसारवर सोपवून चंद्रगुप्ताने वैराग्य धारण केले व तो जैन साधू समवेत कर्नाटकात श्रवण बेळगोळ येथे जाउन राहिला व त्या ठिकाणीच त्याचा मृत्यू झाला.

चंद्रगुप्त मौर्य हा प्राचीन भारतीय इतिहासातील महान सम्राट होता. भारतातील लहान लहान राज्ये नष्ट करून त्याने एक विशाल साम्राज्य निर्माण केले होते. भारतातील परकीय ग्रीक सत्तेचे उच्चाटन केले. शांतता व सुबत्ता निर्माण करणारा तो एक महान सम्राट होता. प्रजेच्या अंतर्गत व बाह्य संरक्षणाला त्याने विशेष महत्त्व दिले व प्रजाहितदक्ष राजा म्हणून गौरव प्राप्त करून घेतला. तो कल्याणकारी प्रशासक होता. धार्मिक बाबतीत सहिष्णू होता. त्याच्या कर्तबगारीचे मूल्यांकन करताना डॉ. आर. के. मुखर्जी म्हणतात की, ''भारतीय राजामध्ये चंद्रगुप्त मौर्य हा सर्वश्रेष्ठ होय. भारतीय इतिहासातील तो पहिला सम्राट होय. याच्या कर्तृत्वामुळेच याला इतिहासातील थोर व विजयी सम्राटांच्या मालिकेत स्थान द्यावे लागते.''

**ब) बिंदूसार (इ.स. पूर्व २९८ – इ.स. पूर्व २७३) :**

चंद्रगुप्तांच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा बिंदूसार गादीवर आला. त्याने किती वर्षे राज्यकारभार केला या विषयी इतिहासकारांच्यामध्ये मतभेद आहेत. पुराणानुसार त्याने २५ वर्षे राज्य केले, अशी नोंद आढळते. तर बौद्ध ग्रंथात २८ वर्षे राज्य केले अशी माहिती मिळते. ग्रीक इतिहासकार अ‍ॅथनॅक्स त्याला अमित्रघात याचा अर्थ 'शत्रूंचा नि:पात करणारा' असा उल्लेख करतो. चंद्रगुप्ताच्या कारकिर्दीप्रमाणेच बिंदूसाराच्या कारकिर्दीतही आर्य चाणक्याने त्याचा महामंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली होती. असे जैन विद्वान हेमचंद्र आणि तिबेटी इतिहासकार लामा तारानाथ यांनी म्हटले आहे. बिंदूसारने आपल्या पित्याचे विशाल साम्राज्य सुरळीत व सुनियंत्रित सांभाळले होते. बिंदूसारचा मोठा मुलगा अशोक उज्जयनी येथील राज्यपाल होता. बिंदूसारच्या काळात तक्षशीलेमध्ये बंड झाले होते. बंड मोडून काढण्याची जबादारी बिंदूसारने सुशिम या आपल्या मोठ्या मुलावर सोपविली होती. पण तो यशस्वी होऊ शकला नाही. म्हणून बिंदूसारने दुसरा मुलगा अशोक यास पाठविले. अशोकाने तेथील बंडाचा बिमोड केला व जुलमी अधिकाऱ्याला कठोर शिक्षा दिली.

बिंदूसारने पिता चंद्रगुप्त प्रमाणेच विदेशी राज्यांशी मैत्रीपूर्ण संबंध कायम राखले होते. डिमॅकस हा त्याच्या दरबारी ग्रीक वकील होता. इजिप्तचा ग्रीक राजा टॉलेमी फिलाडेल्फने डायोनिस् हा आपला वकील बिंदूसारच्या दरबारी पाठविला होता. बिंदूसारला पुष्कळ मुले होती. अशोकाने आपल्या पाचव्या शिलालेखात आपल्या बहिण भावांचा उल्लेख केला आहे. बिंदूसारच्या साम्राज्यात शांतता व सुव्यवस्था असल्याने व्यापार उद्योग धंद्यात प्रगती झाली होती. बिंदूसारचा मृत्यू इ.स. पूर्व २७३ मध्ये झाल्यानंतर त्याचा अशोक हा मुलगा मगधाच्या गादीवर बसला.

### क) सम्राट अशोक (इ.स. पूर्व २७३ ते इ.स. पू. २३६) :

अशोक हा मौर्य घराण्यातील दुसरा सर्वश्रेष्ठ सम्राट होता. जगातल्या थोर राज्यकर्त्यांमध्ये त्याची गणना होते. तो योद्धा, विजेता, शासक, धर्मप्रचारक व प्रजा पालन तत्पर राजा होता. त्याच्या कलिंग विजयामुळे साम्राज्य विस्तार पूर्ण झाला. आणि धर्मप्रसारामुळे बौद्ध धर्मास विश्वधर्माचा दर्जा प्राप्त करून देण्याचे पवित्र कार्य अशोकानेच पार पाडले. योद्धा, प्रशासक व धर्मप्रसारक ह्या तिहेरी भूमिका यशस्वीपणे निभावणारा अशोक अलौकिक पुरुष मानला पाहिजे. त्या दृष्टीने सिकंदर, सीझर, नेपोलियन, समुद्रगुप्त व अकबर ह्या महान सम्राटापेक्षा अशोक सर्वश्रेष्ठ होता. त्याच्या कालखंडापासून भारतात एक राजकीय सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक भरभराटीच्या युगाला प्रारंभ झाला. अशोकाच्या आलेखामधून त्याच्या कारकिर्दीची माहिती मिळते. त्याशिवाय अलाहाबाद प्रशस्ती, गिरनार आलेख, नागार्जून गुहालेख त्याच्या कालखंडाची माहिती पुरवितात. दीपवंश, महावंश, दिव्यावदान, अशोक वदनमाळा, राजतरंगिणी, मंजूश्री मूलकल्प, पुराणे आणि फाहिएन, ह्यु-एन-त्संग व इत्सींगच्या प्रवास वर्णनामधून अशोकाच इतिहास उपलब्ध होतो.

- **अशोकाचे पूर्व चरित्र-वारसा हक्कासाठी युद्ध :**

विविध शिलालेखाच्या आधारे अशोकाच्या चरित्रांची माहिती मिळते. अशोक हा बिंदूसार व धमी (सुभद्रांगी) यांचा पुत्र होय. बौद्ध मताप्रमाणे बिंदूसारला १०० मुले होती. त्यात सुशिम हा सर्वात जेष्ठ मुलगा होता. बिंदूसारच्या मृत्यूनंतर सुशिम हा राजा झाला. पण तो क्रूर, दृष्ट प्रवृत्तीचा, व्यसनी होता. अशोकाने सुशीम व त्यांच्या सहकार्यांना ठार मारले. तसेच आपल्या ९९ भावांना ठार मरून अशोकाने राज्य मिळवले. इ.स. पूर्व २६९ मध्ये त्याने राज्याभिषेक करवून घेतला. त्यावेळी त्याने स्वत:ला 'देवानाम प्रियदर्शी' असे बिरुद धारण केले.

- **कलिंगचे युद्ध :**

अशोकाच्या जीवनात भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारी कलिंगचे युद्ध ही घटना होय. कलिंगच्या लढाईने अशोकाचे जीवन पूर्ण बदलून गेले. कलिंग विजय त्याच्या आयुष्यातील शेवटचीच युद्धविषयक घटना ठरली. या युद्धाने अशोकाचे मत परिवर्तन होऊन सत्य व मानवता या दोन तत्त्वांची शिकवण जगाला देवून अखील मानव जातीला सुखी करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य अशोकाने खर्च केले. डॉ. भांडारकरांच्या मते कलिंग हा संपन्न प्रदेश होता. महानदी व गोदावरी नद्यांच्या दुआबातील हा समृद्ध प्रदेश होता. शेती, अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार यामुळे आर्थिक दृष्ट्या हा भाग सधन होता. अशोकाने इ.स. पूर्व २६१ मध्ये कलिंगवर आक्रमण केले. कलिंगच्या चेदीवंशीय राजांनी सम्राट अशोकाला विरोध करण्याचा प्रयत्न केला. कलिंगच्या स्वातंत्र्यप्रेमी लोकांनी आपल्या देशाच्या रक्षणार्थ लढा दिला. पण यात त्यांना यश मिळाले नाही. त्यांचा स्वाभिमानी लढा कौतुकास्पद होता. अशोकाच्या गिरनारच्या १३ व्या शिलालेखात, कलिंग युद्धाच्या दुष्परिणामातून निर्माण होणाऱ्या रोगराई व दुष्काळ यांनी लाखो माणसे मृत्यूमुखी पडली असा उल्लेख आहे. या विजयाने मौर्य साम्राज्य हिंदुकुश ते बंगाल उपसागर व हिमालय हे म्हैसूरपर्यंत विस्तारले.

- **अशोकाचे धर्म परिवर्तन :**

कलिंग युद्धातील मानवी संहार पाहून अशोकाला खूप दु:ख झाले. त्याच्या मनाला यातना झाल्या. विजयाने

तो उन्मत झाला नाही. तर अंतर्मुख झाला. यापुढे युद्ध न करण्याचा त्याने निर्धार केला. मृत लोकांबद्दल तो शोक करू लागला. यापुढे युद्ध न करण्याचा त्याने निर्धार केला. अशोकाच्या या निर्धारामुळे आक्रमणाचे युग नष्ट होऊन शांता मानवता व अहिंसा या तत्त्वाचा प्रसार करणाऱ्या नव्या युगाची सुरूवात झाली. जगाच्या इतिहासात विजयानंतर दुःखी होणारा अशोक हा पहिला सम्राट होय. यापुढे जग युद्धाने नव्हे तर प्रेमाने जिंकण्याचे अशोकने ठरविले. अहिंसेचा, दयेचा धर्म स्वतंत्र विकसित करावा हेच त्याने आपले जीवित कार्य ठरविले. अशा अवस्थेत असतानाच त्याची बौद्ध भिक्षु उपगुप्त यांच्याशी भेट झाली व तो अहिंसा प्रधान, शांतिवादी बौद्ध धर्माकडे आकर्षित झाला. डॉ. रॉयचौधरी यांच्या मते, ''कलिंग विजय भारत व मगध देशाच्या इतिहासात महत्वपूर्ण घटना आहे. यानंतर राजा किंवा सम्राट यांची साम्राज्य तृष्णा नाहीसी झाली. जीवनाचा नवीन दृष्टीकोन स्विकारला गेला.'' कलिंग युद्धानंतरच भारताच्या इतिहासात नवीन पर्वास प्रारंभ झाला. शांती व सद्‌भावनेचे युग सुरू झाले. अहिंसेच्या नीतीचा अवलंब सुरू झाला. एच. जी. वेल्स म्हणतो ''दिग्विजयी सम्राटाला अशा प्रकारे पश्चाताप झाल्याचे व विजयी होऊन लढाईपासून परावृत्त झाल्याचे उदाहरण जगाच्या इतिहासात दाखविता येणार नाही.''

कलिंगच्या युद्धानंतर अशोकाच्या जीवनात एका नवीन युगास सुरूवात झाली. धर्मविजयाचा काळ सुरू झाला. अशोकाने धर्मांतर करून बौद्ध धर्म स्विकारला. जनतेचा नैतीक स्तर उंचावून भारतीय संस्कृती व बौद्ध धर्म यांचा समन्वय साधला.

- **कलिंग विजयाचे परिणाम आणि महत्त्व :**

कलिंगच्या विजयाची घटना भारताच्या नव्हे तर जागतीक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली. हे शेवटचे युद्ध अशोकाची शत्रुत्वाची भावना नष्ट करून गेली. या युद्धाने अशोकाच्या नीती, कृती व जीवन पद्धतीत परिवर्तन झाले. त्याने बौद्ध धर्माचा स्विकार करून जगात प्रसार केला. त्याच बरोबर मौर्यांच्या राजकीय व लष्करी सामर्थ्याला त्यामुळे ओहोटी लागली.

- **अशोकाचे हृदय परिवर्तन :**

अशोकाला युद्धातल्या संहाराचा पश्चाताप झाला व त्याचे हृदयपरिवर्तन घडून आले. हिंसक, आक्रमण व महत्त्व कांक्षी अशोक समंजस दयाळू व कल्याणकारी सम्राट बनला. विजयानंद ऐवजी त्याने पश्चाताप व्यक्त केला.

- **साम्राज्य विस्ताराचा त्याग :**

हृदय परिवर्तन झाल्याने अशोकाने युद्ध व साम्राज्य विस्ताराचा त्याग केला. शेजारी राज्यांशी मैत्रीचे संबंध ठेवले. जनकल्याण, धर्मप्रसार, मानवतावादी सेवेला प्रारंभ केला.

- **बौद्ध धर्माची दीक्षा घेतली :**

युद्धानंतर अशोकाची उपगुप्त नावाचा बौद्ध पंडितांशी भेट झाली. त्यांच्या अहिंसावादी विचारांमुळे अशोक प्रभावीत झाला आणि बौद्ध धर्माची दिक्षा घेतली. धर्मप्रसारासाठी त्याने विविध उपाय योजले व धर्मप्रसाराला गती प्राप्त झाली.

- **राजर्षि अशोक :**

बौद्ध धर्माचा स्विकार अशोकाने केल्यानंतर तो स्वत: अहिंसावादी बनला. सम्राट असूनही एखाद्या साधुप्रमाणे तो जीवन व्यतीत करू लागला. तो भिक्षु प्रमाणे जीवन जगू लागला. युद्ध, शिकार, मांसाहार, उत्सव, जैन विलास, नृत्य संगीत इ. गोष्टीचा त्याग केला. ऋषीतुल्य जीवन जगणारा सम्राट 'राजर्षि अशोक' झाला. त्याच्या आयुष्यातील हा बदल म्हणजे कलिंग घटनेचाच परिपाक होता.

- **जिवीत व वित्तहानी :**

कलिंग युद्धात सुमारे चार ते पाच लक्ष माणसांचे जीवन उध्वस्त झाले आणि प्रचंड संपत्तीचा विध्वंस झाला. ही अशोकाच्या आयुष्यातील भयावह घटना ठरली.

- **साम्राज्य विस्ताराचे कार्य पूर्ण झाले :**

कलिंगच्या विजयाने साम्राज्यवादाची प्रक्रिया पूर्ण झाली. संपूर्ण भारतावर मौर्यांची एकछत्री सत्ता प्रस्थापित झाली. कलिंगसारखा सुपीक प्रदेश ताब्यात आल्याने समृद्धीत भर पडली.

- **बौद्ध धर्माचा प्रसार :**

कलिंग युद्धानंतर अशोकाचे हृदय परिवर्तन झाले व त्याने बौद्ध धर्माचा स्विकार केला. आपले संपूर्ण आयुष्य बौद्ध धर्मासाठी खर्ची घातले. बौद्ध धर्म राजधर्म बनविला. बौद्धधर्माचा प्रसार भारत व भारताच्या बाहेर विस्तारीत केला.

- **सांस्कृतिक भरभराट :**

कलिंग देश मौर्य साम्राज्यात समाविष्ठ झाल्याने राज्याच्या आर्थिक समृद्धीत भर पडली. त्यामुळे देशात शांतता, संपन्नता व सांस्कृतिक भरभराटीच्या युगाला प्रारंभ झाला.

- **आर्थिक परिणाम :**

काही विद्वानांच्या मते अशोकाने धर्मप्रसार व जनकल्याणासाठी भरमसाठ पैसा खर्च केला. राज्याची तिजोरी रिकामी झाली. पुढील काळात परिस्थिती कठीण होत गेली. हा कलिंग विजयाचा दुरगामी अप्रत्यक्ष परिणाम होता.

- **मौर्य साम्राज्यास ओहोटी :**

अशोकाच्या अहिंसावादी धर्मप्रसारामुळे व सैनिकांचे क्षात्र तेज नष्ट होत गेले. लष्कराचा धर्मप्रसारासाठी वापर केला. परकीय आक्रमकांशी मुकाबला करण्याचे धैर्य त्यांच्यात राहिले नाही. परिणामी मौर्य साम्राज्याचा ऱ्हास झाला. अप्रत्यक्षपणे कलिंग विजय व अशोकाचे धार्मिक धोरण त्यास कारणीभूत ठरले अशी आशयाची मते विद्वानांनी व्यक्त केलेली आहेत.

● **स्वयं अध्ययन प्रश्न –१**

**अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) .............. हा मौर्य घराण्याचा संस्थापक होता.

अ) चंद्रगुप्त  ब) समुद्रगुप्त  क) बिंदूसार  ड) अशोक

२) मौर्य व नंद यांच्यातील युद्धाचे वर्णन ................ या बौद्धग्रंथात आहे.

अ) कौमुदी महोत्सव  ब) मिलिंदपन्हो  क) दिव्यावदान  ड) दीपवंश

३) ............. हा चंद्रगुप्ताच्या दरबारात राजदूत होता.

अ) सेल्यकस निकेटर  ब) मॅगेस्थेनीस  क) मिनँडर  ड) डिमॅकस

४) ............. शिलालेखातून चंद्रगुप्ताने दक्षिण भारतावर स्वारी केल्याचे माहिती मिळते.

अ) जुनागड  ब) भालकी  क) भाब्रु  ड) नागार्जुन

५) सम्राट अशोकाच्या कलिंगच्या युद्धाची माहिती ............ येथील शिलालेखात मिळते.

अ) सारनाथ  ब) गिरनार  क) बैराट  ड) नंदनगड

### ४.२.२ विभाग दुसरा : अशोकाचा धम्म :

अशोकाच्या धार्मिक धोरणाविषयी विविध मतप्रवाह प्रचलित आहेत. अशोकाचे धार्मिक धोरण सहिष्णतेचे व सर्वसमावेशक होते. कलिंग युद्धानंतर अशोकाने भौतीक विजयाचा त्याग करून नैतिक, धार्मिक व अध्यात्मिक विजयाला सुरूवात केली. अधिकृतपणे बौद्ध धर्माचा त्याने स्विकार करून जागतिक पातळीवर एक वेगळा विश्वधर्म प्रस्थापित केला. त्यासच 'अशोकाचा धम्म' असे म्हणतात. त्याने आपल्या धम्म प्रचारासाठी विशिष्ठ यंत्रणा निर्माण केली. देशात व देशाबाहेर ही धम्म प्रसाराची व्यवस्था निर्माण केली. त्यामुळे धर्मप्रचार कार्यास मोठी गती मिळाली. अशोकाच्या या प्रयत्नामुळेच बौद्ध धर्म जागतीक धर्माच्या पदास पोहोचला.

● **अशोकाच्या धम्माचे स्वरूप :**

अशोकाच्या धम्माचे स्वरूप त्याच्या आलेखातून स्पष्ट होते. पूर्वायुष्यात अशोक पूर्वजाप्रमाणे महत्त्वाकांक्षी, युद्धप्रिय व आक्रमक होता. त्याचे आजोबा (चंद्रगुप्त) जैन धर्मानुयायी होते. वडील बिंदूसार शिवोपासक होते. अशोक ही सुरूवातीला शिवाचा उपासक होता. कल्हणाने राजतरंगिणी या ग्रंथामध्ये या विषयी उल्लेख केलेला आहे. कलिंग युद्धातील प्रचंड जिवित हानीने अशोकाच्या मनावर परिणाम झाला. त्यामुळे अशोक अहिंसा प्रधान शांतीवादी बौद्ध धम्माकडे वळला. त्याने धम्म यात्रा करून धम्माचा प्रसार देशी विदेशी केला. अनेक बौद्ध तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. आपल्या आलेखामधून स्वत:चा धार्मिक दृष्टीकोन स्पष्ट केला. अशोकाचा धम्म व्यक्तीच्या आचरणावर व नितीमत्तेवर आधारलेला होता. प्रजाहित व मानवता ही त्याच्या धम्माची उद्दिष्ट्ये होती. अशोकाचा धम्म सार्वभौम धर्म म्हणून ओळखला जातो. कारण हा धम्म कोणताही विशिष्ट धर्म किंवा संप्रदाय

नव्हता. औपचारिक धार्मिक श्रद्धेने केलेली सत्कृत्ये तो मानीत नाही. सामाजीक नीतीला धरून वागणे असे अशोकाचे धम्माबद्दल मत होते. सामाजातील सामाजिक संघर्ष व असहिष्णूता कमी करणे हे अशोकाचे ध्येय धम्माच्या पाठीमागे होते. त्याच्या तिसऱ्या आलेखात तो म्हणतो, गुरु, माता पित्यांची सेवा करा, मित्र, परिचित, आप्तेष्ट, ब्राम्हण, श्रमण व भिक्षुशी औदार्याने वागा. प्राणीहत्या, साठेबाजी व उधळपट्टी करू नका असा उपदेश केला. सातव्या, नवव्या, दहाव्या व बाराव्या आलेखात त्याने आपले विचार व्यक्त केले होते. सर्व पंथीयांनी एकत्र रहावे. दास, नोकर, सेवकांशी संयमाने वागा. सर्व पंथातील चांगल्या गोष्टीचा आदर करा व त्या आत्मसात करा. बोलण्यावर संयम ठेवा व दुसऱ्या धर्माची निंदा करू नका, अहिंसा व भूत दयेचे पालन करा. सत्कर्म, दया, दान, सत्य, पावित्र्य, निष्पापता, दातृत्व, मार्दव, आज्ञापालन, आत्मपरीक्षण, धर्मप्रेम व पांपभिरूता व सद्‌गुणांचा विकास घडवा. असा धर्मोपदेश करून अशोकाला विविध धर्मपंथातील मतभेद मिटवावयाचे होते सर्व धर्म संप्रदायातील चांगल्या नीतीमूल्यांचे एकत्रीकरण करून सर्वसमावेश मानवतावादी धम्माची त्याला प्रस्थापना करावयाची होती. अशोकाची धर्म सहिष्णूता, सर्वसमावेशकता व लोककल्याणाची तळमळ, जन कल्याण, वैश्विकदृष्टी, धर्मनिष्ठीत आदर्श राज्य, नीतीमूल्ये, सदाचरण, अहिंसा, आचार धर्म व मानवतावाद हे अशोकाच्या धम्माचे भक्कम आधार स्तंभ होते. थोडक्यात अशोकाचा धम्म, पंथीय भावनेची कक्षा ओलांडणारा वैश्विक दृष्टीचा पुरस्कार करणारा आणि मानव धर्माची प्रस्थापना करणारा होता.

- **अशोकाच्या धम्माची तत्त्वे :**

अशोकाच्या धम्माची तत्त्वे सर्व धर्म पंथातील लोकांना मान्य होण्यासारखी होती. त्याचा धम्म प्रजेचा मानसिक स्तर उंचावेल असा होता. त्याने आपल्या धम्मामध्ये व्यक्तीच्या आचरणावर व नितिमत्तेवर अधिक भर दिला. साम्राज्य विस्तार धोरणाचा त्याग करून नवीन धर्म विजयाचे धोरण त्याने अंमलात आणले. प्रजेची मते प्रेमाने जिंकूनच आपल्या धर्माचा प्रसार होवू शकतो. याची अशोकाला खात्री पटली व त्याने धर्मविजयाचे धोरण आखले. लोकांना सांगितलेली धर्म तत्त्वे त्याने स्वत:च काटेकोरपणे स्वत:च्या आचरणात आणली म्हणून त्याला बौद्ध सम्राट आणि त्याच्या कालखंडाला बौद्ध कालखंड म्हणून ओळखले जाऊ लागले. धम्म धोरणाचा प्रचार करताना त्याने धर्मयात्रा काढल्या. उच्च नितीमत्तेविषयी लोकांना उपदेश करणे व धम्माची ओळख करून देणे हा हेतू होता. त्याचा धम्म एखादी विशिष्ठ धर्मप्रणाली नव्हेती. परंतु एखाद्या जाती धर्मापासून स्वतंत्र असलेला नैतिक कायदा होता. त्याच्या निम्या अधिक आज्ञा धम्म आचरणात कसा आणावा याचा व्यवहारिक मार्ग सांगतात. अशोकाच्या धम्म तत्त्वाची तत्त्वे कोणत्याही धर्मपंथाच्या व्यक्तीस समजपणे आचरणात आणण्यासारखी सोपी होती. अशोकाने बौद्ध धर्माचा स्विकार केल्यानंतर पाटलीपुत्र येथे बौद्ध धर्मपरिषद भरवून बौद्ध धर्माची काही मूलतत्त्वे मान्य करणयात आली. तसेच अशोकाने ७ व्या शिलालेखातून काही आदर्श तत्त्वांचे पालन करण्याची शिकवण जनतेला दिली.

१) सुश्रूषा २) आज्ञापालन, ३) दया, ४) दान, ५) अहिंसा, ६) सत्य, ७) संयम, ८) स्वार्थत्याग, ९) निष्पापवृत्ती भावशुद्धी, १०) प्रेम, ११) पावित्र्य, १२) सत्कर्म, १३) धर्मप्रेम.

अशोकाच्या धम्माचे नियम हे शुद्ध वागणुकीचे नियम होते. सर्व धर्मातील श्रेष्ठ तत्त्वांचे सार म्हणजे अशोकाचा धम्म होय. आपल्या धम्माला अशोकाने व्यवहारी धर्माचे स्वरूप देवून विश्वधर्म बनविले. भाब्रु

आलेखात बुद्ध, धम्म, व संघाप्रती याने आदर व्यक्त केला होता. मस्की व इतर आलेखात 'देवानाम प्रिय अशोक' व 'देवानाम प्रियदर्शी' असे उल्लेख आहेत. अशोकाच्या सार्वभौम धर्माच्या वैशिष्ट्यामुळे त्याला मोठ्या प्रमाणावर अनुयायी व लोकप्रियता मिळाली. जगाच्या इतिहासात शस्त्राच्या बळावर जग जिंकणारे अनेक सत्ताधीश निर्माण झाले. तथापि धार्मिकतेच्या व नैतिक आचरणाच्या नियमाच्या बळावर जग जिंकण्याचा प्रयत्न करणारा एकमेव सम्राट अशोक होता.

- **अशोकाच्या धम्माची वैशिष्ट्ये :**

१) विश्वधर्म - सर्व धर्म एकच आहेत. फक्त त्यांची नांवे वेगळी आहेत.

२) सहिष्णुता - सर्व धर्मियांनी परस्परांशी सहकार्याने व प्रेमाने वागावे.

३) अहिंसा - विनाकारण व अकारण हिंसा थांबवावी. मनुष्य, पशुपक्षी हत्येस बंदी घालावी.

४) नैतिकता - व्यक्तीने नेहमी युद्ध आचरण व विचार करावा. माणसाने माणसांवर प्रेम करावे.

५) वास्तविकता - वरील तत्त्वांचे पालन करणे व सद्‌विवेक बुद्धीने व व्यवहारिक हित पाहून सामुदायिक कल्याणाचा विचार करून कृती करावी.

- **अशोकाचे धर्मप्रसाराचे कार्य :**

अशोकाने सैन्यबळावर जग जिंकण्याऐवजी धर्मबळावर जग जिंकण्याची इच्छा बाळगली. त्याच्या या हेतूमुळेच बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी सहाय्य लाभले. अशोकाने आपल्या साम्राज्यात व साम्राज्याबाहेर धर्मप्रसार करणेसाठी विविध उपक्रम राबविले. बौद्ध धर्माला राजाश्रय दिला. त्याच्या प्रयत्नामुळेच बौद्ध धर्म जगातील प्रमुख धर्म बनला. त्याने धर्म प्रसारासाठी अनेक उपाय योजना राबविल्या.

**१) बौद्ध धर्मास राजाश्रय :**

अशोकाने बौद्ध धर्मास राजाश्रय दिला. बौद्धधर्माच्या प्रचासाठी त्याने आपली शासन यंत्रणा राबविली. त्याच्या प्रयत्नामुळेच या धर्माचा प्रसार सर्वत्र झपाट्याने झाला.

**२) धर्मविभाग :**

अशोकाने आपल्या राज्यात धर्मप्रसारासाठी प्रांतवार विभागणी करून त्यावर अधिकाऱ्यांची नेमणूक केली. धर्ममहामात्र अशा स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. प्रजेमध्ये नितीधर्माचा प्रचार करण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपविली. स्त्री वर्गाच्या उन्नतीसाठी खास 'स्त्री महामात्र' नावाच्या स्वतंत्र अधिकारी नेमल्या. तसेच प्रादेशिकयुक्त, प्रतिवेदक, नगरव्यावहारिक या अधिकाऱ्यांची त्या-त्या विभागात धर्मप्रसाराची जबाबदारी सोपवली.

**३) धर्मपरिषदेचे आयोजन :**

बौद्ध धम्माच्या प्रचारासाठी अशोकाने इ.स. पूर्व २४० मध्ये पाटलीपुत्र येथे तिसऱ्या बौद्ध धर्म परिषदेचे आयोजन केले होते. मोगलीपुत्र तिस्स या सभेचे अध्यक्ष होते. यावेळी बौद्ध धर्मीयातील मतभेद मिटविण्याचा प्रयत्न

करण्यात आला. तसेच त्रिपटकावर आधारीत भाष्य करणारा 'महाविभाषा' ग्रंथ निर्माण करण्यात आला.

**४) धर्मयात्रा :**

बौद्ध धर्मातील अहिंसेच्या विचारांनी अशोक प्रभावीत झाल्यामुळे त्याने बौद्ध तिर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. अशोकाने गया, सारनाथ, सांची, कोशांबी, पावा, कुशीनगर, लुंबीन ग्राम, कपिलवस्तू अशा स्थळांना भेटी दिल्या.

**५) धार्मिक सभा व चर्चा :**

अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी ठिकठिकाणी सभा, संमेलन, चर्चासत्रे, वादविवाद इत्यादींचे आयोजन करून बौद्ध धर्माबद्दलची आत्मीयता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**६) धर्मदूतांची नेमणूक :**

अशोकाने धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी साम्राज्यात व साम्राज्याबाहेरील प्रदेशात धर्मदूत पाठविले. आपला मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा यांना त्याने नेपाळ व श्रीलंकेला पाठविले. सिरियाचा राजा ॲटोगोनस दुसरा, इजिप्तचा राजा टॉलेमी दुसरा, मॅसिडोनियाचा ॲन्टीगॉनस, सिरीनचा राजा मॅगास, एपिरसचा राजा अलेक्झांडर या सर्वांनी अशोकाच्या धर्माचा स्विकार केला.

याशिवाय अशोकाने बौद्ध धर्म प्रसार करण्यासाठी बौद्ध भिक्षुंना विविध देशामध्ये पाठविले ते पुढीलप्रमाणे होते.

| देश | प्रमुख भिक्षु |
|---|---|
| काश्मीर आणि गंधार | मध्यान्तिक |
| महिशमंड - म्हैसूर | महादेव |
| वनवासी - उत्तर कर्नाटक | रक्षित |
| अपरान्त - कोकण | योगक धम्म-रक्षित |
| महाराष्ट्र | महाधर्म रक्षित |
| यवन देश | महारक्षित |
| हिमवंत | मज्झिम व कस्सप |
| सुवर्ण भूमी ब्रह्मदेश | शोण व उत्तर |
| श्रीलंका | महेंद्र |

कोणताही राजकीय किंवा आर्थिक हेतू न ठेवता जगातील मानवांचे नैतिक उत्थापन करण्यासाठी अशोकाने धर्म प्रसाराचे कार्य केले.

**७) लोककल्याणकारी योजना :**

अशोकाने आपल्या प्रजेच्या मनात बौद्ध धर्माविषयी आस्था निर्माण व्हावी व त्यांनी स्वेच्छेने बौद्ध धम्माचा प्रचार करावा या हेतूने लोककल्याणाची असंख्य कामे सुरू केली. प्रवाशांच्या सोयीसाठी रस्ते बाधले. दुतर्फा झाडे लावली. विहीरी खोदल्या, धर्मशाळा बांधल्या, माणसांच्यासाठी व पशुंच्यासाठी मोफत दवाखाने, औषधी वनस्पतीच्या बागा, तलाव बांधले, शिक्षणाला प्रोत्साहन दिले.

**८) धर्मप्रचारासाठी विहार स्तुपांची निर्मिती :**

अशोकाने देशात धर्माच्या प्रसारासाठी अनेक विहार व स्तूपांची निर्मिती केली. विहारात राहून बौद्ध भिक्षू धर्माचे अध्ययन व अध्यापन करीत. या सर्वांची धर्मप्रसारासाठी चांगली मदत झाली.

**९) स्तंभालेख व शिलालेख :**

अशोकाने धर्माच्या प्रचारासाठी देशात ठिकठिकाणी शिलालेख व स्तंभालेख कोरून त्याद्वारे धर्माज्ञा, धर्मतत्त्वे, नितीतत्त्वे, राजाज्ञा इ. आदर्श तत्त्वांचा प्रसार केला.

**१०) पाली भाषेचा स्वीकार :**

धर्म प्रसार व साहित्य निमितीसाठी पाली भाषेचा स्वीकार केला.

- **अशोकाच्या धम्माचे मूल्यमापन :**

अशोकाचा धम्म सार्वभौम म्हणून ओळखला जातो. त्याच्या प्रचारामुळे बौद्ध धर्माला त्याने विश्वधर्म बनविला. या धर्माला लोकप्रियता मिळवून दिली. साम्राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित झाली. काही विद्वानांच्या मते, परंतु काही वाईट परिणाम ही झाले. अशोकाने अहिंसेचा पुरस्कार केल्यामुळे क्षात्रवृत्तीचा ऱ्हास झाला. सैन्याची लष्करी परंपरा खंडीत झाली. शासक अहिंसक व दुबळे बनले. त्यातच परकीय आक्रमणे झाली. त्यामुळे मौर्य सत्तेचा नाश झाला.

- **अशोकाचे शिलालेख :**

अशोकाच्या शिलालेखामधून अशोकाच्या कारकिर्दीची माहिती मिळते. शिलालेख हे पहाडावर, दगडी स्तंभावर कोरलेले आहेत. हे शिलालेख इतिहासाचे अत्यंत महत्त्वाचे साधन आहेत. इ.स. १७५० मध्ये मीरत जवळील एका निर्जन ठिकाणी एका ख्रिस्ती धर्मप्रसारकाला अशोकाच्या पहिल्या आज्ञेचा शिलालेखाचा शोध लागला. इ.स. १८७५ मध्ये बाराबार आणि नागार्जुन टेकड्यांमध्ये जे. एच. हटिंग्टन यांना असाच शिलालेख आढळला. गिरनार येथे इ.स. १८२२ मध्ये टॉड यांना शिलालेख सापडला. तर एका फ्रेंच अधिकाऱ्याला भारतातील वायव्य भागातील शहाबाजगड येथे शिलालेख आढळले होते. १९०५ मध्ये ऑर्टल यांना सारनाथ स्तंभावरील शिलालेख सापडला. दक्षिण द्वीपकल्प, पश्चिम आणि वायव्य भारत तसेच काबूल, कंदाहार, हिंदूकुश पर्वत इत्यादी प्रदेशामध्ये अशोकाचे अनेक शिलालेख सापडले आहेत. भारतामध्ये सापडलेले सर्व शिलालेखांचे लेखन प्राकृत भाषेतून केलेले आहे. काही शिलालेख खारोष्ट्री व ब्राह्मी लिपीत कोरलेले आहेत. इ.स. १८०१ पर्यंत सापडलेल्या अशोकाच्या शिलालेखांची पहिली आवृत्ती एशियाटिक रिसर्चमध्ये प्रसिद्ध

झाली आहे. जेम्स प्रिन्सेप यांनी १८३७ मध्ये दिल्ली-टोपरा स्तंभावरील ब्राम्ही आलेखाचा अनुवाद केला. इ.स. १८४० मध्ये नॉरिस यांनी शहाबाजगड शिलालेखावरील खारोष्ट्री लिपीचा अर्थ लावला होता. अशोकाच्या सर्व आलेखाच्या अस्सल आवृत्ती उपलब्ध आहेत.

- **अशोकाच्या शिलालेखाचे वर्गीकरण :**

शिलालेख, स्तंभालेख व गुहालेख असे आलेखाचे तीन भाग असून या शिलालेखातून सत्य, अहिंसा, भूतदया व परोपकार व सदाचार इत्यादी तत्त्वांची शिकवण दिली आहे. त्याच बरोबर अशोकाने केलेली जनकल्याणाच्या कामाची माहिती दिली आहे. अशोकाच्या शिलालेखांची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) छोटे शिलालेख (इ.स. पूर्व २५७) :**

रायचूर जिल्ह्यातील भालकी येथे सापडलेल्या शिलालेखात अशोक हे नाव कोरलेले आहे. कर्नाटक, आंध्रप्रदेश, बिहार, राजस्थान, उत्तर प्रदेश, दिल्ली इ. अनेक राज्यात छोटे शिलालेख सापडले आहेत. या शिलालेखातून अशोकाच्या धार्मिक व वैयक्तिक जीवनावर प्रकाश टाकला आहे.

**२) भाब्रू शिलालेख (इ.स. पूर्व २५७) :**

हा शिलालेख कोलकत्याजवळील बैराट टेकडी वरील एका प्रचंड कातळावर कोरलेला आहे. या शिलालेखाची सुरूवात बौद्ध त्रिरत्नांच्या नमनाने केली असून त्यानुसार जनतेने आपले दैनंदिन जीवन कसे व्यक्त करावे असे आदेश कोरलेले आहेत.

**३) चौदा शिलालेख (इ.स. पूर्व २५६) :**

अशोकाने दिलेल्या राजाज्ञा या शिलालेखात कोरलेल्या आहेत. या शिलालेखावरून अशोकाच्या मूळ धर्माचे तत्त्वज्ञान स्पष्ट होते. त्याच बरोबर अशोकाची राज्यव्यवस्था आणि स्वत:चे आचरण या विषयीची मिळकते.

**४) दोन कलिंगचे शिलालेख :**

अशोकाच्या मनात जनतेविषयी असणारी तळमळ यातून स्पष्ट होते. सर्वांनी बंधुभावाने व शांततेने रहावे असा उपदेश त्याने केलेला आहे.

**५) तीन गुहा स्तंभालेख (इ.स. पूर्व २५७ ते २५०) :**

बाराबार आणि नागार्जून येथील टेकड्यावरील गुहालेखातील लिहलेल्या मजकूरावरून अशोकाचे धार्मिक सहिष्णुतेचे महत्त्व कळते. या गुहा अशोकाने आजीवक पंथास अर्पण केल्याची नोंद आहे.

**६) दोन तराई स्तंभालेख :**

रुमिंदेई (नेपाळ) व निगलिव (तराई नेपाळ) या भागात सापडलेल्या या दोन तराई स्तंभालेखात अशोकाने गौतम बुद्धाच्या जन्मस्थळाला दिलेली भेट बौद्धतीर्थस्थाने व यात्रा याविषयी विशेष माहिती मिळते.

**७) सात स्तंभालेख :**

सात स्तंभालेखापैकी दोन टोपरा (पंजाब) व मीरत (उ.प्र.) एक अलाहाबाद (उ.प्र.) व इतर चार लौरिय-अरराज, लौरिय-नंदनगड, रामपूर्व (बिहार) येथे आहेत. या लेखातून अशोकाने धर्माच्या प्रचारासाठी कोणते उपाय योजले हे स्पष्ट होते.

**८) छोटे स्तंभालेख :**

बौद्ध धर्मातील मतभेद दूर करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती या स्तंभालेखातून मिळते.

- **अशोकाच्या आलेखांचे ऐतिहासिक महत्त्व :**

इ.स. पूर्वीच्या सहाव्या शतकाच्या पूर्व काळापासून भारतीयांना लेखन व वाचनाची कला अवगत होती. अशोकाच्या काळात संस्कृत भाषा, ब्राम्ही लिपी, प्राकृत भाषा आणि खारोष्टी लिपी मोठ्या प्रमाणात विकसीत झाल्या. मुद्रणकलेचा शोध लागलेला नसतानाही आपल्या धर्म विषयक कल्पनांचा प्रचार करण्यासाठी त्याने दगडी स्तंभ, पर्वत, गुहा या माध्यमांचा उपयोग करून बौद्ध धर्माचा प्रसार केला. अशोकाच्या शिलालेखाचे ऐतिहासिक महत्त्व पुढीलप्रमाणे हाते.-

१) शिलालेखातून अशोकाची कारकिर्दीची निश्चित माहिती मिळते.

२) शिलालेख ज्या भागात सापडले त्यावरून मौर्याच्या राज्याच्या सीमा निश्चित करणे शक्य होते.

३) कलिंग युद्धाची माहिती मिळते.

४) शिलालेखातून अशोकाच्या राज्यातील सामाजीक, राजकीय, आर्थिक परिस्थितीची माहिती मिळते.

५) अशोकाच्या काळातील घटना, व्यक्तीमत्त्व, अशोकाचे चरित्र, बौद्धधर्माचा स्विकार, कार्य, धर्मकल्पना, प्रजेच्या कल्याणाकरीता राबविलेल्या योजना, बौद्धधर्माचा प्रसार, कला स्थापत्य क्षेत्रातील प्रगती इत्यादी माहिती शिलालेखातून मिळते.

अशोकाच्या शिलालेखावरून प्राचीन भारताच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ सम्राट, शासन कुशल, धोरणी व सर्वोत्तम शासकापेक्षा वेगळा असा अशोक व त्याच्या विविध कार्याची माहिती मिळते.

- **अशोकाची योग्यता :**

जगाच्या इतिहासात अनेक कर्तबगार राजे होऊन गेले. त्यामध्ये अशोकाचे स्थान अद्वितीय आहे. एक महान सम्राट, धाडसी योद्धा, उत्तम प्रशासक, बौद्ध धर्माचा आश्रयदाता व प्रसारक, जनकल्याणकारी, आदर्श राजा होता. म्हणूनच इतिहासकारांनी 'सर्वश्रेष्ठ राजपुरुष' ह्या शब्दात अशोकाचा गौरव केलेला आहे. अशोकाच्या थोरपणाचे रहस्य त्याच्या अजोड कर्तृत्वात दिसून येते

**१) महान सेनापती व आदर्श विजेता :**

कलिंग विजयानंतर अशोकाने साम्राज्य विस्ताराची प्रक्रिया पूर्ण केली. त्यातून त्याच्या युद्ध कौशल्याची खात्री पटते. म्हणून तो महान सेनापती, विजेता व योद्धा असल्याचे सिद्ध होते. त्याचा कलिंगचा विजय, दिग्वीजय व धर्म विजय ही होता. त्याच्या कारकिर्दीत त्याला कोणतीही राजकीय सत्ता आव्हान देणारी नव्हती त्याचे सैनिक व राजकीय सामर्थ्य अफाट होते.

**२) कुशल प्रशासक :**

अशोक हा उत्तम प्रशासक होता. त्याने स्वत:च्या शुद्ध आचरणाद्वारे प्रजेपुढे एक आदर्श ठेवला. प्रशासनाची संपूर्ण यंत्रणा व शक्ती त्याने प्रजेच्या कल्याणासाठी राबविली. दिवसाच्या कोणत्याही प्रहरी त्याच्यापुढे स्वत:च्या तक्रारी मांडण्याची प्रजेला मुभा होती. प्रमाणिक-निस्वार्थी प्रेमळ व निरुपद्रवी अधिकारी शासनात नेमले. त्याने प्रजेची भौतिम व धार्मिक उन्नती साधण्याचा प्रयत्न केला. अशोकाने आपल्या शासन प्रणालीत नैतिकता निर्माण करून लोकाभिमुख कल्याणकारी शासनाचा आदर्श अशोकाने घालून दिला.

**३) असामान्य व्यक्तिमत्व :**

सर्व सद्‌गुणांचा सुरेख संगम अशोकाच्या व्यक्तीमत्त्वात झालेला होता. साधेपणा, शुद्ध चारित्र्य, पावित्र्य त्यागी वृत्ती, न्यायप्रियता, शांततावादी, अहिंसेचा तो पुजारी होता. अशोकाचे व्यक्तीमत्त्व निर्दोष, सर्वांगपरिपूर्ण होते. म्हणूनच स्मिथ, एच. जी. वेल्स, भांडारकर, मुजूमदार, मुखर्जी व रायचौधरी सारख्या विद्वानांनी 'जगातील सर्वश्रेष्ठ थोर सम्राट' म्हणून त्याचा गौरव केलेला आहे.

**४) धार्मिक सहिष्णूता :**

अशोक श्रेष्ठधर्मप्रसारक होता. स्वत:च्या मानवतावादी धर्माप्रमाणेच बौद्धधर्माचा भारतात व जगात प्रसार करण्याचा त्याने प्रयत्न केला. धर्मप्रसार करत असताना. इतर धर्मियांना सुद्धा सहिष्णूतेने वागविले. त्याने ब्राह्मणांना दाने दिली. धार्मिक सहिष्णूता कायम ठेवून धर्मप्रसाराचे अवजड कार्य त्याने सहजपणे पार पाडले. अशोकाच्या धर्मप्रसारात इर्षा, अहंकार, मत्सर किंवा धर्मवेडेपणाचा लवलेशही नव्हता. म्हणूनच बाराव्या शिलालेखात तो म्हणतो, 'देवतांचा प्रिय प्रियदर्शी राजा सर्व धर्माबद्दल आदराची भावना बाळगतो.''

**५) राष्ट्रीय ऐक्याचा थोर शिल्पकार :**

अशोकाने आपल्या विशाल साम्राज्यात राजकीय सुसूत्रता निर्माण केली. सर्व शिलालेखाचे लेखन करीत असताना पाली भाषेचा वापर करून भाषिक एकात्मता व त्याद्वारे राजकीय एकात्मता निर्माण करणारा तो पहिला भारतीय राजा होता. संपूर्ण साम्राज्यात एक शासन, एकन्याय, एकधर्म लागू करणारा राष्ट्रीय ऐक्य निर्माण करणारा राष्ट्रीय ऐक्याचा थोर शिल्पकार होता.

**६) महान आदर्शवादी :**

अशोकाने राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जीवनात अशा आदर्शाची मुहूर्तमेढ साधली. अशोक

राजकीय जीवनात लोकशाहीचा पुरस्कार करणारा होता. समता, बंधुता या उदात्त व पवित्र तत्त्वाचे आचरण करणारा अशोक जगातील एकमेव द्वितीय सम्राट होता.

**७) प्रजावत्सल :**

अशोकाने आपल्या प्रजेवर पुत्रवत प्रेम केले होते. प्रजेच्या कल्याणासाठी त्याने अनेक कल्याणकारी योजना राबविल्या होत्या. प्रजेची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी तो साम्राज्यभर दौरे काढीत असे. प्रजा सुखी तर राजा सुखी हा त्याच्या प्रशासनाचा मंत्र होता.

**८) सुसंस्कृत :**

अशोक हा एक सुसंस्कृत सम्राट होता. त्याच्या काळात विविध स्थापत्य कलेची निर्मिती झाली. भवन, स्तुप, विहार, स्तंभ, अभिलेख इत्यादीची निर्मिती त्याच्या काळात मोठ्या प्रमाणात झाली. धर्मप्रसाराच्या योगाने स्थापत्य कलेला राजाश्रय देऊन भारतीय संस्कृती कला साहित्य इत्यादींचा जगात प्रसार केला. डॉ. त्रिपाठी म्हणतात, ''अशोकाचे अभिलेख म्हणजे त्याच्या मनाचा, अंतर्मनाचा आरसा आहे.''

**९) धर्मपरायण :**

अशोक, कलिंगयुद्धानंतर बौद्ध संघाला शरण गेला. स्वतःच्या जीवनात ऐहिक सुखांचा त्याग करून संसारात राहून त्याने संन्यासी जीवन स्विकारले. बौद्ध धर्म त्याने कुणावरही लादला नाही. त्याच्या धर्मात सर्व धर्मातील चांगल्या तत्त्वांचा समावेश असल्याने त्याच्या धर्माला कुणाचा विरोध झाला नाही. म्हणून त्याच्या धर्माचा जगातील बऱ्याच मोठ्या भागात प्रसार झाला.

**१०) महान जनसेवक :**

अशोकाने प्रजेच्या सुखसोयीसाठी रस्ते, विहीर, दवाखाने, धर्मशाळा, विश्रामगृह, दान-गृह इत्यादींची निर्मिती केली. पशुहत्या, मदिरापन, नृत्य इत्यादींवर बंदी आणून प्रजेला वाईट गोष्टीपासून परावृत्त केले. म्हणूनच अशोक आपल्या प्रजेचा सच्चा सेवक होता.

जगातील थोर सम्राटांच्यामध्ये अशोकाचे स्थान अद्वितीय आहे. संपूर्ण जगभर त्याची ख्याती धार्मिक धोरणाद्वारे पसरली. कलिंगच्या युद्धानंतर तो खरा धर्माशोक बनला. आपले पुढील जीवन धर्मप्रसार व लोककल्याणासाठी घालविले. प्रजेचे हित त्याच्या राजकारणाचे सुत्र बनले. सम्राटाला आवश्यक असणारे गुण अशोकामध्ये होते. त्याने मानवतावादी दृष्टीकोनातून केलेल्या कार्यामुळेच त्याचे नांव अजरामर झाले. तो खऱ्या अर्थाने राजर्षि ठरला. मानवी जीवनाच्या पावित्र्यावर अढळ श्रद्धा ठेवणारा हा सत्ताधीश होता. म्हणूनच देवांना प्रिय प्रजादक्ष राजा ही त्याची बिरूदावली योग्य ठरते. अशोकाच्या कारकिर्दीबद्दल डॉ. एच. जी. वेल्स यांच्या ''अशोक हा जगातील चमकणाऱ्या ताऱ्यापैकी एक सर्वात जास्त चमकणारा तारा आहे. की ज्याने नंतर येणाऱ्या पिढ्यांना नेहमीसाठी शांततेचा मार्ग दाखविला.'' या उद्‌गारातच अशोकाच्या योग्यतेचे मूल्यांकन होते.

● **स्वयं अध्ययन प्रश्न – २**

**अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) सम्राट अशोकाने ............. येथे तिसऱ्या बौद्ध परिषदेचे आयोजन केले होते.

अ) उज्जैनी ब) तक्षशिला क) पाटलीपुत्र ड) अयोध्या

२) सम्राट अशोकाने आपला मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा यांना ............. देशात धर्मप्रसारासाठी पाठविले होते.

अ) इजिप्त ब) नेपाळ क) सिरीया ड) श्रीलंका

३) सम्राट अशोकाने धर्मप्रसार व साहित्य निर्मितीसाठी ............. भाषेचा स्विकार केला.

अ) संस्कृत ब) पली क) हिंदी क) अर्धमागधी

४) ............. यांनी १८३७ मध्ये दिल्ली-टोपरा स्तंभावरील ब्राम्ही आलेखाचा अनुवाद केला.

अ) ख्रिस्ती धर्मोपदेशक ब) हटिंग्टन क) जेम्स प्रिन्सेप ड) टॉड

५) रायचूर जिल्ह्यातील ........... येथे सापडलेल्या शिलालेखात अशोक हे नाव कोरलेले आहेत.

अ) भालकी ब) भाब्रू क) कलिंग ड) नागार्जून

## ४.२.३ विभाग तिसरा : मौर्यांचे प्रशासन, स्वरूप :

प्राचीन भारताच्या इतिहासात विशाल साम्राज्य निर्मिती बरोबर कार्यक्षम प्रशासन यंत्रणा, राजकीय शांतता व स्थैर्य टिकविण्याचे कठीण कार्य मौर्य सम्राटांनी केले होते. विशाल भूभागावर चंद्रगुप्ताने आपले वर्चस्व प्रस्थापित करून वैशिष्ट्यपूर्ण व कार्यक्षम प्रशासन पद्धती अंमलात आणली. चंद्रगुप्ताला आर्यचाणक्य सारखा श्रेष्ठ राजनितिज्ञ व सल्लागार लाभलेला होता. त्याने प्राचीन वैदिक व महाभारतीय प्रशासन पद्धतीचे अनुकरण करून आणि त्यात स्वत:च्या विचारांची भर घालून मौर्य प्रशासन पद्धती निर्माण केली. कौटिल्याचे अर्थशास्त्र व मॅनेस्थेनिसचा इंडिका, काय्सिचे लिखाण यावरून मौर्यांच्या प्रशासन व्यवस्थेची सविस्तर माहिती मिळते. मौर्य प्रशासन इतके कार्यक्षम होते की, त्याच्यानंतर येणाऱ्या शासकांसाठी ते आदर्श ठरले. सम्राट अशोकाची प्रशासन व्यवस्था चंद्रगुप्ताप्रमाणेच होती. परंतु ही प्रशासन व्यवस्था अधिक अधिक प्रजाहितकारी व कल्याणकारी करण्यासाठी त्याने त्यात थोड्या सुधारणा केलेल्या दिसतात. कलिंगच्या एका अभिलेखामध्ये त्याने राजसत्ता ही भोगासाठी नसून त्यागासाठी आहे हे विचार मांडले. मौर्यांना आर्यचाणक्याचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे त्यांनी आखलेली व अंमलात आणलेली शासन व्यवस्था बरीच वर्षे टिकली होती.

● **मौर्य प्रशासनाचे स्वरूप :**

चंद्रगुप्ताने आर्यचाणक्याच्या सप्तांग सिद्धांताच्या सहाय्याने प्रशासन व्यवस्था निर्माण केली. त्यात राजा, मंत्रीमंडळ, राष्ट्र, प्रजा, दुर्ग, कोष, सैन्य व मित्र असे प्रशासनाचे स्वरूप होते. यापैकी कोणतेही अंग

दुबळे असल्यास देश संकटात पडतो असे चाणक्याचे मत होते. कौटिल्याची बुद्धीमत्ता आणि चंद्रगुप्ताचे शौर्य यामुळे त्याची प्रशासन व्यवस्था अत्यंत कार्यक्षम व कर्तव्यदक्ष होती. मौर्य शासकांनी प्रशासनावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी त्याचे विकेंद्रीकरण केले. त्यानुसार केंद्रीय, प्रांतीय, जिल्हा (प्रदेश), तालुका (विषय) ग्राम (खेडे) नगर प्रशासन अशी यंत्रणा निर्माण केली व त्यासाठी कार्यक्षम व कुशल अधिकाऱ्यांची नेमणूक केली. मौर्यांची प्रशासन व्यवस्था पुढीलप्रमाणे होती.

- **क्रेंद्रीय प्रशासन :**

केंद्रीय प्रशासनाचे प्रमुख तीन भाग पाडता येतील. १) राजा, २) मंत्रीपरिषद, ३) विविध खाती.

**१) राजा :**

मौर्यांच्या काळात राजा हा सर्वांचा केंद्रबिंदू मानला जाई. तरीही मौर्य सम्राट अनियंत्रित शासक नव्हते. आपल्या सत्तेचा त्यांनी कधीही दुरुपयोग केला नव्हता. राज्याच्या अधिकारावर रूढी, परंपरा, चालिरीती व मंत्रीपरिषद यांच्या बंधनाचा त्यांनी विसर पडू दिला नाही. 'प्रजेचे कल्याण' हेच तत्व समोर ठेवून त्यांनी राज्यकारभार केला. परकीय आक्रमणापासून प्रजेचे संरक्षण करून शांतता व सुव्यवस्था निर्माण करून प्रजेला सुखी समृद्ध ठेवणे हे राज्याचे आद्यकर्तव्य मानले जात असे. न्यायदान, परराष्ट्रीय धोरण, प्रजेचे हित व कल्याण साधण्याचा प्रयत्न मौर्य प्रशासकांनी केल्याचे दिसते. हिंदू धर्मशास्त्र नीती यांच्या नियमानुसार राज्य करून जनतेचे कल्याण साधण्याचा प्रयत्न केला.

**२) मंत्री परिषद :**

राजा सर्व सत्ताधीश असला तरी एवढ्या मोठ्या साम्राज्याचा कारभार एकट्या राजाला करणे शक्य नव्हते. म्हणून त्याने मंत्री परिषदेची निर्मिती केली. मंत्र्यांनाही मौर्यकाळात राजा प्रमाणे महत्त्वाचे स्थान होते. राजाला राज्य कारभार मदत करण्याचे काम मंत्री करीत असत. मंत्री परिषदेतील मंत्र्यांची नेमणूक राजा स्वत: करीत असे. विद्वान, कार्यक्षम, सुशिक्षित, प्रामाणि, अनुभवी व्यक्तींची या पदावर नियुक्ती होत असे. मंत्री परिषदेतील मंत्र्यांच्या संख्येवर कोणतेही बंधन ठेवलेले नव्हते. राजपुरोहित सेनापती युवराज समवेत १० ते १२ मंत्र्यांचा समावेश असे. परिषदेच्या सचिवास 'परिषदाध्यक्ष' म्हणत. मौर्य काळातील प्रमुख मंत्री व त्यांची कामे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) महामंत्री :** अर्थशास्त्रानुसार महामंत्री हा मंत्रीपरिषदेतील सर्वात उच्च स्थान असलेला मंत्री होता. केंद्रीय प्रशासनात अमात्य, महामात्र व अध्यक्ष नियुक्त केलेले असत. निरनिराळ्या विभागासाठी १८ अध्यक्ष नियुक्त केलेले असत.

**२) मंत्री व पुरोहित :** ही दोन्ही पदे भिन्न असून ही चंद्रगुप्ताच्या काळात आर्यचाणक्याकडे होती. परराष्ट्र धोरण, हेर नियुक्ती व अधिकाऱ्यांची निवड, प्रशिक्षण हे अमात्यांची निवड इ. बाबतीचे अधिकार त्यांच्याकडे असते.

**३) समाहर्ता (महसूल मंत्री) :** राज्याचा महसूल गोळा करण्याचे काम या मंत्र्याकडे असे. महसूल वसुली व इतर करवसुली मदतीला सुराध्यक्ष, शुल्काध्यक्ष, सिमाध्यक्ष,पोताध्यक्ष असत.

**४) सेनापती :** युद्धविभागाच्या अधिकाऱ्यास सेनापती म्हणत. चाणक्याच्या मते सेनापतीला युद्धाचे परिपूर्ण ज्ञान हवेच. युद्ध विभागाचे सैन्य सुसज्ज, कार्यक्षम ठेवणे इ. कामे असत.

**५) युवराज :** हा राज्याचा वारस असे म्हणून जेष्ठ पुत्राची नेमणूक त्याच्याकडे एखाद्या प्रांताचे प्रशासन सोपविले जाई.

**६) प्रदेष्टा :** धर्मस्थीय व कंटकशोधन अशी दोन न्यायालये होती. कंटकशोधनाच्या न्यायाधिशास प्रदेष्टा म्हणत. प्रजेला नैतिक अपराधापासून हा वाचवित असे.

**७) व्यवहारिक :** राज्यातील धर्मस्थीय दिवाणी न्यायालयाचे काम पहात असे.

**८) कर्मान्तक :** राज्यातील शेती, जंगले, खाणी, उद्योगधंदे यांचे व्यवस्थापन व देखरेख यांचे काम त्याच्याकडे सोपविले असे.

**९) नायक :** सैन्याच्या हालचालींची व छावण्यांची व्यवस्था ठेवणे यासाठी या मंत्र्याची नियुक्ती केलेली असे.

**१०) दंडपाल :** सैन्यांच्या गरजांची पुर्तता करणे.

**११) अंतपाल :** परकीय आक्रमणापासून सीमांचे संरक्षण करण्यासाठी खास अंतपाल या मंत्र्याची नेमणूक केली असे.

**१२) दुर्गपाल :** किल्ल्यांचे व्यवस्थापन व संरक्षण यासाठी या मंत्र्यांची नेमणूक असे.

**१३) दैवारिक :** राजप्रसादाचा प्रमुख, राजप्रसादाची व्यवस्था व रक्षण करणे हे काम या मंत्र्यांचे असे.

**१४) आटविक (वनमंत्री) :** राज्यातील जंगले सुरक्षित ठेवणे हे काम त्याच्याकडे असे.

**१५) अन्तर्वशिक :** राजाचा शरीररक्षक दलाचा प्रमुख म्हणून काम करीत असे.

**१६) पौर :** नगरे व शहरे यांची सर्व प्रकारची शासन व्यवस्था पाहणारा सर्वोच्य अधिकारी म्हणून त्याला जबाबदारी पार पाडावी लागत असे.

**१७) प्रशास्ता :** राज्याच्या सर्व विभागांची कागदपत्रे सुव्यवस्थित राखणे हे यांचे काम होते.

**३) विविध खाती :**

**१) गुप्तहेरखाते :** राजाने कान व डोळे म्हणजे त्याचे हेरखाते समजले जात असे. चंद्रगुप्ताचे हेरखाते अतिशय कार्यक्षम होते. हेरखात्यात स्त्रियांचाही सहभाग होता. हेरांना प्रतिवेतक म्हणत. तसेच त्यांना गूढ पुरुष ही म्हणत. अत्यंत प्रामाणिक व स्वामिनिष्ठ कार्यक्षम अशा विश्वासू व्यक्तीचीच निवड हेरखात्यात केली जाई.

सांकेतिक भाषा, परवलीचे शब्द तसेच कबुतरांचा उपयोग हेरगिरीसाठी करत. ज्योतिषी, संन्यासी, व्यापारी, घरगडी, विषकन्या इ. वेषात हेर संपूर्ण साम्राज्यात विखुरलेले असत.

**२) लष्करी प्रशासन :** साम्राज्याच्या संरक्षणासाठी मौर्य शासकांनी सुसज्ज व शिस्तबद्ध लष्कर निर्माण केले होते. लष्कराचा प्रमुख सेनापती असे. सम्राट स्वतः युद्धाचे नेतृत्व करीत असे. लष्करी प्रशासनात सुसुत्रता येण्यासाठी पाच सभासदाच्या सहा समित्या होत्या. पायदल, अश्वदल, रथदल, हत्तीदल, नौदल, रसद व दळणवळण ह्या सहा समित्या होत्या. ग्रीक इतिहासकारांच्या मते, मौर्यांकडे ८ लाख भूदल, ३० हजार घोडदळ, ९ हजार हस्तीदल, १ हजार रथ शिवाय वाहतकुीसाठी बैलगाड्या जलवाहतूकीसाठी नावा व जहाजे अशी प्रचंड सेना होती. चंद्रगुप्ताची लष्करव्यवस्था उपयुक्त व आधुनिक स्वरूपाची होती.

**३) महसूल व्यवस्था :** कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा महसूल हा पाया असून राज्याची सांपत्तीक स्थिती चांगली असेल तर जनकल्याण साधता येते. जनकल्याण साधले तर राज्य समृद्धीच्या दिशेने वाटचाल करते. आर्यचाणक्याच्या या मतानुसार राज्याचा खजिना भरलेला असावा. आर्यचाणक्याच्या या धोरणानेच मौर्य सम्राटांनी महसूल व्यवस्था भक्कम बनविली. उत्पन्नाच्या १/४ किंवा १/६ एवढा महसूल गोळा केला जाई. महसुलाशिवाय खाणीवरचा कर, विक्रीकर, मिठावरील कर, अबकारी कर, परवाना फी, पाणीपट्टी इ. उत्पादनाच्या बाबी होत्या. धान्याच्या किंवा पैशाच्या रूपाने हा कर वसूल करण्यात येत असे. अर्थखात्याच्या प्रमुखाला 'भंडारिक' म्हणत. कर चुकविणाऱ्यांने कठोर शासन असे. 'बलि' व 'भाग' असे कराचे दोन प्रकार होते. 'बलि' हा धार्मिक कर असे तर 'भाग' शेतावरील कर असे स्त्रिया, ब्राह्मण, अपंग, अनाथ व राजपरिवारांना करातून वगळण्यात येत असे. राजाची मालमत्ता व जमिनीतून 'सीत' नावाचा कर जमा होत असे.

**४) खर्चाच्या बाबी :** मुलकी लष्करी अधिकाऱ्याचे वेतन, दरबाराचा खर्च, लोककल्याणकारी योजना, धर्मप्रसार स्थापत्य यावर प्रामुख्याने खर्च केला जात असे.

**५) न्याय प्रशासन :** कौटिल्याच्या अर्थशास्त्रातून मौर्य काळातील न्याय प्रशासनाची माहिती मिळते. मौर्य काळात न्यायव्यवस्था विकसित झाली होती. सम्राट सर्वोच्च न्यायाधिश असे. श्रेष्ठ न्यायाधिशाला प्रांगविवाक व कनिष्ठ न्यायाधिशाला 'धर्माध्यक्ष' असे म्हणत. न्यायव्यवस्थेत धर्मस्थीय (दिवाणी) कंटकशोधन (फौजदारी) अशी न्यायालये होती. विवाह वारसा सीमावाद, करारभंग, ऋण यांचा समावेश धर्मस्थीय न्यायालयात होत असे. चोरी, दरोडे, मारामारी, खून, बलात्कार, भेसळ, लाचलुचपत, राजद्रोह, न्यायभंग इ. विषयाचे खटले कंटक शोधन न्यायालयात चालत. नगर व जनपदासाठी महामात्र वराजुक यांची न्यायालये होती. खेड्यात ग्राम न्यायालये होती. त्यात अनुभवी लोकांची नियुक्ती केली जात असे. गुन्हेगाराला कठोर शिक्षा मिळत असे. त्यामुळे कडक शिक्षेच्या भितीमुळे कमी गुन्हे घडत. मॅगेस्थेनिस म्हणतो, ''चंद्रगुप्ताच्या काळात लोक निर्भय होते. घरांना कुलूप न लावता बाहेर जात. मौर्य काळातील ही न्याय व शिक्षापद्धती राष्ट्र व समाजहिताला पोषक होती.

**६) सार्वजनिक कामे :** मौर्यराजे प्रजेच्या कल्याणाकडे लक्ष देणारे होते. त्यांनी लोक कल्याणाची

कामे करण्यासाठी स्वतंत्र विभाग निर्माण केला होता. त्यास आज पी.डब्ल्यू.डी. म्हणतात. या विभागाकडे रस्ते, पूल बांधणे, झाडे लावणे, विहीर खोदणे, धर्मशाळा बांधणे, दवाखाने, अनाथालये, पशुपक्षी व मानवासाठी मोफत औषधालय, शाळा, महाविद्यालये, नाट्यगृह, सुंदर उद्याने, पोहण्यासाठी तलाव, धर्ममंदीर, पूल, धरणे, कालवे, विश्रामगृहे, मदत केंद्रे अशा लोकोपयोगी सार्वजनिक सेवा, शासनामार्फत दिल्या.

**७) कालवे व पाटबंधारे :** ह्या काळात शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने या खात्याची निर्मिती केली होती. जुने कालवे दुरुस्त केले. नवीन कालवे बांधले. ही कामे शासनाकडून केली जात. सौराष्ट्रातील गिरनार येथील प्रसिद्ध सुदर्शन तलाव, चंद्रगुप्ताचा प्रांतीय अधिकारी पुष्यगुप्त यांच्या देखरेखीखाली बांधला. त्याची दुरुस्ती अशोकाचा यवन सुभेदार तुशास्प याने केली. मोठी धरणे, बंधारे यांची कामे गावकऱ्याच्या सहकार्याने केली जात असत.

**८) आरोग्य :** सार्वजनिक आरोग्याची चांगली काळजी घेण्यात येईल. रोग्यासाठी सरकारी दवाखाने चालविले जात. औषधी वनस्पतींच्या सरकारी बागा होत्या. वैद्य, शस्त्रवैद्य, दाया याचा उल्लेख अर्थशशस्त्रात आहे. संशयास्पद मृतदेहाचे विच्छेदन करून मृत्यूचे कारण शोधले जाई. आरोग्य रक्षणासाठी अन्न, औषधे, मीठ व तेल यातून भेसळ करणाऱ्यास कडक शिक्षा दिली जाईल. सार्वजनिक स्वच्छतेविषयी कडक नियम होते.

**९) जनगणना :** करनियोजन, आरोग्य, संरक्षण, राष्ट्रीय उत्पन्न व इतर राजकीय कारणासाठी लोकसंख्येची गणना करीत असत. यासाठी स्वतंत्र खाते होते. गावातील अधिकाऱ्यामार्फत गावातील लोकांची जात, लिंग, वय, उद्योग, उत्पन्न, चारित्र्य इत्यादींची सविस्तर माहिती मिळत असे.

- **प्रांतिक प्रशासन :**

चंद्रगुप्त मौर्याने विशाल साम्राज्याचे प्रशसानाच्या सोयीसाठी प्रांतामध्ये विभाजन केले होते. तीच पद्धत अशोकानेही अवलंबिली होती. प्रांताच्या प्रमुखाला प्रांताधिपती किंवा प्रांताधिकारी म्हणत. यापदी राजपुत्राची नेमणूक होत असे. प्रांताधिपतीच्या मदतीला प्रांतपरिषद असे. मौर्यांच्या प्रांतीय प्रशासनात पुढील विभाग होते.

**१) उत्तर पथ :** वायव्य सरहद्द प्रांताचा त्यात समावेश केलेला होता. त्याची राजधानी तक्षशिला होती. पंजाब, सिंध, काश्मीर, अफगाणिस्तान इ. प्रदेशाचा समावेश होता.

**२) दक्षिण पथ :** विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेशाचा मिळून हा प्रांत केलेला होता. त्याची राजधानी सुवर्णगिरी होती.

**३) पश्चिमपथ किंवा अवंती पथ :** गुजराथ, कवठेवाड, राजस्थान, माळवा यांचा समावेश या प्रांतात होता. त्याची राजधानी उज्जैन किंवा अवंती होती.

**४) पूर्वपथ किंवा प्राच्य विभाग :** या विभागात मगध व आसपासच्या प्रदेशाचा समावेश होता. त्याची राजधानी पाटलीपुत्र होती.

**५) सेल्युकसजित प्रदेश :** या विभागात सेल्युकस निकेटर कडून जिंकलेल्या प्रदेशाचा समावेश होता. या प्रदेशाची राजधानी कपिशा होती.

**६) सुराष्ट्र –** सौराष्ट्र, जुनागड इ. प्रदेशाचा समावेश या विभागात होता. त्याची राजधानी गिरनार होती.

- **जिल्हा प्रशासन :**

प्रांताचे विभाजन निरनिराळ्या जिल्ह्यात किंवा प्रदेशात केले जात असे. त्याच्या प्रमुखाला प्रादेशिक म्हणत. रज्जुक आणि युक्त असे दोन अधिकारी असत. रज्जुक भूमापन अधिकारी तर युक्त जिल्ह्याचा पत्रव्यवहार व हिशोबाचे काम पहात असे.

**तालुका (विषय) :** प्रदेशाचे / जिल्ह्याचे विभाजन विषयात केले जाई. त्याच्या प्रमुखास 'विषपती' म्हणत.

**ग्राम प्रशासन :** विश याचे ग्रामात विभाजन केले जाई. चंद्रगुप्ताच्या प्रशासनातील सर्वात लहान घटक म्हणजे ग्रामप्रशासन त्याच्या प्रमुखाला ग्रामिक म्हणत. ग्रामपंचायतीच्या सहाय्याने त्याचा कारभार चालत असे.

- **नगर प्रशासन :**

आर्य चाणक्य, मॅगेस्थेनिस यांनी लिहून ठेवलेल्या माहितीवरून नगर प्रशासनास फार महत्त्वाचे स्थान मौर्य प्रशासनात होते. नगराचा कारभार स्वतंत्रपणे केला जात असे. त्यासाठी स्थानिक लोकांची स्वतंत्र प्रशासन व्यवस्था निर्माण केली जात असे. पाच सभासदांच्या सहा समित्या निर्माण केल्या जात असत. त्याच्या प्रमुखास नगरविता (महापौर) नगराध्यक्ष, पौरपाल म्हणत. या सहा समित्यांची कामे पुढीलप्रमाणे होती.

**१) शिल्पकला समिती :** औद्योगिक क्षेत्रात लागणाऱ्या वस्तूंची पारख करणे, कामगारांचे वेतन ठरविणे, त्यांचे रक्षण इ. कामे या समितीकडे होती.

**२) परदेशीयांसाठी समिती :** परकियांची नोंद ठेवणे, त्यांच्या गरजा, राहण्याची, भोजनाची, औषधांची व्यवस्था करणे.

**३) जनगणना समिती :** शहरातील जन्म मृत्यूची नोंद ठेवणे.

**४) वाणिज्य समिती :** व्यापारावर या समितीची देखरेख असे विकले जाणारे सामान, वजने, मापे यांच्यावर या समितीचे नियंत्रण होते.

**५) उद्योग समिती :** कारखान्यातून व व्यक्तीगत पद्धतीने निर्माण होणाऱ्या वस्तूंवर देखरेख करणे, भेसळ करणाऱ्या लोकांना दंड करणे हे काम या समितीला करावे लागे.

**६) कर समिती :** मालाच्या विक्रीवरील कर, जकात हे कर वसूल करणे ही कामे या समितीची होती. कर चुकविणाऱ्यास कठोर शिक्षा दिली जात असे.

मौर्यांची प्रशासन व्यवस्था अत्यंत पुरोगामी होती. मौर्य सत्ताधिशांनी प्रशासन व्यवस्थेत आदर्श व लोकाभिमुख राज्यकारभार करून शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. काही प्रमाणात दोष जरी जाणवत असले तरी एक कार्यक्षम व प्रजाहितदक्ष राज्यव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न मौर्य सम्राटांनी केलेला दिसून येतो. मौर्य शासकांच्या हाती जरी अमर्याद सत्ता असली तरी त्यांनी 'कल्याणकारी राज्याची संकल्पना' राबविली होती.

- **स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) सप्तांग सिद्धांतानुसार कोणत्या सम्राटाने आपली प्रशासन व्यवस्था निर्माण केली होती?

२) चंद्रगुप्ताच्या काळात मंत्री व पुरोहित ही दोन्ही पदे कोणाकडे होती?

३) मौर्य काळात राजप्रसादाच्या प्रमुखाला काय म्हणत असत?

४) मौर्य काळात अर्थ खात्याच्या प्रमुखाला काय म्हणत?

५) मौर्य काळात कोणत्या ठिकाणी सुदर्शन तलाव बांधला होता?

**४.३ सारांश :**

प्राचीन भारताच्या इतिहासात मौर्यांनी विशाल साम्राज्य निर्माण केले व आपली सार्वभौम सत्ता निर्माण केली. मौर्य घराण्यांचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य याने बलाढ्य साम्राज्याची निर्मिती केली. प्रगत व समृद्ध सामाजिक जीवन हे मौर्यकाळाचे वैशिष्ट्य होते. विशाल साम्राज्य कार्यक्षम व प्रजाहित दक्ष राजे यामुळेच मौर्यांच्या राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली होती. मौर्यांनी प्रजेच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविल्या. त्यामुळे साम्राज्यात आर्थिक समृद्धता निर्माण झाली. त्यामुळे मौर्यकाळ सर्वांगीण प्रगतीचा व स्थैर्याचा काळ खंड निर्माण होवून प्रजा सुखी संपन्न बनली. चंद्रगुप्तानंतर त्याचा मुलगा बिंदूसार हा सत्तेवर आला. त्याने २५ वर्षे राज्य केले. त्याने शत्रूवर वचक निर्माण केला. त्याने आपल्या वडीलांच्या राज्याचे रक्षण केले. जवळच्या राजांशी त्याने मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. बिंदूसारच्या दरबारात परकीय वकील होते. बिंदूसारनंतर त्याचा मुलगा सम्राट अशोक सत्तेवर आला. मुळातच प्रतिभावंत व महत्त्वकांक्षी असलेल्या अशोकाने वारसा संघर्ष करून सत्ता करून प्राप्त केली. राज्यारोहणानंतर त्याने साम्राज्य विस्ताराचे धोरण आखले. काश्मिरवर विजय संपादन केला. हिमालयापर्यंत मौर्य साम्राज्याचा विस्तार केला. राज्य विस्तारावरील कलिंग युद्ध त्याच्या जीवनाला कलाटणी देणारे ठरले. कलिंगयुद्धातील प्रचंड हानी व भयंकर संहाराने त्याचे मतपरिवर्तन झाले. यापुढे कधीही युद्ध न करण्याची व हातात शस्त्र न घेण्याची प्रतिज्ञा केली. ही घटना जगाच्या इतिहासात युगप्रवर्तक ठरली. त्याने मानव जातीचा विकास घडवून आणण्यासाठी सत्य, अहिंसा, दया, क्षमा, शांती, जनहित याकरीता आपले आयुष्य व्यतित केले. अशोकाने बौद्ध धर्माचा स्विकार केला. अशोकाचा धम्म अत्यंत वास्तववादी व व्यवहारीक तत्त्वावर आधारलेला होता. अशोकाने तत्त्वज्ञानावर भर न देता नैतिक आचारणावर भर देणारा धर्म प्रसारीत केला. आत्म्याचे शुद्धत्व व चारित्र्य संपन्नता त्याच्या

धम्माची नितितत्त्वे होती. परोपकार, कृतज्ञता, सेवावृत्ती, औदार्य, अहिंसा, दया, दान, शील व शांती ह्या सद्‌गुणांची मनुष्यात वृद्धी व्हावी अशी अशोकाची धर्मतत्त्वे होती. बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी अशोकाने देशात व देशाबाहेर यंत्रणा राबविली. शिलालेख व स्तंभालेख कोरून त्यावर धर्मनिती, धर्मतत्वे, राजाज्ञा, नीती तत्वे इत्यादी सद्‌गुणांचे प्रजेने आचरण करावे. त्यासाठी अविरत प्रयत्न केले हे आलेख म्हणजे अशोकाचे कोरीव आत्मचरित्रच होते. अशोकाने बौद्ध धर्मास राजाश्रय देवून त्याला विश्वधर्म बनविले.

प्राचीन भारताच्या इतहासात विशाल साम्राज्य निर्मितीबरोबर कार्यक्षम यंत्रणा, राजकीय शांतता व स्थैर्य टिकविण्याचे कार्य मौर्य सम्राटांनी केले. कौटिल्याच्या मार्गदर्शनाखाली त्याने प्रशासनाची रचना केली. अर्थशास्त्रातील 'सप्तांग सिद्धांता'च्या सहाय्याने चंद्रगुप्ताने आपल्या राज्याची प्रशासन व्यवस्था निर्माण केली. आपल्या प्रशासनाचे केंद्रीय, प्रांतीय, जिल्हा, तालुका, ग्राम, नगर असे विकेंद्रीकरण करून कार्यक्षम अधिकारी वर्ग नियुक्त करून आदर्श व लोकाभिमुख राज्यकारभार निर्माण करून शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. त्यामुळे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, जीवनात स्थैर्य लाभले. विशाल साम्राज्य विस्ताराच्या कार्याबरोबरच, प्रजेच्या सुख समृद्धीचे प्रयत्न केल्याने या काळातील समाजाच्या जीवनाच्या सर्वांगीण क्षेत्रात प्रगती झाली. राजकीय शांततेमुळे सुख शांती समृद्धी आणि व्यवस्था नांदू लागली. त्यामुळे सांस्कृतीक जीवनात प्रगती साधने शक्य झाले.

अशाप्रकारे मौर्य शासकांनी एकसंघ साम्राज्य, सहिष्णू, धार्मिक धोरण, उत्कृष्ठ प्रशासन यंत्रणा द्वारे भारतीय इतिहास एक वैभव संपन्न युगाचा प्रारंभ केला.

### ४.४ पारिभाषिक शब्द :

समाहर्ता - महसूल मंत्री

प्रदेष्टा - फौजदारी न्यायालयीन अधिकारी

व्यावहारिक - दिवाणी न्यायालयीन अधिकारी

कर्मान्तक - उद्योगमंत्री

दंडपाल - सैन्याच्या गरजांची पूर्तता करणारा अधिकारी

अंतपाल - सीमेवरील अधिकारी

दौवारिक - राजप्रसादाचा प्रमुख

पौर - नगराचा प्रमुख

प्रशास्ता - कागदपत्र रेकॉर्ड अधिकारी

हेर - गुप्त दूत

बलि - धार्मिक कर

ग्रामिक - खेड्याचा / ग्रामाचा प्रमुख

धम्म - धर्म

धर्म विभाग - धर्म प्रचारकांचा नवीन विभाग

स्तूप - गौतम बुद्धांच्या अस्थी / रक्षा अवशेषावर बांधलेले स्मारक

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तर :

- **स्वयं अध्ययन प्रश्न - १**

| | | |
|---|---|---|
| १ - अ) चंद्रगुप्त | २ - ब) मिलिंद पन्हो | ३ - ब) मॅगेस्थेनिस |
| ४ - अ) जुनागड | ५ - ब) गिरनार | |

- **स्वयं अध्ययन प्रश्न - २**

| | | |
|---|---|---|
| १ - क) पाटलीपुत्र | २ - ड) श्रीलंका | ३ - ब) पाली |
| ४ - क) जेम्स प्रिन्सेस | ५ - अ) भालकी | |

- **स्वयं अध्ययन प्रश्न - ३**

| | | |
|---|---|---|
| १) चंद्रगुप्त | २) आचार्य चाणक्य | ३) दौवारिक |
| ४) भंडारिक | ५) गिरनार | |

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) चंद्रगुप्त मौर्याच्या कामगिरीचे वर्णन करा.

२) अशोकाचा धम्म म्हणजे काय ? त्याच्या प्रचारार्थ त्याने केलेल्या उपाय योजना सांगा.

३) मौर्य कालीन केंद्रीय प्रशासनाची माहिती सांगा.

**ब) टिपा लिहा.**

१) बिंदूसार

२) कलिंगच्या विजयाचे परिणाम व महत्त्व

३) अशोकाचे शिलालेख

४) अशोकाची योग्यता

५) मौर्यकालीन प्रांतीक प्रशासन

### ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) मदन मार्डीकर - प्राचीन भारताचा इतिहास.

२) पी. व्ही. काटे - प्राचीन भारताचा इतिहास

३) रोमिला थापर - प्राचीन भारताचा इतिहास

४) पी. जी. जोशी - भारताचा इतिहास

५) पी. जी. जोशी - प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास

५) प्रभाकर देव - प्राचीन भारत

६) गजानन भिडे - प्राचीन भारत

८) डॉ. धनंजय आचार्य - भारताचा इतिहास.

९) भिडे, पाटील - प्राचीन भारतीय इतिहास

१०) गायधनी राहूल - प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास

११) विभा आठल्ये - प्राचीन व मध्ययुगीन भारत.

१२) डी. एस. झा - प्राचीन भारत का इतिहास.

१३) जे. एल. मेहता - प्राचीन भारताचा समग्र इतिहास.

१४) श. गो. कोलारकर - भारताचा इतिहास प्राचीन व मध्ययुगिन.

❖ ❖ ❖